IRBK-0100195

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय चरित्र
दा क्र १९५

IRBK-0100195
IRBK-0100195

दा. क्र. १९५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

৩৬৬
ধারা।

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प आठरावें.

# केसरची प्रभावळ !



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
भगवान् श्रीकृष्ण.

प्रकाशक—प्र. श्री. भसे, गिरगांव—मुंबई.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर,
'जगद्धितेच्छु प्रेस', ४३२ शनवार, पुणें.

१९१६.

IRBK-0100195

(सर्व हक्क स्वाधीन.)

किंमत बारा आणे.

श्री
वा. क्र.
दि.

पुढील पुस्तक

## स्वप्नमय आयुष्य !

ही सामाजिक कादंबरी असून ती सर्वांगांनीं सुंदर करण्याचा शक्य तो प्रयत्न केला जाईल. पुस्तक जुलैच्या पहिल्या आठवड्यांत आश्रयदात्यांच्या हातीं पडेल. ज्या आश्रयदात्यांना वर्गणीदारांतून नांव काढून टाकावयाचें असेल, त्यांनीं व्ही.पी.परत करून ग्रंथमालेचें निष्कारण नुकसान न करतां तसें कळविण्याची आतांच दया करावी.

# कालाय तस्मै नमः

१८५

ग्रंथप्रकाशनाचा व्यवसाय हल्लींच्या बिकट प्रसंगीं किती त्रासदायक झाला आहे, हें वर्णन करून सांगतां येणें कठिण होय. उत्कृष्ट प्रकारचें ग्रंथप्रकाशन हें निदान महाराष्ट्रांत तरी प्रथमपासून धोक्याचें आहे. त्यांत आणखी महायुद्धानें आपली आंच दरिद्री आणि उद्योगधंद्याच्या दृष्टीनें अगदींच मागें पडलेल्या हिंदुस्थानास देण्यास आरंभ केल्यापासून या धंद्यास अगदींच वाईट दिवस आले आहेत, असें ह्मणणें भाग पडतें. ग्रंथ-प्रकाशनाचा धंदा ह्मटला ह्मणजे तो सर्वस्वी कागद, शाई वगैरे वस्तूंवर अवलंबून आहे, हें अगदीं उघड होय आणि ह्या सर्व वस्तु परदेशांतून येत असल्यामुळें त्यांचे भाव वाढतां वाढतां आज ते इतके वाढले आहेत कीं, ग्रंथप्रकाशनाचा व्यवसाय आणि दुर्दैव यांचा निकट संबंध आणखी कांहीं दिवस असाच राहणार, असें स्पष्ट दिसूं लागलें आहे. भारत–गौरव–ग्रंथमालेनें हा व्यवसाय संपत्ति मिळवावी या दृष्टीनें हातीं घेतला नसून अगदीं थोड्या किंमतींत उत्कृष्ट व निर्दोष वाङ्मय महाराष्ट्रीयांच्या हातीं द्यावें, एवढ्या एकाच उद्देशानें हातीं घेतला आहे. अर्थात् या ग्रंथमालेनें पूर्वीं जी सहा आणे किंमत ठेवली होती, ती इतकी बेताची होती कीं, तेवढ्यांत ग्रंथमालेचा खर्च जेमतेमच भागत असे. इतकेंच नव्हे, तर या ग्रंथमालेला सहा आण्यांत कसें पुस्तक देतां येतें, याचेंच पुष्कळांना आश्चर्य वाटत असे. वास्तविक ग्रंथमालेला तर आपल्या व्यव-सायांत यापेक्षांहि अधिक क्रांति घडवून आणावयाची होती पुस्तकाची किंमत आहे हीच कायम ठेवून अधिक पृष्ठसंख्या हळू हळू वाढवाव-याची, या योजनेत ग्रंथमाला होती; परंतु इतक्यांत महायुद्धाची नौबत गाजली आणि ग्रंथमालेचें मनोराज्य तसेंच राहिलें. ग्रंथमालेंत बाह्याव-गाच्या दृष्टीनें सुधारणा करण्याचें अशा आकस्मिक रीतीनें बंद पडल्या-वर, निदान आहे ही स्थिति तरी कायम राहील असें वाटत होतें; परंतु बाहेरून येणारी प्रत्येक वस्तु कल्पनेच्या बाहेर महाग झाल्यामुळें इच्छा नसतांनाहि पुस्तकाची किंमत किंचित् वाढवावी लागली. पुस्तकाची

किंमत आठ आणे केल्यापासून पुष्कळांनीं या बाबतींत ग्रंथमालेस निरनिराळे प्रश्न केले आहेत; परंतु त्यांना त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें दुसरीकडून मिळाली असावींत असें वाटतें. लंडन शहरांतील सुप्रसिद्ध दैनिक स्ट्यांडर्ड कागदाची किंमत विलक्षण वाढल्यामुळें त्याच्या मालकास तें बंद करावें लागलें इंग्लंडांतून येणारीं पुस्तकें पूर्वीं एका शिलिंगास नऊ आणे या किंमतीनें विकलीं जात असत, तींच आतां नऊ आण्याऐवजीं चवदा आण्यांस विकलीं जात आहेत, ही गोष्ट आतां जगजाहीर झाली आहे. ही बाहेरची गोष्ट ज्यांना माहीत नसेल, त्यांना प्रसिद्ध केसरी पत्रावरून पुष्कळ बोध होण्यासारखा आहे. केसरी पत्रानें आपली पुरवणी बंद करून जाहिरातींचे दर सव्वापटीनें वाढविले, हें आतां सर्वश्रुतच झालें आहे. चोंहोकडे अशा प्रकारचें स्थित्यंतर स्पष्ट दिसत असतां एकट्या भारत–गौरव–ग्रंथमालेनें मात्र आपल्या पुस्तकाच्या किंमती वाढवूं नयेत, हें ह्मणणें कितपत न्याय संगत आहे, याचा आश्रयदात्यांनीं अवश्य विचार करावा. शिवाय ज्या मानानें मुद्रणसामग्री महाग झाली आहे, त्या मानानें ग्रंथमालेनें किंमत वाढविली नाहीं, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हल्लींसारख्या विकट स्थितींत आठ आणे किंमतींतहि जो मोबदला आश्रयदात्यांना आह्मी देत आहों, त्याचा आश्रयदात्यांनीं बारीक नजरेनें विचार केल्यास त्यांना याबद्दल विस्मय वाटल्यावांचून राहणार नाहीं. सध्यांच त्यांच्या हातीं असलेल्या ‘ केसरची प्रभावळ ’ या पुस्तकाचा त्यांनीं कितीहि चवकस बुद्धीनें विचार केला, तरी त्यांना अजूनहि ग्रंथमालेचीं पुस्तकें कल्पनातीत स्वस्त आहेत, असेंच वाटेल. आजहि मुद्रणसामग्रीचा बाजार अनिश्चित स्थितींत जरी आहे, तरी यापेक्षां अधिक किंमत वाढविण्याची ग्रंथमालेची मुळींच इच्छा नाहीं. आश्रयदात्यांच्या अंतःकरणांत ग्रंथमालेविषयीं कितीहि आदर वसत असला, तरी महागाईच्या दिवसांत आश्रयदात्यांच्या ताण पडलेल्या खिशांना अधिक ताण देणें, हें अनुचित असल्यामुळें यापेक्षां अधिक किंमत वाढवावयाची नाहीं, असा ग्रंथमालेनें निश्चय केलेला आहे. आमचा हा निश्चय तडीस नेणें हें आश्रयदात्यांच्याच हातीं आहे. जुन्या आश्रयदात्यांनीं अधिकाधिक नवीन आश्रयदाते मिळवून देण्याचा

क्रम असाच चालू ठेवल्यास या विलक्षण संकटांतूनहि ग्रंथमाला पार पडेल, असा आह्मांस भरंवसा वाटतो.

मागील खेपेस विनंति केल्याप्रमाणें ज्यांच्याकडून नवीन आश्रयदात्यांची जोड मिळाली, त्यांचे आह्मी अत्यंत आभार मानतों. पुस्तकाची किंमत वाढविल्यामुळें अशा प्रकारची मदत आश्रयदात्यांकडून होईल किंवा नाहीं, याची आह्मांस बरीच शंका वाटत होती; परंतु उलट पूर्वीपेक्षां अधिक लोकाश्रय मिळाला, हें कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो. या वेळींहि आश्रयदात्यांकडून पूर्वीप्रमाणेंच मदत होईल अशी आह्मांस आशा आहे. हल्लींसारख्या बिकट स्थितींत भारत-गौरव-ग्रंथमालेस अधिक लोकाश्रयाची किती आवश्यकता आहे, हें आतां आश्रयदात्यांना समजावून सांगण्याचें कांहीं कारण नाहीं, असें वाटतें. जितका अधिक लोकाश्रय मिळेल तितका ग्रंथमालेला पाहिजेच आहे आणि या आश्रयास ग्रंथमाला पात्र आहे हेंहि तिनें आतां सर्वांना पटवून दिलें आहे. ग्रंथमालेनें पत्करलेलें हें वाङ्मयसेवेचें व्रत असेंच सतत चालविलें जावें, असा ध्वनि सर्वत्र निघतो व आह्मीहि या बाबतींत प्रयत्नाची शिकस्त करणार आहों. तथापि आश्रयदात्यांनीं नवीन आश्रयदाते मिळवून देण्याचे कामीं हयगय व उपेक्षा करूं नये, अशी सर्वांना अत्यंत कळकळीची विनंति आहे. जों जों लोकाश्रय वाढत जाईल, तों तों वाङ्मयसेवेचें क्षेत्र वाढविण्यास ग्रंथमालेला अवसर मिळणार आहे व आमचीहि अशीच इच्छा आहे कीं, अधिक मिळणाऱ्या लोकाश्रयाचा मोबदला आश्रयदात्यांनाच परत करावयाचा. महायुद्ध संपून पुन्हा पूर्व स्थितीवर बाजारभाव आल्यावर सहा आणे किंमतींतच पुस्तकाचें बाह्यांग अधिक मजबूत व सुंदर करून पृष्ठसंख्याहि वाढविण्याचा आमचा विचार आहे. परमेश्वराच्या आशीर्वादानें आणि आश्रयदात्यांच्या कृपेनें हा आमचा मनोदय तडीस जाईल असा आह्मांस विश्वास वाटतो.

ग्रंथमालेच्या विषययोजनेंत विविधता असावी असा पुष्कळांचा ग्रंथमालेस आग्रह आहे व त्या दृष्टीनेंच ' जर्मनीचें पाताळयंत्र ' आणि ' केसरची प्रभावळ ' हीं दोन युद्धविषयक पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. विशेषतः ' केसरची प्रभावळ ' या पुस्तकाची लेखनसामग्री एकत्र

करतांना श्रम, पैसा व वेळ हीं बरींच खर्च झालीं आहेत. हा प्रयत्न लोकांना आवडल्यास या सर्वांचें चीज झालें, असें ह्मणतां येईल. या पुस्तकांत दिलेली माहिती जितकी मनोरंजक आहे, त्यापेक्षांहि ती अधिक मननीय आहे, हें कोणीहि विसरतां कामा नये. राजकारणाच्या दृष्टीनें जर्मनी जगांत श्रेष्ठ आहे, कीं कनिष्ठ आहे, हा या पुस्तकाचा उद्देश नसून औद्योगिक, बौद्धिक व वैज्ञानिक दृष्टीनें कोणत्या थोर पुरुषांनीं जर्मनीची उत्क्रांति कशी घडवून आणली एवढेंच या पुस्तकांत सांगितलेलें आहे. शेतकी, यंत्रशास्त्र व व्यापार या बाबतींत सर्व जगाच्या मागें पडलेल्या हिंदुस्थानास या लहानशा पुस्तकापासून पुष्कळ शिकतां येण्यासारखें आहे व तेवढी जाणीव हिंदी जनतेच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली, तरी देखील या छोट्या पुस्तकानें आपलें कार्य बजावलें, असें होईल. युद्धविषयक दृष्टीनें 'युद्धमान राष्ट्रें व राजपुरुष' या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे; परंतु लेखनसामग्री मिळण्यास बराच अवकाश असल्यामुळें त्या दरम्यान 'स्वप्नमय आयुष्य' व 'मातृमूर्ति' हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. या दोन्ही सामाजिक कादंबऱ्या असून त्या मराठींत सर्व प्रकारें नवीन व अप्रतिम आहेत, अशी आमची समजूत आहे. या पैकीं 'स्वप्नमय आयुष्य' ही सामाजिक कादंबरी आणखी दोन महिन्यांनीं आश्रयदात्यांच्या हातीं पडेल व त्या वेळीं कादंबऱ्यांचे बाबतींतहि भारत–गौरव–ग्रंथमालेनें कितपत पुढें पाऊल टाकलें आहे, हें आश्रयदात्यांच्या दृष्टोत्पत्तीस येईल. या कार्यास लोकाश्रयाची किती आवश्यकता असते, हें आतां आश्रयदात्यांस सांगावयास नको. त्यांतून मुद्रण सामग्री विलक्षण महाग झाल्यामुळें तर नवीन आश्रयदात्यांची आवश्यकता अधिकच भासूं लागली आहे. नेहमींप्रमाणें या वेळींहि आह्मी आमच्या आश्रयदात्यांकडे नवीन आश्रयदात्यांची याचना करीत आहों; पण या विनंतीचा अव्हेर जो नेहमीं पुष्कळांकडून होतो, तसा या वेळीं न होतां प्रत्येकाकडून नवीन आश्रयदात्यांची जोड ग्रंथमालेला मिळवून दिली जाईल, अशी ग्रंथमालेला फार आशा आहे.

मुंबई,
गिरगांव, ता. १।६।१६.

सर्वांचा नम्र साहित्यसेवक,
प्रभाकर श्रीपत भट.

०११ को १ ३... का. ८८१
१ १

# केसरची प्रभावळ!

## जर्मन आरमाराचे जनक

## फॉं टिरपिट्झ.

जर्मन आरमाराच्या प्रचंड उत्क्रांतीचा इतिहास ज्या वेळीं लिहिला जाईल त्या वेळीं त्यांत एका नांवाचा अत्यंत प्रमुखत्वानें उल्लेख होईल. तें नांव ह्मणजे ग्रँड ॲडमिरल फॉं टिरपिट्झ हें होय. आरमारी राष्ट्रांत जर्मनीनें जें बरेंच प्रमुखत्वाचें पद आज प्राप्त करून घेतलें आहे, तें संपादन करण्यास याच नरश्रेष्ठांचा उद्योग बहुतेकांशीं कारण झाला आहे. किंबहुना केसरच्या आरमाराचें जनकत्वच यांजकडे आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

बर्लिन येथील लोक त्यांस "अनंत काळचे टिरपिट्झ" या नांवानें संबोधित असतात. गेलीं पंधरा सोळा वर्षें जर्मन आरमाराचीं सर्व सूत्रें एकसारखीं त्यांच्या हातीं आहेत. राजकारणांत नित्य घडून येणाऱ्या अस्मानीसुलतानींतून इतकीं वर्षें आपल्या जाग्यावर एकसारखे टिकलेले गृहस्थ फारच थोडे. आजपर्यंत यांच्या जोडीला फक्त बिस्मार्क यांनाच तेवढें बसवितां येईल. इतक्या अवधींत कित्येक चान्सेलर, कित्येक युद्ध खात्याचे प्रधान आणि कित्येक तिजोरी कामदार आले व गेले; पण आरमारी कायद्यांची घटना करणारे हे गृहस्थ आपल्या जागीं अद्याप कायमच राहिले. समुद्रावर वर्चस्व स्थापण्याकरतां जर्मनीनें किती पक्का निश्चय केला आहे व या दृष्टीनें आजपर्यंत तो कसा पाळला आहे, हें यावरून स्पष्ट दिसून येतें. "केसर व्युइलियम आणि आरमार" या नांवाचें एक निमसरकारी पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे व त्यांत जर्मन आरमाराच्या जनकत्वाचा मान बादशाहाकडे दिला आहे; पण खऱ्या दृष्टीनें विचार करतां १८९८ सालापासून जर्मन आरमाराच्या सेक्रेटरीच्या

जागीं असलेले ग्रँड ॲडमिरल आलफ्रेड फॉँ टिरपिट्झ यांसच हा मान देणें योग्य होईल. असें करण्यांत जर्मनीच्या शहानशाहाचा कांहीं उपमर्द होईल हें खरें; पण सत्य तें सत्यच.

आलफ्रेड टिरपिट्झ हे एका सामान्य घराण्यांत जन्मास आले. त्यांना पुढें आणण्यांत कोणाहि मोठ्या मनुष्याचा पाठिंबा नव्हता. ते अत्यंत खालच्या दर्जाच्या अधिकारापासून तों थेट मुख्य पदापर्यंत केवळ स्वतःच्या हिमतीनें वाढले. यांचा उत्साह व सामर्थ्य हीं फार दांडगी आहेत. तसेंच इच्छाशक्ति, महत्त्वाकांक्षा आणि कामाची तडफ हे गुणहि त्यांच्या ठिकाणीं अपूर्व आहेत. पाहिल्या प्रतीची मुत्सद्देगिरी, कामाचा उरक आणि आरमारी कौशल्य या गुणत्रयाचा संयोग यांच्या ठिकाणीं जसा आढळतो तसा तो जगांतील इतर आरमारी खात्यांत आढळत नाहीं.

त्यांच्या जागीं उत्तम प्रतीची मुत्सद्देगिरी असल्यामुळें मुख्य मंत्र्याच्या जागेसाठीं त्यांचें नांव आजपर्यंत अनेकवार सुचविण्यांत आलें आहे. या जागांसाठीं जशा योग्यतेचीं माणसें लागतात, तशा योग्यतेचीं माणसें जर्मनींत फार पैदा होत नाहींत. अशा थोड्या लोकांच्या कोटींतच यांची गणना होते. आरमारी खात्याचें त्यांचें काम आतां बहुतांशीं पूर्णावस्थेस आलें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं जर्मनीला नवें आरमार उत्पन्न करून दिलें आहे. एवढेंच नव्हे, तर सतत पंधरा वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानें या खात्याचें काम त्यांनीं इतक्या पूर्णावस्थेस नेलें आहे, कीं, त्यांच्या अभावीं त्या खात्याला योग्य माणसाची वाण पडणार नाहीं.

फॉँ टिरपिट्झ मुख्य प्रधानाच्या जागीं आले, तर त्या देशाच्या राजनीतीचें एकच धोरण राहील. तें धोरण ह्मणजे आरमारी बाबतींत कांहीं झालें तरी, आरमाराच्या वाढीला ते आपल्या अमदानींत खळ पडूं देणार नाहींत. नव्या आरमाराची पहिली कल्पना त्यांच्याच डोक्यांत जन्मास आली. आरंभीं ह्मणजे १८९८ सालीं जर्मनीचा आरमारी खर्च अवघा साठ लक्ष पौंड होता. तो १९१३ सालीं दोन कोट तीस लक्ष पौंड झाला. ही सारी वाढ टिरपिट्झ यांच्याच मेहनतीचें फळ होय. पार्लमेंट आणि सामान्य जनता यांच्या मनोविकाराचा फायदा

घेऊन त्या द्वारें त्यांनीं ही खर्चाची बाबत देशाकडून कबूल करून घेतली.

जर्मनीच्या सरकारी नौकरींत मानाच्या जागा फक्त उच्च दर्जाच्या घरंदाज लोकांना मात्र मिळतात. असा समज सर्वत्र आहे; पण हा समज किती खोटा आहे, हें फॉं टिरपिट्झ यांच्या उदाहरणावरून चांगलें व्यक्त होतें. ब्रांडनबर्ग परगण्यांतील ओडर नदीच्या कांठीं असलेल्या कुस्ट्रिन नांवाच्या गांवीं यांचा जन्म झाला. हा गांव समुद्रकिनाऱ्यापासून पुष्कळ लांब आहे. यांच्या घराण्यांत नाविक विद्या जाणणारा यापूर्वीं कोणीहि नव्हता. यामुळें या विद्येचे कांहीं अनुवंशिक संस्कार यांच्या ठिकाणीं असण्याचा संभव नाहीं. हे सोळा वर्षांचे होईपर्यंत यांचा अभ्यास एका मध्यमप्रतीच्या शाळेंत झाला. यानंतर ते प्रशियन आरमारांत शिरले. या वेळीं प्रशियन आरमार म्हणजे कांहीं लहान पडावांचा समुदाय होता. चार वर्षें काम केल्यानंतर यांना लेफटेनंटचा हुद्दा मिळाला. आणि आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी ते लेफटेनंट कमॉंडर झाले. आरमारांत हा हुद्दा विशेष महत्त्वाचा आहे, असें नाहीं; तथापि या हुद्यांवर असतां यांच्या बुद्धीचा कुशाग्रपणा उघडकीस येऊं लागला. स्वतःच्या मतांची छाप आपल्या वरच्या व खालच्याहि अम्मलदारांवर बसविण्याची यांची हातोटी याच वेळीं उघडकीस आली. त्यांचा भावी आयुष्यक्रम कशा प्रकारें जाणार हें याच वेळीं ठरलें, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. केवळ दृश्य स्थितीच्या पलीकडे पाहण्यास अवश्य असणारी दूरदृष्टि यांच्याइतकी त्या वेळीं दुसऱ्या कोणासहि नव्हती. आरमारासंबंधीं नव्या नव्या कल्पना काढून त्यांचा प्रसार करण्याचा व त्या अमलांत येण्यासाठीं अनुयायी मिळविण्याचा उपक्रम त्यांनीं सुरू केला. या वेळीं त्यांस जे अनुयायी मिळाले, ते त्यांच्यापेक्षांहि अधिक उत्साहानें त्यांच्या मसलती पार पाडण्यासाठीं उद्योग करूं लागले. आरमारी बाबतींत यांनीं सर्वांच्या आघाडीस असावें, असा जणूं काय ईश्वरी संकेतच होता. प्रशियाच्या लष्करांत आणि नुकत्याच जन्मास आलेल्या आरमारांत जुनाट लोकांचें या वेळीं बरेंच वर्चस्व असे. त्यांचा मोठेपणा मुख्यतः त्यांच्या जुनाटपणावरच अवलंबून असे आणि एवढ्याच कारणासाठीं सामान्यजनताहि

त्यांचा मोठेपणा कबूल करीत असे; पण फॉं टिरपिट्झ हे या सामान्य नियमास अपवाद होत. जुनें तें सोनें असें ह्मणण्याची प्रवृत्ति यांनीं प्रथम साफ झुगारून दिली. या त्यांच्या गुणामुळें त्यांना उत्तम प्रकारचे अनुयायी मिळूं लागले. आरमारांत मानाच्या जागा मिळण्यास केवळ आंगचे गुणच उत्तम असावे लागतात, हें तत्त्व प्रथम यांनीं अमलांत आणलें. मोठें घराणें, श्रीमंती अथवा इतर बाबी या वास्तविक फारशा किंमतीच्या नाहींत, असें यांनींच स्पष्ट केलें.

इ. स. १८९१ मध्यें फॉं टिरपिट्झ हे कील ठाण्याच्या मुख्य अधिपतीच्या जागीं आले. जर्मनीच्या सर्व आरमारी कारभाराचें कील हें मुख्य ठाणें आहे. या जागीं आल्यामुळें आरमाराची संघटना आणि त्यांतील नव्या प्रकारच्या रचना करण्यास लागणारी जी बुद्धिमत्ता यांजपाशीं होती, तिच्या कार्यास चांगलाच अवसर मिळाला. त्यांनीं प्रथम टारपेडो ( आगमाशाचें ) खातें हातीं घेतलें. या खात्यांत पुष्कळ नवीन सुधारणा अमलांत आणून लवकरच त्यांनीं तें पहिल्या प्रतीचें खातें बनविलें. जर्मनीच्या आरमारांत एकंदर प्राविण्याबद्दल या खात्याचा मोठा लौकिक आहे. इतर राष्ट्रांच्या आरमारांनींहि जर्मनीच्या या खात्याचें प्राविण्य कबूल केलें आहे. जर्मनीचें हें खातें इतक्या नांवलौकिकास येण्यास मुख्यतः फॉं टिरपिट्झ यांचेच श्रम कारणीभूत झाले आहेत. हें खातें यांनीं हातीं घेतलें त्या वेळीं जर्मन आरमाराच्या या शाखेंत मूठभर लहानशा होडक्यांचा ताफा मात्र होता. यांतूनच त्यांनीं आपल्या कौशल्यानें नवा शक्तिमान ताफा निर्माण केला. आगमाशाच्या विद्येंत लागणारी कुशलता ज्यांच्या आंगीं उपजतच आहे, असे आरमारी कामगार त्यांनीं निवडून काढले आणि अविरत उद्यमानें व उत्साहानें त्यांनीं या कामगारास त्यांच्या कलेंत निष्णात करून सोडलें. जर्मन आरमाराच्या या खात्यांत जी प्रवीणता आज आढळून येते, तिचा प्रारंभ अशा रीतीनें झाला आहे. अशा रीतीनें आगमाशाच्या विद्येंत त्यांनीं नव्या मन्वंतरास सुरुवात केली व आरमाराची ही शाखा पूर्णावस्थेस आल्यानंतर त्यांनीं आपलं लक्ष खात्याच्या अंतर्रचनेकडे लावलें. खात्याच्या रचनेंत ज्या

कांहीं उणीवा त्यांच्या नजरेस येत, त्यांजवर ते निर्भीडपणें टीका करीत. बर्लिन येथील आरमारी कचेरी आणि बाल्टिक समुद्रावरील आरमारी ठाणीं यांच्यांत जें नातें या वेळीं होतें, त्यावर त्यांनीं पुष्कळ कडक टीका केली. बर्लिन येथील आरमारी सेक्रेटरी व आरमाराचे मुख्य अधिकारी यांजमधील संबंध कसे असावेत याची नवीन दिशा त्यांनीं शोधून काढली.

या वेळीं त्यांना बर्लिन येथील आरमारी खात्यांतच जागा मिळाली. त्यांच्या उपपत्ती प्रत्यक्ष व्यवहारांत कितपत टिकतात, हें पाहण्याची संधि प्राप्त झाली. त्यांच्या कडक टीकेमुळें त्यांना शत्रूहि कांहीं कमी नव्हते. त्यांना कमीपणा आणण्याची संधि ते पहातच होते; पण स्वतःच्या अंगीकृत कार्यांत यश मिळविण्याची विद्या फॉं टिरपिट्झ यांस पूर्ण साध्य झाली होती. शत्रूनीं केलेल्या अनेक कारस्थानांस भीक न घालतां त्यांनीं आपलें ह्मणणें खरें केलें. आपल्या उपपत्ती अव्यवहार्य नाहींत, ही गोष्ट त्यांनीं अवघ्या दोन वर्षांच्या अवधींत सिद्ध केली. या दोन वर्षांनंतर लवकरच त्यांना व्हाईस ॲडमिरल हे मानाचें पद प्राप्त झालें. एकंदर आरमारी खात्यांतहि त्यांनीं चांगलें नांव मिळविलें होतें. आरमारी खात्यांतील लोक त्याना 'डर मिस्टर' या लाडक्या नांवानें संबोधित असत. या जर्मन शब्दाचा अर्थ धनी किंवा मालक असा आहे. यावरून एकंदर खातें यांना किती मान देत असे, हें उघड दिसून येतें.

फॉं टिरपिट्झ हे आतां अधिकारसंपन्न झाले होते; तथापि स्वतःच्या परिस्थितीपलीकडे पाहण्याची त्यांची दूर दृष्टि या वेळींहि भविष्यकाळाचा ठाव काढीत होती. खात्याच्या अंतर्रचनेची सुधारणा करण्याचें अत्यंत अवजड काम पुरें केल्यानंतर जर्मनीच्या नांवलौकिकास साजेल, असें नवें आरमार निर्माण करण्याच्या उद्योगास ते लागले. जर्मनीची औद्योगिक उत्क्रांति या वेळीं पूर्ण भरास आली होती. देशाचा समुद्रावरील व्यापार एकसारखा वाढत्या प्रमाणावर होता. व्यापारी आगबोटींची भर एक-सारखी पडत होती. प्रचंड आरमाराचें महत्त्व लोकांच्या मनांत उत्पन्न करून देण्यास ही संधि फार चांगली आहे, असें फॉं टिरपिट्झ यांना आढळून आलें. त्यांच्या या उपक्रमास प्रोत्साहक अशी आणखी एक

नवीच गोष्ट या संधीस घडून आली. १८९९ सालच्या पावसाळ्यांत प्रसिद्ध बंडस्रात प्रकरण उपस्थित झालें. जर्मनीची बंडस्रात नांवाची टपाली आगबोट आफ्रिकेकडे जात असतां एका इंग्लिश आरमारी जहाजानें तिला वाटेंत अडविलें. जर्मनीला आरमारी पाठबळ नसल्यामुळें जर्मनीचा समुद्रावरील व्यापार अगदीं असंरक्षित स्थितींत आहे, असें फॉ टिरपिट्झ यांनीं लोकांच्या मनांत भरवून दिलें. बंडस्रात प्रकरणाचा फायदा घेऊन साऱ्या देशभर त्यांनीं चळवळीस सुरवात केली. जर्मनीला मोठ्या आरमाराची अत्यंत आवश्यकता आहे, अशा अर्थाचीं व्याख्यानावर व्याख्यानें जिकडे तिकडे झडूं लागलीं. या प्रकरणावरून त्यांनीं लोकांत देशाभिमानाची एवढी लाट उसळून दिली कीं, १९०० सालींच नवा आरमारी कायदा जन्मास आला. हा कायदा पास झाल्याबरोबर त्यांना फॉ हें अत्यंत मानाचें उपपद प्राप्त झालें.

फॉ (von) ही पदवी जर्मनींतल्या वंशपरंपरेच्या सरदारकीची निदर्शक आहे. १९०२ सालीं नव्या कायद्याप्रमाणें तेरा हजार टनाचें ब्रॉश्विग् नांवाचें नवें प्रचंड जहाज समुद्रांत ढकलण्यांत आलें आणि त्या वेळीं फॉ टिरपिट्झ हे दुय्यम अॅडमिरलचे पूर्ण अॅडमिरल झाले. १९०७ सालीं त्यांनीं आणखी एक नवा आरमारी कायदा पास करून घेतला. सामान्य जनतेंत त्यांनीं आपलें नांव इतकें वाढविलें होतें कीं, त्यांचा कायदा नापास करणें, जर्मन पार्लमेंटास शक्य नव्हतें. या नव्या कायद्याप्रमाणें जहाजाचा आकार व वजन वाढवून दरवर्षी चारांऐवजीं सहा जहाजें बांधण्याचें ठरविण्यांत आलें. फॉ टिरपिट्झ यांच्या या कामगिरीनें बादशहा इतके खूष झाले, कीं, त्यानीं त्यांस ब्लॅकईगलचें पदक मोठ्या समारंभानें अर्पण केलें. हा मान जर्मनींत अत्यंत मोठा समजला जातो.

फॉ टिरपिट्झ हे इंग्रज राष्ट्राचे द्वेष्टे आहेत, हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. असें म्हणणें म्हणजे त्यांच्या नांवास निष्कारण कलंक लावण्यासारखें आहे. ब्रिटिशांच्या द्वेषाची कल्पनाहि कधीं त्यांस शिवली नाहीं. उलट पक्षीं इंग्रजांचे ते मोठे चहाते आहेत. त्यांच्या सर्व मुलांचें शिक्षण इंग्लं-

डांत झालेलें आहे. इंग्रजी राष्ट्राच्या नौकानयनाच्या पूर्वापर इतिहासाचें अध्ययन हे मोठ्या कौतुकानें करीत असतात. 'तुह्मी इंग्रज नाविकासारखे व्हा, व त्यांचें उदाहरण सतत आपल्या नजरेपुढें ठेवा' असा उपदेश ते आपल्या जर्मनखलाशांस नित्य करीत असतात. त्यांनीं आरमारी कायदा पास करून घेतला, तेव्हां ब्रिटनशीं या बाबतीत चढाओढ करावी असा त्यांचा मुळींच उद्देश नव्हता. जर्मन आरमार आज प्रबळ होऊन ब्रिटनच्या समुद्रावरील वर्चस्वास कमीपणा आणीत असेल, तर तो दोष जर्मनीचा नसून ब्रिटनचा आहे. फॉं टिरपिट्झ हे दूरदर्शी व शहाणे मुत्सद्दी असल्यामुळें ब्रिटनच्या चुक्यांचा त्यांनीं फायदा घेतला. स्वतःच्या दूरदर्शित्वानें त्यांनीं कोणतीहि संधि वांया जाऊं दिली नाहीं, एवढी गोष्ट मात्र खरी.

फॉं टिरपिट्झ यांनीं आपल्या देशाची एकच कामगिरी केली असें नाहीं; तथापि त्यांची विशेष नांव घेण्यासारखी कामगिरी म्हणजे जर्मन आरमारी खात्याची अंतर्रचना हीच होय. ते आरमारी खात्यांत शिरण्यापूर्वी त्यांत विलक्षण घोटाळा माजून राहिला होता. लष्कराच्या सुसंघटित व्यवस्थेचें नांवहि आरमारी खात्यांत नव्हतें. ही घटना करण्याचें मुख्य श्रेय फॉं टिरपिट्झ यांनींच संपादन केलें. हें खातें नवें निर्माण करणें एवढेंच काम त्यांस करावयाचें नसून लोकांत आरमाराची नवी आवडहि त्यांस उत्पन्न करावयाची होती. वेळोवेळीं उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन लोकमत त्यांनीं अनुकूल करून घेतलें व आपला मूळचा उद्देश सिद्धीस नेण्याकरितां त्यांनीं लोकांत नव्या नव्या चळवळी सुरू केल्या. 'नेव्ही लीग' व 'ॲडमिऱ्यालिटी प्रेसब्यूरो' हे दोन राष्ट्रीय संघ त्यांच्या कर्तृत्वाचीं जिवंत स्मारकें आहेत. 'जर्मनीची भवितव्यता समुद्रावर आहे, व जर्मनीला 'समुद्रावरील वर्चस्वाची अत्यंत जरूर आहे.' हीं ब्रीदवाक्यें आज जर्मनीनें जीं धर्माज्ञेप्रमाणें उराशीं बाळगिलीं आहेत, त्याचें श्रेयहि फॉं टिरपिट्झ यांजकडेच आहे. नेव्ही लीग आणि इतर संस्था यांच्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं, असें ते जर्मन पार्लमेंटांत अनेक वेळ म्हणाले आहेत; तथापि पर्यायानें या संस्थांच्या जनकत्वाचा

मान त्यांसच देणें योग्य आहे. जर्मन आरमारांत केव्हांहि वाढ व्हावयाची असली म्हणजे त्याच्या पूर्वी अनेक हस्तपत्रकांचा आणि वर्तमानपत्री लेखांचा सुळसुळाट साऱ्या जर्मनीभर होत असतो. या लेखांतील मजकुरावरूनहि टिरपिट्झशिवाय दुसऱ्या कोणा चालकाचा संबंध त्यांच्याशीं जोडतां येत नाहीं.

अत्यंत अट्टाहासाची चिकाटी हा टिरपिट्झ यांच्या वागणुकीचा एक विशेष आहे. याच त्यांच्या गुणानें जर्मन आरमाराची आजची स्थिति त्यास प्राप्त झाली आहे. बादशहा दुसरे वुइलियम हे कोणापुढेंहि मान वांकवीत नाहींत अशी त्यांची ख्याती आहे, पण फॉं टिरपिट्झ हे या गोष्टीला अपवादक आहेत असें ह्मणण्याला हरकत नाहीं. आपल्या मनांतील साऱ्या बेतांस बादशहांचें आनुकुल्य कसें मिळवावें, ही विद्या टिरपिट्झ यांस उत्तम अवगत आहे.

फॉं टिरपिट्झ हे अगदीं मोकळ्या मनाचे गृहस्थ आहेत. जर्मनीच्या हितसंबंधांत कांहीं महत्त्वाच्या भानगडी उपस्थित झाल्यास जर्मन राष्ट्राची आरमारी तयारी पहिल्या प्रतीची असली पाहिजे, असें हे स्पष्ट बोलून दाखवितात. जर्मनीच्या हितसंबंधास यत्किंचितहि धोका पोहोंचेल अशीं चिन्हें दिसूं लागलीं, तर आपल्या देशबांधवांकडून आणखी वाटेल ती मदत तावडतोब मागण्यास ते कमी करीत नाहींत. इंग्लंडच्या तीन जहाजांस आपलीं दोन जहाजें तरी नेहमीं तयार असलीं पाहिजेत, असें त्यांचें मत आहे. जर्मनीचें आरमार ब्रिटिश आरमाराच्या दोन तृतियांशाइतकें असेल, तर जर्मनीविरुद्ध फ्रान्स आणि ब्रिटन हीं राष्ट्रें संगनमतानें लढणार नाहींत, असें त्यांस वाटतें. जर्मनीचा आरमारी कायदा पास झाला, त्या वेळीं आरंभीं त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, "पहिल्या प्रतीच्या आरमारी राष्ट्रासहि जर्मनीवर बिनधोकपणें हल्ला करतां येऊं नये, इतकें मोठें आरमार जर्मनीनें नित्य जय्यत राखलें पाहिजे." या मूळ हेतूला पोषक अशाच रीतीनें जर्मन आरमाराची वाढ त्यांनीं कायम ठेवली आहे. जर्मन तोफखाना साऱ्या जगांत पहिल्या प्रतीचा आहे, व प्रसंग येईल त्या वेळीं हा तोफखाना जर्मनीचें आरमारी वर्चस्व पृथ्वीवरील साऱ्या समुद्रावर

गाजवील असा त्यांचा विश्वास आहे. आरमारी चढाओढीमुळें युरोपांतील साऱ्या देशांस जर्मनी भिकेस लावीत आहे, हें म्हणणें टिरपिट्झ यांस कबूल नाहीं. जर्मनीचें आरमार परराष्ट्रांचा उच्छेद करण्यासाठीं नाहीं, असें ते निक्षून सांगत असतात, आणि परस्परांच्या अनुमतीनें युरोपीय राष्ट्रांनीं आपापली आरमारी वाढ बंद करावी या मतालाहि ते सर्वथा प्रतिकुल आहेत. आपल्या मतांचा प्रसार त्यांनीं आपल्या अनुयायांतहि पूर्ण करून दिला आहे. आरमारावरील प्रमुखपणाची जागा त्यांनीं सोडून दिली, तरी त्यांच्या मागें त्यांचें व्रत चालविण्यास योग्य माणसांची उणीव पडणार नाहीं. आता यापुढें त्याची नेमणूक व्युइलहेल्मस्ट्रासीच्या अधिक उच्च जागीं झाली अथवा सर्व दगदग सोडून ते स्वस्थ बसले, तरी जर्मन राष्ट्राची जी अमूल्य कामगिरी त्यांनीं बजावली आहे, ती चिरकाल त्यांच्या मागें राहील.

फॉं टिरपिट्झ यांस मुख्य प्रधानाचें पद मिळालें, तर जर्मनराष्ट्राचीं सूत्रें फार शहाणपणानें चालविलीं जातील यांत शंका नाहीं. आज त्यांचें वय सुमारें बासष्ट वर्षांचें आहे, तरी ते एकाद्या तरुणाप्रमाणें निधड्या छातीचे आणि शाबूत डोक्याचे गृहस्थ आहेत. कौटुंबिक सुखहि त्यांस चांगलें प्राप्त झालें आहे. मुख्य प्रधानाच्या पदास हे गृहस्थ सर्व दृष्टीनें पूर्ण योग्य आहेत, असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं; पण त्यांची योजना मुख्य प्रधानाच्या जागीं झाली, तर जर्मनीच्या आरमारी खात्यांत मात्र मोठी उणीव पडेल यांत शंका नाहीं.

---

## अलबर्ट बॉलिन.

हॅंबर्ग बंदराच्या कांठीं असलेल्या एका भव्य दगडी इमारतीच्या मुख्य कमानीवर " सारें जग हेंच माझें कार्य-क्षेत्र " अशा अर्थाचे शब्द कोरलेले आहेत. हॅंबर्गहून अमेरिकेला जाणाऱ्या आगबोटींच्या ऑफिसावर दुसरें कोणतेंहि ब्रीदवाक्य याहून अधिक खुलणार नाहीं. हॅंबर्ग–अमेरिकन आगबोट कंपनी ही एक खाजगी व्यापारी मंडळी आहे. तथापि

केसर बादशाहा आणि सर्व जर्मनराष्ट्र यांना जर्मन आरमाराइतकीच ही कंपनी प्रिय आहे. या कंपनीचें संपूर्ण जर्मन नांव " हँबर्ग–अमेरिक्यानिश प्याकेटफार्ट–अॅक्टीन्–गेसेलशॉफ्ट् " असें आहे. सोयीसाठीं या कंपनीला जर्मन राष्ट्रानें " हॅप्याग " असें आंखुड नांव दिलें आहे. ही कंपनी व हिचीच दुसरी बहीण " नॉर्थ जर्मन लॉइड " या दोघींनीं मिळून जर्मन माल पृथ्वीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पोंहोंचविण्याचें व्रत अखंड चालविलें आहे. हँबर्ग–अमेरिका कंपनीच्या शिरोभागीं अलबर्ट बॉलिन ही अधिष्ठात्री देवता आहे. जर्मनीच्या आरमारांत फॉं टिरपिट्झ यांचें जें महत्त्व आहे, तेंच व्यापारी जहाजांच्या बाबतींत अलबर्ट बॉलिन यांस दिलें पाहिजे. जर्मन आरमाराला सध्यांची स्थिति जशी टिरपिट्झ यांच्या कर्तबगारीनें प्राप्त झाली आहे, त्याप्रमाणें जर्मनीच्या समुद्रावरील व्यापारी वर्चस्वास बॉलिन यांचे श्रम कारणीभूत झाले आहेत. आरमारी वर्चस्वाचें जनकत्व जसें टिरपिट्झ यांजकडे आहे, त्याच-प्रमाणें व्यापारी वर्चस्वाचें जनकत्व बॉलिन यांजकडे आहे. आपल्या लष्करी, आरमारी आणि व्यापारी संस्था पहिल्या प्रतीच्या करण्याकरतां जर्मन राष्ट्रानें किती धडपड चालविली आहे, त्याचा इतिहास पुढें जेव्हां लिहिला जाईल, त्या वेळीं हँबर्ग येथील या अत्यंत शालीन अशा यहुदी गृहस्थाचें नांव त्यांत प्रमुखत्वानें आढळून येईल. अनेक नांवांच्या पदव्या आणि राष्ट्रांतील मानाच्या जागा त्यांजकडे चालत आल्या होत्या, पण असल्या दिखाऊ गोष्टींपैकीं एकीचाहि त्यांनीं स्वीकार केला नाहीं.

प्रशियांतील एका लष्करी ठाण्यांत नव्या भरतीच्या वेळीं एका तरुणाची इतिहासाच्या विषयांत परीक्षा घेतली जात होती. " साऱ्या जर्मनींत आज मोठा कोण ? " असा प्रश्न परीक्षकानें त्याला विचारतांच त्यानें " बॉलिन " असें चटकन् उत्तर दिलें. लक्षावधि जर्मन जनतेच्या मनांत आज कोणतें नांव घोळत आहे, हें या उत्तरावरून उघड होतें. दुसऱ्या वुइलियम बादशहाच्या कारकीर्दींत थेट बादशहापासून तों सामान्य जर्मन मनुष्यापर्यंत यांच्याशिवाय दुसरें कोणतेंहि नांव अजरामर जर्मनांच्या यादींत पडण्याच्या योग्यतेचें नाहीं, असें जर्मन जनतेस वाटतें. जर्मन-

राष्ट्राची सांप्रतची भव्य इमारत ज्या कारागिरांच्या कौशल्यानें उभारली गेली आहे, त्यांत बॉलिन यांची प्रमुखत्वानें गणना केली पाहिजे. तिसऱ्या नेपोलियनच्या कारकीर्दींत रॉथशाइल्ड अथवा पहिल्या वुइलियमच्या कारकीर्दींत ब्लीक्रोडर आणि बिस्मार्क यांस जें महत्त्व होतें, तेंच दुसऱ्या वुइलियमच्या कारकीर्दींत बॉलिन यांस आहे. दुसऱ्या वुइलियम बादशहानें अनेकवार त्यास प्रधानगिरी देऊं केली होती; पण 'वुइल-हेल्मस्ट्रासीपेक्षां आम्स्टरडॅममध्येंच आपला अधिक उपयोग होईल' असें ह्मणून बॉलिन यांनीं प्रधानपदाचा स्वीकार केला नाहीं; तथापि अनेक बाबतींत त्यांचा खाजगी सल्ला बादशहा नित्य घेत असतात. वुइल-हेल्मस्ट्रासींत सुरू असलेल्या एकमुखी राज्यपद्धतींत बॉलिनसारख्या गृहस्थाचा कांहीं उपयोग होणार नाहीं, हें उघड आहे. प्रधानमंडळांतील एकादी जागा अथवा 'फॉं' हें सरदारी उपपद बादशहांनीं जेव्हां जेव्हां बॉलिन यांस देऊं केलें, तेव्हां तेव्हां बादशहाच्या एका फोटोचा स्वीकार मात्र त्यांनीं केला. बादशहांनीं आपला जो एक फोटो ह्यांस नजर केला, त्यावर पुढील मजकूर त्यांनीं स्वहस्तें लिहिला आहे. "आमच्या राष्ट्राच्या निर्गत व्यापाराचे दूरदर्शी आणि दीर्घोद्योगी कर्णधार यांस नजर." फॉं एक्स्लेन स्टाट् सेक्रेटर अथवा दुसऱ्या सरदारीच्या निदर्शक पदव्यां-पेक्षां हॅंबर्गच्या या अनभिषिक्त राजाला व्यापाराचे कर्णधार या पदवीचा अधिक अभिमान वाटतो. सामान्य जर्मन जनता ज्या पदव्या मिळविण्या-करतां सारा जन्म धडपड करीत असते, त्या पदव्या घरीं चालून आल्या असतांहि अलबर्ट बॉलिन यांनीं त्यांचा स्वीकार केला नाहीं.

बॉलिन हे केवळ स्वतःच्या कर्तबगारीनें उदयास आलेले गृहस्थ आहेत. हॅंबर्ग येथील एका सामान्य मुनिमाच्या उदरीं यांचा जन्म झाला. तरुणपणीं व्यापाराचें ज्ञान मिळविण्यासाठीं ते तेथून इंग्लंडास गेले. नौकानयनविद्येतील अगदीं बारीकसारीक देखील माहिती आपलीशी करण्याचा त्यांनीं अटोकाट प्रयत्न केला. जर्मनींत परत आल्यानंतर 'कार' नांवाच्या आगबोट कंपनींत त्यांनीं नौकरी धरली. ग्यालिशिया, पोलंड आणि हंगारी येथून हॅंबर्ग येथें येऊन जे लोक परदेशगमन करतात,

त्यांची व्यवस्था करण्याचें काम प्रथम यांजकडे सोंपविण्यांत आलें. हें काम करीत असतां त्यांची संघटनाशक्ति आणि त्यांचा निरलस उत्साह यांचें वजन त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर इतकें पडलें कीं, बॅालिन हे अधिक वरिष्ठ दर्जाच्या जागेसाठीं योग्य आहेत, असें ते म्हणूं लागले. त्यांच्या या धंद्यांत त्यांना प्रथम मानाची जागा मिळाली, तेव्हां त्यांचें वय अवघें पंचवीस वर्षांचें होतें. परदेशगमन करणाऱ्या लोकांचे तांडेच्या तांडे आपखुषीनें कार कंपनीला आश्रय देतात, ही गोष्ट इतर आगबोट-वाल्यांच्याहि लक्षांत तावडतोब आली. विशेषतः हाच धंदा करणाऱ्या हॅंबर्ग-अमेरिकन कंपनीला तर ही गोष्ट अधिकच जाणवूं लागली. पर-देशगमन करणाऱ्या उतारूंची ने-आण करण्याचा धंदा हॅंबर्ग-अमेरिकन कंपनी पुष्कळ वर्षांपासून करीत होती व कार कंपनी नवी असून तिच्या बोटी लहान असतांहि तिची चढाओढ हॅंबर्ग-अमेरिकन कंपनीला जाणवूं लागली. कार कंपनीच्या भरभराटीच्या मुळाशीं बॅालिन या नांवाची कोणी व्यक्ति आहे, असा शोध हॅंबर्ग अमेरिकन कंपनीला लागल्यावर तिनें ही चढाओढ बंद करण्याकरतां सगळी कार कंपनी विकत घेण्याचा खटाटोप केला. १८८६ सालीं सर्व कार कंपनी व त्याजबरोबर बॅालिन बॅालिन हे सुद्धां हॅंबर्ग अमेरिकन कंपनीच्या ताब्यांत आले. हॅंबर्ग-अमेरिकन कंपनीची जो अभूतपूर्व भरभराट सध्यां दिसून येते तिचा प्रारंभ या वेळेपासूनच झाला.

ही भरभराट कशी झाली, तें प्रत्यक्ष आंकड्यांनींच सिद्ध होतें. १८८६ सालीं बॅालिन हॅपॅग कंपनींत आले, त्या वेळीं तिचें संकलित भांडवल ७'५०००० पौंड होतें. आज तें ७'५००००० झालें आहे. पूर्वीचा वार्षिक नफ्याचा आंकडा १२५००० पौंडांचा होता. तोच १९१२ सालीं २८२'५००० पौंडांवर गेला. १८८६ सालीं कंपनीच्या मालकीच्या फक्त सव्वीस आगबोटी होत्या, आज तोच आंकडा १८० झाला आहे. बॅालिन यांचा लाभ हॅपॅग कंपनीला होण्यापूर्वीं त्या कंप-नीच्या सर्व आगबोटींचें संकलित वजन ६०००० टन होतें आणि १९१२ सालापासून इंपरेटर नांवाची ५०००० टनी एकच नवी आगबोट

या कंपनीच्या निशाणाखालीं समुद्रावर फिरूं लागली आहे. इच्याच जोडीला आणखीहि कित्येक राक्षसी गलबतें बांधलीं जात आहेत आणि हॅपग कंपनीच्या ताब्यांतील एकंदर गलबतांचें वजन लौकरच १५०००० टनाच्या घराला येईल. युरोपांतील पांच सहा राष्ट्रें मिळून सुद्धां एवढी भरती होईल कीं नाहीं, याची शंकाच आहे.

बॉलिन यांना जें एवढें प्रचंड यश मिळालें, याचें कारण प्रत्येक तपशिलाचाहि अत्यंत बारकाईनें ते विचार करीत असतात, हें होय. ज्या क्षुल्लक गोष्टीकडे कोणाचेंहि लक्ष फार करून जात नाहीं, अशा गोष्टींचाहि फार बारकाईनें विचार करुन त्यांची तपशीलवार यादी ते आपल्या मनोरूपी कपाटांत सांठवीत असतात. या धंद्याचा अभ्यास इंग्लंडांत करीत असतां, त्यांस रोजमुरा मिळत नसतांहि केवळ धंद्यांत प्रावीण्य मिळविण्यासाठीं ते ठरीव वेळाहून अधिक वेळ काम करीत असत. या वेळीं धंद्यांतील अगदीं बारीकसारीक खुब्यांचाहि त्यांनीं मनःपूर्वक अभ्यास केला. धंद्यांतील कोणतीहि मख्खी त्यांच्या अवलोकनातून सुटली नाहीं. या त्यांच्या गुणामुळें त्यांची स्मरणशक्तीहि विलक्षण वाढली. कोणतीहि एकादी नवी गोष्ट समजली कीं, तिचा योग्य रीतीनें संग्रह करण्यास ते कधींहि चुकत नाहींत. ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, हॉलंड आणि स्क्यांडिनेशिया येथील सर्व व्यापारी कंपन्यांचें एक मोठें संमेलन अलीकडे भरत असतें. त्या समेलनांत बॉलिन हे जी माहिती देत असतात, ती ऐकून बाहेर देशचे व्यापारी आश्चर्यानें थक्क होऊन जातात. कार कंपनीच्या साऱ्या धंद्याबरोबर बॉलिन यांचा प्रवेश हॅपग कंपनींत झाला, त्याच वेळीं जर्मनीच्या व्यापारी निशाणाचा प्रवेश पृथ्वीच्या दुसऱ्या टोंकापर्यंत कसा करावा याजबद्दल साऱ्या उपायांची जंत्री बॉलिन यांजपाशीं तयार होती.

हॅपग कंपनीचीं सर्व सूत्रें बॉलिन याच्या हातीं आलीं, त्या वेळीं त्यांचें वय तिशीच्या आंतच होतें. यामुळें या कंपनीच्या बुढ्या व जुन्या चालींत मुरलेल्या मालकांवर जय मिळविणें हें सोपें काम नव्हतें. नव्या पद्धतीच्या जोड पंख्याच्या आगबोटी बांधाव्या ही बॉलिन यांची कल्पना त्यांस संमत

झाली नाहीं. नव्या आगबोटींत केवळ सामान्य सुखसोयींहून अधिक चैनींचाहि संग्रह केला पाहिजे, असें बॉलिन यांचें म्हणणें होतें, पण हें म्हणणें त्या वृद्ध कपीस मान्य होईना. कित्येक दिवस एकसारख्या समुद्रांत फिरत राहूं शकतील एवढ्या मोठाल्या बोटी बांधणें ही गोष्ट त्यांस शक्यतेच्या कोटीबाहेरची वाटत असे; पण नौकानयनाच्या इतिहासांत, असा दिवस लवकरच उगवणार, याचें स्वप्न बॉलिन यांस अगोदरच पडलें होतें. आपला मार्ग निष्कंटक करण्याची तयारी बॉलिन हे हळू हळू करीत होते. अखेरीस क्रमाक्रमानें या पुराण्या माणसांवर त्यांनीं विजय मिळविला. त्यांचा कधींहि कमी न पडणारा उत्साह, त्यांची चिकाटीची उद्यमशीलता आणि त्यांची सदा विजयी आत्मश्रद्धा या गुणांचा अखेरीस विजय झाला. कंपनीचीं सारीं सूत्रें हातांत येण्यास हेच एक लायक गृहस्थ आहेत, अशी या पुराण्या मंडळीची सर्व तऱ्हेनें खात्री झाली. १९०० सालीं त्यांस कंपनीचे डिरेक्टर जनरल नेमण्यांत आलें. त्या वेळेपासून कंपनीचीं सारीं सूत्रें अप्रतिहतपणें त्यांच्या एकट्याच्याच हातीं आलीं आहेत.

बॉलिन यांनीं ही कंपनी भरभराटीस आणली त्यांत दोन विशिष्ट पद्धति त्यांनीं अंमलांत आणल्या. प्रथम त्यांनीं नव्या पद्धतीचीं गलबतें बांधून कंपनीच्या आगबोटींत सुखसोयींचा व चैनींचाहि समावेश केला. अद्यापीहि नव्या नव्या पद्धतीच्या गलबतांची भर कंपनीच्या संग्रहांत पडत असते. केवळ चैन मारण्यासाठीं समुद्र प्रवास करणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाणार, ही गोष्ट बॉलिन यांस अगाऊच कळली होती व या दिशेनें पाऊल टाकण्यास त्यांनीं एकदम सुरवातहि केली. ऑटलांटिक समुद्रावर आपल्या कंपनीचें वर्चस्व स्थापित झालें, तर तिचा फारच मोठा फायदा होईल, ही गोष्ट ते जाणून होते. या दृष्टीनें त्यांनीं डच्युशल्यँड नांवाची एक आगबोट १९०० सालीं बांधली. प्लायमौथ व न्यूयार्क या दोन बंदरांमधील प्रवास या आगबोटीनें पांच दिवस सात तास आणि अडतीस मिनिटांत संपविला. १९०० सालापर्यंत एवढ्या जलद चालीची दुसरी कोणतीहि आगबोट या दोन बंदरांत फिरत नव्हती. या नंतर तीन वर्षांनीं नॉर्थ जर्मन लॉयड कंपनीनें याहूनहि जलद चालीची एक बोट

बांधली. १९०७ सालापर्यंत सदरील दोन बंदरामधील उतारूंचा व्यापार या दोन कंपन्यांच्यामुळें जर्मनीच्या हातांत राहिला. १९०७ सालीं ल्युसिटानिया नांवाची बोट बांधून इंग्लंडनें आपल्या हातांतला गेलेला व्यापार पुनः परत मिळविला. यानंतर हपॅग कंपनीच्या बोटींचा संचार साऱ्या जगभर करावा या करतां बॉलिन यांनीं खटपट सुरू केली. पनामाच्या कालव्याच्या द्वारें युनायटेड स्टेटसच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यांत दळणवळण लौकरच सुरू करण्याच्या विचारांत ते आहेत. स्वतःच्या कंपनीची इतकी व्यवस्था झाल्यानंतर कंपनीची व्यापारी स्थिति सुसंरक्षित राहील अशी व्यवस्था करण्याच्या विचारास ते लागले. या दृष्टीनें नॉर्थ ॲटल्यांटिक युनियन या नांवाचा बोट कंपन्याचा एक संघ त्यांनीं तयार केला. ॲटल्यांटिक महासागरावर आगबोटींच्या द्वारें चालणाऱ्या व्यापाराचीं सर्व सूत्रें या संघाच्या हातीं आलीं. निरनिराळ्या बोट कंपन्यांनीं एकमेकांशीं चढाओढ करून भाड्याचे दर कमी करूं नयेत, अशासाठीं ते नेहमीं खटपट करीत असतात. सर्वांनीं एकमेकांच्या अनुमतानें काम करावें असें त्यांचें मत आहे, तथापि चढाओढीचा प्रसंगच आल्यास त्यांतहि ते माघार घ्यावयाचे नाहींत, याचा अनुभव लिव्हरपूर आणि सौथॅम्टन येथील बोटवाल्यांस आहेच. १९०१ सालीं पियर पॉंड मार्गन यांनीं ओशनट्रस्ट नांवाचा जो व्यापारी संघ केला, त्याच्याशीं सहकारिता करून त्यांनीं इंग्लिश, डच आणि इतर बोटवाले यांच्या अनुमतानें पुढील धंद्याचें धोरण निश्चित करून टाकलें.

जर्मन लोकांवर बोटींच्या व्यापाराच्या बाबतींत ताशेरा झाडण्याची खोड लॉर्ड पामर्स्टन यांस फार होती. जर्मन लोक शेतकी चांगली करतील व वाटल्यास मनोमय किल्लेहि उभारतील; पण समुद्रोल्लंघन ते केव्हांहि करूं शकणार नाहींत, असें पामर्स्टन ह्मणत असत. या बाबतींत जर्मनीची चढाओढ इंग्लंडाशीं कधींहि होणार नाहीं, अशी त्यांची खात्री होती; पण एकोणिसावें शतक संपण्यापूर्वीं तोच जर्मन आज व्यापारी जहाजें आणि आरमार यांत इंग्लंडचा पहिल्या प्रतीचा प्रतिस्पर्धी होऊन बसला आहे. ल्युसिटानिया आणि मॉरेटानिया यांची जोड इंग्लंडास

मिळाली याचेंहि कारण जर्मनीच होय, असें बॉलिन ह्मणत असतात. कारण इंग्लंडचा जो विशिष्ट व्यापार जर्मन आगबोटींनीं त्यांजपासून हिरावून घेतला आहे, तो परत मिळविण्याकरतांच इंग्लंडनें या दोन बोटी बांधल्या. या दोन बोटी बांधण्याकरतां खुद्द ब्रिटिश सरकारनें कुनार्ड कंपनीला पैशाची मदत केली. अशा प्रकारच्या मदतीच्या अभावीं अशा प्रकारें बोटी बांधून त्या चालविण्याचें धैर्य कोणाहि आगबोट कंपनीला झालें नसतें. अशा प्रकारें सरकारी मदत घेऊन धंदा चालविणें बॉलिन यांस श्रेयस्कर वाटत नाहीं. धंद्यांत सरकारी मदतीचें पिल्लू एकवार शिरलें म्हणजे नाशकारक प्रतिस्पर्धा दोन राष्ट्रांत सुरू झाल्यांवाचून रहात नाहीं. अशा प्रकारें मदत मिळत गेल्यास धंदेवाल्यांच्या अंगात जी आत्मश्रद्धा व धमक असावी लागते, तिचा नाश होतो, असें त्यांचें मत आहे. साखरेच्या धंदेवाल्यांस पूर्वीं सरकारी मदत मिळत असे; पण युरोपांतील प्रमुख राष्ट्रांनीं परस्परांच्या अनुमतानें ही मदत देण्याचें बंद केलें. अशाच रीतीनें बोटवाल्यांसहि सरकारी मदत मिळूं नये असा ठराव सर्व राष्ट्रांनीं करावा, या मताचा प्रसार बॉलिन हे करीत असतात. बोटी बांधण्याच्या कामांत अमेरिकन संस्थानें मागासलेलीं असल्यामुळें तेथील कंपन्यांना मात्र कांहीं थोडे दिवस सरकारी मदत मिळाल्यास हरकत नाहीं, असें ते कबूल करतात.

डयूशल्यॉड बोट बांधल्यानंतर तिच्याहून अधिक जलद चालीची बोट त्यांनीं अद्यापि बांधली नाहीं. ॲटल्यॉंटिक महासागर ओलांडण्यास सहा सात दिवस लागल्यास प्रवाशांनीं कुरकुर करण्याचें कारण नाहीं, असें आज त्यांचें म्हणणें आहे; पण बॉलिन चढाओढींत उद्यां पडणार नाहींत, असें कोणीं सांगावें ? ब्रिटनच्या बोटीहून अधिक जलद चालीच्या बोटी बांधून ते ब्रिटनशीं पुनः प्रतिस्पर्धा करूं लागतील, असें म्हणणें फारसें चुकीचें होणार नाहीं.

बॉलिन हे स्वभावानें अतिशय शालिन आहेत–इतके कीं, ते अगदीं लाजाळू गृहस्थ असावेत असेंच एकाद्यास वाटेल–जेथें तेथें पुढें पुढें करणें त्यांना आवडत नाहीं. बांध्यानें ते वामनमूर्ति आहेत. सकाळीं बरोबर

नऊ वाजतां ते आपल्या ऑफिसांत हजर होतात. सर्व कंपनीचा मुख्य अधिकार त्यांच्या हातांत आहे, आणि ते केवळ नांवाचेच अधिकारी आहेत, असें नाहीं तर कंपनीच्या कारभारांतील सर्व बारीकसारीक बाबींवरहि त्यांची प्रत्यक्ष नजर असते. ऑफिसांतील सर्व कामगारांच्या आधीं येऊन सर्वांच्या मागून जाण्याचा त्यांचा क्रम अद्यापीहि चालू आहे. कोणी भेटावयास आल्यास त्याच्याशीं निरर्थक गप्पा मारीत बसणें त्यांस आवडत नसल्यामुळें फार करून ते कोणाची भेटच घेत नाहींत. बादशहाची स्वारी ज्या ज्या वेळीं हॅंबर्गला जाते, त्या त्या वेळीं बॉलिन यांच्या छोटे-खानी बंगल्यांत त्यांची भेट घेण्यास ते चुकत नाहींत. बॉलिन हे कोठेंहि गेले, तरी आतां ते सर्वांस हवेसे वाटतात यांत नवल नाहीं. मोठमोठीं जुनीं आणि सरदार घराणीं त्यांच्या भेटीसाठीं उत्सुक असतात, पण आपलें ऑफिस किंवा घर यावांचून दुसऱ्या कोठेंहि जाण्याचा त्यांचा परिपाठ नाहीं. यांना एक कन्या एवढेंच अपत्य आहे. बॉलिन हे पहिल्या प्रतीचे मातृभक्त आहेत. आपली वृद्ध माता जीवंत असेपर्यंत आपला सारा रिकामा वेळ ते तिच्या शुश्रूषेंत घालवीत. यहूदीधर्मावर त्यांची पूर्ण श्रद्धा आहे; तथापि ते धर्मवेडे मात्र नाहींत. कोणाहि यहुद्याला तो केवळ धर्मबंधु ह्मणून हॅपॅग कंपनींत त्याला एकादी मोठीशी जागा यांनीं दिल्याचें उदाहरण नाहीं. पुष्कळ जर्मनयहुदी लौकिक फायद्याच्या आशेनें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करतात, या गोष्टीचा त्यांस फार राग येतो. स्वतःच्या धर्मावर इतकी श्रद्धा ठेवणाऱ्या या यहुद्याला केसर इतका मान देतात, या गोष्टीचा पुष्कळ जर्मन सरदारांस मोठा विषाद वाटतो. हॅपॅग कंपनीशीं यांचा संबंध जडल्यास १९१० सालीं पंचवीस वर्षें झालीं. या प्रसंगानिमित्त सिल्व्हर ज्युबिली करावी व हा प्रसंग मोठ्या थाटानें व दिमाखानें साजरा करावा, अशी हॅंबर्ग येथील जनतेची इच्छा होती. जूनच्या २ तारखेस हीं पंचवीस वर्षें पुरीं व्हावयाचीं होतीं; पण त्या तारखेपूर्वी एक आठवडा बॉलिन हे स्वतःच्या खास बोटींत बसून कोठें नाहींसे झाले. ते कोठें गेले होते, हें कोणासहि समजलें नाहीं. 'ज्युबिलीचा' लोकांना पूर्ण विसर पडल्यानंतर एके दिवशीं हळूच ते आपल्या ऑफिसांत हजर झाले.

## प्रशियाचे प्रिन्स हेनरी.

खुद्द राजाचा भाऊ होणें, ही गोष्ट पुष्कळ वेळा मोठ्या अडचणीची असते. राजाची प्रभावळ शोभविण्यावांचून भाऊ झालेल्या या व्यक्तीला बहुधा अधिक महत्व नसतें. यामुळें राजाच्या भावाला नैसर्गिकपणें असणारें महत्त्व कायम ठेवणें हें मोठें कठिण काम आहे. हें कठिण काम चांगल्या रीतीनें पार पडल्याचे दाखले फारसे आढळत नाहींत.

सांप्रतच्या जर्मन बादशहांचे बंधु प्रशियाचे प्रिन्स हेनरी, हे या सामान्य नियमास अपवाद आहेत. जर्मन आरमाराच्या इन्स्पेक्टर जनरलच्या हुद्यावर सध्यां ते आहेत आणि यांच्या तोडीची जर्मन राष्ट्राची महत्त्वाची सेवा चालू कारकिर्दींत दुसऱ्या कोणींहि बजावली नाहीं. ग्रँड ॲडमिरल फॉ टिरपिट्झ हे जर्मन आरमाराचे जसे आद्यजनक आहेत, तसेच ग्रँड ॲडमिरल प्रिन्स हेनरी हे त्याचे आद्य गुरु आहेत. आपलें पूर्वीचें बालरूप टाकून जर्मन आरमार तारुण्याच्या भव्य रूपांत येऊं लागलें, त्या वेळीं प्रिन्स हेनरी हे आरमाराचे मुख्य अधिपति—कमान्डर इन चीफ होते. जर्मन आरमाराच्या वाढींत हा काळ मोठा आणीबाणीचा होता. प्रचंड आकारांचीं व नुसत्या प्रचंड तोफांनीं सज्ज झालेलीं नव्या जातीचीं बेडर जहाजें याच वेळीं जन्मास आल्यामुळें दर्यायुद्धाच्या पद्धतींत विलक्षण क्रांति घडून आली होती. लढाऊ जहाजांची बांधणी, लढाईचे व्यूह आणि गोलंदाजीचें शिक्षण यांचें जुनें शास्त्र समूळ मोडलें जाऊन नवें शास्त्र तयार होण्याचा हा काळ होता. अशा काळीं खुद्द बादशाहाच्या भावाच्या नजरेखालीं जर्मन आरमार आपल्या नव्या स्वरूपांत उदयास आलें. जर्मन आरमाराची ही क्रांति इतक्या त्वरेनें आणि इतक्या उत्तम शिस्तीनें घडून आली, कीं, जर्मन आरमाराची ही तयारी दुसऱ्या कोणत्याहि नव्या आरमाराच्या जोडीची झाली. जणूं काय, एका रात्रीच्या अवधींतच सारें जुनें जर्मन आरमार आपली कात टाकून एकदम नवें झालें. यामुळेंच ग्रँड ॲडमिरल प्रिन्स हेनरी यांनीं जर्मन राष्ट्राच्या हृदयांत मोठ्या प्रेमाची आणि मानाची जागा पटकाविली आहे. राष्ट्रीय

विभूति या सदरांत ज्या कांहीं थोड्याशा व्यक्ति, बिस्मार्कच्या काळानंतर झाल्या, त्यांतच प्रिन्स हेनरी यांची गणना होते.

एकसारखीं तीस वर्षें समुद्राशीं संघट्टन असल्यामुळें प्रिन्स हेनरी यांचा स्वभाव इतका दिलदार बनला आहे कीं, त्यांच्या वागणुकीवरून ते राजकीय पुरुष नसून एकाद्या खलाशाच्या घराण्यांत जन्मास आले असावेत, असें वाटतें. राजघराण्यांतील पुरुषांच्या अंगीं नित्य आढळून येणाऱ्या चैन-बाजीचा गंधहि यांस नाहीं. ते अत्यंत कर्तव्यदक्ष असल्यामुळें चैन करण्यास त्यांस वेळच नाहीं आणि याशिवाय त्यांची मनः प्रवृत्तीहि चैन-बाजीस फारशी अनुकूल नाहीं. राजघराण्यांत नित्य चालणारे चैनीचे प्रकार त्यांस आवडत नाहींत. समुद्रपर्यटन करणें हाच त्यांच्या शौकाचा विषय आहे. आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षीं हे आरमारांत प्रथम दाखल झाले. या वेळीं जर्मन आरमाराला लहान होडग्यांच्या समुदायावांचून अधिक भव्य रूप नव्हतें. वयाच्या तिसाव्या वर्षीं यांना कप्तानाची जागा मिळाली व त्यानंतर चार वर्षांनीं ते रीअल ॲडमिरल झाले. १९०६ सालीं मुख्य अधिपतीच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. या वेळीं जर्मन आरमाराला भव्य स्वरूप प्राप्त झालें होतें. जरूर पडेल, त्या वेळीं गदाघात करण्यास हें आरमार जय्यत तयार व उत्सुक होऊन बसलें होतें. आपल्या आरमाराची प्रतिक्षणीं पूर्ण तयारी असली पाहिजे व कोणत्याहि क्षणीं युद्धाचा प्रसंग आल्यास जर्मन आरमार निर्वाणीचा तडाखा देण्यास सज्ज असलें पाहिजे, अशा दृष्टीनें यांनीं सर्व आरमारी शिक्षणाचें काम केलें असल्यामुळें जर्मन साम्राज्याच्या मुख्य आरमारी सेनापतीच्या जागीं नेमण्यास यांजहून दुसरा अधिक योग्य पुरुष सांपडणार नाहीं.

कील बंदर हें त्यांचें राहण्याचें मुख्य ठिकाण आहे. खुद्द बादशा-हांच्या तर्फे कारणपरत्वें परदेशीं जावें लागलें, तरच ते आपल्या ठाण्यां-तून बाहेर पडतात, अशा प्रकारच्या महत्त्वाच्या कारणावांचून एक दिवसहि आपल्या ठाण्यांतून ते बाहेर फिरावयास जात नाहींत. कडव्या शिस्तीचे ते चहाते असल्यामुळें इतरांप्रमाणेंच स्वतःवरहि या शिस्तीचा

अम्मल चालविण्यास ते कमी करीत नाहींत. त्यांची कर्तव्यदक्षता आणि कामाची हौस यांचें वजन आरमारांतील सर्व शाखांत दिसून येतें. ते स्वतः कामचुकावू नसल्यामुळें आरमारांतील सर्व नौकरांसहि कर्तव्यदक्ष राहणें भागच पडतें. जर्मनींतले सारे आरमारी कामदार विलक्षण कष्टाळू आहेत, अशी त्यांची ख्याति जगभर पसरली आहे. एकसारखें काम करण्याच्या बाबतींत प्रिन्स हेनरी यांचें जीवंत उदाहरण त्यांच्या डोळ्या-समोर नित्य असतें. गोलंदाज तयार करण्यास प्रिन्स हेनरी यांनीं विशेष मेहनत घेतली. नाविकांच्या शिक्षणाकरतां जर्मन आरमार जेव्हां जेव्हां बाहेर पडेल, तेव्हां तेव्हां वेळ अवेळ न पाहतां व स्वतःच्या शारीरिक सुखाची यत्किंचितहि पर्वा न करतां जातीनिशीं ते आरमाराबरोबर जात असत. व्यूहरचना आणि युद्धाचें जें कांहीं कौशल्य जर्मन आरमारानें सध्यां मिळविलें आहे, त्याचें सारें श्रेय प्रिन्स हेनरी यांजकडे आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं. चार वर्षांपूर्वी आरमाराच्या आधि-पतित्वाचीं सूत्रें त्यांनीं सोडलीं, त्या वेळीं त्यांच्या स्वतःच्या जहाजावरून त्यांस किनाऱ्यावर पोहोंचविण्यासाठीं जी होडी निघाली होती, तींत कांहीं आरमारी कामगारानीं वल्हीं मारण्याचें काम केलें. आरमारांतील सर्व कामगारांस ते किती प्रिय झाले आहेत व त्याजबद्दल त्यांच्या मनांत कसा आदर वसत आहे, हें यावरून स्पष्ट होतें.

जर्मन राष्ट्राची भवितव्यता समुद्रावर आहे, असें दुसऱ्या वुइलियम बादशहांनीं एक वेळ म्हटलें होतें. हेंच ब्रीदवाक्य प्रिन्स हेनरी यांनींहि उराशीं बाळगलें आहे. प्रिन्स हेनरी हे निधड्या छातीचे आणि स्वतंत्र बाण्याचे गृहस्थ असल्यामुळें कित्येक आरमारी बाबतींत केसरशीं मतभेद होण्याचे अनेक प्रसंग यांजवर आलेले आहेत; तथापि जर्मन राष्ट्राला पहिल्या प्रतीचें आरमार पाहिजे, या मुख्य सिद्धांताबद्दल मात्र दोघांचीहि पूर्ण एकवाक्यता आहे. जर्मनीला मोठें आरमार अवश्य पाहिजे, ही गोष्ट साऱ्या जर्मन जनतेंत पक्की ठसविण्याकरतां नेव्ही लीग या नांवाची एक संस्था जर्मनींत स्थापन झाली आहे. प्रिन्स हेनरी हे या संस्थेच्या उत्पादकां-पैकींच एक असल्यामुळें तिच्या सर्व कारभारांत ते पुढाकार घेत असतात.

प्रिन्स हेनरी हे सध्यां त्रेपन्न वर्षांचे असून केसरपेक्षां साडेतीन वर्षांनीं ते लहान आहेत. सन १८७५–७७ च्या दरम्यान क्यासेल येथील शाळेंत या दोघां बंधूंचा अभ्यास एकत्रच झाला. यानंतर बादशहा बान येथील विश्वविद्यालयांत गेले व प्रिन्स हेनरी हे कील येथील आरमारी विद्यालयांत दाखल झाले. प्रिन्स हेनरी हे आपल्या आईबापांचे फार लाडके होते.

सांप्रतच्या बादशहांचे वडील एंपरर फ्रेडरीक हे गादीवर असतां एक अमेरिकन वकील बादशहास भेटण्यासाठीं गेला. त्या वेळीं भाषणाच्या ओघांत युवराजाची–म्हणजे सध्यांच्या बादशहांची त्यानें बरीच स्तुति केली. ती सारी ऐकून घेऊन फ्रेडरीक बादशहा म्हणाले, "वुइलियम चांगला मुलगा आहे, ही गोष्ट खरी; पण माझ्या हेनरीला तुह्मीं पाहिलें असतें, तर काय म्हटलें असतें ?" प्रिन्स हेनरी यांस जलपर्यटणाचा विलक्षण शौक आहे. हा शौक त्यांच्या इंग्रज मातेच्या द्वारें त्यांच्या रक्तांत आला असावा. ते सोळा वर्षांचे असतां प्रिन्स ॲडेलबर्ट नांवाच्या आरमारी जहाजावर दोन वर्षेंपर्यंत त्यांची रवानगी करण्याचें ठरलें. हें जहाज या दोन वर्षांच्या अवधींत पृथ्वी प्रदक्षणा करणार होतें. आपला धाकटा मुलगा इतका काळ समुद्राच्या स्वाधीन करणें, प्रिन्सेस विक्टोरिया यांच्या जिवावर आलें. त्या वेळीं सांप्रतच्या बादशहाचे आजे पहिले वुइलियम हे गादीवर होते. प्रिन्स हेनरी यांस इतका काळ या जहाजाबरोबर पाठवूं नये, अशी त्यांच्या मातेनें बादशहापाशीं विनवणी केली; पण बादशहा पहिले वुइलियम हे स्वतः शिपायी गडी असल्यामुळें व आपल्या सर्व मुलांबाळांनीं हाच कित्ता गिरविला पाहिजे, अशा मताचे ते असल्यामुळें त्यांनीं आपल्या सुनेच्या विनवणीकडे लक्ष दिलें नाहीं. ते ह्मणाले, "या मुलाचें भावी आयुष्य ज्या अर्थीं समुद्रावरच जावयाचें आहे, त्या अर्थीं पुढें येण्याच्या संकटाची ओळख त्यानें आजपासूनच करून घेतली पाहिजे. त्याचें सारें शिक्षण अगदीं सामान्य खलाशाप्रमाणें झालें पाहिजे." या दोन वर्षांच्या अवधींत एका मोठ्या वादळाच्या सपाट्यांत हें जहाज सांपडलें होतें. आपल्या भावी आयुष्यक्रमांत कसे प्रसंग येण्याचा

संभव आहे, याचा अल्पसा अनुभव प्रिन्स हेनरी यांस बंगालच्या उपसागरांत मिळाला.

१८९७ सालीं, जर्मन क्रुइझरांचा नंबर दोनचा काफिला चीनकडे जाण्यास बाहेर पडला त्या वेळीं त्याचें आधिपत्य प्रिन्स यांस दिलें होतें. हीच त्यांची महत्त्वाची पहिली नेमणुक. कील बंदरांतून हा काफिला बाहेर पडला त्या वेळीं त्यांस निरोप देतांना केसर यांनीं मोठें विलक्षण भाषण केलें. ते म्हणाले, " आपल्या हक्कावर घाला घालण्यासाठीं जो कोणी यत्न करील, त्याजवर सशस्त्र मुठीचा—mailed Fist–आघात करावयाला चुकूं नका. " वडील भावाबद्दल प्रिन्स हेनरी यांच्या मनांत असलेला आदर या वेळीं व्यक्त झाला. बादशहांच्या भाषणास उत्तर देतांना ते म्हणाले, " मोठे विजय मिळवून धन्य व्हावें, अशी माझी महत्त्वाकांक्षा नाहीं, तर बादशहांचें नांव सर्व पृथ्वीवर गाजवावें इतकीच माझी इच्छा आहे. "

प्रिन्स हेनरी यांचा काफिला चीनला पोहोंचला, त्या वेळीं तेथें मोठी उलथापालथ सुरू होती. एका जर्मन मिशनऱ्याचा खून झाल्याबद्दल कियाचऊचें बंदर याच वेळीं जर्मनीनें चीनपासून घेतलें. यानंतर लवकरच अमेरिकेनें फिलिपाईन बेटें घेतलीं. ॲडमिरल फॉं डॉयडेरिक याच्या मूर्खपणामुळें जर्मनी आणि अमेरिका यांजमध्यें युद्ध जुंपण्याच्या बेतांत आलें; पण तो प्रसंग टळला. या स्वारीहून परत आल्यानंतर प्रिन्स हेनरी हे लौकरच व्हाइस ॲडमिरल झाले.

या वेळीं अमेरिका आणि जर्मनी यांजमधील परस्पर संबंध असावे तितके सलोख्याचे नव्हते. याच प्रसंगीं प्रिन्स हेनरी यांची मुत्सद्देगिरी जर्मनीच्या उपयोगीं पडली आणि यानंतरहि त्यांच्या मुत्सद्देगिरीचा उपयोग जर्मन सरकारांनीं अनेक प्रसंगीं करून घेतला आहे. चिनांतील स्वारीहून परत येऊन फार दिवस झाले नाहींत तोंच १९०२ सालीं त्यांची अमेरिकेंत रवानगी करण्यांत आली. केसर यांनीं खास आपल्यासाठीं एक नौका अमेरिकेंत बांधविली होती. ती तयार होऊन पाण्यांत लोटण्याचा समारंभ व्हावयाचा होता. बाह्यतः या समारंभाकरतां प्रिन्स यांची रवानगी अमेरिकेंत झाली होती; पण या

भेटीचा अंतःस्थ हेतु वेगळाच होता. अमेरिकेशीं जो हितसंबंध केसर यांस जोडावयाचा होता, त्याचा प्रारंभ प्रिन्स हेनरी यांनीं ह्या भेटींत केला, आपण श्रेष्ठ प्रतीचे लोक आहों व कनिष्ठाशीं मिसळणें आपणास इष्ट नाहीं, असें पुष्कळ जर्मन लोकांना वाटतें. प्रिन्स हेनरी अमेरिकेंत जाण्यास निघणार, ही बातमी ऐकून या लोकांस मोठें नवल वाटलें. लहान-थोरपणाचा भेद न पाळणाऱ्या अमेरिकेंत होहेनझोलार्न घराण्याचा मोठेपणा कसा सांभाळला जाईल, याची भीति या लोकांस वाटत होती; पण प्रिन्स हेनरी यांच्या मनांत ही शंका सुद्धां आली नाहीं. न्यूयार्क येथें झालेल्या एका बड्या मेजवानींत प्रिन्स हेनरी यांनीं अमेरिकन वर्तमानपत्रकारांस मोठ्या मानमरातबानें वागविलें. प्रशियन सेनानीस ज्या प्रकारचा मान प्रशियांत मिळतो, तशाच प्रकारचा मान प्रिन्स यांजकडून वर्तमानपत्रकारांस मिळाला. वर्तमानपत्रकार ह्मणजे कःपदार्थ असा प्रशियन लोकांचा समज आहे. अशा स्थितींत प्रिन्स यांची ही वर्तणूक पाहून त्यांस काय वाटलें असावें ? एके वेळीं प्रिन्स चिकागो शहरांत गाडींतून हिंडत असतां वर्तमानपत्रें विकणारा एक पोरगा मोठ्यानें ओरडून त्यांना ह्मणाला, " ओहो ! हॅंक् आपली तब्येत कशी आहे ? " हा सवाल ऐकून प्रिन्स खदखदां हंसून ह्मणाले, " ठीक आहे. तुझी तब्येत बरी आहे ना ? " या भेटीच्या प्रसंगीं प्रिन्स सर्व दर्जाच्या अमेरिकन लोकांशीं किती मिळून मिसळून वागले, याचें हें एक उदाहरण आहे. या त्यांच्या वर्तणुकीमुळें अमेरिकेंत ते फार लोकप्रिय झाले. अमेरिका व जर्मनी यांजमध्यें जो मित्रभाव दिसून येतो, त्याचा प्रारंभ याच प्रसंगीं झाला. यानंतर इंग्लंड, रशिया, जपान व युरोपांतील दुसऱ्या कित्येक देशांस प्रिन्स यांनीं भेटी दिल्या, आणि या साऱ्या प्रसंगीं प्रिन्स हेनरी यांच्या चातुर्याचा आणि राजकारणकुशलतेचा उपयोग त्यांच्या मातृदेशास फार झाला.

प्रिन्स हेनरी यांस दर्यावर्दीपणाची जशी आवड आहे, तशीच उघड्या हवेंतील खेळांचीहि आहे. जगांतील सर्व प्रकारच्या उघड्या हवेंतील खेळांचें एक बडें सम्मेलन बर्लिन येथें दरसाल भरत असतें. या

सम्मेलनांतहि जर्मनीचा नंबर वर लागावा यासाठीं प्रिन्स यांची नित्य खटपट सुरू आहे. आपल्या लोकांस सर्व खेळांची गोडी लावण्याकरतां ते नेहमीं खटपट करीत असतात. प्रिन्स हेनरी हे पहिल्या प्रतीचे शिकारी आहेत. तसेंच ते मोठे वस्ताद पोहणारे असून गोल्फ आणि टेनिस हे खेळहि ते चांगल्या प्रकारें खेळतात. नौकांच्या शर्यतींत आपली नौका ते स्वतः हाकीत असतात. कील येथें दरसाल एक आठवडा नौकांच्या शर्यती होत असतात व प्रिन्स यांच्या खटपटीनें हा समारंभ सध्यां जगांतील एक अत्यंत प्रेक्षणीय देखाव्याप्रमाणें झाला आहे. जर्मनींतील इम्पीरियल आटोमोबाईल क्लब या संस्थेचे ते अधिपति असून या संस्थेमार्फत होणाऱ्या मोटार गाड्यांच्या शर्यतींतहि ते स्वतः गाडी हांकीत असतात. या कलेंतहि जन्मभर हाच धंदा केलेल्या माणसांइतके ते निष्णात आहेत. जर्मनींत तयार झालेल्या मोटार गाड्यांचा प्रसार जगभर चालू व्हावा, यासाठींहि त्यांची खटपट चालू आहे. त्यांच्या उदाहरणामुळेंच खुद्द जर्मनींत मोटार गाड्यांचा प्रसार वाढत आहे.

प्रिन्स हेनरी हे विमानें चालविण्यांतहि कुशल आहेत. झेपेलिनमध्यें प्रवास करणारे असे, राज्यघराण्यांतील हे पहिलेच पुरुष होत. या वेळीं झेपेलियन विमान सध्यां इतकें पूर्णत्वास आलें नव्हतें. या पहिल्याच प्रवासांत कांहीं वेळपर्यंत सुकाणू धरण्याचें काम त्यांनीं केलें. विमानांचा प्रचार जर्मनींत लोकप्रिय करण्यासाठीं त्यांनीं फार मेहनत घेतली आहे. विमान चालविण्यास योग्य अशाबद्दलचा जो दाखला सरकारांतून प्रत्येक वैमानिकास घ्यावा लागतो, तशाप्रकारचा दाखला प्रिन्स यांस मिळाला असून त्याचा नंबर ३८ आहे. जर्मनीचें सैन्य आणि आरमार यांस या कलेचा उपयोग कोठवर करून घेतां येईल, या विचारांत सध्यां त्यांचें मन गुंतलें आहे.

प्रिन्स हेनरी यांच्या पत्नीचें नांव ऐरीन असें असून त्या रशियाच्या राणीच्या भगिनी आहेत. या खाजगी नात्यामुळें रशियाचे झार बादशहा व प्रिन्स यांजमध्यें चांगला स्नेहसंबंध जडला आहे. प्रिन्स यांस जर्मन आणि



फॉं झेपेलीन.

इंग्रजी या दोन भाषांचें उत्तम ज्ञान असून गप्पागोष्टी करण्यांतहि ते मोठे कुशल आहेत.

जर्मन आरमारावर त्यांचें जसें प्रेम आहे, त्याच्या खालोखाल ब्रिटिश व अमेरिकन आरमारें हीं सुद्धां त्यांचा प्रेमाचा विषय असून त्यांजबद्दल त्यांस मोठा अभिमान आहे. या दोन्ही आरमारांची खडानखडा माहिती त्यांस असून त्यांच्यांतील पुष्कळ अम्मलदारांशीं त्यांचा चांगला स्नेहहि आहे. आंग्ल-जर्मन आरमाराचें प्रचंड युद्ध कधीं काळीं जुंपलें तर, लढाईच्या भर गर्दीच्या ठिकाणीं यांची मूर्ति दिसल्याशिवाय रहावयाची नाहीं. ब्रिटन व ब्रिटिश आरमार यांचा द्वेष करणाऱ्या आपल्या देशबांधवांची कडक रीतीनें कान उघाडणी करण्यास ते कमी करीत नाहींत. ड्रेक आणि नेल्सन यांचे वंशज जर्मनीच्या आरमाराबरोबर दोन हात करण्यास लायक नाहींत, असें ह्मणणाऱ्या सवाई देशभक्त जर्मनांचे ते मोठे भोक्ते आहेत. इंग्लंड व जर्मनी याच्या आरमारांनीं खांद्याशीं खांदा लावून दोघांच्याहि शत्रूंचा निःपात करावा, अशी त्यांची इच्छा आहे.

## कौंट झेपेलीन.

विसाव्या शतकांतील जर्मनींतील ‘ अद्वितीय पुरुष ’ अशी पदवी केसर दुसरे वुइलियम यांनीं कौंट फॉ झेपेलीन यांस एका प्रसंगीं दिली. पांच वर्षांपूर्वी झेपेलीन विमानांतून एक सफर करून कौंट परत आले, त्या वेळीं बादशहा तेथें हजर होते. तेव्हां एक मोठें उत्साहजनक भाषण करून कौंटसंबंधीं त्यांनीं वरील उद्गार काढले होते. बादशहांनीं आपल्या उत्साहाच्या भरांत कौंटची केवळ व्याजस्तुति केली असेल, असें कोणास वाटण्याचा संभव आहे. झेपेलिन विमान यशस्वी करण्यांत कौंट यांनीं जीं सोळा वर्षें घालविलीं, त्या वेळीं त्यांची चेष्टा करणारे लोक पुष्कळ होते, व त्यांपैकीं कांहीं आज हयातहि असतील; पण आज झेपेलिन विमानें शेंकडों उतारू सुरक्षितपणें जर्मनीच्या एका टोंकाहून दुसऱ्या टोंकास नेत असतात, ऱ्हाईन नदीवर पहारेकऱ्याचें काम करीत असतात व उत्तर

समुद्रावरील आरमारी ठाण्याचें संरक्षण गरुडासारख्या तीक्ष्ण नजरेनें करीत असतात. त्यांच्या शत्रूस आतां त्यांची नालस्ती करणें अशक्य आहे. अद्वितीय पुरुषांच्या यादींत त्यांनीं आपलें नांव अजरामर केलें आहे, हें कोणासहि कबूल करावें लागेल.

कौंट झेपेलिन यांचें वय आतां सुमारें ७८ वर्षांचें आहे. ते सत्तर वर्षांचे असतां कीर्तीनें त्यांस माळ घातली; पण ही कीर्ति प्राप्त होण्यापूर्वीं किती तरी काळ अत्यंत कष्टांत आणि दुर्दशेंत त्यांस घालवावा लागला. नानाप्रकारच्या युक्त्यांचा शोध ज्यांनीं लाविला, त्यांस पुष्कळ दुःखें भोगावीं लागलीं असल्याचें व पुष्कळ वेळां त्यांची निराशा झाली असल्याचे दाखले इतिहासांत पुष्कळ सापडतील; पण कौंट यांस जे कष्ट पडले, तितके कष्ट फारच थोड्यांच्या नशिबीं आले असतील. दुःखें, निराशा, आणि लोकांचा उपहास यांच्याशीं एकसारखीं वीस वर्षें ते झगडत होते. इतके कष्ट सोसून व अखेरीस आपलें म्हणणें सिद्ध करून कीर्तिमंदिराच्या उच्च शिखरावर आरूढ होणारा पुरुष विरळाच सांपडेल. कौंट झेपेलिन यांचा हा इतिहास पाहिला म्हणजे केसर यांनीं केलेली त्यांची स्तुति अवास्तव होती, असें म्हणण्याचें कारण नाहीं.

झेपेलिन विमानांनीं आज हवेवर जय मिळविला आहे, ही गोष्ट निःसंशय सिद्ध झाली असून त्यांची भावी कर्तबगारी अद्यापि काळाच्या उदरांत आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं. जलद चालीच्या बाबतींत छोट्या आकाशयानांची बरोबरी हीं हवेंतील प्रचंड गलबतें करूं शकत नाहींत ही गोष्ट खरी; तथापि इतर बाबतींत यांची बरोबरी इतर कोणत्याहि जातीचीं आकाशयानें करूं शकत नाहींत. हवेंत वादळ असतां, व पाऊस आणि हिमपात होत असतां मध्यें कोठेंहि विश्रांति घेतल्याशिवाय पांचपन्नास माणसें आंत घेऊन झेपेलिन यानें एकसारखीं चोवीस तास परिभ्रमण करूं शकतात. वारा अनकूल असला, तर दर तासास पन्नास मैल जाणें हा या यानांचा पोरखेळ आहे. वेळीं सतरा अठरा खंडींपर्यंत ओझें हीं यानें सहज उचलून नेतात, हें सिद्ध झालें आहे. वारा अगदीं विरुद्ध दिशेनें वहात असतां उत्तर समुद्र आणि बाल्टिक समुद्र

यांजवरून या आकाश जहाजांनीं अनेक सफरी केल्या आहेत. या जहाजांना शोधक बत्त्या, बिनतारी संदेशयंत्रें, बांबगोळे टाकणाऱ्या नळ्या आणि यांत्रिक तोफा इत्यादि जोडलीं असून इतक्या समारंभासह यांनीं लांबलांबचे प्रवास केले आहेत. ग्रेटब्रिटनचा सर्व किनारा अथवा फ्रान्सची सर्व सरहद्द फिरून हीं परत येऊं शकतात, असें आतां सिद्ध झालें आहे. सैन्य आणि आरमार यांच्या उपयोगासाठीं झेपेलिन यानें बांधण्याचा कायदा जर्मनीनें पास केला, हीच गोष्ट कौंट झेपेलिन यांच्या विजयाची व महत्त्वाची साक्ष देत आहे.

जर्मनी आणि स्विट्झर्लंड यांच्या सरहद्दीवर असलेल्या कान्स्टन्स नांवाच्या प्रचंड सरोवराच्या कांठीं असलेल्या एका गांवीं कौंट झेपेलिन यांचा जन्म झाला. यांच्या वडिलांचें नांव कौंट फर्डिमंड फॉ झेपेलिन असें असून त्यांस वर्टेमबर्गच्या दरबारीं एक असामी होती. तरुणपणीं आपल्या क्षात्रकुलास अनुरूप अशी सैन्यांतील नौकरी त्यांनीं पत्करली. आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षीं ते रिसाल्याचे लेफ्टनंट झाले. या वेळीं वर्टेमबर्ग दरबारातर्फें ते अमेरिकेंत मिलिटरी अटॅनी होते. त्या वेळीं अमेरिकेंतील संस्थानांत दुफळ्या होऊन एक अंतःस्थ युद्ध सुरू झालें होतें. एका संघाच्या सैन्याचा तळ मिसिसिपी नदीच्या कांठीं पडला होता. या ठिकाणीं कार्लस्कर्झ या नांवाचा एक जर्मन अम्मलदार तोफखान्यावर कामगार होता. कौंट झेपेलिन यांस युद्धाच्या गर्दींत शिरण्याचें कारण नव्हतें, तथापि कौंट यांच्या मनोवृत्ति अत्यंत प्रबळ असल्यामुळें केवळ तमासगिरासारखें युद्धाच्या बाहेर उभे न रहातां ते कार्लस्कर्झ यांच्या हाताखालीं तोफखान्याचें काम करूं लागले. यानंतर थोडे दिवसांनीं फ्रेड्रिकबर्ग या ठिकाणीं जी हातघाईची लढाई झाली, तींत यांनीं आपला घोडा इतका पुढें घातला कीं, ते शत्रूच्या हातांत पडण्याच्या बेतांत आले; परंतु ते छातीचे मजबूत व खंदे स्वार असल्यामुळें शत्रूची फळी फोडून सुरक्षित बाहेर पडले.

याच वेळीं हवेंत उडण्याचा प्रसंग त्यांस प्रथम प्राप्त झाला. ते ज्या सैन्यांत होते, त्या सैन्याच्या तर्फें शत्रुसैन्याची पहाणी करण्याकरतां एक

फुग्याचें विमान उडविण्याचें ठरलें व या कामावर कौंट झेपेलिन यांची योजना झाली. त्यांनींहि मोठ्या उत्साहानें तिचा स्वीकार केला. त्यांचा हा पहिला हवेंतील प्रवास इतका यशस्वी झाला, कीं हें युद्ध चालू होतें तोपर्यंत शत्रुसैन्याची टेहळणी करण्याचें काम पुढें अनेकवार त्यांजवर सोंपविण्यांत आलें. जर्मनीनें हवेवर सांप्रत जो विजय मिळविला आहे, त्याचा पाया अमेरिकेंतील डिक्सीया गांवीं अशा रीतीनें पडला.

अमेरिकेंतील युद्ध संपून कौंट झेपेलिन स्वदेशीं परत आले न आले तोंच आस्ट्रो-प्रशियन युद्धास सुरवात झाली. १८६६ सालीं प्रशिया व आस्ट्रिया यांजमध्यें झालेलें युद्ध थोड्या अवधींत संपून त्यांत आस्ट्रियाचा पूर्ण पराभव झाला. या युद्धांत कौंट झेपेलिन अव्वलपासून अखेरीपर्यंत कामगिरीवर होते. यानंतर १८७० सालीं जें जंगी फ्रांको-प्रशियन युद्ध झालें, त्यांत कौंट झेपेलिन हे प्रथम प्रसिद्धीस आले. १८७० साल-च्या जुलई महिन्याच्या २४ साव्या तारखेस युद्ध पुकारलें गेलें. त्याच दिवशीं कौंट झेपेलिन यांस शत्रूंच्या हालचालीची बातमी काढण्यासाठीं एका फ्रेंच प्रांतांत पाठविण्यांत आलें होतें. त्यांजबरोबर दुसरे चार लष्करी अम्मलदार व सात शिलेदार होते. या प्रदेशांत जर्मन सैन्यानें तोंपर्यंत प्रवेश केलेला नव्हता. कौंट झेपेलिन यांजमध्यें ढळढळीत आढळून येणारा गुण म्हटला म्हणजे त्यांची निधडी छाती हा होय. त्यांच्या साऱ्या आयुष्यक्रमांत याच गुणाचें आविष्करण सर्वत्र दिसून येतें. शत्रूच्या मुलुखांत कसले प्रसंग येण्याचा संभव आहे, याजबद्दल यत्किंचितहि फिकीर न करतां ते त्या फ्रेंच प्रांतांत एकदम घुसले. जर्मन टेह-ळ्यांचा प्रवेश झाल्याची बातमी फ्रेंच सैन्यांत ताबडतोब पसरली. या जर्मन स्वारांस ठार करण्याकरतां अथवा जिवंत धरून आण-ण्याकरतां एका फ्रेंच तुकडीची **रवान**गी झाली. जरूर असलेली माहिती मिळवून जर्मन टेहळ्यांचें हें पथक स्वदेशीं जाण्याकरतां परत फिरतें न फिरतें तोंच सरहद्दीवरील एका खेड्यांत फ्रेंचांच्या तुकडीनें त्यांस गांठलें. या चकमकींत झेपेलिन यांच्या घोड्यास जखम झाली. ताबडतोब पाय-उतार होऊन झेपेलिन यांनीं आपल्या शत्रूवर तरवारीचा असा सपा-

त्याचा वार केला कीं, तो तावडतोब आपल्या घोड्यावरून जमिनीवर आदळला. क्षणार्धांत झेपेलिन यांनीं त्याच्याच घोड्यावर उडी मारून त्याला टांच दिली. वाटेंत असलेलीं वुइसेनबर्ग, ओर्थ आणि दुसरीं कित्येक खेडीं झपाट्यानें मागें टाकून जर्मन टेहळ्यांचें हें छोटेंसें पथक रीशॉफ गांवीं पोहोंचलें. या ठिकाणीं दुसरी एक फ्रेंचांची तुकडी त्यांस भेटली. या दुसऱ्या चकमकींत लेफ्टनंट वुइन्स्लो नांवाचा एक लष्करी अम्मलदार बंदुकीस बळी पडला. फ्रांको–प्रशियन युद्धांतील हा पहिला जर्मन बळी होय. बाकी उरलेल्या अम्मलदारांस व शिलेदारांस फ्रेंच टोळीनें घेरलें. याहि वेळीं शत्रूंच्या एका स्वाराला आपल्या तरवारीचें पाणी पाजून व त्याच्याच घोड्यावर स्वार होऊन शत्रूंच्या फळींतून कौंट मोठ्या मुष्किलीनें बाहेर पडले. त्यांच्याबरोबरचे सर्व लोक शत्रूंच्या हातीं सांपडले. फ्रेंच घोडेस्वारांनीं आजूबाजूचा सर्व प्रदेश त्रिखंड शोधिला; पण झेपेलिनचा पत्ता त्यांस लागला नाहीं. शत्रूंच्या हालचालींच्या महत्त्वाच्या वातम्या मिळवून झेपेलिन स्वसैन्यांत सुरक्षित दाखल झाले. या युद्धांत झेपेलिन यांनीं चांगला पराक्रम गाजविल्यामुळें त्यांस भराभर बढती मिळून युद्ध संपलें त्या वेळीं ते कर्नलच्या हुद्यावर होते. युद्ध संपल्यानंतर एका तुकडीच्या अधिपतीचें काम त्यांस मिळालें. यानंतर कांहीं दिवस किल्लेदाराचें काम केल्यावर बर्लिन येथील मुख्य अधिकारी सभेंत ते वर्टेंबर्गतर्फें प्रतिनिधि होते. १८९१ सालीं सैन्यांतील नौकरी यांनीं सोडली, तेव्हां ते घोडेस्वारांचे सेनापति होते.

आकाशसंचाराची हौस कौंट झेपेलिन यांस प्रथमपासूनच होती. इच्छेस येईल तिकडे आकाशांतून संचार करण्यास समर्थ असें एकादें यान बांधण्याचा त्यांचा पुष्कळ दिवसांचा हेतु होता. १८९२ सालीं या दिशेनें त्यांनीं आपल्या उद्योगास सुरुवात केली. वास्तविक पहातां धाडसाच्या उद्योगांत हात घालण्याचें त्यांचें आतां वय नव्हतें; पण एकाद्या तरुण बांडास शोभेशा उमेदीनें यंत्रशास्त्र, विद्युत्शास्त्र, हवामापनशास्त्र इत्यादि शास्त्रांचा अभ्यास त्यांनीं केला. आपला हेतु काय आहे, हें त्यांनीं या वेळीं स्वतःच सांगितलें होतें. ते म्हणालेः—

"मनुष्याला वाहनाच्या सामान्य साधनानें जेथें पोहोंचणें शक्य नसतें, अशा जागीं जाण्यासाठीं एकादें वाहन बांधण्याचा माझा विचार आहे. मनुष्याला अद्यापि अज्ञात असलेले किनारे अथवा पृथ्वीचे अंतरभाग शोधून काढण्यासाठीं अशा प्रकारचें एकादें वाहन हवें आहे. समुद्र अथवा जमीन उल्लंघून सरळ रेषेनें या वाहनांतून जातां आलें पाहिजे. बरोबर मनुष्यें अथवा खलिते घेऊन सैन्यांतील एका तुकडीची बातमी दुसऱ्या कोणत्याहि तुकडीस कितीहि अंतरावर पोंचविण्याचें काम यांनीं केलें पाहिजे. शत्रूंच्या सैन्याच्या अथवा आरमाराच्या हालचालींचें निरीक्षण त्यांतून करतां आलें पाहिजे. एकाच वेळीं हें विमान कित्येक दिवसपर्यंत हवेंत तरतें राहिलें पाहिजे. नवीन सांठा घेण्यासाठीं खालीं येण्याचें कारण त्यास पडूं नये. तसेंच ठरलेल्या मुदतींत विशिष्ट ठिकाणीं पोंचण्याइतकी त्याची चाल जलद असली पाहिजे. सामान्य हवामानांत खालीं चढून पुन्हा वर चढणें व प्रवास करणें या क्रिया होत असतां त्यांत कसलीहि अडचण उपस्थित न होईल अशी या यानाची रचना असली पाहिजे."

झेपेलिन यांचे हे विचार प्रसिद्ध झाल्याबरोबर साऱ्या जर्मनींत मोठी चळवळ उडाली. शास्त्रनिपुण लोकांसहि या विचारास प्रत्यक्ष स्वरूप येईल असें वाटलें नाहीं. यामुळें कौंट झेपेलिन हे एक थट्टेचा विषय होऊन बसले. वृद्धापकाळामुळें कौंटचें मन अस्थिर झालें असावें असें वाटून कित्येकांस त्यांची दयाहि आली. झेपेलिन यांस म्हातारचळ लागला असावा, असें कित्येक म्हणूं लागले. या वेळीं आपलें सर्वस्व गहाण लावून देऊन त्यावर पांच हजार पौंडांची रकम झेपेलिन यांनीं एका अमेरिकन लखपतीजवळ मागितली होती. यावर त्या लखपतीनें उत्तर दिलें 'अर्धवट मेंदूच्या व स्वप्नसृष्टींत भटकणाऱ्या मूर्खांच्या नादीं मी लागत नसतों.' अशा प्रकारें सर्वत्र थट्टा होत असतांहि कौंट आपला उद्योग करीतच होते. हळू हळू त्यांची स्वकष्टार्जित व वडिलोपार्जित मिळकत गडप होत चालली. एकामागून एक नमुन्याचीं यानें बांधण्याचा व मोडण्याचा त्यांचा क्रम चालूच होता. उपपत्तीच्या दृष्टीनें हीं

यानें ठीक दिसावीं व प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळीं तीं कुचकामीं ठरावीं असें होऊं लागलें. असा प्रकार अनेक वेळां घडल्यामुळें कौंटचे जे थोडेसे स्नेही व चहाते उरले होते, तेहि आपला पाय हळू हळू मागें घेऊं लागले. सरकारी विमानखातें त्यांजकडे बिलकुल लक्ष देईनासें झालें. वर्तमानपत्रांत लेख लिहून लोकांच्या मदतीची त्यांनीं मागणी केली. अखेरीस निःसंशय यश येईल, असें ते लोकांस सांगूं लागले; पण कोणा-सहि त्यांचा भरंवसा वाटेना. पण फ्रेंच सैन्याची फळी फोडणाऱ्या या बहाद्दरानें अशा स्थितींतहि मागें पाऊल घेतलें नाहीं. निराशा, अपयश आणि लोकांची चेष्टा हीं कौंटच्या अंगवळणीं पडल्यासारखीं झालीं. लोक जों जों चेष्टा करीत तों तों त्यांचा हुरूप अधिकच वाढे. अखेरीस येन केन प्रकारेण त्यांनीं तिसरें झेपेलिन बांधण्यापुरता पैसा गोळा केला आणि १९०७ सालाच्या उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत या विमानांतून त्यांनीं सहा वेळ उड्डाण केलें. अखेरच्या खेपेस सुमारें आठ तास हवेंत तरतें राहून व २०० मैलांवर प्रवास करून ते सुखरूपपणें परत आले, तेव्हां साऱ्या देशभर मोठी खळबळ उडून गेली.

बर्लिनमध्यें कौंटच्या शत्रूंचा पक्ष इतका काळ मोठा प्रबळ होता; पण या उड्डाणानंतर तो पक्ष संपुष्टांत येत चालला आणि अखेरीस झेपे-लिन विमानांच्या यशस्वितेबद्दल खुद्द जर्मन सरकारची जेव्हां खात्री झाली, तेव्हां तर हा पक्ष नामशेषच झाला. सरकारनें हें नंबर ३ चें विमान विकत घेतलें व आणखी प्रयोग करण्याकरतां २५००० पौंडांची रक्कम कौंट झेपेलिन यांस देण्याचें मंजूर केलें. याहूनहि अधिक लागणारें द्रव्य मिळविण्याकरतां कौंट यांस सोडत काढण्याचा परवाना पार्लमेंटनें कायदा पास करून दिला. यानंतर कौंट यांचे प्रयोग पुन्हा सुरू झाले व पुन्हा अपयशाशीं त्यांस झगडावें लागलें. १९०८ सालीं आगष्ट महिन्यांत त्यांनीं नवें व मोठें बांधलेलें यान झेपेलिन नं. ४ हें फुटलें त्या वेळीं त्यांचा अपयशाचा जणूं कळसच झाला. हें यान उत्तरेकडून निघून कान्स्टन्स सरोवराकडे जाणार होतें; पण तें मुक्कामास न पोहोंचतां वर्टेमबर्ग संस्थानांतील एक्टरडिनजेन गांवच्या मैदानांत फुटून पडलें;

पण या वेळीं झेपेलिन विमानांच्या यशस्वितेबद्दल जर्मनराष्ट्राची इतकी खात्री झाली होती कीं, हा अपघात एखाद्या राष्ट्रीय आपत्तीसारखा त्यास जाणवला. झेपेलिन यांस आणखी मदत करण्याचा निश्चय लोकांनीं केला. या वेळीं जर्मन जनतेच्या औदार्यास जणूं काय महापूर आला होता. केवळ सहा आठवड्यांच्या अवधींत लोकांच्या वर्गणीनें जमलेली ४५००००० रुपयांची रक्कम कौंट झेपेलिन यांच्या हातीं पडली. पैशाची तजवीज काय करावी, अशी जी भीति कौंट यांस एकसारखी भेडसावीत होती, ती आतां अखेरची दूर झाली. कान्स्टन्स सरोवराकांठीं असलेल्या फ्रेड्रिकसेव्हन गांवीं झेपेलिन यानें बांधण्याकरतां त्यांनीं एक गोदी उभारली. अत्यंत प्रचंड आकाराची झेपेलिन–आकाशनौका--या गोदींत एका महिन्यांत तयार व्हावी अशा प्रकारची यंत्रसामग्री येथें आहे. एक्टरडिनजेन येथील अपघातानंतर आणखीहि पांच सहा आकाश-नौकांस अपघात झाला; पण त्यांत कोणीहि मनुष्य दगावलें नाहीं. हे अपघात यांत्रिक कमतरतेमुळें घडून आले नसून पुष्कळ वेळां निष्काळजी-पणामुळें व कित्येक वेळां इतर बाह्य कारणांनीं घडून आले होते. १९०९ सालच्या वसंतमासात आणखी एका नव्या पद्धतीची आकाशनौका झेपेलिन यांनीं बांधली. कौंटच्या अंगांत काय कर्तबगारी होती. ती या नौकेनें सिद्ध करून सर्वांस आश्चर्यानें थक्क करून सोडलें. ही नौका फ्रेड्रिकसेव्हन येथून निघून साक्सनी प्रांतांत गेली व तेथून पुन्हा वर्टेमबर्गला परत आली. अशा रीतीनें एकसारखी ३८ तास हवेंत राहून तिनें एक हजार मैलांचा प्रवास केला.

कौंट झेपेलिन हे स्वभावानें अत्यंत नम्र व शालीनतेची केवळ मूर्ति आहेत. कीर्तीच्या व वैभवाच्या अत्युच्च शिखरावर आज ते आरूढ झाले आहेत; पण त्यांचा मार्ग त्यांस भयंकर अडचणींतून काढावा लागला आहे. ते मध्यम उंचीचे असून शरीरानें फार बांधेसूद व दिसण्यांत क्षात्र-तेजानें युक्त असे आहेत. चोहोंकडून त्यांजवर स्तुतीचा वर्षाव होत असतां त्यांच्या नम्र स्वभावांत यत्किंचितहि फरक झाला नाहीं. गर्व त्यांस कधीं शिवलाहि नाहीं. स्टट्गार्ट गांवीं एकाद्या सामान्य मनुष्याच्या पद्धतीनें ते



हर फॉँ क्रप्.

रहात असतात. नवी नौका तयार झाली ह्मणजे तिच्या पहिल्या उड्डाणाचें वेळीं सुकाण्याचें काम अद्यापीहि ते स्वतःच करतात. स्वतःच्या नांवाची टिमकी ते कधींहि वाजवीत नाहींत. या बाबतींत लॉर्ड रॉबर्टस यांज-सारखीच यांची वागणुक आहे. 'आपलें खरें राहाण्याचें ठिकाण मेघ लोक हेंच आहे' असें ते ह्मणत असतात. ते कधीं काळीं बर्लिनला गेले, तर तो दिवस सार्वजनिक उत्सावाप्रमाणें गाजला जातो; पण युद्धखातें किंवा आरमारी खातें यांच्याशीं कांहीं जरूरीचें खलबत करणें असेल, तर तेव-ढ्याचपुरते ते राजधानीला जाऊन येतात. एका कन्येवांचून त्यांस दुसरी संतति नाहीं. तिचा विवाह बर्लिन येथील एका लष्करी अम्मलदाराशीं झाला आहे. आकाश नौका-नयनाच्या कलेंत तीहि अत्यंत प्रवीण असून नव्या नौका बांधण्याच्या कामांत आपल्या वडिलांस ती पुष्कळ मदत करीत असते. झेपेलिन नौकांची बांधणी व तींतील संचारक यंत्रें यांची उत्तम माहिती तिला आहे. कौंट झेपेलिन यांचा एकंदर आयुष्यक्रम एकाद्या मनोराज्यासारखा भासतो; पण आद्यापीहि त्यांचें एक मनोराज्य अपूर्णावस्थेंत आहे. वृद्धापकाल प्राप्त होण्यापूर्वी उत्तर ध्रुवाकडे प्रवास करून तिकडील अज्ञात प्रदेशाचा शोध लावावा. असा त्यांचा बेत आहे. सरकार आणि लोकमत यांचा पूर्ण पाठिंबा यांस आहे, हें सांगावंयास नकोच. या दिशेनेंहि त्यांचें पाऊल बरेंच पुढें पडलें आहे. आणखी थोड्याच वर्षांच्या अवधींत महासमुद्रांचें उल्लंघन करून झेपलिन आकाशनौका एका देशाहून दुसऱ्या देशीं सुखरूप प्रवास करतील असें ह्मणण्यास प्रत्य-वाय दिसत नाहीं.

---

## क्रप फॉं वॉहूलेन.

तुर्की बाल्कन युद्धांत बाल्कन संस्थानांच्या फौजा तुर्कांचा चक्काचूर करून त्यांस आशियाखंडाकडे एकसारख्या रेटीत सुटल्या, त्या वेळीं तुर्कांच्या या अपयशाचें खापर क्रपच्या तोफखान्यावर फोडण्यांत आलें.

क्रपनें पुरविलेला तुर्की तोफखाना अयशस्वी झाल्यामुळें तुर्कांचा खुर्दा उडाला, असें साऱ्या युरोपचें—किंबहुना साऱ्या जगाचें—मत झालें. या मुद्यावर मतभेद होण्याचा पुष्कळ संभव आहे. तथापि एक परिणाम मात्र या वेळीं विशेषें करून दृष्टीस पडला, तो हा कीं, युरोपच्या असल्या टीकेनें जर्मन राष्ट्रांत अत्यंत विषाद उत्पन्न झाला. जर्मनींत तयार झालेल्या वस्तूंवर अनेकांनीं अनेक प्रकारच्या टीका आजपर्यंत केल्या असतील; पण या वेळीं जर्मन राष्ट्राला जें दुःख झालें, तसें तें या पूर्वी केव्हांहि झालें नसेल. क्रपचा कारखाना हा जर्मन राष्ट्राच्या अभिमानाचा विषय आहे. होहेनझोलार्न घराण्याबद्दल जी पूज्यबुद्धि व जो आदर जर्मन राष्ट्राच्या मनात वसत आहे, तितकाच तो क्रपच्या कारखान्या-बद्दलहि आहे. त्या कारखान्याची निंदा करणें, ह्मणजे सर्व राष्ट्रावर शिंतोडा उडविणें होय, असें त्यांस वाटतें. कारखान्याच्या कीर्तीला जो हा डाग क्षणैक लागला आहे, तो लवकरच पुसून जाईल यांत संशय नाहीं.

लुलेबर्गास आणि कर्क किलेसी या लढायांतील तुर्कांचा पराभव जर्मन तोफखान्यामुळें झाला, हें तज्ज्ञाचें ह्मणणें खरें असेल, तर जगांतील बावन युद्ध खातीं अर्ध्या शतकभर एक मोठी चूक करीत आहे, असें ह्मणणें भाग पडतें. इतक्या युद्ध खात्यांनीं आजपर्यंत तीस हजारांवर प्रचंड क्रप तोफांची खरेदी केली आहे. क्रपच्या तोफांना आश्रयदाते युरोपांतील तेवीस राष्ट्र असून याशिवाय अमेरिकेंतील १८, आशियांतील ६ आणि आफ्रिकेंतील पांच राज्यें या तोफा खरेदी करीत आहेत. खुद्द जर्मन राष्ट्राची खरेदी या सर्वांहून मोठी असल्यामुळें जर्मनी इतक्या मूर्खांच्या शिरोभागीं आहे, असें ह्मणणें भाग पडतें. एवढ्या मोठ्या राष्ट्र संघास मूर्खांचा बाजार म्हणणें धाष्टर्याचें नव्हे काय ?

१८५१ सालीं लंडन येथें एक मोठें प्रदर्शन भरलें होतें. या प्रदर्शनांत ऱ्हाईन नदीकांठच्या एका अप्रसिद्ध कारखानदारानें सहा पौंडाचा गोळा फेंकणारी एक तोफ मांडली होती. ही तोफ बनविण्याकरतां उपयोगांत आणलेल्या पोलादाचा गुण पाहून सर्व लष्करी लोक आश्चर्यानें थक्क

झाले. या वेळेपासून जर्मनीच्या लष्करी आणि आरमारी खात्यांनीं क्रपच्या तोफा घेण्यास सुरुवात केली. आजपर्यंत त्यांनीं सुमारें २९००० तोफांची खरेदी केलेली आहे. जर्मन राष्ट्र एकाद्या युद्धांत पडले, तर मेट्झ् आणि कॉनिग्जबर्ग येथील बुरूजांवरून कडकडणारा क्रपचा तोफखाना, भेदरलेल्या आणि अशिक्षित तुर्कांच्या तोफखान्याहून निराळ्याच प्रकारची कर्तबगारी दाखवील. अशा प्रचंड युद्धाच्या वेळीं जर्मन तोफखान्याच्या मागें खरे मर्द सज्ज असल्याचें दिसून येईल.

तुर्को-बाल्कन युद्ध संपल्यानंतर वुइलियम बादशाहाच्या जन्म दिवशीं क्रपच्या कारखान्याचा वाढदिवस साजरा करण्यांत आला. या वेळीं या कारखान्यांतील निरनिराळ्या शाखांचे मुख्य अधिकारी व एंजिनियर मिळून दोन तीन हजार लोकांचा समुदाय जमला होता. यांत एक अत्यंत विनयशील व दिसण्यांत सरदारी रुबाबाचा असा एक तरूण पुरुष आला होता. मुख्य वक्त्याचें काम त्या दिवशीं या तरुण पुरुषा-कडेच होतें. तो ह्मणाला, " क्रपचा तोफखाना आणि क्रपची एकंदर कारागिरी यांजबद्दल चोहोंकडून सध्यां प्रतिकूल टीका करण्यांत येत आहे. असल्या दंतकथांवर विश्वास ठेवणारा तुह्मांमध्यें एक तरी आहे काय? क्रपचा तोफखाना समागमें घेऊन रणमैदानांत उतरणें भाग पडेल, तर जगांतील कोणत्याहि शत्रुविरुद्ध तसें करण्यास माझी तयारी आहे, व तशीच ती तुह्मां सर्वांची असेल, याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. आपण ज्या कांहीं कारागिरीच्या वस्तु तयार केल्या आहेत, त्या वस्तु जणूं काय आमच्या प्रत्यक्ष देहाचे भागच आहेत व त्यांजबद्दल आपणां सर्वांस अत्यंत अभिमान आहे. हें मला पक्कें माहीत आहे." या वक्त्याचें नांव डॉ. गस्टाव्ह क्रप फॉं बोह्लेन अँड हॉलबॅक असें होतें. क्रपच्या कारखान्याची एकटीच मालकीण बर्था क्रप हिच्याशीं यांचा विवाह झालेला आहे.

एवढ्या मोठ्या कारखान्याच्या मालकिणीचे हे गृहस्थ यजमान आहेत, एवढ्यावरच त्यांची सांप्रतची कीर्ति अवलंबून नाहीं. साऱ्या जर्मनींतील अत्यंत श्रीमान म्हणून नाणावलेल्या घराण्याशीं यांचा शरीरसंबंध झाला,

हें त्यांच्या कीर्तीचें कारण नव्हें. डॉ. क्रप फॉं बोह्लेन हे क्रपच्या कारखान्याच्या शिरोभागीं आज आहेत, याचें कारण शरीरसंबंध हें नसून त्यांच्या अंगचे गुणच कारण आहेत. पूर्वी परराष्ट्रीयखात्यांत हे एक कामगार होते. ही कामगिरी त्यांस वंशपरंपरा प्राप्त झाली होती आणि तींतहि त्यांनीं चांगलें यश मिळविलें होतें. या नौकरीचा राजीनामा देऊन क्रप कारखान्याच्या शिरोभागीं ते आरूढ झाले, आणि तेव्हांपासून या कामांतहि स्वतःच्या आंगची कर्तबगारी उत्तम प्रकारें त्यांनीं जगाच्या निदर्शनास आणली आहे. क्रपच्या कारखान्याच्या मालकाबद्दल जो आदर गेल्या तीन पिढ्या त्यांतील कामगारांच्या मनांत वसत आहे, तोच आदर त्या कारखान्यांतील पंचाहत्तर हजार कामगारांच्या व एकंदरींत तीन लक्ष मनुष्यवस्तीच्या मनांत डॉ. क्रप फॉं बोह्लेन यांजबद्दल आजहि दिसून येतो. पृथ्वीच्या कोणत्याहि भागांत जाण्याचें कारण डॉ. क्रप यांस पडलें, तर तीन लक्ष मनुष्यें डोळे मिटून त्यांच्या मागून जाण्यास सिद्ध आहेत.

उत्तर समुद्रापासून बर्लिनपर्यंत पसरलेल्या पश्चिम प्रशियांत ज्या कोणीं प्रवास केला असेल, त्यांना तेथील धुराड्यांचें अरण्य आणि हजारों धूर सोडणाऱ्या लहान लहान नळ्या आठवत असतीलच. रूर नदीच्या खोऱ्यांत असलेल्या एसेन गांवीं या प्रचंड कारखान्याची उभारणी झाली आहे. मुख्य कारखान्यानें १२०० एकर जागा व्यापली असून त्यांपैकीं २३५ एकरांवर कारखान्याच्या इमारती बांधलेल्या आहेत. इंग्लंडांत शेफिल्ड आणि अमेरिकेंत पिट्सबर्ग हीं दोन शहरें लोखंडाच्या कारखान्याबद्दल नांवाजलेली आहेत. हीं दोन्ही शहरें जणूं काय एकत्र होऊन जोडीनेंच एसेन गांवीं अवितीर्ण झालीं आहेत कीं काय, असा भास होतो. क्रपकंपनीचा फक्त एसेन येथील कारखानाच एवढा मोठा आहे. याशिवाय पेमेन येथें ८५ मैल लांबीची जागा या कंपनीच्या ताब्यांत असून तेथें तोफांचा पल्ला अजमाविण्यांत येत असतो. या ठिकाणीं ३९००० लोक कामावर आहेत. तसेंच ॲनन् आणि ब्रुसन् येथें चिलखतांचें पोलाद करण्याच्या शाखा

असून त्या कारखान्यास लागणारा कोळसा त्यांच्या मालकीच्या खाणींतून पुरविला जातो. या खाणी ऱ्हाइन नदीच्या कांठीं वेस्टफ्यालिया प्रांतांत असून याशिवाय सायलेशियांतहि कांहीं कांहीं खाणी या कंपनीच्या मालकीच्या असून त्या सर्वांत मिळून दहा हजार कामकरी कामावर आहेत. लोखंडाचा रस करण्याच्या शाखा व्हीनहासन्, डुइसबर्ग, न्यूवीड, आणि एंगर्स येथें असून यांत १५००० कामकरी आहेत. कील येथें क्रपची जर्मानिया या नांवाची एक गोदी असून तिनें ५६ एकर जागा व्यापली आहे. या ठिकाणीं ६१०० कामकरी बेडर जहाजें, आगमाशांचीं जहाजें आणि पाणबुड्या बांधण्याच्या कामांत गुंतले आहेत. तसेंच जर्मनींत आणि स्पेनमध्यें कंपनीच्या मालकीच्या ज्या लोखंडाच्या खाणी आहेत, त्यांत ५००० माणसें अशुद्ध लोखंड खणण्याच्या कामावर आहेत. ही अशोधित धातु भट्टीवर आणण्याकरतां कंपनीनें स्वतःच्या मालकीच्या आगबोटी बांधल्या आहेत. ह्या आगबोटींतून अशोधित धातु प्रथम राटरड्याम येथें नेली जाते. या बंदरांतहि कंपनीच्या मालकीची एक गोदी आहे. ही धातु राटरड्याम येथून भट्टीवर नेली जाते आणि पुढें कांहीं दिवसांनीं ती जहाजांचीं चिलखतें, वेढ्याच्या प्रचंड तोफा आणि प्राणहारक गोळे इत्यादि जर्मन कारागिरीच्या रूपानें बाहेर पडतें. क्रप कंपनीला कामगारांचा पगार वाटण्यास दरसाल साडेसात कोट रुपये लागतात.

डॉ. फॉं क्रप बोह्लेन यांनीं क्रपच्या मालकिणीशीं लग्न केलें, तेव्हां पोपच्या दरबारीं असलेल्या प्रशियन वकिलाचे ते चिटणीस होते. यांचें पूर्वींचें नांव डॉ. फॉं बोह्लेन अँड हॉलबॅक असें असून या तोफांच्या मालकिणीशीं त्यांचा विवाह झाल्यानंतर क्रप हें आणखी एक नांव जोडण्याची परवानगी बादशहांनीं त्यांना दिली. यापूर्वीं अमेरिकेच्या वाशिंगटन राजधानींत असलेल्या जर्मन वकिलातींत व पेकिन येथील जर्मन वकिलातींत ते कामावर होते. त्यांचा जन्म शांतता परिषदेसंबंधानें सुप्रसिद्ध असलेल्या हेग शहरीं झाला. त्या वेळीं त्यांचे वडीलहि परराष्ट्रीय खात्यांत कामगार होते. डॉ. क्रप फॉं बोह्लेन यांचें वय सध्यां ४५

वर्षांचें आहे. यांच्या माता पितरांच्या द्वारें यांचा संबंध अमेरिकेशींहि पोहोंचतो. यांचीं मातापितरें फिलाडेलफिया येथें जन्मलीं होतीं. यांचे आजे हे युंनायटेडस्टेटच्या सैन्यांत एक सेनापति होते. क्रपच्या कारखान्याची मालकीण आपल्या आईबरोबर इटली देशांत प्रवास करीत असतां तिच्या लग्नाचा योग यांच्याशीं जुळून आला व १९०६ च्या आक्टोंबर महिन्यांत एसेन येथील क्रपच्या बंगल्यांत त्यांचा विवाह झाला. या प्रसंगीं बादशहा स्वतः हजर होते आणि साऱ्या राष्ट्राच्या वतीनें त्यांनीं या जोडप्यास आशीर्वाद दिले. ‘ जर्मन राष्ट्राची सुरक्षितता आणि त्यांची भावी उत्क्रांति हीं क्रपच्याच हातांत आहेत, ’ असें बादशहा या वेळीं ह्मणाले.

क्रपच्या कारखान्याच्या तिसऱ्या पिढीचे ( यांच्या पूर्वींचे ) मालक फ्रेड्रीक आल्फ्रेड क्रप हे अठ्ठेचाळीस वर्षांचे होऊन १९०२ सालीं वारले. यांना पुत्रसंतति नव्हती. यामुळें कारखान्याची मालकी त्यांची वडील कन्या बर्था इजकडे आली. त्या वेळीं कायद्याप्रमाणें ही मुलगी अज्ञान होती. हिच्या आईलाच हिचे पालक नेमण्यांत आलें होतें. १९०३ सालीं या कारखान्याचें स्वरूप पालटून त्याला संयुक्त भांडवलाच्या कारखान्याचें स्वरूप आलें. एकंदर भागांपैकीं फक्त चार भाग खेरीज करून बाकींचे सर्व बर्था क्रप हिच्या नांवानें नोंदण्यांत आलें. हिची धाकटी बहीण बर्बरा हिला तिच्या बापानें स्वतंत्र उत्पन्न करून दिलें आहे. हें उत्पन्नहि पुष्कळ मोठें आहे; पण बर्था हिच्या उत्पन्नाच्या मानानें तें कांहींच नाहीं. बर्थाचें वार्षिक उत्पन्न सुमारें साडेसतरा कोट रुपयांजवळ असावें, असा अदमास आहे. उत्पन्नाच्या बाबतींत सुद्धां ती बादशहाहूनहि अधिक श्रीमंत आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

जर्मनींतील या अत्यंत श्रीमान घराण्याची राहणी मात्र अतिशय साधी आहे. तींत भपक्याचा किंवा चैनीचा यत्किंचितहि समावेश झालेला नाहीं. मध्यम स्थितींतील हजारों जर्मन घराणीं यांच्याहून अधिक भपक्यानें वागत असतात. डॉ. क्रप फॉं बोह्लेन व त्यांची पत्नी हीं उभयतांहि अत्यंत साध्या स्वभावाचीं असून क्रपचा कारखाना ही एक पवित्र ठेव

आपल्या ताब्यांत आली आहे, असे तीं समजतात. कारखान्यांतील मजुरां-पैकीं जे कोणी आजारानें अथवा इतर कारणांनीं निकामी होतील, त्यांच्या मदतीसाठीं त्यांनीं एक मोठा फंड उभारला असून त्यांत सदोदित भर टाकणें एवढेंच व्यसन या जोडप्यांस आहे. कारखान्यांतील कामगारासाठीं स्वतंत्र वसाहती बांधण्याचें काम त्यांनीं सुरू केलें असून त्यांच्या फुरसतीचा बराचसा वेळ या कामांत जातो. तसेंच पेन्शनांत गेलेल्या वृद्ध कामगारांसाठींहि स्वतंत्र घरें बांधण्याची व्यवस्था त्यांनीं केली आहे. एकंदरींत स्क्रीडर–क्रूसो ( फ्रान्स ) व व्हिकर्स–म्याक्झीम्. ( इंग्लंड. ) यांच्याशीं तोफांच्या बाबतींत चढाओढ करून अधिक श्रीमंत होण्यापेक्षां आपल्या कारखान्यांतील कामगारांची योग्य तरतूद करणे त्यांस अधिक श्रेयस्कर वाटतें. मोठमोठीं सरदार घराणींच काय, पण अनेक राजवाडेहि त्यांचा सत्कार करण्यास खुले होऊन बसले आहेत; पण हें जोडपें आपल्या कौटुंबिक सुखाचा त्याग करून कोठेंहि फार करून जात नाहीं. बर्लिन येथें मोठमोठे सरदार व घरंदाज यांचा समाज दरबारी उत्सवासाठीं जमला असतां, त्यांत हर्र आणि फ्राउ (मिस्टर आणि मिसेस) क्रप हें जोडपें फार करून आढळून यावयाचें नाहीं. फारच झालें, तर क्वचित प्रसंगीं एकाद्या हवा खाण्याच्या ठिकाणीं थोडेसे दिवस तें जात असतें. जून महिन्यांत कील येथें जी नौकांची मोठी शर्यत होते, तिला मात्र हें जोडपें अवश्य हजर असावयाचें. या शर्यतींत बादशहांची नौका मिटिआर व क्रपची नौका जर्मानिया यांची चढाओढ मोठी प्रेक्षणीय असून तींत पुष्कळ वेळां बादशहांचा पराभव झाला आहे. समुद्रावर फिरण्याचा त्यांस मोठा शौक आहे, ही गोष्ट खरी; तथापि त्यांचा बहुतेक वेळ कारखान्यांतील कामदारांच्या व स्वतःच्या तीन मुलांच्या तैनातींतच जातो. याप्रमाणें हें जोडपें परोपकाराच्या कार्यांत सदोदित गुंतलें असतांहि स्वतःच्या कारखान्याच्या वाढीकडे त्यांनीं बिलकुल दुर्लक्ष केलेलें नाहीं. १९०८ सालीं हर्र क्रप फॉं बोह्लेन यांनीं कंपनीचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. त्या वेळेपासून सकाळीं बरोबर नऊ वाजतां एकाद्या सामान्य कामगाराप्रमाणें ते आपल्या ऑफिसांत हजर होतात. दुपारचे बारा वाजेपर्यंत कारखा-

ऱ्यांतील मुख्य अधिकाऱ्यांच्या भेटीचें काम चालू असतें. कारखान्यांतील सर्व घडामोडीची यच्चावत् माहिती ते रोज मिळवीत असतात. पोलाद बनविण्याच्या कृतींतील सर्व बारिकसारीक खुब्या ते उत्तम प्रकारें जाणतात. कारखान्यांत बऱ्याच सुधारणा स्वतःच्या अक्कलहुशारीनें त्यांनीं घडवून आणल्या आहेत. तोफा व चिलखतें तयार करण्याच्या कलेंत फ्राउ क्रप यांहि मोठ्या तरबेज आहेत. या कलेंत त्यांच्या वडिलांनीं त्यांस उत्तम प्रकारचें शिक्षण दिलें होतें. त्याहि रोज कारखान्यांत जात असतात, आणि कित्येक वेळां आपल्या पांच वर्षांच्या मुलाला हातीं धरून त्याला कारखाना दाखवीत त्या फिरतात. क्रपच्या कारखान्याचे भावी मालक म्हणजे हे छोटे गृहस्थ अशा रीतीनें आतांपासूनच आपल्या भावी उद्योगाची ओळख करून घेत आहेत. कारखान्याच्या डायरेक्टरांच्या सभेंतहि फ्राउ फॉं बोह्लेन कित्येक वेळां हजर असतात व कित्येक वेळां त्या अशा कांहीं मार्मिक सूचना करतात कीं, स्वतःच्या धंद्यांत निष्णांत असलेल्या त्या डायरेक्टरांसहि त्यांच्या बुद्धिमत्तेचें मोठें आश्चर्य वाटतें.

फ्राउ क्रप यांस त्यांच्या वडिलांकडून जसें धंद्यांतील शिक्षण उत्तम मिळालें, तसेंच त्यांच्या आईकडून घरगुती शिक्षणहि त्यांस उत्तम मिळालें असून घरधनीण कशी असावी याचा नमुना त्यांच्या ठिकाणीं प्रत्यक्ष पहाण्यास सांपडतो. स्त्रियांस मतांचा अधिकार असावा, असल्या प्रकारच्या अलीकडच्या चळवळींत त्या कधींहि पडत नाहींत. तसेंच नटून, मुरडून गांवभर भटकत फिरण्याचा शोकहि त्यांस नाहीं. गांवांतल्या उठाठेवी करण्यापेक्षां अथवा स्त्रीस्वातंत्र्याच्या वगैरे चळवळी करण्यापेक्षां रिकामा वेळ आपल्या मुलांच्या संगतींत घालविणें व त्यांस शिक्षण देणें हेंच त्यांना अधिक आवडतें. खुद्द एसेन गांवींहि होणाऱ्या सार्वजनिक समारंभास त्या फार करून हजर रहात नाहींत. आपल्या वडिलांचा वाढ दिवस अद्यापीहि मोठ्या समारंभानें त्या साजरा करीत असतात. कारखान्यांत ज्यांची नोकरी पुरी २५ वर्षें झाली असेल अशा लोकांना या दिवशीं शेला. पागोटीं त्या देत असतात. दर वर्षीं असे ग्राहक सुमारें चारशें



फॉं डर गोल्ड.

असतात. या सर्वांशीं हास्तांदोलन करून त्यांस पारितोषिकें देण्याचा त्यांचा परिपाठ आहे. स्वतःच्या कारखान्यांतील मजुरांचें हित चिंतणें हा त्यांचा एक धर्मच होऊन बसल्यामुळें कारखान्यांतील लोकांचेंहि त्यांजवर मातेप्रमाणें प्रेम जडलें आहे.

क्रपच्या राहत्या घराचें नांव व्हिला ह्युजेल असें असून त्यांत चैनीच्या वस्तूंचा समावेश केल्याचें कोठेंहि आढळून येत नाहीं. यांच्या घरीं येणारे सर्व पाहुणे यांच्या साध्या रहाणीनें चकित होतात. तथापि प्रापंचिक सुखाचा इतका उत्तम नमुना आपणास दुसऱ्या कोठें आढळला नाहीं, असेंहि ते ह्मणतात. चैनीचा व भपक्याचा इतका विलक्षण सुकाळ साऱ्या जगभर झाला असतांहि अगदीं साध्या रहाणीनें जगाला ललामभूत होणारीं माणसें अद्यापि थोडी तरी आहेत, असें या कुटुंबावरून आढळून येतें. श्रीमंती आणि दुर्व्यसनें यांचा संबंध जगाच्या आरंभापासून नित्य आढळून येत आहे; परंतु श्रीमंतीचा सदुपयोग केल्याचीं जीं थोडींशीं उदाहरणें आढळून येतात, त्यांतच या कुटुंबाची गणना करणें भाग आहे.

---

## फाँ डर गोल्डज्.

आपल्या सैन्याचें बळ वाढविण्याकरतां जर्मनी सव्वा पांच कोट पौंड दरसाल खर्च करतो. या द्रव्यनिधीचा मुख्य प्रवाह पूर्व सरहद्दीवरील ठाण्यीं बळकट करण्याकडे होत आहे. युरोपांत स्लाव्ह वंशानें अधिराज्य मिळवावें कीं, या खंडाचें पुढारीपण जर्मन वंशाच्या हातीं जावें, याचा निकाल लवकरच केव्हां तरी लागणार असून त्यासाठीं ही सारी तयारी आहे. रशिया, फ्रान्स, बल्गेरिया, ग्रीस, सर्व्हिया आणि मॉंटेनिग्रो इतक्या राष्ट्रांच्या सैन्याशीं तोंड देण्यास समर्थ असें सैन्य जर्मनी आणि आस्ट्रिया-हंगारी या दुकलीनें अथवा त्रयीनें उभारणें अत्यंत आवश्यक आहे, असा समज साऱ्या जर्मनींत झालेला आहे. नवा बाल्कनसंघ निर्माण होण्यापूर्वी आस्ट्रियाचें सैन्य रशियास पुरें पडण्याइतकें होतें, व जर्मनीवर फक्त

पश्चिम सरहद्दीचीच जबाबदारी येईल, असा समज होता; पण यानंतर ज्या कांहीं गोष्टी घडून आल्या, त्यामुळें पूर्व युरोपांतील सामर्थ्याचें केंद्र बदललें. लष्करीदृष्ट्या आस्ट्रियाची जी मदत जर्मनीला झाली असती, तिच्यांत नव्या परिस्थितीमुळें निदान शेंकडा चाळीस या प्रमाणानें उणीव आली. बाल्कनसंघ आस्ट्रो-जर्मनांच्या विरुद्ध गेला, तर रशिया आणि फ्रान्स या दोन्ही सरहद्दी सांभाळण्याचें काम एकट्या जर्मनीवरच पडणार आहे.

स्लाव्ह कीं टयूटन? या प्रश्नाचा निकाल लागण्याची वेळ येईल, त्या वेळीं त्या रणयज्ञांत फिल्ड मारशल जनरल ब्यारन फॉं डर गोल्डज् यांस बहुधा अध्वर्युत्वाचा मान मिळेल, असा बराच संभव आहे. तुर्कांचें सैन्य गोल्डज् यांच्या हातीं तयार झालें होतें व गेल्या तुर्को-बाल्कन युद्धांत तुर्कांची जी दुर्दशा झाली ती पाहून या सेनानायकाच्या कौशल्याबद्दल पुष्कळांचीं मनें साशंक होतीं, यांत संशय नाहीं. गोल्डज्पाशाच्या कीर्तीला कर्ककिलेसी आणि लुलेबर्गास येथें कायमची मूठमाती मिळाली, असा समज सर्वत्र पसरला आहे. बाल्कन युद्ध संपल्यानंतर निंदेनें भरलेलीं जीं अनेक पत्रें गोल्डज् यांस आलीं, त्यावरून निंदकांत पुष्कळसे त्यांचे देशबांधवहि आहेत, हें उघड सिद्ध होतें; तथापि जर्मनीच्या लष्करी-खात्यावर मात्र या गोष्टीचा कांहीं परिणाम झाला आहे, असें दिसत नाहीं. नंबर २ च्या सैन्याची पाहणी करण्याचें इन्स्पेक्टर जनरलचें काम अद्यापीहि फॉं डर गोल्डज् यांजकडे आहे. साऱ्या जर्मन सैन्यांत गार्डस्चें पथक अत्यंत श्रेष्ठ समजलें जातें. या पथकाची पाहणीहि गोल्डज् हेच करीत असतात. जनरल गोल्डज् हे तोंडाचे थोडेसे फटकळ असल्यामुळें बादशहांची मर्जी त्यांजवर फारशी फिदा नाहीं. अशा स्थितींत त्यांची अपकीर्ति पसरली असतांहि एवढ्या महत्त्वाच्या जागीं अद्याप ते काम करीत आहेत, यावरूनच त्यांची योग्यता सिद्ध होते. विस्तुला नदी उतरण्याचा प्रसंग प्राप्त झाल्यास आघाडीच्या घोड्यावर गोल्डज्पाशाची स्वारी विराजमान होईल, असा पुष्कळांचा समज आहे. जर्मनीच्या सेनानायकांच्या शिरोभागीं बसण्यास तेच योग्य आहेत, ही जाणीव सामान्य जर्मन राष्ट्राच्या मनांतून अद्यापि नाहींशी झालेली नाहीं.

१९०२ आणि १९०७ या दोन सालांच्या दरम्यान प्रशियन सर-हद्दीवरील कोनिग्जबर्ग येथील सैन्यावर ते मुख्य अधिपति होते व त्या वेळीं त्या सैन्याची जी व्यवस्था त्यांनीं लावली, ती त्यांच्या कीर्तीस प्रथम कारणीभूत झाली. हे पूर्व प्रशियांतील रहिवाशी असल्यामुळें तेथल्या सैन्याचें आधिपत्य त्यांना स्वतःला प्रिय होतें आणि तसेंच त्या प्रदेशाची सर्व बाबींची माहिती त्यांना असल्यामुळें सर्वांशीं सहकारितेनें त्यांस आपले हेतु पार पाडतां आले. कोनिग्जबर्ग येथील सैन्याची तयारी किती जय्यत आहे, याची खुलासेवार माहिती अर्थातच गुप्त राखण्यांत आली आहे; तथापि ती तयारी अत्युत्कृष्ट आहे, याबद्दल मात्र सर्वांची खात्री आहे. जनरल गोल्डज् हे प्रतिभावान् आणि स्वतंत्र विचाराचे शिपायी गडी असल्यामुळें या सरहद्दीवर त्यांनीं केलेली तयारी शत्रु व मित्र या दोघांसहि प्रसंगविशेषीं चकित करून सोडील यांत शंका नाहीं. पूर्वी कोणाच्या ध्यानांतहि आली नसेल इतकी ती तयारी अप्रतिम आहे, असें पूर्व प्रशियांतील सामान्य लोकमत आहे. सैन्याच्या व्यूहरचनेच्या शाखेंत गोल्डज् हे पहिल्या प्रतीचे सेनापति आहेत व त्यांच्या कौशल्याचें पुरें तेज पडण्यास कोनिग्जबर्ग ही योग्य रणभूमि आहे. या सरहद्दीवर होणाऱ्या युद्धांत निरनिराळ्या हालचालींचें लष्करी महत्त्व काय आहे, याची माहिती सर्व सैन्यास करून देण्याची खटपट त्यांनीं प्रथम केली. शिपायी होणें म्हणजे नुसतें खेळाचें काम नसून प्रत्येकानें आंग मोडून मेहनत केली पाहिजे, हें तत्त्व त्यांनीं सर्व अम्मलदारांच्या व शिपायांच्या गळीं उतरविलें. या बाबतींत स्वतःच्याच उदाहरणानें त्यांनीं धडा घालून दिला. सैन्याच्या हालचाली होत असतां त्यासंबंधीं ते जीं सूचनापत्रें काढीत, तीं लष्करी माहितीनें पूर्ण भरलेलीं असत. प्रत्येक वेळीं कांहीं तरी नवा धडा त्यांजकडून शिपायांस मिळत असे. गोल्डज् यांच्या हाताखालीं तयार झालेला अम्मलदार म्हणजे लष्करी विद्येंतला मुरब्बी असा त्यांचा लौकिक पसरला आहे.

गोल्डज् याचें वय सुमारें ७३ वर्षांचें असून यापैकीं पन्नासाहून अधिक वर्षे त्यांनीं स्वारी शिकारींत, लष्करी कामांत व लष्करी ग्रंथरचनेंत

घालविले आहेत. खऱ्या शिपाई बाण्याचा गडी कसा असावा हें फिल्ड मारशल कौंट फॉं हेसेलर यांजपासून आपण शिकलों, असें गोल्डज् ह्मणत असतात. कौंट हेसेलर हेहि एक नाणावलेले सेनापति असून अद्यापि ते हयात आहेत. गोल्डज् यांची नेमणूक पूर्व प्रशियांत झाली असतां हेसेलर हे फ्रेंच सरहद्दीवरील सैन्य अजिंक्य करण्याच्या तयारींत गुतले होते. फ्रांको—प्रशियन युद्धाच्या वेळीं प्रिन्स फ्रेडरिक कार्ल यांच्या सैन्याचे आधिपत्य हेसेलर यांजकडे होतें व जनरल गोल्डझ् हे त्यांच्या हाताखालीं दुय्यम अधिकारी होते. त्या वेळीं आपल्या हाताखालच्या या तरुण अम्मलदारास हेसेलर एकदां ह्मणाले, " मनुष्यें आणि जनावरें यांच्या अंगांत गुप्त कर्तबगारी किती असते, हें तूं येथें शिकून घे. या माहितीचा तुला पुढें उपयोग होईल. " त्या वेळच्या युवराजाच्या सैन्यांत यांची महत्त्वाच्या जागीं नेमणूक झाली असतां, आपणास सैन्याच्या हालचालीचा विलक्षण युद्ध चमत्कार पहावयास सांपडेल, असें त्यास वाटत होतें. या संबंधीं गोल्डज् स्वतःच एके ठिकाणीं ह्मणतातः—" नुसत्या लष्करी उपपत्तीपेक्षां माणसें आणि घोडीं यांचें गुप्त सामर्थ्य काय आहे, हें पक्कें माहित असणें अधिक महत्त्वाचें आहे. ही गोष्ट या वेळेपर्यंत माझ्या लक्षांत आली नव्हती. एकाद्या अम्मलदारानें सकाळीं चार तास व दुपारीं तीन तास नोकरी केली ह्मणजे त्याचें मुख्य कार्य संपलें, असा माझा समज होता. इतकी नौकरी बजावल्यानंतर दुसऱ्या कांहीं करमणुकींत वेळ घालविण्याचा हक्क अम्मलदारांना आहे. असा माझा समज होता; पण कौंट हेसेलर यांच्या हाताखालीं काम करूं लागल्यापासुन हा माझा समज बदलला. कौंटसाहेब झोंप केव्हां घेतात, आणि जेवणखाण तरी केव्हां उरकतात, हेंच मला समजेना. मग करमणुकीची गोष्ट तर बोलावयासच नको. पहावें तेव्हां ते कोणत्याना कोणत्या लष्करी कामांत गुंतलेले आढळावयाचे. तेव्हांपासून एकादी क्षुल्लक गोष्ट सुद्धां करून टाकीपर्यंत अम्मलदारानें विश्रांति घेतां उपयोगी नाहीं, हें तत्त्व मी शिकलों. माझ्यावरील मुख्य अधिकारी कौंट हेसेलर हे विलक्षण कंटक वृत्तीचे आहेत. चैन कशी ती त्यांस ठाऊकच नाहीं. तसेंच त्यांची

शिस्त इतकी कडक होती कीं, बारिकसारिक गोष्टींतहि ते कोणाचा मुलाहिजा ठेवीत नसत. कसल्याहि अडचणीनें ते कधीं गांगरून गेले नाहींत आणि कित्येक वेळां सामान्य मनुष्याच्या दृष्टीनें अनुल्लंघ्य अशा अडचणींतून हे आपल्या उद्योगानें पार पडून गेले. अशा प्रकारच्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं मला लष्करी शिक्षणाचा लाभ झाला नसता, तर माझा आयुष्यक्रम कांहीं निराळ्याच तऱ्हेनें रेंखाटला गेला असता. ''

फिल्ड मारशल फॉं डर गोल्डज् हे पहिल्या प्रतीचे लष्करी ग्रंथकार आहेत. यांनीं कोणत्याहि लष्करी कामगिऱ्या केल्या नसत्या, तरी केवळ लेखांच्या द्वारें यांची कीर्ति अजरामर झाली असती. हे लष्करी खात्यांत शिरले; त्या वेळीं लहान वयांतच यांची साहित्याची आवड दृष्टोत्पत्तीस आली. आरंभीं कादंबऱ्या लिहिण्याचा नाद यांना होता. हीं गोष्टींचीं पुस्तकें विकून उत्पन्न झालेला पैसा हे आपल्या विधवा मातोश्रीस देत असत. यानंतर लष्करी दृष्टचा महत्त्वाचा '' लिऑं ग्यांबेटा आणि त्याचें सैन्य '' या नांवाचा एक ग्रंथ त्यांनीं लिहिला. या ग्रंथानें त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली; पण त्यामुळें ते थोड्याशा पेंचांतहि आले. लष्करी नौकरी तीन वर्षां ऐवजीं दोन वर्षांची करावी, असें ह्मणणारा एक पक्ष या वेळीं जर्मनींत आस्तित्वांत आला होता. हा पक्ष जर्मन सरकाराला नावडता झालेला होता. प्रस्तुत ग्रंथांतहि याच मताचें परंपरया समर्थन केलें असल्यामुळें गोल्डज् सरकारच्या रोषास पात्र झाले. बादशहाच्या तैनातींत असलेल्या लष्करी अम्मलदारानें अशी वर्तणुक करणें सरकारास गर्हणीय वाटलें. या त्यांच्या कृतीबद्दल शिक्षा ह्मणूनच कीं काय त्यांची बदली जेरा येथील ठाण्यावर करण्यांत आली. हें पुस्तक १८७७ सालीं प्रसिद्ध झालें आणि तेंव्हांपासून सर्व राष्ट्रांचें लक्ष या प्रश्नाकडे लागलें आणि त्या वेळीं गोल्डज् यांजवर सरकारची इतराजी झाली, तरी खुद्द सरकारनेंच सोळा वर्षांनंतर हें तत्त्व प्रत्यक्ष आमलांत आणलें.

१८८३ सालीं गोल्डज यांनीं लिहिलेलें ' राष्ट्राची लष्करी तयारी ' ( A Nation in Arms. ) हें पुस्तक फार सुप्रसिद्ध आहे.

राष्ट्रांतील सर्व तरुणांनीं लष्करी शिक्षण अवश्य घेतलें पाहिजे, या तत्त्वाचें समर्थन या ग्रंथांत फार चांगल्या रीतीनें केलें आहे. लॉर्ड रॉबर्टस हे या तत्त्वासाठीं इंग्लंडांत कित्येक वर्षे चळवळ करीत होते. त्यांच्या विरुद्ध गडबड करणाऱ्या लोकांनीं गोल्डज् यांचा ग्रंथ एक वेळ तरी अवश्य वाचून पहावा. युरोपांतील बहुतेक भाषांत त्याचें भाषांतर झालें असून हें तत्त्व बहुतेक सर्व देशांत आतां मान्य झालें आहे. जर्मनींतील सोशियालिस्ट पक्षानें या तत्वाविरुध्द चळवळ आरंभिली तेव्हां, ती हाणून पाडण्याकरतां 'तरुण जर्मन संघ' (young German League.) या नांवाची एक संस्था निर्माण होऊन तिचें अध्यक्ष पद गोल्डज् यांना देण्यांत आलें. यानंतर गोल्डज् यांनीं लिहिलेल्या पुस्तकांत 'फ्रेड्रिक धी ग्रेटने केलेलीं युध्दें' 'सेनानित्व' व 'एकोणिसाव्या शतकांतील जर्मन युध्दांचा इतिहास' हीं पुस्तकेंहि नांवाजलेलीं आहेत. शेवटच्या ग्रंथांत 'जर्मनीचें महत्त्व तलवारीच्या धारेवर अवलंबून आहे' या मताचा अनुवाद केला आहे. गोल्डज् ह्मणतात, "आपल्या मानसिक तरलतेनें नव्हे, तर तलवारीच्या तीक्ष्णतेमुळें आपलीं स्वप्नें प्रत्यक्ष सृष्टींत खरीं ठरण्याच्या मार्गास लागलीं आहेत. सर्व बाजूंनीं जर्मन राष्ट्राची वाढ फार झपाट्यानें होत आहे; पण हीच वाढ भावी सुरक्षिततेस भयावह आहे. कारण तीमुळें आपण सुरक्षित आहों, असा भ्रम वाढून लोकांत चैनीची प्रवृत्ति होते. चैन आणि सुरक्षितपणाचा भ्रम हीं दोन्हीहि राष्ट्रास नेहमीं विघातक होतात. राष्ट्राच्या एकंदर वाढीबरोबर पौरुषाचीहि वाढ होणें अवश्य आहे. ज्या राष्ट्रांत ही वाढ जोडीनें होईल, तेंच राष्ट्र इतिहासांतील आपलें महत्व राखूं शकेल." भाषासौष्टव आणि उत्कृष्ट वर्णनशैली हीं गोल्डज् यांच्या लेखाचीं प्रमुख अंगें आहेत. त्याच्या ठिकाणीं भाषाप्रभुत्व केवढें आहे, हें यावरून दिसून येतें.

पुष्कळ सैन्य असलें म्हणजे लढाईत यश अवश्य येतें, या नेपोलियनच्या मताचा पुरस्कार गोल्डज् करीत नाहींत. लक्षावधि बाजारबुणग्यांपेक्षां उत्तम लष्करी शिक्षण मिळालेली एकच पलटण अधिक उपयोगी आहे, असें यांचें मत आहे.

सुलतान अबदूल हमीद यांच्या कारकीर्दींत तुर्कांना लष्करी शिक्षण देण्याच्या कामावर सन १८८३ सालीं यांची नेमणुक झाली. १८९५ पर्यंत या कामावर हे होते. हें काम यांनीं हातीं घेतलें त्या वेळीं तुर्की सैन्याची खरी लष्करी किंमत बाजारबुणग्याहून अधिक नव्हती. असल्या प्रकारच्या लोकांतून शिस्तवार लष्कर उभें करणें हें मोठ्या त्रासाचें काम होतें. तशांतून गोल्डज् यांच्या विरुद्ध कान्स्टांटीनोपल येथें होणारे कट, खुद्द बादशहाची उदासीनता आणि संशयी वृत्ति हीं लक्षांत घेतलीं म्हणजे बारा वर्षांच्या अवधीनंतरहि गोल्डज् यांनीं आपल्या कार्यांत इतकें तरी यश कसें मिळविलें, याचेंच आश्चर्य वाटतें. सुलतान अबदुल हमीद यांनीं आपल्या हेरांचें जाळें यांच्या भोंवतीं पसरून ठेवलें होते. गोल्डज् यांनीं हातीं घेतलेल्या प्रत्येक कामांत खो घालण्याचें सत्कार्य हे लोक करीत असत. एके वेळीं सैन्याची लटकी लढाई करण्याचें अभिवचन गोल्डज् यांनीं सुलतानापासून मोठ्या मिनतवारीनें मिळविलें; पण अखेरीस खलीपानें ही लढाईसुद्धां बंद केली. या लढाईचा खरा उद्देश तक्ता-विरुद्ध कट उभारण्याचा आहे, असें आजूबाजूच्या हुजऱ्यांनीं खलिफाच्या मनांत भरविलें. त्या भित्र्या सुलतानालाहि हें म्हणणें खरें वाटलें. सुल-तानाचा भित्रेपणा इतक्या परमावधीस पोहोंचला होता, कीं, गोळी अस-लेलीं काडतुसें त्यांनीं शिपायांस कधींहि दिलीं नाहींत. तोफखान्यांतहि गोळे वापरण्याची त्यांनीं सक्त मनाई केली होती. जर्मनींतून तुर्की-सैन्याकरतां मासर बंदुका येऊन पडल्या होत्या; पण सहा वर्षांत त्या पेट्यांचे खिळेहि बाहेर निघाले नाहींत. तुर्की लष्कर तयार करण्याचें काम गोल्डज् यांस कशा परिस्थितींत करावें लागलें, याची कल्पना या उदाहरणावरून कोणासहि येईल. तथापि आज नाहीं उद्यां ही परिस्थिति पालटेल, या आशेवर भिस्त ठेवून गोल्डज् यांनीं आंगीकृत कार्य सोडलें नाहीं. मोठ्या धीरानें व भगीरथ प्रयत्नांनीं त्यांनीं तुर्की सैन्यास अंशतः तरी चांगलें स्वरूप दिलें. कान्स्टांटीनोपल सोडून ते बाहेर पडले, त्या वेळीं बऱ्याच प्रकारें तयार झालेले लष्करी अम्मलदार, राखून ठेवलेलें 'लॅंडव्हर व लॅन्सर' सैन्य, एक लष्करी पाठशाळा, युद्धविषयक नकाशे

तयार करण्याचें खातें आणि सैन्य भरतीची योजना, इतक्या निशाण्या गोल्डज् यांनीं मागें ठेवल्या आहेत. सैन्याला नव्या बंदुका व नवा तोफखाना त्यांनीं दिला. तसेंच तुर्कस्थानास जेथें जेथें युद्धांत उतरण्याचा संभव दिसला, तेथील सर्व योजनांचे नकाशेहि त्यांनीं आगाऊ तयार करून ठेवले. १९०९ सालीं तुर्कस्थानांत राज्यक्रांति होऊन तरुण तुर्कांचा पक्ष अधिकारारूढ झाला. तुर्की सैन्य तयार करण्याकरतां गोल्डज् यांस पुनः पाचारण करण्यांत आलें; पण या बोलावण्याचा स्वीकार त्यांनीं केला नाहीं. १९१० सालीं पुनः दोन महिनें ते कान्स्टांटीनोपल येथें जाऊन राहिले होते. ते जर्मनींत परत आले, त्या वेळीं तुर्की लष्कर योग्य माणसांच्या हातीं आहे, अशी त्यांची समजूत झाली होती; पण १९१२ सालीं घडलेल्या तुर्कोबाल्कन युद्धानें त्यांचें भ्रमनिरसन होऊन त्यास अतिशय दुःख झालें.

तुर्को-बाल्कन युध्दांत तुर्कांचा झालेला खुर्दा, हाच जर्मनीचा पराभव होय, या समजांत स्वाभाविक तत्त्व कांहींच नाहीं. तुर्कांच्या लष्करी सामर्थ्याची अंतःस्थ माहिती ज्यांस आहे, असे सर्व तज्ज्ञ यासंबंधाचा दोष जर्मनीला मुळींच देत नाहींत. बल्गेरिया, सर्विया, ग्रीस आणि मान्टेनिग्रो यांच्या लष्करी धडाडीपुढें ज्या तुर्की सैन्याचा चक्काचूर झाला, तें सैन्य वस्तुतः गोल्डज् यांच्या हाताखालीं तयारच झालेलें नाहीं. या तुर्की सैन्याची खरी लष्करी योग्यता बाजारबुणग्याहून अधिक नसून तयारीच्या दृष्टीनेंहि त्यांत उणीवा होत्या. अन्नसामग्री आणि दारूगोळा यांचा भरपूर पुरवठा तुर्की लष्करांत नव्हता, यामुळें आरंभापासूनच तुर्की लष्कर हताश स्थितींत होतें. त्याच्या जर्मन गुरूंनीं जें शिक्षण त्यांस दिलें होतें, तें सारें घरीं ठेवून हें लष्कर युद्धास उद्युक्त झालें होतें. तोफखाना कोणत्या रीतीनें उभा करावा ही विद्या तें साफ विसरून गेलें होतें. शत्रुसैन्याच्या नजरेस अगदीं सहज रीतीनें येईल, इतक्या उघडपणें तोफा उभ्या करण्याचें शिक्षण गोल्डज् यांजकडून त्यांस खास मिळालें नव्हतें. एका तुर्कीठाण्यावर गुप्त तोफखाना होता व त्यावर जर्मन लष्करी अधिकारी होते. हा तोफखाना अखेरपर्यंत बंद पाडतां आला नाहीं, अशी

हकीकत काहीं बल्गेरियन लष्करी अम्मलदारांनींच प्रसिद्ध केली आहे. ॲड्रियानोपलच्या शिबंदींत साठ जर्मन अम्मलदार होते. हा किल्ला अखेर पर्यंत भांडला ही गोष्ट सर्वत्र महशूर आहे. तुर्की सैन्याप्रमाणेंच तुर्की आरमाराचीहि या युद्धांत दैना झाली. तुर्की आरमार तयार करण्याचें काम इंग्रज ॲडमिरल गॅंबल याजकडे होतें. आणि तुर्की सैन्याचे मुख्य सेनापति नाझीमपाशा हे फ्रान्सांतील सेन्टसीर येथील लष्करी पाठशाळेंत तयार झाले होते. तुर्की सैन्याच्या अपयशाबद्दल ब्रिटिश आरमारी शिक्षण अथवा फ्रेंच लष्करी पद्धत जशी जबाबदार धरतां येत नाहीं. त्याचप्रमाणें या अपयशाचें खापर गोल्डझ् यांच्या माथीं मारतां येत नाहीं. अनेक अंतःस्थ कारणांनीं तुर्की सैन्याची स्थिति आंतून पोखरलेल्या झाडासारखी झाली होती. तुर्कोबाल्कन युद्धांत तुर्कांना अखेरीस अपेश आलें, तथापि त्यांचे पिढीजाद लष्करी गुण अद्यापि लुप्त झालेले नाहींत, असें जनरल गोल्डझ् हे स्वतः अजूनहि ह्मणतात. ॲड्रियानोपलचा वेढा व स्कुटारी चाटल्जा आणि जॉनिना येथील रणसंग्राम तुर्कांच्या पिढीजाद लष्करी गुणाची अद्यापीहि साक्ष देतात, असें त्यांचें म्हणणें आहे. कर्क—किलसे, लुले—बर्गास आणि कुम्यानोवा येथें तुर्कांनीं मार खाल्ला असला, तथापि त्यांच्या नाड्यांत अद्यापीहि प्लेव्हनाच्या वीरांचें रक्त खेळत आहे, असें गोल्डझ् ठासून सांगतात.

सामान्यतः बाह्यस्वरुपांत गोल्डझ् हे लष्करी बाण्याचे दिसत नसून त्यांची मुद्रा एकाद्या पंडिताला किंवा अध्यापकाला शोभण्यासारखी आहे. जर्मनराष्ट्र आणि खुद्द बादशहा यांच्या मनांत त्यांजबद्दल अत्यंत आदर वसत असून अनेक पदव्यांचा वर्षाव त्यांनीं त्यांजवर केला आहे. १८६६ सालीं झालेल्या आस्ट्रो—प्रशियन युद्धांत हे दुय्यम लेफ्टनंट होते. त्यावेळीं यांच्या खांद्यास तोफेच्या गोळ्याची जखम झाली होती. या खालच्या दर्जापासून वाढत वाढत आज ते फील्डमारशलच्या अत्युच्च जागीं विराजमान झाले आहेत व त्यास नाइट ऑफ दी ब्लॅक ईगल हा बहुमानाचा चांद मिळाला आहे. चवदाव्या लुईच्या कारकीर्दींत फ्रान्स देशांत गोल्डझ् या नांवाचा एक गृहस्थ मारशल ऑफ फ्रान्स म्हणजे फ्रान्सचा मुख्य

सेनाधिपति होता. हाच गोल्डझ् आपला पूर्वज आहे, असें जनरल गोल्डझ् ह्मणतात. यांची मुद्रा अत्यंत सौम्य आहे; तथापि ते निधड्या छातीचे व खंबीर मनाचे आहेत. एकादा मनुष्य जगाच्या दृष्टीनें मोठा, एवढ्याच साठीं ते त्याजपुढें कधींहि मान वांकवावयाचे नाहींत. वरिष्ठाशीं वांकून रहावयाचें व कनिष्ठास दयार्द्रतेनें वागवावयाचें असा त्यांचा बाणा आहे. भपकेबाज लष्करी पोशाक घालून व बिल्ले आणि चांद छातीवर लटकावून दिखाऊ समारंभात मोरासारखें नाचणें त्यांना आवडत नाहीं. कांहीं राजकीय समारंभ झाले, तर त्याच्या हुद्याचा पोषाक घालून हजर राहणें त्यांना भाग पडतें व अशा प्रसंगीं बादशहांची तलवार सांभाळण्याचा मान त्यांजकडे असतो. तथापि अशा प्रसंगीं सुद्धां केवळ कर्तव्य ह्मणून ते हजर राहतात व अशा प्रसंगीं आपणास मोठा मान मिळाला, असें त्यांना वाटत नाहीं.

जर्मन राष्ट्राच्या लष्करी रक्षणासाठीं जो नवा कायदा पास झाला, त्यांत या विषयाबद्दलचीं गोल्डझ् यांचीं मतें स्पष्टपणें व्यक्त झालीं आहेत. चाऱ्ही सरहद्दीवर जर्मन लष्करांची कडेकोट तयारी सदोदीत जय्यत असली पाहिजे, असें त्यांचें मत आहे. जर्मनीनें लष्करी मदतीसाठीं कोणाच्याहि तोंडाकडे पाहतां कामा नये, असें ते स्पष्ट ह्मणतात. बाल्कन युद्धांत तुर्कांस आलेल्या अपयशामुळें त्यांच्या कीर्तिसूर्यावर जर्मनींत कसलीहि छाया पडलेली नाहीं. तुर्की सैन्य भुसकुटासारखें उडून गेलें, ह्मणून एकाद्या महायुद्धाच्या प्रसंगीं जर्मन लष्कराचीहि तीच दशा होईल, असें कोणास वाटत असेल, तर तो त्याचा भ्रम आहे. महायुद्धाचा वणवा युरोपांत पेटला व अखेरीस विजयश्रीनें कोणासहि माळ घातली, तरी जर्मन लष्कर वाटतें तितकें कुचकें नाहीं, असें निःसंशय सर्वांच्या प्रत्ययास येईल.

## ॲडमिरल फॉं कोस्टर.

जगांतील पार्लमेंटांच्या इतिहासांत अननुभूत अशा प्रकारचा एक देखावा १९०९ च्या मार्च महिन्याच्या आरंभीं जर्मन पार्लमेंटांत दिसून आला. जर्मन आरमाराच्या वाढीकरतां तीस कोटी रुपये खर्चावे, अशा आशयाचा एक कायदा यावेळीं एकाहि विरुद्ध मतावांचून जर्मन पार्लमेंटांत पास झाला. या कायद्यानें तीन सवाईड्रेडनॉट जहाजें, एक मोठें क्रुझर आणि याच प्रमाणावर धाकटीं क्रुझरें, आगमाशांच्या बोटी आणि पाणबुड्या बांधण्याची परवानगी जर्मन राष्ट्रानें आपल्या सरकारास दिली. या कायद्याच्या मसुद्यावर वादविवाद झाला, त्यावेळीं त्या विरुद्ध एक अक्षरहि कोणी उच्चारलें नाहीं किंवा एकाहि सभासदानें असंतोष प्रदर्शित केला नाहीं. एवढ्या मोठ्या खर्चाची बाब अंगावर येत असतां त्या विरुद्ध कोणीहि तकरार केली नाहीं, ही गोष्ट जगाच्या पार्लमेंटांच्या इतिहासांत खरोखरच अननुभूत आहे.

आपलें सैन्य जय्यत राखण्यासाठीं जर्मनराष्ट्र प्रतिवर्षीं सुमारें दीड अब्ज रुपये खर्चीत आहे. हा पैसा उत्पन्न करण्यासाठीं जर्मनराष्ट्रावर लादलेलें करांचें ओझें जवळ जवळ असह्य होण्याइतकें मोठें असतांहि आरमाराप्रीत्यर्थ त्यानें एवढ्या मोठ्या खर्चाची परवानगी बिनतकरार दिली, या गोष्टीवरून जर्मनराष्ट्राच्या मानसिक परिस्थितीची ओळख पटते. ही परिस्थिति येण्यास काय कारणें झालीं असावींत याचा विचार करणें फार मनोरंजक आहे. १८९८ सालीं जर्मनीचा आरमारी खर्च नऊ कोट रुपये होता. तो १९१३ सालीं चवतीस कोटींच्या वर गेला. एवढ्या खर्चाच्या वाढीला जर्मनराष्ट्रानें बिनतकरार अनुमति दिली, याचें सर्व श्रेय 'जर्मन नेव्ही लीग' या संस्थेस दिलें पाहिजे. आजपर्यंत जर्मनराष्ट्र कवींचें व तत्त्ववेत्त्यांचें आहे, असा त्याचा लौकिक होता; पण यापुढें हा मनु बदलून ते राष्ट्र नाविकांचेंहि आहे, असें जगाच्या प्रत्ययास येईल. समुद्रावर वर्चस्व मिळविण्याकरतां जर्मनराष्ट्रानें आपलें सर्व बळ खर्च केलें पाहिजे, या तत्त्वाचा प्रसार करण्यांत सदरहू लीगनें जिवापाड खट-

पट केली आहे. कोरड्या सभा भरवून ठराव पास करणें आणि वर्षाच्या अखेरीस सर्वांनीं मिळून एखादी मेजवानी झोडणें, असल्या प्रकारचें कार्य या लीगनें केलेलें नाहीं. या संस्थेचे सुमारें दहा लक्ष सभासद असून आपल्या तत्त्वांचा प्रसार करण्याकरतां यांपैकीं प्रत्येक जण शक्य तितकी मेहनत करीत असतो.

अशा प्रकारच्या राष्ट्रीय चळवळी सुरू झाल्या म्हणजे त्यांना एकादा मोहोरक्या असतोच. त्याप्रमाणें या चळवळीचा पुढाकारहि ॲडमिरल फॉं कोस्टर यांनीं घेतला आहे. कोस्टर हे जर्मन आरमारांतले एक सुप्रसिद्ध व बुद्धक कामदार आहेत. यांच्याच परिश्रमानें या संस्थेला तिचें सांप्रतचें स्वरूप प्राप्त झालें असून तिचे उद्देश इतके फलद्रूप होण्यासहि त्यांचेच श्रम कारणीभूत झाले आहेत. अगदीं हलक्या दर्जापासून वाढत वाढत पन्नास वर्षांच्या नौकरींत ॲडमिरलच्या अति श्रेष्ठ पदावर हे केवळ स्वकष्टानें चढले आहेत. सुमारें आठ वर्षांपूर्वीं नेव्ही-लीगचें अध्यक्षपद त्यांस प्राप्त झालें. या संस्थेच्या कारकीर्दींत हा काळ अगदीं आणीबाणीचा होता. पूर्वींच्या अध्यक्षाच्या माथेफिरूपणामुळें ही संस्था बुडण्याच्या पंथास आली होती. ही संस्था नामशेष झाली असती, तर सरकारी आरमारखात्यालाहि भविष्यत् कालीं फार अडचणी उपस्थित झाल्या असत्या. समुद्रावर आरमारी वर्चस्व मिळविण्याकरतां जें धोरण जर्मन सरकारनें स्वीकारलें आहे, तें सारें ढांसळून पडण्याचा संभव होता. याच सुमारास ग्रँड ॲडमिरल कोस्टर यांनीं आरमाराचें आधिपत्य नुकतेंच सोडलें होतें. फिल्डमार्शल ही जशी लष्करांतील अति श्रेष्ठ पदवी आहे, तशीच ग्रँड ॲडमिरल ही आरमारांतील श्रेष्ठ पदवी आहे. वृद्धापकाळीं सुखानें राहतां येईल अशी त्यांची सांपत्तिक स्थिति होती; तथापि केवळ आळसांत काळ घालविण्यापेक्षां देशहिताच्या कोणत्या तरी उद्योगांत तो घालविणें त्यांना अधिक श्रेयस्कर वाटलें. आरमारीसंघ डबघाईस आला आहे, असें पाहून त्याला चिरस्थाई स्वरूप देण्याचें कार्य यांनीं आपल्या शिरावर घेतलें. सर्व कामें शिस्तवार रीतीनें हाताखालच्या लोकांकडून उरकवून घेण्याची विद्या उपजतच फॉं कोस्टर यांच्या अंगीं

होती. आरमारीसंघांत पडणाऱ्या फाटाफुटीस त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें आळा घातला आणि ही संस्था लौकरच जोरानें कार्य करूं लागेल अशीं चिन्हें दिसूं लागलीं.

"जर्मनीचा भावी उदय समुद्रावर आहे." हें ब्रीद वाक्य बादशहा वुइलियम यांनीं चालू शतकाच्या आरंभीं उच्चारलें. जर्मनराष्ट्राला जगांत कांहीं महत्व प्राप्त करून घ्यावयाचें असेल, तर मोठें आरमार बांधून आपलें वर्चस्व त्यानें समुद्रावर प्रस्थापित केलें पाहिजे व घरच्या घरीं माशा मारीत न बसतां जर्मन लोकांनीं महासागरांचें आलोडन केलें पाहिजे, असें बादशहा ह्मणाले. अशा प्रकारच्या उत्साहजनक भाषणांनीं जर्मन-राष्ट्राच्या कल्पनाशक्तीस नवें चैतन्य मिळालें होतें. जर्मन पार्लमेंटात या वेळीं अनेक पक्ष अस्तित्वांत होते. पक्षभेदाच्या अडचणींतून सुरक्षित-पणें आपला मार्ग शोधून काढणें आरमारीखात्यास फार जड झालें होतें. हें कठिण कार्य या वेळीं ग्रँड ॲडमिरल फॉं टिरपिट्झ यांनीं बऱ्याच अंशीं सिद्धीस नेलें; तथापि या कामीं टिरपिट्झ यांस देशाचें पाठबळ मिळवून देण्याचें अधिक कठिण काम जर्मन आरमारीसंघानें केलें. प्रसंग पडेल त्याप्रमाणें कधीं उत्साहजनक लेखांनीं व भाषणांनीं, तर कधीं दुसऱ्या राष्ट्रांबद्दल भीति उत्पन्न करून जर्मनराष्ट्राचा उत्साह या आर-मारीसंघानें या वेळीं कायम राखला होता. नवे नवे आगगाडीचे फांटे बांधण्याकरतां अतोनात खर्च करणें जर्मनराष्ट्राच्या आंगवळणीं अगोदरच पडलें होतें. त्याचप्रमाणें आरमारी खर्चाची वाढहि त्याच्या आंगीं आतां पूर्णपणें मुरून गेली आहे. गेल्या सतरा वर्षांच्या अवधींत जर्मन आरमारी-संघानें जे भगीरथ प्रयत्न केले, तसे प्रयत्न दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांत कोणत्याहि चळवळीसाठीं झाले नसतील.

या आरमारीसंघाच्या सभासदांची संख्या सध्यां जवळ जवळ साडे-बारा लक्ष असून त्याच्या पसतीसशें शाखांचें जाळें सर्व देशभर पसरलें आहे. कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें या संघाचा प्रवेश न झालेलें असें एक खेडेंसुद्धां साऱ्या राष्ट्रांत सांपडावयाचें नाहीं. कील बंदरापासून ५०० मैल अंतरावर बव्हेरिया प्रांतांत बिनूस्व्यांजेन् या नांवाचें एक

खेडें आहे. एकदां एक प्रवासी या खेड्यांत गेला होता. या खेड्यांतील लोकांनीं कधीं स्वप्नांतहि मोटारगाडी पाहिली नव्हती; तथापि वेडर जहाजाबद्दल मात्र त्यांना पूर्ण माहिती होती, असें या प्रवाशाला आढळून आलें. हें खेडें सोडून निघतांना हा प्रवासी तेथील पाटलास भेटावयास गेला. तेव्हां आरमारीसंघाच्या सभासदाच्या अर्जाचा नमुना त्याच्यापुढें करून पाटीलबोवांनीं त्यावर सही करण्याची त्याला हळूच विनंति केली.

नेव्ही लीगचें गुंतविलेलें भांडवल तीन लक्ष रुपये असून सभासदांकडून येणारें वार्षिक उत्पन्न जवळ जवळ अडीच लक्ष रुपयांचें आहे. या लीगचें डायफ्लॉट नांवाचें वर्तमानपत्र असून त्यांतील जाहिरातींचें उत्पन्न वर्षाकाठीं पाऊण लक्ष रुपयांचें होतें. यांत बहुधा तोफांचे व बोटींचे कारखानदार यांच्याच जाहिराती असतात. आरमाराबद्दल लोकांच्या मनांत उत्साह कायम राखण्यासाठीं हा संघ सुमारें चार लक्ष रुपये दरसाल खर्च करीत असतो. डायफ्लॉटच्या तीन लक्ष साठ हजार प्रति जर्मनींत व बाह्यदेशीं दरमहा पसरवून संघाची चळवळ जिवंत ठेवीत असतात. खेडींपाडीं, मध्यम गांवें आणि मोठीं शहरें यांत हजारों प्रचारक नित्य फिरत असून आपल्या मिठ्या भाषणांनीं लोकांचीं मनें या कार्याकडे ओढण्यासाठीं खटपट करीत असतात. या कंपनीच्या मालकीचे वीस सिनेम्माटोग्राफ असून ते देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सदोदित फिरते ठेवले जातात. अशा प्रकारें प्रत्यक्ष चित्रांच्या द्वारें आरमाराचें महत्त्व निरक्षर लोकांपर्यंतहि पसरविण्याचें कार्य हा संघ करीत असतो. प्रतिवर्षीं उन्हाळ्याच्या सुट्टींत अनेक शाळांतील शिक्षक आणि विद्यार्थीवर्ग यांस निरनिराळ्या बंदरीं फिरतीवर नेऊन तेथील गोद्या व आरमार यांची प्रत्यक्ष ओळख त्यांस करून देण्यांत येते. या प्रसंगीं जमलेल्या शिशुगणांच्या चित्तांत अशा प्रकारच्या उत्साहाचें बीजारोपण केलें जातें, कीं येथून आपल्या गांवीं परत गेलेला प्रत्येक विद्यार्थी संघाचा उत्साही प्रचारक बनतो. अशाच रीतीनें संघाच्या सभासदांसहि फिरतीवर नेण्यांत येत असतें. समुद्रापासून दूर असलेल्या भागांत ही चळवळ जिवंत ठेवण्याची खटपट हा संघ विशेष जारीनें

करीत असतो. हँबर्ग, ब्रेमेन, ड्यॉंझिग्, स्टेटिन इत्यादि बंदरच्या लोकांना दर्याची ओळख बाळपणापासून असल्यामुळें आरमाराचें महत्त्व /त्यांस उपजतच कळत असतें, यामुळें त्यांच्यासाठीं विशेष खटपट /करण्याचें अर्थातच कारण नाहीं; पण पूर्व आणि पश्चिम प्रशिया, बव्हेरिया, ऱ्हाइन-ल्यॉंड, वेस्टफालिया, सॅक्सनी इत्यादि भागांत जन्मांत समुद्राचें दर्शन न झालेले अनेक लोक आहेत. यामुळें या संघाची विशेष चळवळ याच लोकांत आहे. आरमाराच्या हालचाली पाहण्यासाठीं या लोकांतून अनेकांस नेण्यांत येतें आणि आरमाराचें महत्त्व त्यांच्या चित्तांत बिंब-विण्याची खटपट अशा रीतीनें एकसारखी सुरू असते.

मोरोक्कोसारख्या राजकीय भानगडी उपस्थित झाल्या म्हणजे या संघाला अधिकच स्फुरण चढत असतें. अशा वेळीं हा संघ प्रत्यक्ष अथवा परंपरेच्या अशा कोणत्याहि मार्गांचा अवलंब करण्यास चुकत नाहीं. हस्तपत्रकें, सभांतील भाषणें आणि वर्तमानपत्रांतील लेख हीं सारीं एकवटून जनतेवर निकराचे हल्ले करूं लागतात. 'अगादीर'सारखीं प्रकरणें उपस्थित होऊन लोकमत खवळलें, तर अशा संधीचा फायदा घेऊन त्या खळबळींत भर टाकण्यास हा संघ चुकत नाहीं. निरनिराळ्या प्रकारचे भयसूचक मथळे वर घातलेलीं हस्तपत्रकें देशांत जिकडे तिकडे दिसूं लागतात. पार्लमेंटाचे सभासद रस्त्यानें चालले म्हणजे 'अधिक बेडर जहाजें बांधा' असा प्रचंड घोष त्यांच्या कानांवर एकसारखा चोहों-कडून आदळत असतो. "जर्मनीचा कडेलोट, भावी युद्ध, जर्मनीला खग्रास ग्रहण," असल्या प्रकारचे मथळे घातलेलीं हस्तपत्रकें कोट्यवधींनीं वाटलीं जातात. जर्मनीच्या आरमारी खर्चास पार्लमेंटानें निमुटपणें मान कशी डोलावली, हें या खटपटीवरून सहज ध्यानांत येईल.

अशा रीतीनें साऱ्या जर्मनराष्ट्रांत खळबळ करून सोडणारे ग्रँड ॲड-मिरल कोस्टर यांची मुद्रा बाह्यतः शांत दिसते. यांची प्रत्यक्ष माहिती ज्याला नाहीं, अशा एकाद्या गृहस्थाला, हे कोणी धर्मगुरू असावेत, असेंच वाटावयाचें. १९०५ सालीं जर्मनीच्या लार्डांच्या सभेचे यांस कायम सभासद करण्यांत आलें आहे. बांध्यानें ते उंच, धिप्पाड व ताठ

असून स्वभावानें अगदीं शांत आहेत. जर्मन आरमार परक्याशीं भांडण्याकरतां उभारलें जात नसून केवळ स्वसंरक्षणासाठीं आहे, असें ते म्हणत असतात. प्रिन्स हेनरी किंवा ॲडमिरल टिरपिट्झ यांच्याप्रमाणेंच ब्रिटिश आरमाराचे हे चाहते आहेत. इंग्लंडशीं सदोदित सल्ला ठेवणें जर्मनीला इष्ट आहे, असें त्यांचें मत आहे; तथापि परस्परांबद्दल परस्परांच्या ठिकाणीं योग्य आदर असल्यावांचून राष्ट्रीय प्रेम कायम राहूं शकत नाहीं व याकरतां इंग्लंडच्या मनांत आदर उत्पन्न करण्यासाठीं जर्मनीनें मजबूत आरमार बाळगलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. संघाची चळवळ कायम ठेवण्यासाठीं, जेव्हां जेव्हां ते स्वतः भाषणें करतात, तेव्हां तेव्हां या तत्त्वाचा अनुवाद ते करीत असतात. जर्मनीनें गुप्तपणें आपलें आरमार वाढविलें आहे, हें म्हणणें निराधार असल्याचें तें सांगतात. जर्मनी जें जें कांहीं करतो, तें सारें उघड माथ्यानेंच करतो, असें ते निक्षून सांगत असतात. जर्मनीला जलद चालीच्या क्रूझरांची अतिशय जरूरी आहे, हें मत हा संघ सध्यां प्रचलित करीत आहे.

ॲडमिरल कोस्टर यांचा जन्म १८४४ सालीं स्वेरीन् गांवीं झाला. मनुष्याच्या आयुष्यांत अनुवंशिक संस्काराचें फार महत्त्व आहे, या मतांत कांहीं तथ्य असतें, तर ॲडमिरल कोस्टर हे मोठे कवी झाले असते. त्यांचे वडील हे बरेचसे नाणावलेले कवी होते. त्यांची आई श्लेजल् कवीची चहाती असून शेक्सपीयरचें भाषांतर करणाऱ्या सुप्रसिद्ध कवींच्या कुलांत जन्मली होती. आपल्या वयाच्या पंधराव्या वर्षीं फॉं कोस्टर प्राशियन आरमारांत शिरले. वयाच्या तिसाव्या वर्षीं क्यापटन् होऊन त्यांनीं जगाचा प्रवास केला. १८९१ सालीं जर्मन आरमारांत शिक्षक म्हणून त्यांची योजना झाली, त्या वेळीं ते दुय्यम ॲडमिरलच्या हुद्यावर होते. १९०३ सालीं थोरल्या काफिल्याचें मुख्य आधिपत्य त्यांस प्राप्त झालें. या कामावर ते तीन वर्षें असून तेवढ्या अवधींत आरमाराची त्यांनीं उत्कृष्ट तयारी केली. कील बंदरीं असतां त्यांस शत्रूहि पुष्कळ उत्पन्न झाले होते; तथापि स्वतःच्या करारीपणानें व बुद्धिसामर्थ्यानें साऱ्या अडचणी बाजूस सारून त्यांनीं आपल्या कार्यांत यश संपादन

केलें. प्रशियाचे प्रिन्स हेनरी हे जर्मन आरमाराचे इन्स्पेक्टर जनरल झाले, त्या वेळीं सर्व आरमार अगदीं जय्यत स्थितींत आहे, असें ॲडमिरल कोस्टर यांनीं त्यांच्या प्रत्ययास आणून दिलें.

अठराव्या शतकाच्या अखेरीस ब्रिटिश आरमारांत ॲडमिरल जर्व्हिस या नांवाचे एक विख्यात गुरू होऊन गेले. त्यांचीच योग्यता फॉं कोस्टर यास आहे, असें त्यांचे शिष्य प्रेमानें म्हणत असतात. ट्रॅफलगारचा अद्वितीय जय नेलसन यांस मिळविण्यास जसे जर्व्हिस यांचे श्रम कारणीभूत झाले, तसेच जर्मनीची भावी ट्रॅफलगार जिंकण्याची तयारी ॲडमिरल कोस्टर यांनीं केली आहे. जर्मनीची आरमारी तयारी कसास लागण्याची वेळ कधीं काळीं आली, तर आरमारांतील लोकांच्या चित्तांत त्या वेळीं ॲडमिरल कोस्टर यांची मूर्ति खास उभी राहील.

---

## आर्थर फॉं ग्विनर.

ज्या मानववंशांत रॉथशाइल्डसारखा पुरुष निर्माण झाला, त्याच वंशांत बुद्धिमान् कुबेर निर्माण व्हावेत, हें अगदीं साहजिक आहे. अशा प्रकारचे अनेक पुरुष जर्मनराष्ट्राला सुदैवानें आज लाभले आहेत. इतर राष्ट्रांना एका काळीं बर्लिनमधून कर्जाऊ पैशाचा पुरवठा होत असे. ही स्थिति अलिकडे बदलून बर्लिन इतरांकडून कर्ज घेत आहे. ही गोष्ट खरी; तथापि व्यापारीदृष्ट्या बर्लिनचें महत्त्व कितीतरी पटीनें वाढलें आहे. सध्यांच्या काळीं जगांतील व्यापारी उलाढालीचें प्रमुख ठिकाण वॉलस्ट्रीट न्यूयार्क हें आहे. वॉलस्ट्रीटमधील भावांच्या चढती पडतीवर सर्व जगाचे बाजार अवलंबून असतात. बर्लिन येथील सराफकट्ट्याला एवढें महत्त्व अद्यापि प्राप्त झालें नसलें, तरी लंडन, न्यूयार्क आणि पारिस येथील सराफकट्ट्यास बर्लिन सराफकट्ट्याचें अस्तित्व जाणवूं लागलें आहे, यांत मात्र शंका नाहीं. जगाचा व्यापार एके काळीं इंग्लंडची ब्यांक, जे. पी. मार्गन कंपनी ( अमेरिका ) आणि क्रेडिट लि ओने ( पारिस ) या त्रयींच्या हातीं होता; पण आतां त्यांत एक नवा भागिदार लवकरच

घुसणार, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ज्या ज्या भूमिभागांत हा भागिदार घुसतो, तेथें तेथें स्वतःचें महत्त्व प्रस्थापित केल्यावांचून तो रहात नाहीं. या भागीदाराचें नांव 'डयूश ब्यांक' असें आहे.

जर्मनींत एकंदर नऊ मोठ्या ब्यांका असून त्यांचीं भांडवलें प्रत्येकीं साडेचार कोटीपासून पंधरा कोट रुपयांपर्यंत आहेत. याशिवाय सर्व राष्ट्रांत नाणावलेले मेंडेलसोन किंवा ब्लिकरोडर सारखे कुबेरहि हा ब्यांकेचा धंदा करीत असतात. या धंद्यांत कलिफर्स्टेनबर्ग, पॉल फॉं श्वाब्याग, पॉल म्यांकिव्हिट्ज़्, ब्यारन ऑपेन्हीम, स्पेअर्स, वारबर्ग, यूजेन गुटमन, आर्थर सालोमनसन् इत्यादि व्यापारी विशेष नाणावलेले असून त्यांच्या हातानें करोडो रुपयांची घडामोड प्रत्यहीं होत असते; तथापि या साऱ्या घडामोडीचें नेतृत्व मुख्यतः डयूश ब्यांकेकडे आहे. बर्लिनमधून सर्व पृथ्वीला आक्रमण करणारा पैशाचा प्रचंड प्रवाह या ब्यांकेच्या तिजोरींतून उगम पावतो. जर्मनीच्या राष्ट्रीय ब्यांकेचें नांव रीश्ब्यांक असें असून पैशाचा वटाव वगैरे कामें हिजमार्फत होतात; तथापि सातां-समुद्रापलीकडे असलेल्या जर्मन व्यापाऱ्यांस पैशाचा पुरवठा डयूश ब्यांकें-तूनच होतो. जर्मनराष्ट्रांत खुद्द सरकारचें जितकें महत्त्व आहे, तितकेंच तें डयूश ब्यांकेचें आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं. ही ब्यांक स्थापन झाली, तेव्हां वर्षाच्या कांठीं जवळ जवळ वीस कोट रुपयांची उलाढाल तिनें केली. ही उलाढाल वाढत वाढत सध्यां एक खर्व रुपयांच्या घरास पोहोंचली आहे. यावरून जर्मनराष्ट्राच्या सांपत्तिक आयुष्य-क्रमांत तिचें केवढें महत्त्व प्रस्थापित झालें आहे, हें उघड सिद्ध होतें.

या ब्यांकेला एवढें महत्त्व प्राप्त होण्यास मुख्यतः आर्थर फॉं ग्विनर यांचेच श्रम कारणीभूत झाले आहेत. या ब्यांकेसाठीं आपण विशेष कांहीं केलें नाहीं, असें ते ह्मणतात; पण ही त्यांची शालीनता आहे. त्यांच्या नांवाचें आद्याक्षर हें वर्णमालेंतील पहिलें अक्षर असल्यामुळें ब्यांकेच्या डिरेक्टरांच्या यादींत यांचें नांव आरंभींच नमूद करण्यांत आलें; पण डिरेक्टरांच्या शिरोभागीं बसण्याचा हा मान केवळ एवढ्याच काकतालीय न्यायावर अवलंबून नसून त्यांची वास्तविक योग्यताच तशी आहे. जुने

डिरेक्टर पाळीपाळीनें जाऊन नवे त्यांच्या जागीं येतात, त्या वेळीं वर्णानुक्रमानें ज्यांचें नांव ग्विनर यांच्या आर्धी येईल, असा मनुष्य न निवडण्याचा या ब्यांकेचा जणू काय नियमच आहे, असें दिसतें. ब्यांकेच्या डिरेक्टरांपैकीं आपण एक सामान्य सभासद आहों, असें ग्विनर ह्मणत असतात; तथापि ज्या ज्या वेळीं डयूश ब्यांक एकादें नवें महत्त्वाचें कार्य संपादिते, त्या त्या वेळीं त्याच्या मुळाशीं ग्विनर हेच आहेत, याबद्दल जर्मन राष्ट्राची—किंबहुना—साऱ्या जगाची खात्री असते. ग्विनर हे साऱ्या सराफांचे अध्वर्यु आहेत, अशी सर्वांची खात्री नसती, तर बादशहांनीं सरकारी तिजोरीच्या किल्ल्या अनेकवार आग्रहानें त्यांस देऊं केल्या नसल्या. ग्विनर यांनीं प्रधानमंडळांत शिरून सरकारी तिजोरी हातीं घ्यावी, अशी इच्छा केसर यांनीं अनेकवार प्रगट केली आहे. हे कट्टे देशभक्त आहेत; तथापि स्वतःच्या धंद्यांतच अखेरपर्यंत राहून आपणास मातृभूमीची सेवा उत्कृष्ट रीतीनें बजावतां येईल, असें बॉलिनप्रमाणेंच यांचेंहि मत आहे. यामुळें प्रधानमंडळांतील मानाच्या जागेचा स्वीकार त्यांनीं केला नाहीं.

डयूश ब्यांकेची स्थापना १८७० सालीं झाली. बिस्मार्क आणि मोल्टके यांच्या फौजा फ्रान्सच्या अघाडीकडे जात असतां इकडे डयूश ब्यांकेची मुहूर्तमेढ रोंवली जात होती. फ्रँको–प्रशियन युद्धांच्या पोटांतून नवें जर्मन साम्राज्य उदय पावलें व त्याच वेळीं या ब्यांकेचाहि उदय झाला. या दृष्टीनें जर्मन साम्राज्याशीं या ब्यांकेचें सहोदरत्वाचें नातें आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. जर्मन राष्ट्राची सांपत्तिक भरभराट आणि या ब्यांकेची वाढ हीं मुद्दां आजपर्यंत जोडीनेंच चालत आलीं आहेत. अगदीं आरंभापासूनचा या ब्यांकेचा सोळा सालचा आढावा तपासून पाहतां ही वाढ एकसारखी साम्राज्याच्या वाढीबरोबर पाऊल टाकीत आहे, असें दिसून येतें. देशांतील उद्योग-धंद्याची वाढ पुष्कळ अंशीं ब्यांकांच्या मदतीवर अवलंबून असते ही गोष्ट खरी; तथापि जर्मनींत हा संबंध जितका अभेद्य आहे, तितका तो दुसरा कोठेंहि नाहीं. प्रत्येक धंद्याला पत ही थोडीबहुत लागतेच; पण सारा धंदा केवळ पती-

वरच चालत नाहीं, अशी स्थिति बहुतेक साऱ्या राष्ट्रांत आढळून येते; पण जर्मनींत कित्येक धंदे नुसत्या पतीवरच अवलंबून आहेत. यामुळें कित्येक धनोत्पादक कारखाने, खाणी आणि समुद्रावरील वाहतुकीचा व्यापार इत्यादि धंदे सर्व या ब्यँकांच्या अमलाखालीं गेले आहेत. कित्येक ब्यँकांचें सारें भांडवल केवळ अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांत गुंतलें आहे. अशा रीतीनें ब्यँका आणि उद्योगधंदे यांजमध्यें होणारा अभेद्य संबंध एकंदरीनें हितावह आहे कीं काय, याबद्दल पुष्कळ परकीय सराफांच्या मनांत शंका आहे; तथापि अशा प्रकारच्या संबंधामुळें जर्मन व्यापारानें साऱ्या जगांत महत्त्वाचें स्थान पटकावलें आहे, हें मात्र नाकारतां येत नाहीं.

जार्ज फॉं सायमेन्स या नांवाच्या गृहस्थांनीं डच्यूश ब्यँक प्रथम स्थापन केली. हे गृहस्थ सांप्रत हयात नाहींत, तरी जर्मनीच्या सांपत्तिक इतिहासांत त्यांचें नांव अजरामर झालें आहे. डच्यूश ब्यँकेनें बाह्यदेशीं गेलेल्या जर्मन व्यापाऱ्यांना पैशाची मदत करावी, ही योजना सायमेन्स यांनीं प्रथम अमलांत आणली. सायमेन्स यांच्या या योजनेमुळें जर्मनीचा व्यापार साऱ्या जगभर पसरण्यास मदत झाली. १८८८ सालीं आनाटोलियन् ( तुर्कीराज्य ) रेलवे बांधण्याची सवलत सायमेन्स यांनीं मिळविली. जर्मनीचा तुर्कीसाम्राज्याशीं जो महत्वाचा संबंध पुढें घडला, त्याला येथूनच प्रत्यक्ष सुरुवात झाली. या वेळीं आर्थर ग्विनर हे सायमेन्स यांचे पट्टशिष्य व मदतगार होते. १९०१ सालीं सायमेन्स परलोकवासी झाले, तेव्हां यांचा सर्व कारभार ग्विनर यांच्या हातीं आला. बगदाद रेलवे बांधण्याची परवानगी ग्विनर यांनीं सुलतान अबदुल हमीद यांजपासून १९०३ सालच्या मार्च महिन्यांत मिळविली. याच सालीं या दोन ह्मणजे आनाटोलियन व बगदाद रेलवे कंपनी यांचे ते मुख्य अध्यक्ष झाले व त्यांचा कारभार ते मुखत्यारीनें पाहूं लागले. आज मितीस सुमारें वीस कोट रुपयांचें जर्मन भांडवल या दोन रेलवेंत गुंतलें आहे. आनाटोलियन रेलवे हैदरपाशा येथून निघून कान्स्टान्टीनोपलला गेली आहे, व तेथून दुसरे दोन फांटे एस्की शहर व अंगोरा यांजकडे गेले आहेत.

एक्सी शहरचा फांटा यापुढें कोनियाला गेला आहे. विख्यात लेखक सिसरो यानें कोनियाहून आपल्या एका स्नेह्याला पत्र लिहिलें, त्या वेळीं त्यांत तो ह्मणाला, "या देशांत माणसाहून गाढवांचीच संख्या अधिक आहे." ग्विनर यांचे सर्व हेतु सफल झाले, तर तुर्कांहून जर्मनांची संख्या तेथें अधिक होईल यांत शंका नाहीं. आनाटोलियन रेलवेची एकंदर लांबी ६५० मैल आहे आणि ही रेलवे जेथें संपते, तेथेंच बगदाद रेलवेस आरंभ होतो. बगदाद रेलवे कोनियापासून निघून इराणच्या आखातापर्यंत येऊन भिडावयाची आहे. याशिवाय भूमध्यसमुद्रावरील आलेक्झांड्रेटा बंदरापर्यंतहि या रेलवेचा एक फाटा जावयाचा आहे. ख्रिस्ती शतकाच्यापूर्वीं ३३३ साव्या सालीं याच जागीं आलेक्झांडर आणि इराणचा बादशहा यांजमध्यें मोठें युद्ध होऊन त्यांत इराणी बादशहाचा पूर्ण पराभव झाला. बगदाद आणि इराणचा उपसागर यांजमधील फांट्याच्या बांधणीस अद्याप सुरुवात झालेली नाहीं. याच प्रदेशांत जर्मनी आणि इंग्लंड यांच्या तंट्याचें मूळ आहे. इराणच्या उपसागरापर्यंत रेलवे बांधण्याचा हक्क आपणास आहे, हें जर्मनीचें म्हणणें इंग्लंडच्या मनास येत नाहीं. जर्मनीच्या मालकीची व जिचा सर्व कारभार जर्मनांच्या हातीं आहे, अशी रेलवे हिंदुस्तानच्या जवळपास येणें ही गोष्ट इंग्रजांस रुचली नाहीं, किंबहुना ती त्यांस अनर्थावह वाटली, तर त्यांत नवल नाहीं. समुद्रावरील मार्गापेक्षां हा खुष्कीचा रस्ता दहा दिवसांनीं कमी लांबचा आहे.

बगदाद रेलवे बांधण्यांत ग्विनर यांचा कांहीं लष्करी हेतु आहे, असें ह्मणावयास जागा नाहीं. फक्त ड्यूश ब्यांकेला अधिक फायदा कसा मिळेल, व जर्मनीचा व्यापार पूर्वेकडे अधिक मोठ्या प्रमाणावर कसा फैलावेल, इतकीच चिंता त्यांस आहे. १९०९ सालच्या नाइन्टिथ सेंचुरी नांवाच्या मासिकाच्या जूनच्या अंकांत एक लेख लिहून त्यांनीं आपलें हेंच म्हणणें जाहीर केलें आहे.

आपलें आरमार आणि सैन्य जय्यत राखण्यासाठीं जर्मनी जो अवाढव्य खर्च करीत आहे, तो योग्यच आहे, असें ग्विनर यांचें म्हणणें आहे.

जर्मनीच्या वाढत्या व्यापाराचें संरक्षण करण्यासाठीं अशा प्रकारें खर्च करणें, अत्यंत आवश्यक आहे, असें त्यांचें ह्मणणें आहे. जर्मन राष्ट्राच्या खजिन्याच्या चाव्या ग्विनर यांच्या हातीं असत्या, तर कित्येक वेळां या खात्यांत जो गोंधळ दृष्टीस पडतो, तो कधींहि पाहण्यांत आला नसता. १९१० सालीं केसर यांनीं त्यांस लॉर्डांच्या सभेचे सभासद केलें, त्या वेळीं त्यांनीं जें पहिलें भाषण केलें, त्यांत तिजोरींतील अंदाधुंदीबद्दल त्या खात्यावर त्यांनीं यथास्थित कोरडे उडविले होते. जर्मनींतील सर्व रेलवे सरकारानें आपल्या हातीं घेऊन स्वतःचें उत्पन्न वाढवावें, असें त्यांचें मत आहे. या वेळीं ब्यारन फॉं ऱ्हीन बॅबन हे तिजोरी कामदार होते. पार्लमेंटांत ग्विनर यांचें भाषण झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांनीं राजिनामा दिला.

ग्विनर यांचा जन्म १८५६ सालीं मेन नदीच्या कांठीं असलेल्या फ्रयांकफोर्ट गांवीं झाला. जर्मनींतील प्रमुख सराफकट्टा याच गांवीं असल्यामुळें सराफीचें बाळकडू ग्विनर यांस येथेंच पाजलें गेलें, असें ह्मणावयास हरकत नाहीं. त्यांचे वडील हे एक नांवाजलेले गृहस्थ असून ते तत्त्ववेत्ता शापेनहार याचे परम मित्र होते. शापेनहारच्या मागें त्यांनींच त्याच्या इस्टेटीची व्यवस्था लावली. शापेनहारचें एक चरित्रहि त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. हे गृहस्थ अद्यापि हयात असून १९०९ सालीं बादशाहाकडून त्यांस वंशपरा सरदारीचीं वस्त्रें मिळालीं. बादशाहाच्या मनांतून हा मान वस्तुतः आर्थर ग्विनर यांसच द्यावयाचा होता, असा लोकांचा समज आहे. १८८४ सालीं आर्थर ग्विनर यांची नेमणूक म्याड्रिड ( स्पेन ) येथें जर्मन कान्सल ( व्यापारी वकील ) या नात्यानें झाली. १८८५ सालीं फ्रयांकफोर्ट येथील फिलिपस्पेअर नांवाच्या एका प्रख्यात सराफाच्या मुलीबरोबर त्यांचा विवाह झाला. या विवाहामुळें युरोप आणि अमेरिका यांतील पुष्कळ पेढ्यांशीं त्यांचें दळणवळण सुरू झालें. १८८८ सालीं त्यांनीं आर्थर ग्विनर आणि कंपनी या नांवाची एक पेढी बर्लिन येथें स्थापन केली. १८९४ पर्यंत ही पेढी चालविल्यानंतर जॉर्ज फॉं सायमेन्स यांनीं त्यांना डच्यूश ब्यांकेचा कारभार पाहण्या-

साठीं बोलावलें. नार्दर्न प्यासिफिक रेलवे कंपनीची पुनर्घटना १८९६ सालीं झाली, त्या वेळीं भागीदारतर्फे काम पाहण्यास ड्यूश ब्यांकेची नेमणूक झाली. ड्यूश ब्यांकेनें हें काम आर्थर ग्विनर यांजवर सोंपविलें. हें काम त्यांनीं इतक्या उत्तम रीतीनें पार पाडलें कीं, कंपनीच्या पुनर्घटनेंत जुन्या भागिदारांस कोणतेंहि नुकसान सोसावें लागलें नाहीं. सराफीच्या धंद्यांत ग्विनर यांचें नांव प्रथम या वेळीं सर्वतोमुखी झालें व यानंतरहि त्यांनीं अनेक वेळां आपल्या बुद्धीचा पराक्रम गाजविला आहे.

बारिकसारिक धंदे हातीं घेण्यापेक्षां प्रचंड कामें स्वीकारण्याकडेच त्यांची प्रवृत्ति आहे. लहानसहान रकमांचे शेकडों उद्योग न करतां एकच प्रचंड उद्योग हे सदोदीत पहात असतात. जर्मनींतिल कित्येक भुयारी रेलवे कंपन्या ड्युशब्यांकेच्या हातीं आहेत; तथापि त्यांचा कारभार ग्विनर पहात नाहींत. हजारो मैलांच्या लांबीच्या नार्दर्न-प्यासिफिक व बगदाद रेलवे येवढ्यांचेंच काम त्यांजकडे आहे. अमेरिकेंतील स्टचांडर्ड ऑईल कंपनीनें पेट्रोलचा जर्मनींतील सर्व व्यापार आपल्या हातीं घेतला आहे. त्या धंद्यांत स्टयांडर्ड कंपनीला तेथें कोणी प्रतिस्पर्धी नाहीं. यामुळें ही कंपनी या धंद्यांत तेथें सुलतानी अम्मल गाजवीत असते. स्ट्यांडर्ड कंपनीचें हें बंड मोडून टाकण्याचा उद्योग त्यांनीं सध्यां हातीं घेतला आहे. रुमानियांतील कित्येक तेलाच्या विहिरी ड्यूश ब्यांकेच्या हातीं आहेत. यांचा सर्व कारभार जर्मन साम्राज्य सरकारानें आपल्या हातीं घ्यावा व एकंदरीनें पेट्रोल तेलाचा सर्व व्यापार खाजगी कंपन्यांकडे न राहतां तो साम्राज्य सरकारच्या हातीं जावा, अशी खटपट ते करीत आहेत. या खटपटीस यश आलें, तर जर्मनींतील रॉकफेलरचें ( स्ट्यांडर्ड ऑइल कंपनीचे मालक.) जर्मनींतील बंड मोडलें जाईल, यांत शंका नाहीं.

ग्विनर हे पराकाष्ठेचे स्पष्टवक्ते आहेत. प्रशियन पार्लमेंटांत तिजोरी कामदाराचे त्यांनीं वाभाडे काढले, त्यावेळपर्यंत अशा प्रकारची स्पष्टोक्ति पार्लमेंट सभेंत कोणाच्याहि ऐकिवांत आली नव्हती. एका वेळीं एका मोठ्या मेजवानीसाठीं कित्येक मोठमोठे अमेरिकन व्यापारी व प्रत्यक्ष

अमेरिकन वकील व्यापारी सभेच्या दिवाणखान्यांत जमले असतां ग्विनर यांनीं अमेरिकन तिजोरीच्या कारभारावर अगदीं उघडपणें कडक टीका केली. ग्विनर यांस स्वभाषेशिवाय इंग्लिश, फ्रेंच आणि स्पॅनिश या भाषांचें उत्कृष्ट ज्ञान आहे. इंग्रजी भाषेवर एकाद्या मोठ्या पंडितासारखें त्यांचें प्रभुत्व आहे. या सर्व भाषांतील ग्रंथांचें विस्तृत परिशीलन त्यांनीं केलें असून त्यांची स्मरणशक्तिहि मोठी तीव्र आहे. शेक्स्पीयर, मोलिअर, गटे, शीलर इत्यादि कवींचे कित्येक ग्रंथ त्यांस मुखोद्गत आहेत. एके वेळीं ड्यूश ब्यांकेंतील एक कागद त्यांच्या माहितीसाठीं त्यांजकडे पाठविण्यांत आला होता, त्यावर सही करून कारकुनाकडे तो परत पाठवितांना बाजूच्या समासांत देवघेवच्या व्यापाराबद्दलचें शेक्स्पीयरचें एक वचन लिहिलें होतें. प्रशियन पार्लमेंटांत एकदां ते ह्मणाले, " कर्ज फार काढण्यानें आपला घोटाळा झाला आहे, असें नाहीं. उलट वाजवी-पेक्षां कमी रकमा आपण उसन्या घेतल्या आहेत. योग्य रीतीनें कर्ज कसें काढावें हें समजणें अगत्याचें आहे. पैशाच्या कारभारांत चांगली बुद्धिमत्ता पाहिजे ही गोष्ट खरी, तथापि कर्ज काढण्यांत तर अलौकिक बुद्धीचीच जरूर आहे. "

ड्यूश ब्यांकेचें मूळ भांडवल पंधरा कोट रुपयांचें असून तिची गंगाजळी साडेसात कोट रुपयांची आहे. सुमारें सव्वा अब्ज रुपयांची लोकांची ठेव या ब्यांकेपाशीं आहे. खुद्द जर्मनींत या ब्यांकेच्या बारा शाखा असून त्यांशिवाय लंडन, कॉन्स्टान्टीनोपल व ब्रुसेल्स येथेंहि एकेक शाखा आहे. एकंदर कामगारांची संख्या सहा हजार आहे. या स्वतःच्या शाखांशिवाय दुसऱ्या खाजगी व्यापाऱ्यांच्या द्वारेंहि या ब्यांकेचा कारभार साऱ्या जगभर पसरला आहे. दक्षिण अमेरिकेंतील अर्जेंटाइन, चिली, पेरू, बोलिव्हिया, ब्राझील, मेक्सीको इत्यादि देशांतील अनेक धंदे या ब्यांकेच्या हातीं आहेत. जर्मनींतील एका मोठ्या विजेच्या कंपनीचीहि मालकी या कंपनीकडे आहे. जर्मन साम्राज्यांत या ब्यांकेचा कारभार इतका वाढला आहे, कीं ज्यांत प्रत्यक्ष अथवा परंपरेनें या ब्यांकेचा हितसंबंध नाहीं, असा एकहि धंदा तेथें नाहीं. ग्विनर यांचा संबंध या ब्यांकेशीं



क्रौन प्रिन्स.

जडल्यास सुमारें वीस वर्षांचा काळ लोटून गेला. या अवधींत आपल्या भागीदारांस केव्हांहि दहा टक्याहून कमी नफा या ब्यांकेनें दिला नाहीं. गेलीं पांच वर्षे हें नफ्याचें प्रमाण साडेबारा टक्यांचें झालें आहे."

## जर्मनीचे युवराज.

सध्यांचे जर्मनीचे युवराज गादीवर आले, म्हणजे जर्मन साम्राज्य शांती सुखाचा अनुभव घेईल, असें एका सुप्रसिद्ध इंग्रज लेखकानें म्हटलें होतें. सध्यांचे केसर वुइलियम यांचा स्वभाव अत्यंत चळवळ्या असून त्यांचें कर्तृत्वहि पुष्कळ वरच्या प्रतीचें आहे. युवराजांच्या आंगीं हे गुण इतक्या स्पष्टपणें निदर्शनास येत नाहींत, इतकाच या इंग्रज लेखकाच्या ह्मणण्याचा अभिप्राय आहे. त्यांचा स्वभाव उलाढाल्या करण्याचा नसल्यामुळें केसर वुइलियम यांच्या कारकीर्दींत जी अस्थिरता साऱ्या जर्मनीभर दिसून येते, ती मंदावेल असा अजमास आहे.

युवराजांचा स्वभाव कसा आहे? असें एकाद्या जर्मनास कोणी विचारलें, तर त्याला एकच उत्तर तो पूर्वी देत असे. 'युवराज हे कोऱ्या कागदासारखे आहेत,' असें जर्मन लोक पुष्कळ वर्षांपासून ह्मणत असत. युवराजासारख्या उच्च दर्जाच्या मनुष्याच्या स्वभावाची पारख त्याच्या भाषणादिकावरून होत असते; पण सांप्रतचे बादशाहा विलक्षण बोलके असल्यामुळें युवराजास तोंड उघडण्याची संधि त्यांनीं बहुधा कधीं प्राप्त होऊंच दिली नाहीं. राजकुलीन माणसास सामान्य जनसमुहापुढें येण्याचे प्रसंग अगोदरच थोडे, त्यांतून सर्व भाषणाचा भाग खुद्द बादशहांनींच आपल्या शिरावर घेतल्यावर युवराजास लोकांपुढें येण्याची संधि प्राप्त व्हावी कशी? पण ही गोष्ट पुष्कळ वर्षांपूर्वींची झाली. युवराज अल्पवयाचे होते, तेव्हांची ही गोष्ट आहे. ते वयानें वाढत गेले, तसतशी त्यांची लोकांना अधिक ओळख पटूं लागली. आपल्या वयाच्या एकतीसाव्या वर्षी ते कर्नल झाले आणि त्या वेळेपर्यंत ज्या ज्या प्रसंगीं जनतेसमोर

येण्याची संधि त्यांस सांपडली, त्या त्या प्रसंगीं त्यांचें बुद्धिस्वातंत्र्य आणि त्यांचा करारी स्वभाव यांची ओळख त्यांनीं लोकांस पटविली. एकादा मनुष्य केवळ मोठ्या अधिकारावर आहे, ह्मणूनच त्याचें सारें म्हणणें ऐकावयाचें असा युवराजांचा स्वभाव नाहीं; ही गोष्ट त्यांनीं लोकांच्या प्रत्ययास पूर्णपणें आणून दिली आहे. होहेनझोलार्न घराण्याचा हा स्वभावविशेष पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहे. सांप्रतचे बादशहा आणि त्यांचे वडील हे सुद्धां स्वतंत्र वृत्तीचे होते. युवराजांच्या उमद्या आणि करारी स्वभावाची ओळख लोकांस जों जों पटूं लागली, तों तों त्यांची लोकप्रियताहि वाढूं लागली. वडिलांचे कांहीं विशिष्ट गुण यांच्या अंगीं नाहींत; तथापि एकंदर साम्राज्याची यांच्यावर फार भक्ति आहे, एवढी गोष्ट मात्र खरी. ते राजमुकुट धारण करतील त्या वेळीं साऱ्या जर्मन साम्राज्यास मनःपूर्वक आनंद होईल यांत शंका नाहीं त्यांची कारकीर्द शांततेची व अबादानीची राहील, असें साऱ्या जर्मन लोकांस वाटत आहे.

जर्मन युवराज हे दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारे नाहींत, याबद्दलचा पहिला अनुभव त्यांच्या विवाहप्रसंगीं लोकास आला. आपलें प्रेम जिच्या ठिकाणीं असेल, अशीच स्त्री पत्नी करावयाची, असा त्यांचा निश्चय होता. जर्मन राजघराण्यांत आजपर्यंतचे बहुतेक विवाह शुद्ध प्रेमाचे नसून बरेचसे राजकीय दृष्टीचे होते; पण ही पद्धत सांप्रतच्या युवराजांनीं मोडून टाकली. यांच्या भावी वधूची व यांची प्रथम भेट १९०५ सालच्या वसंत ऋतूंत झाली. तिचें नांव सेसिली असें असून म्याकलेनबर्गस्वेरिन प्रांतांची ती डचेस आहे. बर्लिन राजधानींत तिचा प्रथम प्रवेश झाला, तेव्हां लोकांनीं मोठ्या अपूर्व उत्साहानें तिचें स्वागत केलें. हिजपासून युवराजांस चार पुत्रांची प्राप्ति झाली आहे.

युवराज हे अगदीं स्वतंत्र वृत्तीचे आहेत, या गोष्टीचा दुसरा दाखला १९०७ सालीं आला. बादशहाभोंवतीं असलेल्या लोकांची वर्तणुक असावी तशी चोख नाहीं, अशाबद्दल 'झुकुंम्फट्' नांवाच्या एका पत्रांत कांहीं प्रछन्न लेख येऊं लागले. या पत्राच्या चालकाचें नांव म्याक्झीमिलियन हार्डन् असें होतें. हा लेखक विलक्षण स्पष्टवक्ता आहे, अशी

त्याची ख्याती होती. खुद्द बादशहा सर्व वर्तमान पत्रें स्वतःच वाचीत असत असें नाहीं. वर्तमानपत्रांतील महत्त्वाचा मजकूर कापून तो त्यांजकडे पाठविण्यांत येत असे व त्यांतील कांहीं भाग त्यांच्या अवलोकनांत येई. यामुळें बादशहांचे दोस्त प्रिन्स मुलेनबर्ग व त्यांचे लष्करी हस्तक जनरल कौंट कुनो फां मोल्टके यांजवर सदरील पत्रानें लिहिलेले कडक लेख त्यांच्या अवलोकनांत आले नाहींत; पण या लेखांनीं साऱ्या देशभर अगदीं चळवळ उडवून सोडली होती. अगदीं पोरासोरापासून तों बुढ्यालोकांपर्यंत तो एक चर्चेचा विषय होऊन बसला होता; पण बादशहास मात्र या गोष्टीची गंधवार्ता नव्हती. लोकांत अशा प्रकारची चर्चा चालू आहे, ही गोष्ट बादशहांच्या कानावर घालण्याचें धैर्य कोणास होईना. खुद्द आपल्या मित्रमंडळीवर वर्तमानपत्रांत उघडपणें कडक टीका होत आहे, ही गोष्ट बादशहास अर्थातच रुचण्यासारखी नव्हती. ही अप्रिय; पण पथ्यकर गोष्ट बादशहांच्या नजरेस आणण्याचा निश्चय युवराजांनीं केला. युवराजांकडून सर्व हकीकत कळल्यानंतर मुलेनबर्ग आणि मोल्टके यांस बादशहांनीं राजवाडा बंद केला. या नंतर त्या पत्राचा संपादक हार्डेन याजवर कोर्टांत फिर्याद होऊन त्या वेळीं झालेल्या चौकशींत फार विलक्षण गोष्टी बाहेर पडल्या. यामुळें मुलेनबर्ग–मोल्टके मंडळाचें बादशहावरील वजन साफ नाहींसें झालें. अशा प्रकारच्या गलिच्छ गोष्टींचा खल भरकोर्टांत होऊं नये, अशी जर्मन लोकांची पुष्कळ इच्छा होती; तथापि एकंदरीनें झालें तें योग्यच झालें, असें त्यांस वाटलें. बादशहाभोंवतीं अशुद्ध दानतीच्या लोकांचा पडलेला गराडा युवराजांनीं फोडून टाकला, याबद्दल लोकांस फार संतोष वाटला.

योग्य प्रसंगीं लोकांची क्षिति न बाळगतां अथवा स्वतःच्या मोठेपणाच्या खोट्या अभिमानास बळी न पडतां न्याय्य गोष्टी करण्यासाठीं ते किती निर्धारानें वागतात, याचें आणखी एक उदाहरण सांगण्यासारखें आहे. कौंट फॉ हॉचबर्ग या नांवाचे त्यांचे एक स्नेही होते. त्यांजवर अमेरिकेंत पैशाच्या अफरातफरीसंबंधीं एक खटला चालू झाला. या बाबतींत युवराजांकडून आलेलीं कांहीं खाजगी पत्रें पुराव्यांत दाखल कर-

ण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. त्या पत्रांत युवराजांच्या थोर पदास कमीपणा आणण्याजोगा कांहीं मजकूर असण्याचा संभव आहे, असें वाटून तें भर कोर्टात वाचली जाऊं नयेत अशी जर्मन लोकांची इच्छा होती. कारण तीं पत्रें प्रसिद्ध करण्याकरतां लिहिलीं नसून तीं केवळ खाजगी स्वरूपाचींच होतीं. हीं पत्रें पुराव्यांत दाखल करण्याची परवानगी कौंट यांनीं युवराजांपाशीं मागितली. युवराजांनींहि आपल्या मित्राच्या बचावासाठीं तीं कोर्टांत दाखल करण्याची परवानगी दिली. पत्रें कोर्टांत वाचलीं गेलीं, तेव्हां युवराजांच्या थोरवीस उणेपणा आणणारा एक शब्दहि त्यांत नसून मित्रप्रेमानें त्यांचें अंतःकरण किती भरलें होतें, हें मात्र उघडकीस आलें. युवराजांच्या दानतीचें इतकें स्पष्ट चित्र दुसऱ्या कोठेंहि पहावयास सांपडावयाचें नाहीं. वरील पत्रांपैकीं एकांत ते ह्मणतात, " कधींमधीं बाबा मजपाशीं राजकारणाच्या गोष्टी बोलत असतात. असे प्रसंग मला फार प्रिय आहेत; पण ते अगदीं थोडे येतात, याचेंच वाईट वाटतें. " यावरून राजकारणाचीहि युवराजांस किती आवड आहे, हें उघड दिसून येतें. वरील खटला संपल्यानंतर थोड्या दिवसांनीं बादशहांच्या उजव्या हातास कांहीं इजा झाल्यामुळें सरकारी कागदपत्रावर राजमोहर करण्याचें काम थोडे दिवस युवराजांकडे आलें होतें.

युवराज कोणाचीहि भीड मुरवत ठेवीत नाहींत. या त्यांच्या स्वभावाचा विशेष दाखला १९११ सालीं आला. मोरोक्को प्रकरणांत आपला लाग साधला नाहीं, असा जर्मन लोकांचा समज झाला होता. फ्रान्सशीं युद्ध धुकारण्यास सारें राष्ट्र एकमतानें उद्युक्त झालें असतां बादशाहांनीं पडती घेऊन युद्ध थांबविलें, याबद्दल सारें जर्मन राष्ट्र संतापानें खवळून गेलें होतें. या वेळीं भरलेल्या पार्लमेंटाच्या सभेंत या प्रकरणासंबंधीं कडाक्याचे वादविवाद झाले. लोकपक्षाच्या सभासदांनीं सरकारावर उघडपणें भेकडपणाचा आरोप केला. कान्सरवेटीव पक्षाचा पुढारी हर्र फॉं हाइड ब्रँड याचें भाषण अत्यंत कडक असें झालें. युवराज सभेंतील आपल्या नेमलेल्या जागीं बसले होते. जर्मनीचे मुख्य प्रधान डॉ० फॉं बेथमन हालवेग् यांजवर हाइड ब्रँड हे कोरडे उडवूं लागले, तेव्हां तें भाषण युवराजांस

फार मानवल्याचें उघड दिसून आलें. लोकांच्या नजरेस येईल इतक्या उघडपणें ते मोठ्यानें टाळ्या वाजवूं लागले. वडिलांच्या धोरणाविरुद्ध खुद्द त्यांच्याच वडिल चिरंजिवांनीं आपलें मत इतक्या स्पष्टपणें प्रगट करावें, याचें सर्वांसच फार आश्चर्य वाटलें. हाइड ब्रँड यांस उत्तर देतांना मुख्य प्रधानांनीं त्यांजवर माथेफिरूपणाचा स्पष्ट आरोप केला व परंपरेनें युवराजांवरहि ताशेरा झाडण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं; पण या प्रकरणा-संबंधीं वास्तविक सामान्य लोकांचें मत काय होतें, हें युवराजांनीं उघड करून दाखविलें. या प्रसंगामुळें ते लोकांत अत्यंत प्रिय झाले.

वर सांगितलेल्या गोष्टींवरून युवराजांचा स्वतंत्र बाणा आणि कोणतीहि गोष्ट करण्यास लागणारें मनोधैर्य त्यांजपाशीं कसें आहे, हें स्पष्ट दिसून येतें. युवराज खंदे स्वार आहेत असा त्यांचा लौकिक सैन्यांत या पूर्वींच पसरला आहे. कार्लस्हार्स्ट येथें झालेल्या घोड्याच्या शर्यतींत उंच ताटीवरून आपला घोडा उडवून त्यांनीं एक वेळ पहिलें बक्षीस मिळविलें. ही धाडसीपणाची—अथवा बादशाहांच्या दृष्टीनें वेडेपणाची—गोष्ट बादशाहांच्या कानीं गेली, तेव्हां बराकींत थोडा वेळ अटकेंत राहण्याची शिक्षा त्यांनीं युवराजांस फर्माविली होती. कोणतीहि धाडसाची गोष्ट करण्यास त्यांचा पाय सदोदित पुढें असतो. एके वेळीं झेपेलिन यानांत बसण्याची इच्छा त्यांस झाली. त्या वेळीं झेपेलिन विमान हल्लींइतक्या पूर्णावस्थेस पोहोंचलें नव्हतें. आर्व्हील राइट नांवाच्या वैमानिकास पॉटस्ड्याम येथें बोलावून त्याजबरोबर एका यानांतून ते वर गेले आणि सुखरूप परत आल्यानंतर आपल्या आकाश प्रवासाची गोष्ट त्यांनीं आपल्या वडिलांस कळविली. ते किती निधड्या छातीचे शिकारी आहेत याचा प्रत्यय त्यांच्या हिंदुस्थानच्या प्रवासांत अनेकवार आला आहे.

सर्व प्रकारच्या मैदानी व मर्दानी खेळांचीहि त्यांस फार आवड आहे. अशा प्रकारच्या खेळांत ते इतके दिवस घालवितात कीं, आपला खरा राजकीय पेशा हे विसरले कीं, काय अशी शंका लोकांस येऊं लागते; पण वस्तुस्थिति तशी नाहीं, हें मात्र खरें आहे. होहेनझोलार्न

घराण्याचा शिपायीबाणा त्यांच्या आंगीं पूर्णपणें भरलेला आहे. बर्लिन आणि पॉटस्ड्याम यांजसारख्या चैनी शहरांपासून लांब अंतरावर असलेल्या ड्यांझिगच्या किल्ल्यांत त्यांनीं दोन वर्षें लष्करी नौकरी केली आहे. या अवधींत लष्करी कामाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि कामांत त्यांनीं आपलें मन गुंतविलें नव्हतें. मधून मधून नाटकें पाहणें, आकाश यानांतून प्रवास करणें अथवा समुद्रांत नौकाविहार करणें इत्यादि गोष्टींची आवड त्यांस असली; तरी लष्करी शिक्षण घेण्याकडे त्यांचें लक्ष कमी नाहीं. ते कर्नलच्या हुद्यापर्यंत चढले, ते केवळ मोठेपणामुळें नसून स्वतः च्या मेहनतीनें व कर्तबगारीनें चढले आहेत. लष्करांच्या हालचालींत ते कुशाग्रबुद्धीनें काम करतात, असे अभिप्राय अनेक तज्ज्ञांनीं अनेक वेळां प्रगट केले आहेत. कसा तरी वेळ घालवावा, एवढ्याचसाठीं ते मर्दानी खेळ खेळतात असें नाहीं. मर्दानी खेळांची आवड लोकांत उत्पन्न व्हावी यासाठींच अशा प्रकारच्या खेळांत ते व त्यांचे चुलते प्रिन्स हेनरी पुढाकार घेत असतात. गोल्फ, हॉकी, फुटबॉल, पोलो इत्यादि खेळांची जर्मन लोकांस तादृश आवड नव्हती. ती आवड प्रिन्स हेनरी व युवराज यांनीं प्रथम उत्पन्न केली.

युवराजांची शरीरयष्टि उंच असून ते सडपातळ असल्यामुळें ते अशक्त असावेत, अशी कल्पना आरंभीं साहजिक मनांत येते. त्यांच्या शरीराच्या आकारावरून व चेहऱ्यावरून त्यांच्या शरीरशक्तीची व बुद्धिमत्तेची खरी अटकळ करतां येत नाहीं. होहेनझोलार्न घराण्याचा लष्करी बाणा त्यांच्या ठिकाणीं असेल, असें त्यांच्या बाह्यस्वरूपावरून कोणासहि वाटावयाचें नाहीं. वुइलियम बादशहांच्या चेहऱ्यावरील उग्रपणा त्यांच्या ठिकाणीं नाहीं. उलट त्यांच्या चेहऱ्यावर बालत्वाचें हास्य अजूनहि स्पष्टपणें दिसतें. ते अंतःकरणाचे कोमल असावेत, असें त्यांच्या हंसऱ्या चेहऱ्यावरून उघड लक्षांत येतें आणि ते तसे आहेतहि. अंतःकरणाची कोमलता हा विशेष गुण त्यांचे आजे फ्रेड्रिक यांजपासून त्यांस प्राप्त झाला आहे. त्यांना संगीताची फार आवड असून व्हायोलिन ( सारंगी ) त्यांस फार उत्तम वाजवितां येतें. ते स्वभावानें सौम्य आणि

अगदीं शालीन आहेत. राजकुलीनत्वाचा खोटा अभिमान त्यांच्या ठिकाणीं मुळींच नाहीं. पॉटस्डयाम येथील एका चांभाराकडे झंलेल्या लग्नाच्या मेजवानीस ते हजर राहिले होते. मोटार गाडी, भरधांव पळवीत नेण्याचा त्यांना मोठा शोक आहे. एके वेळीं अशाच रीतीनें आपली मोटर चालवीत असतां रस्त्याच्या कडेला एक गरीब शेतकरी आजारी होऊन पडल्याचें त्यांस आढळलें. त्याला ताबडतोब आपल्या गाडींत घालून त्यांनीं त्याला इस्पितळांत पोहोंचविलें.

आपली पत्नी व आपलीं मुलें यांजवर त्यांचें अतिशय प्रेम आहे व त्यांच्या खालोखाल त्यांच्या प्रेमाचा विषय ह्मटला ह्मणजे नेपोलियन बादशहा हा होय. पॉटस्ड्याम येथील त्यांच्या राहत्या राजवाड्यांत नेपोलियन बादशहाचीं चित्रें, दगडी पुतळे, छोट्या मूर्ति इत्यादिकांचा भरणा जिकडे तिकडे आढळून येतो. नेपोलियननें आपल्या काळीं प्रशियाची वाताहत करून त्याला फ्रान्सचा एक प्रांत बनविलें होतें. तथापि तो खरा योद्धा असून राज्याचा गाडा योग्य रीतीनें हांकण्याची कला पूर्णपणें जाणत होता, असें युवराजांचें मत असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं युवराजांची भक्ति जडली आहे. युवराज आपल्या वडिलांपेक्षांहि लष्कराला अधिक प्रिय झाले आहेत. जर्मनींत प्रबळ असलेल्या लष्करी पक्षाला बादशहाचीं शांतिसुत्रें पसंत पडत नाहींत. त्यापेक्षां युवराजांचीं लष्करी बाण्याचीं भाषणें त्यांस अधिक आवडतात.

हिंदुस्थानांत त्यांनीं केलेल्या प्रवासाविषयींचें ' माझी शिकारी रोजनिशी ' या नांवानें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत एके जागीं ते ह्मणतात. " माझे पूज्य पूर्वज फ्रेड्रिक दी ग्रेट यांच्या मताप्रमाणेंच माझेंहि मत आहे. आपल्या प्रजाजनांपैकीं प्रत्येकाला स्वतःच्या सुखाचा व मुक्तीचा मार्ग स्वमतानें आक्रमूं द्यावा, असें फ्रेड्रिक बादशहाचें मत होतें. मलाहि तसेंच वाटतें." युवराज तक्तानशिन झाल्यानंतर त्यांचें हेंच मत कायम राहिलें, तर जर्मन राष्ट्राला चांगले दिवस येतील यांत शंका नाहीं.

# आगस्ट थायसेन.

जर्मनीच्या अवाढव्य व्यापारी इमारतीच्या आद्य जनकापैकीं, आगस्ट थायसेन या नांवाचे एक गृहस्थ आहेत. "विश्रांति घेतली, तर मी गंजून जाईन" If I rest, I rust. हे शब्द नेहमीं त्यांच्या तोंडांत असतात आणि एवढ्याच मोजक्या शब्दांत त्यांच्या जीवनक्रमाचें सारें रहस्य सांठविलेलें आहे. किंबहुना याच मूळ पायावर त्यांच्या जीवनक्रमाची उभारणी झाली आहे. पोलाद, लोखंड आणि दगडी कोळसा या जिनसाचा एवढा प्रचंड व्यापार त्यांनीं उभारला आहे कीं, त्यांना लोकांनीं राजा थायसेन ही पदवी दिली आहे. त्यांना कोणी कोणी जर्मन कार्नेगीहि ह्मणत असतात. जर्मनीनें आपला व्यापार सांप्रत विलक्षण आट्टाहासानें साऱ्या जगभर वाढविला आहे. जर्मन व्यापाराची अशी वाढ होण्यास जे पुरुष कारण झाले, त्यांत दीर्घोद्योग आणि चिकाटी या बाब-तींत थायसेन यांची बरोबरी करणारा क्वचितच आढळेल. फ्रांकोप्रशियन युद्धानंतर जर्मन व्यापाराची इतकी विलक्षण भरभराट झाली कीं, ती खरोखर असंभवनीय कोटींतीलच असावी असें वाटतें.

१८८५ पासून १९१० पर्यंतच्या केवळ पंचवीस वर्षांच्याच इतिहासांत जर्मनीची लोखंडापुरतीच वाढ कशी झाली ती पहा. १८८५ सालीं जर्मनींत ३६,८८,००० टन लोखंड पैदा झालें आणि ही पैदास वाढतां वाढतां ती १९१० सालीं सुमारें १,४८,००,००० टनांपर्यंत येऊन पोहोंचली. त्याचप्रमाणें कोळशाच्या पैदाशींतहि दोनशें पटीहून अधिक वाढ झाली. पंचवीस वर्षांपूर्वी इंग्लंड या बाबतींत किती तरी जर्मनीच्या पुढें होतें. आतां या जिनसांतली जर्मनीची पैदास कांहीं बाबतींत इंग्लंडच्या दुप्पटीजवळ झाली असून पोलादाची वाढ तर अडीचपटीच्याजवळ आली आहे. त्याचप्रमाणें पोट्याश, जस्त, शिसें, तांबें इत्यादि जिनसांची वाढ चाळीस वर्षांच्या अवधींत साडेसहा पटीनें झाली आहे. लोखंड आणि पोलाद या बाबतींत जर्मनीहून पुढें असलेला देश आज फक्त अमेरिका

हाच आहे, युरोपांत जर्मनीची बरोबरी करणारा तर एकहि देश नाहीं, फक्त दगडी कोळशाच्या बाबतींत मात्र जर्मनी इंग्लंडच्या मागें आहे.

या अवाढव्य व्यापाराचीं सूत्रें ज्या व्यक्तींच्या हातांत आहेत, त्यांतच रूर नदीवरील मुलहीम ग्रामवासी आगस्ट थायसेन यांची प्रमुखत्वानें गणना करतां येईल. अमेरिकेंत तेलाच्या व्यापारांत रॉकफेलर आणि पोलादाच्या व्यापारांत कार्नेगी यांचें जें महत्त्व आहे, तेंच आगस्ट थायसेन यांचें जर्मनींत आहे, असें ह्मणावयास हरकत नाहीं. या तिघांच्या एकंदर जीवनक्रमांतहि कांहीं बाबतींत विलक्षण साम्य आढळून येतें. हे तिघेहि अगदीं अकिंचन स्थितींतून सांप्रतच्या वैभवाच्या शिखरास पोंहोंचले आहेत. रॉकफेलर हे अद्यापहि एकसारखे कार्यव्यापृत असतात आणि तसेच थायसेनहि कोणत्या तरी कामांत सदोदीत गुंतलेले असतात. कार्नेगी यांनीं व्यापारांतून आपलें अंग काढून ते आतां विश्रांति घेण्याच्या मार्गास लागले आहेत. पुस्तकालयें बांधणें आणि इतर लोकोपयोगी कार्यें करणें अशा उद्योगांत कार्नेगी आतां पडूं पहात आहेत; पण थायसेन यांनीं आपल्या मानेवरील जूं अद्यापि झुगारून दिलेलें नाहीं. कोळसे खणून काढण्यांत आणि पोलादाचा रस करण्यांत अद्यापहि त्यांस आनंद वाटत आहे. काम करतां करतां मरण यावें असें बिस्मार्क म्हणत असत. ही ह्मण थायसेन यांस अक्षरशहा लागू पडते. त्यांस अद्यापपर्यंत विश्रांतीची जरूर केव्हांहि भासली नाहीं. कित्येक प्रसंगीं एका दिवसांत त्यांनीं तीन चिटणिसांस दमविलें आहे. स्वतःच्या धंद्यानिमित्य सदोदीत फिरतीवर राहण्यात त्यांचा काळ जातो. खुद्द त्यांचें रहातें घरहि धंद्याच्या जागेसारखेंच सजविलेलें आहे. त्यांच्या निजावयाच्या खोलीला जोडूनच त्यांची काम करण्याची खोली आहे. माणसें आणि लोखंड हीं निरुद्योगी राहिलीं ह्मणजे त्यांस गंज चढतो, असें त्यांचें म्हणणें आहे.

अमेरिकेंत ज्याप्रमाणें कित्येक व्यापारांची वाढ अगदीं विलक्षण रीतीनें झाली, त्याच प्रमाणें थायसेन यांच्या धंद्यांची वाढहि अगदीं विलक्षण रीतीनें झाली आहे. रॉकफेलर व ॲंड्र्यूज या पेढीनें आपला तेलाचा धंदा केवळ १४५०० पौंडाच्या भांडवलावर चालू केला. याच सुमारास

आगस्ट थायसेन यांनीं आपल्या धंद्यास सुरुवात केली. त्यावेळीं त्यांजपाशीं फक्त १२०० पौंडाचें भांडवल होतें. या भांडवलावर त्यांनीं एक लोखंडाची गिरणी सुरू केली. त्यावेळीं त्यांत साठ मजूर कामावर लावले होते. त्याच कारखान्यांत आज पन्नास हजार मजूर कामावर आहेत. हॅम्बोर्नगांवीं डयूशर केसर या नांवाची त्यांची स्वतःची एक दगडी कोळशाची खाण असून तींतून २६००० बेलदार पन्नास लक्ष टन कोळसा दरसाल बाहेर काढीत आहेत. त्यांच्या इस्टेटीची नक्की किंमत अद्यापि कोणीं केलेली नाहीं; पण ती दोन कोट पौंडांपर्यंत असावी असें ह्मणतात. आज मित्तीला कित्येक दगडी कोळशांच्या खाणी, पोट्याश वगैरे क्षारांच्या खाणी आणि कित्येक लोखंडाचे कारखाने त्यांच्या मालकीचे असून ऱ्हाइन नद्यांच्या कांठीं असलेल्या हॅम्बोर्न, डयूशबर्ग, मुलहीम, इत्यादि बंदरांच्या द्वारें त्यांच्या व्यापाराचें जाळें साऱ्या जगभर पसरत आहे. लोखंडाच्या कित्येक खाणी त्यांच्या मालकीच्या असून त्या अशोधित धातूंतून पक्के जिन्नस तयार करण्याचे कारखानेहि त्यांच्या मालकीचे आहेत. हे जिन्नस स्वतःच्या मालकीच्या आगबोटींतून, स्वतःच्या मालकीच्या गोद्यांत भरून बाहेर देशीं पाठविण्याचें काम ते करीत असतात. काळ्या समुद्रावरील रशियन हद्दींतिल निकोलेफ बंदरीं त्यांच्या स्वतःच्या गोद्या व वखारी बांधलेल्या असून तेथून अशोधित धातू ऱ्हाइन नदीकांठच्या त्यांच्या लोखंडाच्या कारखान्यांत येत असतात. ब्राझील देशांत व हिंदुस्थानांतहि स्वतःच्या मालकीच्या वखारीवर आपल्या पितृदेशाचें निशाण त्यांनीं फडकाविलें आहे. ज्या अपेशी मोरोक्को प्रकरणांत जर्मनीला हार खावी लागली, त्यांत आगस्ट थायसेन यांचें अंग होतें, ही गोष्ट फार करून कोणास ठाऊक नसेल. सुलतान अबदुल अझीज यांना एक मोठी रक्कम कर्जाऊ देऊन तिच्या बदल्यांत मोरोक्कोंतील एका प्रचंड लोखंडाच्या खाणीचा हक्क मिळविण्याचा बेत त्यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी केला होता; पण त्यावेळीं जर्मन सरकारास तो बेत पसंत पडला नाहीं; पण पुढें थोड्याच वर्षांनीं डयूसेलडॉ आणि रेमशीज येथील एका व्यापारी पेढीनें थायसेन याच्या कल्पनेस मूर्त रूप दिलें व यावेळीं या पेढीला सरकारचें पाठबळहि मिळालें. पुढें या प्रकरणास राजकीय

स्वरूप येऊन फ्रान्स व जर्मनी ह्यांमध्यें युद्ध जुंपण्याचा प्रसंग कसा आला, हें जगाला आतां विदित झालेंच आहे.

दोन तीन संलग्न धंदे एकत्र चालवून त्या सर्वांचें खेळतें भांडवल एकत्र करावयाचें, ही कल्पना हे प्रथम अमेरिकेपासून शिकले. एक दगडी कोळशांची कंपनी, एक लोखंड गाळणारी कंपनी आणि एक पोलाद तयार करणारी कंपनी असे तीन उद्योग त्यांनीं प्रथम एकत्र केले, आणि अशा रीतीनें कोळसा, लोखंड आणि पोलाद यांचा सर्व व्यापार हळू हळू त्यांनीं एका केंद्रांत आणला. यामुळें या जिनसांची पैदास आणि त्यांचे बाजारभाव यांचें योग्य नियमन त्यांस स्वतः करतां येऊं लागलें. व्यापारी संघ निर्माण करून एकादी जिन्नस त्या संघानें पूर्णपणें आपल्या हातांत ठेवावी, या कल्पनेचा मूळ उगम अमेरिकेंत झाला. अमेरिकेंतील तेलाचे व पोलादाचे 'ट्रस्ट' हीं या कल्पनेचीं दृश्य फळें होत. अलीकडे हे ट्रस्ट लोकांस फार नावडते होऊं लागले आहेत. एकादी जिन्नस पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेऊन मग ती वाटेल त्या किंमतीनें विकावयाची, म्हणजे सभ्यपणें व कायदेशीर रीतीनें लोकांस बुचाडणेंच होय, असा आक्षेप या ट्रस्टावर अलीकडे येऊं लागला आहे. तथापि आगस्ट थायसेन हे या कल्पनेचे पूर्ण भक्त आहेत. कित्येक वेळां एकाद्या जिनसाची वाजवीपेक्षां फाजील पैदास होऊन त्यामुळें व कित्येक वेळां व्यापाऱ्यांच्या फाजील चढाओढीमुळें सबंध धंद्यास धोका येत असतो. अशा प्रकारचा धोका टाळण्यास ट्रस्ट हेंच उत्तमोत्तम साधन आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. ॲटलांटिक महासागराच्या परतीरावरून आणलेल्या या कल्पनेच्या कलमावर त्यांनीं स्वतःची अशी आणखीहि एक मखलाशी केली आहे. अमेरिकेंतील डिरेक्टरांच्या मंडळाऐवजीं एकाच व्यक्तीच्या हातीं त्या मंडळाचे सर्व अधिकार राहतील, अशी व्यवस्था त्यांनीं केली. स्टॅन्डर्ड ऑइल कंपनी, स्टील कारपोरेशन, आणि अमेरिकेंतील इतर अवाढव्य धंदे यांच्या तुलनेमें थायसेन यांचा उद्योग अति अल्प आहे, ही गोष्ट खरी; तथापि सदरील अमेरिकन कंपन्यांच्या भागीदारांच्या सभेंत कित्येक वेळां जसे हातघाईचे प्रसंग येतात, तसा

प्रकार थायसेन यांच्या सभेंत कधींहि घडत नाहीं. कारण थायसेन यांचे ट्रस्ट म्हणजे त्यांतील भागीदारहि तेच आणि डिरेक्टरहि तेच असें झालें आहे. ट्रस्टासंबंधीं सर्व अधिकार एकाद्या सुलतानाप्रमाणें ते एकटेच गाजवीत असतात. यांचा एक भाऊ व वडील मुलगा असे दोन भागीदार यांच्या धंद्यांत आहेत; पण ते केवळ नांवाचे मात्र भागीदार आहेत. धंद्यांतील सारी सत्ता जितकी या मुलहिमच्या सुलतानाच्या ताब्यांत आहे, तितकी अमेरिकन ट्रस्टवाल्यांच्या स्वप्नींहि आली नसेल. हा सुलतान कोणत्याहि ब्यांकेशीं संबंध ठेवून त्यांची गुंतागुंत आपल्या धंद्याशीं होऊं देत नाहीं. ट्रस्टांची पद्धत मोडून टाकावी याकरतां अमेरिकन सरकार विलक्षण खटपट करीत आहे. उलटपक्षीं त्यांचें साम्राज्य जर्मनींत अधिक अधिक वाढत्या प्रमाणांत आहे. जर्मनींतील एकेक ब्यांक अनेक धंदे एकाच वेळीं आपल्या हातीं घेऊं लागली आहे. पुष्कळ मोठ्या धंद्याच्या डिरेक्टरांच्या मंडळांत ब्यांकांचे डिरेक्टरहि प्रमुखत्वानें काम करीत असतात. ड्रेसडेनर बँक नावाच्या पेढीच्या हातीं, दोनशें कंपन्यांचें काम असून सव्वा दहा कोट पौंडांहून अधिक किंमतीच्या रकमा या कंपन्यांच्या धंद्यांत गुंतल्या आहेत; पण सुलतान थायसेन यांच्या धंद्यांत एकाहि ब्यांकेचें बोट शिरकलेलें नाहीं. त्यांच्या कोणत्याहि धंद्यांतले भाग बर्लिनच्या सराफकट्ट्यावर विक्रीसाठीं नसतात. सट्ट्याच्या खरेदी-विक्रींतहि ते कधीं पडत नाहींत. सट्ट्याच्या धंद्यांत आपणास अक्षरहि समजत नाहीं, असें ते म्हणत असतात. प्राप्तीवरील करासाठीं त्यांनीं आपलें वार्षिक उत्पन्न दीड लक्ष पौंडाचें नोंदविलें आहे. त्यांचें वास्तविक उत्पन्न याहून कितीतरी पटीनें अधिक आहे; पण अधिक होणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग धंद्याच्या वाढीकरतां भांडवलाच्या रूपानें करण्याची त्यांची पद्धत असल्यामुळें ते जास्त करास पात्र होत नाहींत. अगदीं अल्प प्रमाणावर त्यांनीं आपल्या धंद्यास आरंभ केला, तेव्हांपासून धंद्याची वाढ करण्याकडे त्यांची एकसारखी दृष्टि आहे. प्रत्येक वेळीं हजार पांचशें रुपये जमा झाले, कीं ते तावडतोब धंद्याच्या वाढीकडे लावावयाचे असा त्यांचा परिपाठ आहे. पुष्कळ पैशाची नुसती ऊब

घेऊन त्यांत समाधान मानणें, त्यांस पसंत नाहीं. पैशाचा उपयोग सदोदित धंद्याच्या वाढीकडेच झाला पाहिजे, असें त्यांचें मत आहे. दगडी कोळसा, लोखंड आणि पोलाद यांतील व्यापाराची सारी सत्ता अविछिन्नपणें त्यांच्या हातीं आली आहे. अशोधित धातू त्यांच्या मालकीच्या खाणींतून बाहेर पडतात. ज्या आगबोटींतून ती कारखान्यांत जाते, त्या आगबोटीहि त्यांच्या मालकीच्या आहेत. आगबोटी ज्या धक्क्याशीं लागतात ते धक्के सुद्धां त्यांनीं आपल्या मालकीचे बांधलेले आहेत. कारखान्यांच्या भट्टयांना लागणारा कोळसा त्यांच्या मालकीच्या खाणींतूनच निर्माण होतो. या कोळशांतून व लोखंडांतून कोक, पोलादीपत्रा, चिलखतीपत्रा, नळ्या, रूळ, अमोनिया, डांबर आणि याशिवाय कित्येक रासायनिक पदार्थ तयार करण्याचे स्वतंत्र कारखाने त्यांनीं उभारले आहेत. प्रत्येक जिन्नसेच्या पैदासीकरतां लागणारा खर्च कमी कसा करतां येईल, याकडे त्यांचें चित्त सदोदित गुंतलेलें असतें. याच तत्त्वावर कोणताहि धंदा यशस्वी करतां येतो, असें त्यांचें म्हणणें आहे. या तत्त्वाचें प्रतिपालन एकंदर जर्मनराष्ट्रानें चांगलें केलें असल्यामुळेंच त्यांच्या उद्योगधंद्याची एवढी राक्षसी वाढ झाली आहे. जर्मनीच्या प्रत्येक धंद्यांत यंत्रकलानिपुण लोक फार आढळतात, याचेंहि कारण हेंच. कोणत्याहि एकाद्या गिरणींत अथवा कारखान्यांत दर दहा मजूरामागें निदान एक यंत्रकलानिपुण इंजिनियर असावयाचाच. केरसुद्धां फुकट जाऊं द्यावयाचा नाहीं, असा जर्मन कारखानदारांचा बाणा आहे. एकादा जिन्नस तयार करतांना त्याच्या खर्चांत काटकसर करण्याकरतां किंवा त्याच खर्चांत त्या पदार्थांतून दुसरे त्याचे आनुषंगी व्यापारी पदार्थ बनविण्याकरतां उपाय शोधून काढण्यांत जर्मन कारखानदार वर्षांचीं वर्षें मेहनत करीत असतात. चिकागोंतील कारखान्यांत पुष्कळसे आनुषंगी पदार्थ फुकट जात असतात; पण आगस्ट थायसेनच्या कारखान्यांत धुराशिवाय बाकीच्या सर्व वस्तूंचा उपयोग केला जातो. आतां या धुरांतूनहि एकादी व्यापारी वस्तु निर्माण करतां येईल कीं काय, हें पाहण्यासाठीं चार्लटनबर्गचे कित्येक पदवीधर त्यांच्या कारखान्यांत प्रयत्न करीत आहेत.

सुमारें चार पांच वर्षांपूर्वी थायसेन यांच्या गुणाची किंमत खुद्द जर्मन सरकारनेंहि केली. बर्लिन येथील आरमाराच्या कारखान्यांत शिस्त लावण्याकरतां, सरकारनें त्यांची नेमणुक केली होती. कील येथील सरकारी गोद्यांत धंद्याच्या दृष्टीनें पुष्कळ उणीवा असल्याचें आढळून आलें होतें. खर्चांत बचत करण्याकडे कोणाचें फारसें लक्ष नव्हतें. कँट्राटदारांनीं आरमाराच्या पैशाची नुसती लूट चालविली होती. ॲडमिरल फॉ टिरपिट्झ् हे इतर बाबतींत फार दक्षतेनें काम चालवीत असतांहि खर्चाची काटकसर त्यांस साध्य झाली नाहीं. या अंदाधुंदीस आळा घालण्यासाठीं कोणा तरी खऱ्या व्यापारी दृष्टीच्या मनुष्याची जरूर होती. अशा प्रसंगीं आगस्ट थायसेनसारख्या खऱ्या व्यापारी बुद्धीच्या मनुष्याकडे आरमारखात्याची नजर गेली, हें योग्यच झालें. यानंतर जीं बेडर जहाजें बांधलीं गेलीं, त्यांत पंधरा लक्ष रुपयांची बचत झाल्याचें आढळून आलें. यापुढें आरमारी उद्योगांत लूट करणें अशक्य आहे, असें कील येथील कंट्राटदारांस आढळून आलें. अशा रीतीनें जिनसांची खरेदी कशी करावी, ही विद्या गजा थायसेन यांनीं टिरपिटझ् यांस शिकविली.

परस्पर राष्ट्रांत जे अनेक गुंतागुंतीचे राजकीय प्रश्न उपस्थित होतात, त्यांचें वास्तविक स्वरूप राजकीय नसून ते शुद्ध व्यापारी रूपाचे असतात, असें थायसेन यांचें मत आहे. ब्रिटिश मुत्सद्दी चेंबर्लेन यांचेंहि असेंच मत आहे. इंग्लंड आणि जर्मनी यांचे परस्पर संबंध असावे तसे मित्रत्वाचे नसण्यास परस्परांतील व्यापारी चढाओढच कारण आहे, असें थायसेन यांचें मत आहे. राष्ट्रांचीं राजकीय सूत्रें पंडितांच्या हातून काढून तीं इंजिनियर, व्यापारी व कारखानदार यांच्या हातीं द्यावीं, असें त्यांचें म्हणणें आहे. सर्व राष्ट्रांचे परस्पर व्यापारी संबंध एकमेकांशीं इतके संलग्न झाले आहेत कीं, त्यांच्या राजकीय हितसंबंधांतील तडजोड व्यापारी हितसंबंधाच्या दृष्टीनें करणें शक्य आहे, असें थायसेन स्पष्टपणें बोलतात. जर्मनी आणि इंग्लंड यांजमधील व्यापारी हितसंबंधाची मांडणी योग्य पायावर झाली, तर या राष्ट्रांत चांगला सलोखा उत्पन्न होईल, असें त्यांस वाटतें. साऱ्या जगभर प्रसार पावणाऱ्या कोळशासारख्या वस्तूंचे भाव सर्व

राष्ट्रांनीं मिळून एक मतांनीं ठरविल्यास त्या योगें जगाची शांतता नोंदण्यास जितकी मदत होईल, तितकी तहांनीं, बेडर जहाजांनीं, व सैन्याच्या पथकांनीं होणार नाहीं, असें ते ह्मणतात.

थायसेन यांचें वय सध्यां ७४ वर्षांचें आहे. स्वभावानें ते अगदीं बेमुर्वत खोर व विलक्षण मितभाषी आहेत. त्यांच्या रहाणींतहि अगदीं सामान्य मनुष्याइतका साधेपणा आहे. पदव्यांच्या मागें लागणें त्यांस मुळींच आवडत नाहीं. तसेंच समारंभादिकांतहि हजर रहाणें त्यांस आवडत नाहीं. धर्मानें ते जुन्या रोमन क्याथोलिक पंथाचे आहेत. धार्मिक बनण्याइतका मी आतां वृद्ध झालों आहें, असें ते ह्मणत असतात. आपल्या मजुरदारांचें कांहीं तरी कल्याण करावें, अशी प्रबळ इच्छा ते सदोदीत मनांत बाळगीत असतात व यासाठीं ते सढळ हातानें खर्चहि करतात. त्यांना तीन मुलगे आहेत; पण त्यांचे सारे गुण फक्त एका वडील मुलाच्याच आंगांत उतरले आहेत.

त्यांचें रहातें घर मात्र त्यांच्या प्रचंड संपत्तीस साजेसें आहे. हें ड्यूमेल डार्फ शहराजवळ रूर नदीच्या कांठा बांधलें असून ही इमारत फारच प्रेक्षणीय आहे. हिची बांधणी जुन्या रोमन पद्धतीची आहे. ही जागा त्यांनीं १९०३ सालीं विकत घेतली आणि तींत इमारती बांधून तिची किंमत किती तरी पटीनें त्यांनीं वाढविली. त्यांच्या राहात्या बंगल्याचें नांव कॅसल ल्यांडस्बर्ग असें असून तो खरोखर एकाद्या राजास रहाण्यास योग्य इतका सुंदर आहे. सांप्रतहि तेथें खरोखर एक सुलतानच रहात असतो; पण आपली योग्यता मजुरदाराहून अधिक नाहीं, असें तो ह्मणतो व रोजच्या कृतीनें तें सिद्धहि करून दाखवितो. मरेपर्यंत आपण असेच मजुरदार राहणार, असें तो ह्मणत असतो.

---

## आगस्ट स्कले.

रोमन क्याथोलिक लोकांनीं चालविलेलें "जर्मानिया' या नांवाचें एक रोजचें वर्तमानपत्र बर्लिन येथें प्रसिद्ध होत असतें. या पत्राला सरासरीनें

तीस वर्षांच्या अवधींत एक अशा रीतीनें तारा येत असतात. फक्त पोपच्या मृत्यूची बातमी मात्र या पत्रांत तारेनें येते. बाकीच्या साऱ्या अंकांत ताजी बातमी या सदराखालीं कोणताहि मजकूर त्यांत प्रसिद्ध होत नाहीं. सुमारें तीस वर्षांपूर्वी जर्मनींत एकंदर वर्तमानपत्रांची स्थिति या जर्मोनियाप्रमाणेंच होती. सध्यांचे बादशहा गादीवर येईपर्यंत वर्तमानपत्रांतील बहुतेक मजकूर वुल्फ टेलिग्राफ एजन्सी पुरवीत असे. यांची बातम्या देण्याची पद्धति अगदीं जुनाट आणि शिळ्या झालेल्या ठरीव रीतीची होती. ही मंडळी निमसरकारी स्वरूपाची असल्यामुळें तिनें पुरविलेल्या बातम्याहि त्याच स्वरूपाच्या असत. यामुळें बातम्याऐवजीं सरकारी रिपोर्ट अथवा तशाच प्रकारचे दुसरे बेचव लेख या मंडळीमार्फत पुरविले जात. मुख्य लेखहि बहुधा चालू विषयावर लिहिलेले नसून एकाद्या जुन्या विषयावर केलेलें पांडित्य मात्र त्यांस पहावयास सांपडे. असल्या प्रकारच्या पत्रांचा त्या काळीं खपहि फारसा नव्हता, हें सांगावयास नकोच. एकाद्या पत्राच्या ५-४ हजार प्रति खपल्या ह्मणजे तें पत्र मोठें भाग्यवान् समजलें जाई. या वेळीं जर्मन लोक पत्रें घरीं न घेतां आपली वाचनाची लालसा सुख–शांतिगृहांत अथवा दारूच्या दुकानांत फुकट पुरविल्या जाणाऱ्या जुन्यापान्या पत्रांवर भागवीत असत.

आज बर्लिनमध्यें सहा रोजचीं वर्तमानपत्रें असून त्यांचा खप प्रत्येकीं दीड लक्षापासून चार लक्षांपर्यंत आहे. याशिवाय हॅंबर्ग, फ्रॅंकफोर्ट, कलोन, ब्रॅसला, लिपझिग्, ड्रेसडेन येथेंहि दैनिक पत्रें निघत असून त्यांचा खप प्रत्येकीं लाखाहून अधिक आहे. लंडन, न्यूयार्क व पारिस येथल्याप्रमाणें तेथें अद्यापि दरतासास ताज्या तारा प्रसिद्ध होऊं लागल्या नाहींत, ही गोष्ट खरी; तथापि पूर्वीच्या स्थितींत आतां विलक्षण पालट झाला आहे, हें मात्र खरें. जर्मनींतील दोन तीन वर्तमानपत्रें पारिस लंडन किंवा न्यूयार्क येथील पहिल्या दर्जाच्या पत्राहून कोणत्याहि दृष्टीनें कमी नाहींत.

केवळ तीस वर्षांच्या अवधींत जर्मनीच्या वर्तमानपत्रांत जी ही विलक्षण क्रांति घडून आली, तिचें सारें श्रेय मुख्यत: आगस्ट स्कर्ले नांवाच्या एकाच व्यक्तीकडे आहे. 'बर्लिनर लोकल आंझिगर' नांवाच्या पत्रांचे

आगस्ट स्कर्ल हे मालक आहेत. ड्यूसेलडार्फ गांवच्या एका पुस्तकें-विक्याच्या पोटीं हे जन्मले. ते बर्लिनमध्यें आले, तेव्हां त्यांचा खिसा जवळ जवळ रिकामाच होता; पण त्यांचा मेंदू मात्र अनेक कल्पनांनीं पूर्ण भरलेला होता. सुमारें दहा वर्षांच्या अवधींत जर्मन वर्तमानपत्रांचें स्वरूप त्यांनीं पूर्णपणें बदलून टाकलें. वर्तमानपत्रें हीं केवळ थोड्याशा विद्वान् लोकांसाठीं नसून सामान्य जनसमूहाकरितांहि आहेत, हें तत्त्व या अवधींत त्यांनीं सिद्ध केलें. जुन्यापान्या विषयावर पांडित्यप्रचुर लेख लिहिण्यापेक्षां जगांतील बातम्या अधिक प्रमाणावर पुरविणें अधिक इष्ट आहे, ही गोष्ट वर्तमानपत्रांच्या चालकांच्या लक्षांत त्यांनीं आणून दिली. बातम्यांकरतां केवळ टपालावर अवलंबून न राहतां टेलिफोन आणि तारा यांचा अधिक उपयोग करण्यास त्यांनीं सुरवात केली. १८८३ सालीं 'लोकल अंझिगर' हें पत्र त्यांनीं सुरू केलें. पहिलीं दोन वर्षें तें साप्ताहिक होतें. १८८५ सालच्या आगष्ट महिन्यांत तें दैनिक झालें. हें पत्र आपल्या नव्या स्वरूपांत प्रगट झाल्याबरोबरच त्यानें साऱ्या बर्लिनमध्यें चळवळ उडवून दिली. शापेनहार, कँट, ट्रीचे, इत्यादि पंडितांच्या नमुन्यावर लिहिलेले लेख या पत्रांत नसलेले पाहून जुन्या पद्धतीचे जर्मन लोक त्या-विषयीं फार साशंक झाले. जर्मन राष्ट्रावर ही एक मोठी आपत्तिच कोसळली असें त्यांस वाटलें. आठवड्यानें किंवा पंधरवड्यानें जर्मनीला जी बाह्य जगाची खबर हा वेळपर्यंत लागत होती, ती आतां रोज येऊन आदळणार, हें पाहून हे जुनाट लोक खरोखरच चिंताकुल झाले असतील; तथापि वर्तमानपत्रांच्या स्थितींत क्रांति होण्याची टळणार नाहीं, ही गोष्ट त्यांस तेव्हांच दिसून आली. 'लोकल अंझिगर' पत्राचा वाचकवर्ग एक-सारखा वाढूं लागला. त्यांत राजकीय विषय फार करून येत नसत, यामुळें तर लोकांना तें पत्र अधिक आवडलें. राजकीय क्लिष्ट विषय वाचून वाचून लोक अगदीं कंटाळून गेले होते. त्यामुळें पिष्टपेषण ज्यांत केलेलें नसून ज्यांत जगांतील पुष्कळ बातम्या दिलेल्या असतील, असें पत्र लोकांस हवें होतें. ही उणीव आगस्ट स्कर्ल यांच्या लोकल अंझिगरनें

प्रथम भरून काढली. अमेरिकेंतील बेनेट आणि पुलिटझर अथवा इंग्लंडांतील हार्मस्वर्थ यांनीं या बाबतींत जी कामगिरी केली, तीच कामगिरी आगस्ट स्कर्ल यांनीं जर्मनींत केलीआहे.

वर्तमानपत्रें कशा रीतीनें चालवावीं, याबद्दल ज्या कांहीं कल्पना जर्मनींत १८८५ सालापर्यंत रूढ होऊन बसल्या होत्या, त्या आगस्ट स्कर्ल यांनीं झुगारून दिल्या. एवढेंच नव्हे तर, पत्रें व पत्रांचा प्रसार करण्याच्या पद्धतींतहि त्यांनीं बदल करून टाकला. लोकांच्या घरोघर पत्रें जाऊन पडावीं, अशी व्यवस्था त्यांनीं सुरू केली. आपला प्रसार वाढविण्यासाठीं जर्मनपत्रें या काळापर्यंत फारशी खटपट करीत नसत. अशी खटपट करणें आपल्या मानास कमीपणा आणणारें आहे, असें ते समजत असत; पण या जुन्या मताची पर्वा न करतां स्कर्ल वर्गणीदार जमा करण्यासाठीं बाहेर फिरत असत आणि अशा रीतीनें त्यांनीं आपल्या पत्राचा खप वाढविला. घरोघर पत्रें वांटण्याची पद्धत त्यांनीं प्रथम सुरू केली. या कामाकरितां त्यांनीं अनेक स्त्रिया नौकरीस ठेवल्या होत्या. पत्रें वांटण्याचें काम जर्मनींत सध्यांहि स्त्रियाच करीत आहेत. आपल्या मुख्य ऑफिसाच्या शाखा बर्लिन शहरांत त्यांनीं जागोजाग उघडल्या. यामुळें वर्गणीदारांना शक्य तितक्या लवकर पत्र मिळण्याची व्यवस्था झाली. कित्येक महत्त्वाच्या प्रसंगीं जादा अंक काढून आपल्या वर्गणीदारांस ते फुकट वांटण्याची व्यवस्था त्यांनीं केली. यामुळें त्यांच्या पत्राचा प्रसार एकदम वाढत चालला. याशिवाय गरीब लोकांकरतां असलेल्या जाहिराती एका पुरवणींत छापून ही पुरवणी मजूरदारांच्या मोहल्ल्यांत फुकट वांटण्याची व्यवस्था त्यांनीं केली. बर्लिन येथील विशिष्ट मोहल्ल्यांतील रहिवाशांसच महत्त्वाची वाटणारी अशी एखादी गोष्ट घडली, तर तिची सविस्तर बातमी एकाद्या निराळ्या पुरवणींत छापून ती पुरवणी त्या मोहल्ल्यांतील अंकांत घालण्याची व्यवस्था त्यांनीं सुरू केली. याशिवाय अंटर डेनलिंडन नांवाच्या मोठ्या रस्त्यावर जगांतील बातम्या दर तासास वाचावयास मिळण्याची व्यवस्था त्यांनीं केली. नव्या नव्या कल्पना काढण्यांत आगस्ट स्कर्ल यांचा हात धरणारा मनुष्य मिळणें

दुरापास्त आहे. अशा स्थितींत लोकल अँझिगरच्या खप वाढत चालल्यास नवल नाहीं. तत्त्वज्ञान व साहित्यशास्त्र यांची चर्चा करणारीं पत्रें लोक पूर्वींप्रमाणेंच आवडीनें वाचीत असत; तथापि बातम्यासाठीं लोकल अँझिगरचा खप जितका होतो, तितका दुसऱ्या कोणत्याही पत्राचा होत नाहीं.

१८८९ सालीं लोकल अँझिगर दिवसांतून दोन वेळ प्रसिद्ध होऊं लागलें. या दोन्ही प्रतींची मिळून दरमहा वर्गणी फक्त बारा आणे आहे. याशिवाय याच वर्गणींत रविवारच्या खास अंकाच्या प्रतीहि वर्गणीदारांस फुकट देण्यांत येतात. पत्र दिवसांतून दोनदां निघूं लागलें, तेव्हां अधिक बातम्या मिळविण्याचीहि व्यवस्था स्कर्ल यांनीं केली. बातम्या मिळविण्यासाठीं यापूर्वींहि ते सढळ हातानें खर्च करीत असत. तत्त्वज्ञानविषयक लेखांवर खर्च करण्यापेक्षां तोच पैसा बातम्या मिळविण्याकडे खर्च केला, तर धंद्याच्या दृष्टीनें तें अधिक किफायतशीर होतें, असें त्यांच्या अनुभवास आलें. देशांतील गांवोगांवीं व शहरोशहरीं त्यांनीं खास बातमीदारांची नेमणूक केली. परराष्ट्रांतील राजधान्यांच्या शहरींहि त्यांचे खास बातमीदार असून बातमी पाठविण्यास लागणाऱ्या खर्चांत त्यांनीं काटकसर करूं नये. अशी स्कर्ल यांची त्यांस सक्त ताकीद आहे. बाह्यदेशीं खास बातमीदार पाठविण्याची चाल जर्मनींत यापूर्वीं फारशी नव्हती. कलोनग्याझेट, फ्रँकफुर्टरझिटंग इत्यादि कांहीं पत्रांनीं फ्रँको-जर्मन युद्धाच्या वेळीं आपले खास बातमीदार रणभूमीवर पाठविले होते; पण स्कर्ल हे याहिपुढें गेले. जगांत कोठेंहि एखादा अस्मानीसुलतानीचा प्रसंग झाला, तर त्या ठिकाणीं स्कर्ल यांचे बातमीदार हजर असावयाचेच. कोठें धरणीकंप झाला, कोठें महापूर आला, एकाद्या देशांत बंड झालें, अथवा एकाद्या देशांत दुसरी एकादी महत्त्वाची चळवळ सुरू असली, तर त्या ठिकाणीं लोकल अँझिगरचे खास बातमीदार धांवत जावयाचेच. या बातमीदारांत ऑटो फॉं गॉटबर्ग हे फार विख्यात असून राष्ट्रांच्या परस्पर हितसंबंधाविषयीं एकादी गोष्ट घडून आली, तर तीविषयीं अंतस्थ बातम्या काढण्यांत हे फार पटाईत आहेत. गेल्या पंधरा वीस वर्षांत अशा प्रकारची एकहि गोष्ट त्यांच्या नजरेंतून सुटली नाहीं.

बातम्या मिळविणें आणि त्यांचा प्रसार करणें या बाबतींत जशा नव्या पद्धति स्कर्ल यांनीं शोधून काढल्या, त्याचप्रमाणें छपाईच्या बाबतींतहि अगदीं नव्या पद्धतीचें अवलंबन त्यांनीं केलें आहे. ठसे जुळण्याकरितां लिनो टाईप यंत्राचा उपयोग जर्मनींत यांनीं प्रथम सुरू केला. वर्तमान पत्रांत चित्रें घालण्याची पद्धतहि त्यांनींच प्रथम सुरू केली. डॉयबोश नांवाचें एक सचित्र साप्ताहिक त्यांनीं सुरू केलें. हें पत्रहि फार लोकप्रिय झालें आहे. यानंतर लवकरच दुरंगी चित्रें छापण्याची कला प्रथमच अस्तित्वांत आली, तेव्हां दुरंगी चित्राचें एक डरटॅग नांवाचें नवें दैनिक त्यांनीं सुरू केलें. दुरंगी छपाईची कीर्ति साऱ्या युरोपभर पसरण्यास हेंच दैनिक कारण झालें आहे. अशा रीतीनें प्रकाशनाच्या कार्यांत सालोसाल ते भर घालूं लागले. आज मितीस पांच दैनिकें आणि डझनभर साप्ताहिकें त्यांच्या मालकिची आहेत. यांतील कित्येक शिकारी लोकांसाठीं, व कित्येक कांहीं धंद्यांच्या लोकांसाठीं असून कांहीं साप्ताहिकें मैदानी खेळास वाहिलेलीं आहेत. त्यांचा खपहि फार दांडगा आहे. स्कर्ल यांच्या धंद्याचीं ऑफिसें साऱ्या साम्राज्यभर पसरलेलीं आहेत. खुद्द बर्लिन शहर व त्याच्या आजूबाजूचीं उपांत नगरें यांत बेच्याळीस ऑफिसें असून इतर प्रांतांत अडीचशें ऑफिसें आहेत. १८९४ नंतर त्यांनीं नियत भांडवलाची मंडळी उभारून ही सारी मालमत्ता तिच्या नांवानें केली आहे. हा सर्व कारखाना चालण्याकरतां बर्लिनच्या मध्यवस्तींत कित्येक प्रचंड इमारती त्यांनीं उभारल्या असून त्यांत पांच हजाराहून अधिक माणसें काम करीत आहेत.

हेर स्कर्ल हे अगदीं व्यवहारी असले, तरी मनानें ते बरेच कोमल आहेत. व्यवहारांत अवश्य लागणारा निष्ठुरपणा आणि भावनांची कोमलता यांचें विलक्षण मिश्रण त्यांच्या ठिकाणीं आढळून येतें. ते आज विलक्षण संपत्तिमान झाले आहेत व त्यांनीं काढलेलीं सारीं पत्रें पैशाच्या दृष्टीनें यशस्वी झालीं आहेत, ही गोष्ट खरी; तथापि अगदीं प्रथमपासून सुद्धां कोणतेंहि पत्र केवळ पैसा मिळविण्यासाठीं त्यांनीं सुरू केलें नाहीं. गरीब लोकांचा आयुष्यक्रम थोडा तरी अधिक सुखाचा व सोयीचा करावा

हाच त्यांचा मूळ हेतु होता. या हेतूला पोषक अशा दुसऱ्याहि अनेक संस्था त्यांनीं निर्माण केल्या आहेत. पत्रें, पुस्तकें अगदीं थोड्या किंमतीत गरीबांस मिळावित याकरतां कित्येक फिरतीं वाचनालयें त्यांनीं सुरू केलीं आहेत. गरीबांस पैशाचा संग्रह करतां यावा याकरतां नव्या पद्धतीच्या सेव्हिंग ब्यांका त्यांनीं स्थापिल्या आहेत. याशिवाय कित्येक नाटकगृहेंहि त्यांनीं बांधलीं असून गरीबांस शहराच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत लवकर जातां यावें ह्मणून एकरुळाची गाडीहि त्यांनीं सुरू केली आहे. पुष्कळ पैसा खर्चून या युक्तीच्या उत्पादकापासून ती त्यांनीं विकत घेतली व थोड्या खर्चानें तिचा उपयोग सर्वांस सुलभ करून दिला. आकाश यानांतून प्रवास करण्याची गोडी आपल्या देशबांधवांस लागावी व आकाश यानांचें महत्त्व त्यांच्या चित्तावर बिंबावें याकरतां दर आठवड्यास कांहीं माणसास आकाश यानांतून पदर खर्चानें ते फिरवून आणीत असतात.

जर्मन राष्ट्राच्या सांप्रतच्या अननुभूत वाढीच्या मुळाशीं ज्या लोकांचे श्रम कारणीभूत झाले आहेत, त्यांतच आगस्ट स्कर्ल यांची गणना करणें अवश्य आहे; तथापि त्यांचें दर्शन ज्यांना झालें आहे, अशीं मनुष्यें साऱ्या जर्मन साम्राज्यांत अवघीं शंभरहि मिळावयाचीं नाहींत. डामडौलाच्या अशा एकाद्याहि लौकिक समारंभास ते आजपर्यंत कधीं हजर राहिले नाहींत. अरण्यांत राहणाऱ्या एकाद्या तापशाच्या राहणीला अनुरूप अशी त्यांची राहणी आहे. खुद्द बादशहांची भेट घेणें एक वेळ सोपें आहे; पण यांची भेट मात्र कोणास होऊं शकत नाहीं. १९०० सालीं आपली चिनांतील मोहीम संपवून विजयी झालेले फिल्ड मार्शल कौंट फाँ वाल्डरसी हे एका वेळीं त्यांची भेट घेण्याकरतां सुमारें महिनाभर खटपट करीत होते; पण त्यांच्या खटपटीस यश आलें नाहीं. ते आपल्या खाजगी खोलींतून फारसे बाहेर पडत नाहींत, व आपल्या चिटणिसावांचून दुसऱ्या कोणाची भेटहि ते घेत नाहींत. असें आहे; तथापि त्यांच्या प्रचंड धंद्यांतली एकहि बाब त्यांच्या नजरेंतून सुटलेली नसते. आपल्या धंद्याचीं सारीं सूत्रें त्यांनीं आपल्याच हातीं ठेविलीं आहेत आणि त्यांतील

सर्व बाबी ते अत्यंत लक्षपूर्वक पहात असतात. वर्तमानपत्राच्या बाबतींत कोणत्याहि नवीन कल्पनेचा उदय बर्लिनमध्यें झाला, तर तिचें मूळ झिमरस्ट्रासीवरील आगस्ट स्कर्ल यांच्या खोलींतच आहे, ही गोष्ट साऱ्या जर्मनींतील आबालवृद्धांस आतां माहीत झालें आहे. त्यांच्याशीं चढाओढ करणारे लोक अर्थातच पुष्कळ आहेत व यांपैकीं पुष्कळांची चढाओढ योग्य मार्गांनीं चालली आहे, ही गोष्ट खरी; तथापि नव्या नव्या कल्पना काढण्यांत त्यांचा हात धरणारा अद्यापिहि कोणी नाहीं. थिओडर वुल्फ यांचें 'बर्लिनर टागेब्लाट' हें वर्तमानपत्र हल्लीं पुष्कळच पुढें आलें असून तें फार चांगल्या प्रकारें चाललें आहे; पण या सर्व पत्राचें काम यशस्वी रीतीनें चालण्यास एका प्रकारें आगस्ट स्कर्ल यांचेच श्रम कारणीभूत झाले आहेत, असें ह्मणावयास हरकत नाहीं. वर्तमानपत्रांची चटक लोकांत प्रथम उत्पन्न करण्याचें बिकट काम त्यांनींच पाहिल्यानें केलें. पडित जागेंतील कांटेकुटे काढून टाकून तेथें त्यांनीं राजरस्ता उत्पन्न करून दिला व त्या रस्त्यानें इतर लोक आतां सुखानें मार्गक्रमण करीत आहेत.

लोकल अँझिगर पत्राला जर्मन सरकारचा आश्रय आहे, ही गोष्ट इग्लंडांतील व अमेरिकेंतील पुष्कळ लोकांना आतां ठाऊक झाली आहे. जर्मनीचीं राजकीय सूत्रें हातीं वागविणाऱ्या लोकांशीं लोकल अँझिगरचा जितका निकट संबंध आहे, तितका तो दुसऱ्या कोणाशींहि नाहीं. या पत्राची सत्ता लोकांच्या मनोवृत्तीवर किती बसली आहे, हें जर्मन मुत्सद्यांस चांगलें ठाऊक झालें आहे आणि आपणाला अनुकूल अशा कोणत्याहि कल्पनांचा फैलाव साऱ्या राष्ट्रभर करून देण्यास ते लोकल अँझिगरचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करीत असतात. ज्या पत्रासंबंधीं लोकांत अगोदरच आदर वसत आहे, त्याच्या मार्फतच आपल्या मतांचा केलेला प्रसार सामान्य लोकांत अधिक दृढमूल होतो, हें तत्त्व जर्मन अधिकारीवर्ग विसरलेला नाहीं.

स्कर्ल यांचें पांखरावर फार प्रेम आहे; पण पांखरें पाळण्यापेक्षां तीं पिंजऱ्यांतून मोकळीं सोडून देण्यांतच त्यांस फार आनंद होतो. "पांखरांचें

स्मरण ठेवा." असें वाक्य लोकल ॲंझिगर पत्रांत वारंवार व अनेक जागीं मोठ्या अक्षरांनीं छापण्यांत येत असतें. लहानपणीं एका पांखराच्या घरट्यांतील पिल्लें त्यांनीं चोरलीं त्या वेळीं त्या पांखरांनीं केलेल्या, किलबिलाटानें त्यांचें चित्त द्रवलें. आपल्या लहानपणच्या या कृतीचें स्मरण अद्यापहि त्यांस होत असतें. अजूनहि मधून मधून बाजारांत जाऊन पुष्कळ पक्षी ते विकत घेतात व टायरगार्टन बागेंत नेऊन त्यांस मोकळ्या हवेंत सोडून देतात. अशा रीतीनें कित्येक वेळां पक्ष्यांचे थवेच्या थवे त्यांनीं मोकळे सोडले आहेत.

स्कर्ल यांचें वय आज सहासष्ट वर्षांचें आहे. तथापि त्यांची कल्पनाशक्ति एकाद्या तरुणाइतकीच ताजीतवानी आहे. जर्मन राष्ट्राला सांप्रतची उन्नतावस्था प्राप्त करून देण्यास ज्यांनीं श्रम केले, त्यांत यांची बरोबरी करणारीं माणसें फारच थोडीं सांपडतील. जर्मन भाषा ज्या ज्या ठिकाणीं चालते, त्या त्या ठिकाणीं आगस्ट स्कर्ल यांचें नांव सर्वतोमुखीं झालें आहे.

---

## पॉल अर्लिक.

आपल्यांतील नाणावलेल्या पुरुषांचें कांहीं तरी स्मारक त्यांच्या जिवंतपणींच करावयाचें, अशी संवय जर्मन लोकांस आहे. यामुळें फ्रॅंकफर्ट येथील वैद्यकीय शोधशाळेकडे जाणाऱ्या मनुष्याला पॉल अर्लिक स्ट्रासी ( रस्ता ) वरून जावें लागतें. याच रस्त्यावर पॉल अर्लिक यांची शोधशाळा असून तेथेंच त्यांनीं ६०६ हें प्रख्यात औषध तयार केलें. घटसर्पावर औषध तयार करणारे प्रोफेसर बेहरिंग हे त्यांचे समकालीन असून त्यांचाहि एक पुतळा बर्लिन येथें लोकांनीं उभा केला आहे. १९०९ सालीं प्रोफेसर अर्लिक यांनीं आपलें उपदंशावरील ६०६ हें रामबाण औषध शोधून काढलें व तेव्हांपासून त्यांचें नांव युरोपांत सर्वत्र प्रसिद्ध झालें. तथापि त्या पूर्वींहि निद्रारोगावर औषध शोधून काढण्याच्या कामांत त्यांनीं बरेंच यश

संपादन केलें होतें. शास्त्रीय शोधाचें सुवर्णपदक १९०३ सालींच त्यांस बादशहाकडून मिळालें होतें व १९०५ सालीं आक्स्फर्ड, गार्टिजेन व शिकागो या विश्वविद्यालयांनीं वैद्यशास्त्रांतील उच्च पदव्या त्यांस अर्पण केल्या होत्या.

अर्लिक यांनीं उपदंशावर जें रामबाण औषध शोधून काढलें, त्याला त्यांनीं ६०६ हें नांव दिलें. याचें कारण असें कीं, हें औषध तयार करण्याकरतां त्यांनीं जे प्रयोग केले, त्यांत सहाशें सहाव्या प्रयोगाच्या वेळीं त्यांस यश आलें. या औषधाचें खरें शास्त्रीय नांव द्यावयाचें म्हटलें, तर तें 'डाय आक्सी डाय ॲमिडो–ॲर्सिनो बंझाल' असें वांकडें तिकडे नांव द्यावें लागेल. औषधी विकणाऱ्या व्यापाऱ्यांत तें साल्व्हरसान या नांवानें प्रसिद्ध आहे. ६०६ या औषधाची वैद्यकीयदृष्ट्या खरी किंमत काय आहे, हें अद्यापि निश्चित झालेलें नाहीं. उपदंशावर त्याचा उपयोग निश्चितपणें होतो कीं नाहीं, याबद्दल वैद्यमंडळांत अद्यापि एकमत झालेलें नाहीं. या रोगावर तें रामबाण आहे, असें ह्मणणारे जसे अनेक धन्वंतरी आहेत, तसेंच तें निरुपयोगी आहे, असें ह्मणणारेहि भिषग्वर बरेच आढळतात. हें औषध जगापुढें आणण्यापूर्वीं अर्लिक यांनीं दहा हजार रोग्यांवर ते अजमावून पाहिलें व यापैकीं अगदीं थोडे रोगीखेरीजकरून बाकीचे सारे अगदीं थोड्या वेळांत निखालस बरे झाल्याचें आढळून आलें. कांहीं थोड्या रोग्यास त्याचा गुण आला नाहीं, याचें कारण औषधाचें प्रमाण आपणास निश्चित करतां आलें नाहीं, हें आहे, असे अर्लिक ह्मणतात. औषधाचा उपयोग करतांना निदान ते अपायकारक तरी होणार नाहीं, अशी खबरदारी प्रथम घेणें हें अत्यंत आवश्यक आहे. यासाठीं योग्य अधिक प्रमाणावर औषधाचा उपयोग करणें प्रशस्त न वाटल्यामुळें कांहीं रोग्यांस तें गुणावह झालें नाहीं. ६०६ हें औषध उपदंशाच्या सर्वच अवस्थांत सारखें लागू पडतें असें नाहीं, ही गोष्ट खरी; तथापि त्या रोगावर तें बिनमोल उपयोगी पडतें, यांत मात्र मुळींच शंका नाहीं. आतां त्याच्या योगानें रोगाचें समूळ उच्चाटन होतें कीं नाहीं, हें पुष्कळ वर्षांच्या अनुभवावांचून ठरवितां येणार नाहीं. अनेक वैद्यांनीं आजपर्यंत त्याचा जो कांहीं

उपयोग करून पाहिला, त्यावरून त्याच्या गुणाबद्दल सर्वांची बहुमतांशीं खात्री होऊन चुकली आहे आणि वैद्यमंडळानें आपल्या औषधीसंग्रहांत त्याला कायमचें स्थान दिलें आहे. हें औषध सर्वांगांनीं परिपूर्ण आहे, असें खुद्द अर्लिक यांचेंहि ह्मणणें नाहीं. त्यांत उणीवा आहेत ही गोष्ट ते स्वतःच उघडपणें सांगतात व त्या नाहींशा करून तें पूर्णत्वास आणण्याचा उद्योग ते अद्यापहि करीत आहेत. सांप्रत त्यांचें लक्ष काळपुळी आणि निद्रारोग यांकडे लागलें असून त्यांजवर रामबाण औषधें शोधून काढण्यासाठीं त्यांचे प्रयोग चालू आहेत.

क्लॉड बर्नार्ड, हेल मोल्डझ, पाश्चूर आणि अर्लिक हे सर्व एकाच दर्जाचे रसायन शास्त्री आहेत व रोगनिवारण शास्त्रासंबंधीं त्यांनीं महत्त्वाचे शोध लावण्यांत सारखीच बुद्धिमत्ता प्रगट केली आहे, असें एका रसायन शास्त्रविशारदानें ह्मटलें आहे; तथापि या सर्व मंडळींत अर्लिक हे कल्पनाशक्तीनें अधिक श्रेष्ठ आहेत, यांत संशय नाहीं. रोगनिर्मूलनाचीं साधनें शोधून काढण्याच्या बाबतींत अर्लिक यांची कल्पनाशक्ति असामान्य कोटींतील असून त्यांची बुद्धिहि या बाबतींत तशीच असामान्य आहे. त्यांचे शोध केवळ एकाद्या शास्त्रालाच चिटकून न राहतां ते रसायन शास्त्र, रोगजंतुशास्त्र, मज्जातंतुशास्त्र, आणि औषधीक्रिया या साऱ्या शास्त्रांत एकसमयावच्छेदेंकरून चालू असतात. असें आहे; तथापि त्यांत कोणत्याहि प्रकारची विसंगतता नसून हे निरनिराळ्या शास्त्रांतील परिश्रम कोणत्या तरी एका विशिष्ट हेतूस धरून चालू असतात, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अर्लिक यांच्या शोधशाळेंतील एका मदतनिसाच्या पत्नी मिसेस मार्क्स यांनीं १९१० सालीं एक लेख लिहून त्यांत अर्लिक यांच्या शोधांचा मूळ पाया काय आहे, याचें थोडक्यांत वर्णन दिलें आहे. या लेखांत मिसेस मार्क्स ह्मणतात, " प्रत्येक जीवांत जंतु कांहीं विशिष्ट पदार्थांसाठीं चुंबकता दाखवीत असतो. मग तो जंतु एकादा रोगजंतु असो अथवा दुसऱ्या एकाद्या जीवंत जंतूला भक्षण करून स्वतः जगणारा जंतु असो. कोणत्याहि जातीचा जंतु झाला, तरी अनेक पदार्थांपैकीं एकाच पदार्था-

कडे विशेष ओढ तो दाखवीत असतो. एकाद्या औषधाचा प्रवेश शरीरांत झाला, म्हणजे त्या मिश्रणांतील सर्व औषधें सर्व शरीरभर सारखीच वाटलीं जात नाहींत. अथवा शरीरांतील सर्व इंद्रियांवर त्यांचा सारखाच परिणाम होत नाहीं. उदहरणार्थ, अफू किंवा कुचला यांचा परिणाम मज्जा-तंतूवरच घडतो. डिजिट्यालिस या औषधाचा परिणाम हृदयाच्या क्रियेवर-च घडतो. अशा रीतीनें प्रत्येक जीवंत इंद्रिय निरनिराळ्या पदार्थासाठीं आपली आसक्ति प्रगट करीत असतें. ही गोष्ट सर्व वैद्यांस ठाऊक झाले-लीच आहे. हीच कल्पना मूळ पायादाखल घेऊन तीवर अर्लिक यांनीं आपली पुढील इमारत उभारली. अशा रीतीनें त्यांनीं दोन औषधें तयार करून त्यांचे प्रयोग करून पाहिले. त्यांवरून शरीराच्या कोणत्याहि भागास इजा न पडतां भयंकर रोगांच्या जंतूंचा मात्र नाश करतां येतो. असें त्यांनीं सिद्ध केलें. अशा रीतीचें प्रत्येक जातीच्या जंतूंचें समूळ उच्चाटन करणारीं औषधें निर्माण करणें शक्य आहे, ही गोष्ट पॉल अर्लिक यांनीं निःसंशय सिद्ध केली आहे. ”

अर्लिक तरुण असतां त्यांची बुद्धि कुशाग्र आहे, ही गोष्ट प्रोफेसर राबर्ट कोच यांच्या लक्षांत आली आणि त्यांनीं आपल्या बर्लिन येथील शोधशाळेंत त्यांची १८९० सालीं नेमणूक केली. त्यापूर्वी बारा वर्षें निरनिराळ्या रसायनशास्त्रविशारदाकडे अर्लिक हे एक छोटेसे मदतगार या नात्यानें काम करीत होते. रक्तांतील मूलद्रव्यासंबंधीं त्यांनीं जे शोध प्रगट केले, त्यायोगानें त्यांचें नांव सर्व जगास प्रथम मशहूर झालें. हा काळपर्यंत रक्तासंबंधीं झालेल्या सर्व प्रयोगांत ताज्या रक्ताचाच सर्वत्र उपयोग करतां येत असे; पण वाळून गेलेल्या व निरनिराळ्या रंगीत पदार्थांशीं मिश्र झालेल्या रक्ताच्या डागांत कांहीं अनुकूल गोष्टी आढळून येतात, असा शोध अर्लिक यांनीं प्रथम लावला. रक्ताशीं निरनिराळ्या रंगांचें मिश्रण केलें, तर त्यांतील घटक वेगळे करतां येतात, ही गोष्ट अर्लिक यांनीं प्रथम सिद्ध केली. त्यांनीं तयार केलेला रंग रक्ताच्या सफेत भागांत मिसळला, तर त्या रक्तांत पांच निरनिराळ्या घटकांचें मिश्रण आढळून येतें. या शोधामुळें रोगनिदान ठरविण्यास हल्लीं

सुलभ मार्ग झाला आहे. अर्लिक यांच्या शोधामुळें रक्तबिंदूवरून रोग-निदान ठरविण्याच्या क्रियेंत नवे नवे शोध अस्तित्वांत आले. त्यानंतर क्षयरोगाचे जंतु इतर जंतूपासून निश्चितपणें कसे शोधून काढावेत याचा शोध त्यांनीं लावला.

यानंतर आर्लिक यांची कुशाग्र बुद्धि रोगप्रतिबंधाकडे वळली. एकाद्या मनुष्याला देवी किंवा गोंवर या सारखा रोग एकवार होऊन त्यांतून तो वांचला, तर तोच रोग बहुधां त्यांस पुनः होत नाहीं, असा अनुभव आहे. असें होण्याचें कारण काय असावें, याचा शोध शास्त्रीय दृष्ट्या ते करूं लागले. पुष्कळ वेळां या शोधांत निराशेचें दुःख भोगण्याचेंहि त्यांच्या नशीबीं आलें; तथापि स्वभावतः ते दीर्घोद्योगी असल्यामुळें आपले प्रयोग पुढें चालू ठेवण्यांत त्यांनीं कसूर केली नाहीं. हजारों प्रयोगाच्या अंतीं त्यांस यश आलें व रोगप्रतिबंधक शास्त्राचा मूळ पाया त्यांनीं शोधून काढला. याच सुमारास घटसर्पावरील बेहरिंग यांचें पिचकारीचें औषध प्रसिद्धीस येऊं लागलें होतें. अशा प्रकारच्या औषधींत शरीराच्या इतर भागांस हानिकारक असे बरेच दोष त्या वेळीं आढळून येत. हे दोष नाहींसे करून औषधें निखालस खात्रीचीं करण्याचा उद्योग त्यांनीं सुरू केला. याहि उद्योगांत त्यांस यश येऊन त्यांच्या पद्धतीचा स्वीकार जर्मन सरकारनें केला. यानंतर थोड्याच दिवसांनीं इतर सरकारांनींहि जर्मन सरकारचें अनुकरण केलें. हा नवा शोध लावण्यांत आर्लिक यांनीं जे महद्यश संपादिलें. त्याबद्दल त्यांचा सन्मान करण्याकरतां प्रशियन सरकारनें बर्लिनजवळील एका सरकारी शोधशाळेच्या मुख्याच्या जागीं त्यांची नेमणूक केली. रोगजंतूंचा नाश करणारीं औषधें शोधून काढण्याकरितांच या शाळेची स्थापना झाली आहे; पण अर्लिक यांच्या शोधांचा विस्तार वाढतां वाढतां इतका वाढला कीं, त्यांच्या शोधांस ही शोधशाळा पुरेनाशी झाली. तेव्हां फ्रँकफर्ट येथें नवीनच स्थापलेल्या प्रचंड सरकारी शोधशाळेवर त्यांची नेमणूक झाली.

यानंतर अर्लिक यांचें लक्ष निद्रारोगाकडे वळलें. केवळ तीन वर्षांच्या अवधींत या रोगानें ब्रिटिश आफ्रिकेंत एक लाख वस्तीचा सप्पा उडविला

होता. या बाबतींत त्यांनीं निरनिराळ्या प्राण्यांवर शेंकडों प्रयोग करून पाहिले. प्रयोग करतां करतां चारशें अठराव्या प्रयोगांत त्यांस यश आलें व ४१८ या औषधाचा शोध लागला. या औषधाला अर्सेनो-फेनिल-ग्लायसिन असें शास्त्रीय पारिभाषिक नांव त्यांनीं दिलें आहे. अगदीं आसन्नमरणास्थितींतील प्राणीहि या औषधाच्या एका पिचकारीनें साफ बरा होतो, असा अनुभव आला आहे. हेंच औषध आफ्रिकेंत सांप्रत सर्वत्र उपयोगांत आणलें जात आहे. त्याचा उपयोग फारच काळजीपूर्वक करावा लागतो आणि त्याच्या गुणाचा पुरा अनुभव घेण्यास आणखी कांहीं काळ लोटला पाहिजे. टोगोच्या वसाहतींत त्याचा फारच चांगला परिणाम झाला. सामान्यतः दोन पिचकाऱ्यांनीं टोगोमधील रोगी बरे झाले. फिलेपाईन बेटांत सुरा नांवाच्या घोड्यांच्या रोगावरहि या पिच-कारीचा चांगला उपयोग झाल्याचें आढळून आलें आहे.

काळपुळीसंबंधींहि अर्लिक यांनीं कांहीं शोध चालविले आहेत. या-संबंधांत आपलें पाऊल किती पुढें पडलें आहे, हें त्यांनीं स्वतः कोणासहि सांगितलेलें नाहीं· तथापि त्यांतहि बरेंचसें यश त्यांनीं संपादन केलें आहे, अशी बोलवा आहे. या रोगावरहि रसायनशास्त्र पुढें मागें खचित जय मिळवील एवढेंच ते ह्मणतात. हजारों प्रयोगांच्या अंतीं यश मिळेल, अशी त्यांची खात्री आहे. या प्रयोगात त्यांचे पट्ट शिष्य प्रोफेसर फॉवासर-मन हे प्रयोग करीत असून त्यांत कांहीं यश त्यांनीं मिळविलें आहे.

विश्वविद्यालयांत कोणत्याहि शास्त्राचा अभ्यास करणें म्हणजे काळाचा अपव्यय करणें होय, असें ह्मणणारे कांहीं लोक अलीकडे निर्माण झाले आहेत. या मताला अर्लिक यांच्या उदाहरणावरून चांगलीच पुष्टि मिळ-ण्यासारखी आहे. पॉल अर्लिक हे ब्रेसला, स्ट्रासबर्ग, फ्रीबर्ग, आणि लिप-झिग इतक्या विश्वविद्यालयांत होते; पण तेथें त्यांनीं किती ज्ञानमौक्तिकें वेंचलीं याची नक्की माहिती कोणासहि नाहीं; तथापि हजिरीपेक्षां गैरहा-जिरीचेच दिवस त्यांचे अधिक असत. रसविद्येंत त्यांनीं जें कांहीं यश संपादन केलें, त्याला त्यांचे स्वतःचेच श्रम कारणीभूत झाले आहेत. रसायन शास्त्राचा अभ्यास विश्वविद्यालयीन पद्धतीवर त्यांनीं कधींहि केला

नाहीं. कोणतीहि विद्या साध्य होण्यास त्या विद्येसंबंधीं उच्च भरारी मारणारी कल्पना अत्यावश्यक आहे, असें त्यांचें मत आहे. त्या शास्त्रीशीं आपलें चित्त सदोदित खेळत राहिलेलें असावें आणि आपल्या कल्पना-शक्तीला वाटेल तिकडे भटकण्यास पूर्ण वाव यावा, म्हणजे त्या शास्त्राचें रहस्य साध्य होतें, असें ते ह्मणतात. औषधीक्रियेंतहि पुष्कळसे शोध असेच केवळ सुदैवानें लागले आहेत, असें त्यांचें मत आहे. अमुक एक गोष्ट शक्य अथवा दुसरी अमुक अशक्य असें प्रत्यक्ष अनुभवाशिवाय ते कधींहि ह्मणत नाहींत. आपला शाळेंतला क्रमिक अभ्यास ते नीट रीतीनें कधीं करीत नसत; तथापि त्यांच्या शाळागुरूंनींहि त्याबद्दल त्यांस कधीं त्रास दिला नाहीं. यामुळें पाठशाळेंत पांच वर्षें घालवून कोणतीहि परीक्षा ते पास झाले नाहींत. यानंतर आणखी एक वर्षाच्या शेवटीं युनिव्हर्सिटीची सनद त्यांस मिळाली; पण ती ठरींव विषयासंबंधीं नसून त्यांच्या स्वतंत्र शोधासाठीं ती त्यांस देण्यांत आली होती.

पॉल अर्लिक हे सायलेशिया प्रांतांतले रहिवाशी आहेत. त्यांचें वय सध्यां साठ वर्षांचें आहे. त्यांचे वडील हे उदीमधंदा करणारे गृहस्थ होते; पण त्यांचे आजे वनस्पति शास्त्राचे गुरु होते व या शास्त्रांतील शिक्षणाचें काम आपल्या वयाच्या नव्यदाव्या वर्षांपर्यंत ते करीत होते. याच आजोबाकडून पॉल अर्लिक यांस रसायन शास्त्रांचें बाळकडू मिळालें. अर्लिक हे देहयष्टीनें जवळ जवळ सुदामदेवच आहेत. उंचीनेंहि ते पुरे पांच फूट सुद्धां नाहींत. त्यांची लांब दाढी आणि डोक्याचे केंस करडे झाले असून, आतां तंबाखूच्या धुराच्या पुटांनीं ते पिवळे होऊं लागले आहेत. त्यांना चिरूट ओढण्याचें भयंकर व्यसन आहे. हातांत चिरूट नाहीं, अशा स्थितींतला त्यांचा एकहि फोटो कोणास अद्याप उपलब्ध झाला नाहीं. त्यांचा स्वभाव भयंकर विसरभोळा आहे. फक्त चिरूटाचा त्यांस कधीं विसर पडत नाहीं; पण चिरूटावर जमलेली राख झाडून टाकण्याचें भान न राहिल्यामुळें ती नेहमीं त्यांच्या अंगावरील कपड्यांचा आश्रय करीत असते. त्यांच्या कपड्यांच्या बाबतींतला हा नीटनेटकेपणा त्यांच्या रसशाळेंत आणि संग्रहालयांतहि आढळून येतो. टेबलें, खुर्च्या, पलंग,

पुस्तकें, वर्तमानपत्रें आणि इतर फाटके कागद हीं सारीं केवळ स्वेच्छेनें कोठें तरी पडलेलीं असतात; पण या खोलींत प्रवेश करून तेथें व्यवस्था करण्याची कोणाचीहि छाती होत नाहीं. अर्लिक यांनीं एके वेळीं आपले कांहीं ग्रंथ आपल्या मित्रास वाचावयास देऊन त्याजकडून कांहीं पुस्तकें आणलीं होतीं. बरेच महिने हीं पुस्तकें परस्परांकडे तशींच पडून होतीं. एके दिवशीं अर्लिक यांच्या मित्रानें त्यांचीं पुस्तकें परत करून सोबत एक चिठ्ठी लिहिली, आपण लग्न केलें असून आपल्या ग्रंथसंग्रहालयाची व्यवस्था आपण लावीत आहों, असें तींत त्यानें लिहिलें होतें, त्याला अर्लिक यांनीं उत्तर दिलें, "आपला विवाह झाला, हें ऐकून मला फार संतोष होत आहे. माझीं पुस्तकें आपण परत पाठविलीं, याबद्दल मी आपला फार आभारी आहें; पण यामुळें आपलीं पुस्तकें मी परत करीन असा आपला समज असेल, तर तो मात्र अगदीं चुकीचा आहे." रस-शाळेंतील उपकरणें पुसण्यासाठीं चिंध्या गोळा करण्याचा त्यांस विलक्षण नाद आहे. विशेषतः जुने हातरुमाल आणि सद्रे यांवर त्यांचें विशेषच प्रेम आहे. एके वेळीं व्याख्यान देत असतां घाम पुसण्यासाठीं आपल्या खिशांतून हातरुमाल ते बाहेर काढूं लागले, तों त्यांच्या पत्नीचें एक सबंद जुनें जाकीट बाहेर पडलें.

त्यांच्या विवाहाच्या वेळीं त्यांच्या पत्नीची बरीचशी मिळकत त्यांजकडे आली होती आणि याशिवाय त्यांच्या औषधींनींहि त्यास चांगलीच द्रव्य-प्राप्ति करून दिली आहे; तथापि त्यांस कसल्याहि प्रकारची चैन माहीत नाहीं. कडक चिरूट हीच काय ती चैनीची वस्तु त्यांस माहीत आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं एका विश्व विद्यालयांत रसायनाच्या अध्यापकाच्या जागीं ते काम करीत होते. त्या वेळीं मिळणाऱ्या पगारांतून आपला चिरूटाचा खर्च जेमतेम भागत असे, असें तें स्वतःच सांगतात.

त्यांनीं ६०६ व्या औषधाचा शोध लावला, त्यावेळीं बादशहांनीं त्यांस एक्सलेंझ ही मानाची पदवी दिली. ही पदवी मिळविणारे ते पहिलेच यहुदी आहेत. धंद्यानें ते रसायनशास्त्री आहेत ही गोष्ट खरी; पण वास्तविक पाहतां ते खरोखर तत्त्ववेत्ते आहेत असेंच म्हटलें पाहिजे.

केवळ रसायनशास्त्री नसून रसायनशास्त्रांतील तत्त्वदर्शी आहेत, असेंच ह्मटलें पाहिजे. अनेक रोगांनीं पीडलेल्या मानव जातीला आणखीहि त्यांच्या श्रमाचा उपयोग होईल, अशी आशा जर्मन राष्ट्रास आहे.

प्रो०अर्लिक हे थोड्या महिन्यांपूर्वी परलोकवासी झाल्याचें समजतें.

## अरन्स्ट फाँ हाइडब्रँड.

प्रत्येक वर्षाच्या फेब्रुआरी महिन्यांत बोजड चेहऱ्याच्या, मोठ्या टोप्या घातलेल्या आणि धुळीनें आंग भरलेल्या; अशा धष्टपुष्ट लोकांची एक स्वारी बर्लीनवर होत असते. ही मंडळी बर्लिनमध्यें जमा झाली ह्मणजे साऱ्या शहरभर मोठी चळवळ उडून जाते. जर्मन राष्ट्रभूमीच्या बऱ्याचशा भागाची खरी मालकी या मंडळीच्या हातीं असते. जर्मन राष्ट्राच्या सांप्रतच्या वैभवांत आपण बऱ्याच मोठ्या प्रमाणाचे हिस्सेदार आहों, ही गोष्ट ही मंडळी बर्लिनच्या ऐटबाज नागरिकांना पटवीत असते. जर्मनीच्या शेतकऱ्यांनीं 'बंडडरल्यॉंडवर्ट' नांवाची संस्था स्थापिली असून तिची बैठक प्रतिवर्षी बर्लिनमध्यें भरत असते.

केवळ शेतकीच्याच प्रश्नांचा खल करावा या उद्देशानें ही संस्था प्रथम निर्माण झाली; पण आतां तिला राजकीय स्वरूप प्राप्त झालें असून तिचे प्रयत्नहि सांप्रत अतिशय वाढले आहेत. जर्मनीच्या लोकसंख्येंत शेतकऱ्यांचें प्रमाण फक्त शेंकडा २८ इतकेंच आहे; तथापि राज्यकारभाराची वरींचशीं सूत्रें आपल्या हातीं पक्कीं आहेत, ही गोष्ट दरवर्षी हे शेतकरी राष्ट्राच्या लक्षांत आणून देत असतात. या संस्थेविरुद्ध जर्मनींत पुष्कळ लोकांनीं ओरड केली आहे व त्यांच्या जुलमी अमलापासून सरकारनें जनतेचें रक्षण केलें पाहिजे, अशीहि मागणी पुष्कळ लोक मागत असतात; तथापि यांची जूट व शक्ति अद्यापिहि फुटलेली नाहीं. या शेतकरीमंडळीपुढें १९०९ सालीं सरकारासहि मान वांकवावी लागून त्यासाठीं उद्योग-

धंदे आणि व्यापार यांजवर अधिक कर लादण्यांत आले. या शेतऱ्यांची चळवळ हाणून पाडण्यासाठीं हंसालीगा नांवाची एक संस्था स्थापन झाली; पण या नांगऱ्यांस स्थानभ्रष्ट करण्यास ती समर्थ झाली नाहीं.

या संस्थेचें अध्यक्षपद डॉ. अरन्स्ट फॉं हाइडब्रँड यांजकडे असून त्यांस प्रशियाचे अनभिषिक्त राजे अशी पदवी प्रशियन शेतकरीवर्गांनीं दिली आहे. प्रशियाच्या किंवा साम्राज्याच्या पार्लमेंटांत या मंडळीच्या सभासदांची संख्या फार आहे, असें नाहीं; तथापि सरकारावर त्यांचें वजन मात्र अतिशय आहे. खुद्द मुख्य प्रधानालाहि या मंडळीच्या मताविरुद्ध वागण्याचें धाडस करवत नाहीं. असें धाडस प्रिन्स ब्यूलो यांनीं केलें; पण अखेरीस त्यास प्रधानपद सोडावें लागलें. हाइडब्रँड यांनीं नजर वर उचलून बेथमन् हॉलवेग यांजकडे पाहिलें कीं, ते कापूं लागतात, अशी लोकवार्ता आहे. फार काय; पण खुद्द बादशहासहि या लोकांविरुद्ध उघडपणें बोलण्याची सहसा छाती होत नाहीं. गेलीं कांहीं वर्षें बर्लिनमध्यें भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या कांग्रेसमध्यें बादशहा स्वतः हजर राहूं लागले आहेत. एके वेळीं बादशहांनीं एका जुन्या कायद्यांत कांहीं सूधारणा सुचविली; पण हाइडब्रँड यांस ती नापसंत झाल्यामुळें हा कायदा अद्यापीहि तसाच चालू आहे.

प्रशियन पार्लमेंट आणि रीकस्टाग–म्हणजे साम्राज्याचें पार्लमेंट–या दोन्ही सभांत हाइडब्रँड हे सभासद आहेत व या दोन्ही सभांतील त्यांच्या बाजूच्या सभासदांचें पुढारीपण त्यांजकडे आहे. व्यक्ति या नात्यानें ते पार्लमेंटांत मोठे शक्तिमान् गृहस्थ आहेत; तथापि शरीरानें मात्र ते अगदीं रोडके व खुजे आहेत. उंचीनें ते पुरे पांच फूटहि नाहींत आणि ते खुर्चीवर बसलेले असले म्हणजे पुढच्या टेबलावर पडलेल्या कागदाच्या ढिगाऱ्यांत त्यांची मूर्ति पुरती दिसत देखील नाहीं. उंच व धष्टपुष्ट अशा हालवेग साहेबांसमवेत ते एकादे वेळीं भाषण करीत असले म्हणजे बळी आणि वामन या जोडीचीच एकाद्यास आठवण व्हावयाची. फॉं हाइडब्रँड हे जसे पोशाकानें तसेंच स्वभावानेंहि अगदीं साधे गृहस्थ

आहेत. त्यांच्या पोशाकांत भपक्याची यत्किंचित् छटा देखील दिसून यावयाची नाहीं. तसेंच त्यांच्या भाषणांत अलंकारहि कधीं असावयाचा नाहीं. पार्लमेंटाच्या प्रत्येक बैठकीस हजर राहण्यास ते कधीं चुकत नाहींत; तथापि ते फार करून कधीं भाषणहि करीत नाहींत. त्यांचा सारा वेळ लोकांचीं भाषणें ऐकण्यांत व विचार करण्यांतच जातो. एकाद्या आणीबाणीच्या प्रसंगीं मात्र ते स्वतः भाषण करतात. त्यावेळीं त्यांच्या वक्तृत्वाचें आणि वादविवादकुशलतेचें तेज लोकांस चांगलेंच दिसून येतें. एकाद्या प्रसंगीं, ते भाषण करणार ही गोष्ट लोकांस आगाऊ समजली, तर सभासदांच्या बैठकी आणि प्रेक्षकांचे सज्जे हीं चिकार भरून जातात.

फॉं हाइडब्रँड यांना प्रशियन शेतकऱ्यांनीं राजाची पदवी दिली आहे, आणि त्या पदवीला साजेसें त्यांचें अंतःकरणहि अगदीं निर्भय आहे. कोणाचाहि मुलाहिजा न ठेवतां त्यांस योग्य वाटेल, तें सरळपणें ते बोलत असतात. पार्लमेंटांतील एकाद्या विशिष्ट पक्षावर तुटून पडण्याची वेळ आली, तर तसें करण्यास हाइडब्रँड कधींहि कचरावयाचे नाहींत. अशा प्रसंगीं त्यांच्या भाषणांत तीव्रता आणि जोम हीं अशीं वर उसळून येतात कीं, या खुज्या सुदामदेवाच्या तोंडांतून एवढी जोरदार भाषा बाहेर पडते तरी कशी, याचेंच श्रोत्यांस मोठें नवल वाटतें. १९११च्या नोवेंबर महिन्यांत मोरोक्को प्रकरणासंबंधानें त्यांनीं केलेलें भाषण जर्मन सरकार विसरून जाणार नाहीं. त्या वेळेस डॉ. फॉं बेथमन् हालवेग आणि हर फॉं किडरलेन वेक्टर यांजवर नामर्दपणाचा आरोप हाइडब्रँड यांनीं उघड भाषेंत केला. सरकारास तलवार खुळखुळावयाचें सामर्थ्य मात्र असून ती बाहेर काढण्याचें सामर्थ्य त्यास नाहीं, असें ते ह्मणाले. प्रशियाच्या प्राचीन काळच्या उज्ज्वल यशाची आठवण त्यांनीं सभेस करून दिली. ज्या ज्या वेळीं साऱ्या युरोपाविरुद्ध एकटा प्रशिया लढला, त्या त्या वेळींच त्याचें खरें क्षात्र तेज प्रगट झालें आहे, असें ते ह्मणाले. आणीबाणीच्या वेळीं नामर्दपणें अशीच माघार घ्यावयाची होती, तर एवढें प्रचंड लष्कर आणि जंगी आरमार कां उभारण्यांत आलें ? असा प्रश्न त्यांनीं सरकारास केला. त्यांच्या या भाषणाच्या वेळीं एक तरुण लष्करी अम्मलदार सभा-

गृहांतील राजेलोक बसण्याच्या जागीं बसला होता व या वक्त्याच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक कडक शब्दाला तो आपली संमति उघडपणें दर्शवीत होता. हा तरुण अम्मलदार म्हणजे सध्यांचे जर्मन युवराजच होत. हाइडब्रँड यांचें भाषण संपलें, त्या वेळीं टाळ्यांचा कडकडाट एवढा प्रचंड झाला, कीं, त्यानें सारें सभागृह हादरलें. हें भाषण केवळ लष्करी बाण्याचेंच होतें व त्यांत मुत्सद्दी दृष्टि फारशी नव्हती, ही गोष्ट खरी; तथापि जर्मनराष्ट्राचा कल त्या वेळीं कसा वहात होता, हें मात्र स्पष्टपणें निदर्शनास आलें. या भाषणावर उत्तर देतांना डॉ. हालवेग यांनीं या अनभिषिक्त राजावर पुष्कळसा ताशेरा झाडून मार्थोफरूपणाचा आरोप त्याजवर केला; तथापि त्यामुळें हाइडब्रँड यांच्या भाषणाची जी छाप लोकांवर बसली, ती कमी झाली नाहीं.

बिस्मार्क यांनीं मुख्य दिवाणगिरीचीं सूत्रें सोडल्यानंतर या शेतकरी राजाला राजकीय सामर्थ्य प्राप्त होऊं लागलें. बिस्मार्क यांच्यानंतर कौंट क्याप्रिव्ही हे मुख्य प्रधानाच्या जागीं आले. यांचा कल उद्योगवृद्धीकडे असल्यामुळें जर्मनसाम्राज्याच्या जवळपासच्या राष्ट्रापाशीं त्यांनीं लांब मुदतीचे कित्येक व्यापारी तह केले. या तहामुळें जर्मनीच्या शेतकीस थोडासा धोका प्राप्त झाला. रशियांतील गहूं, आस्ट्रियांतील राय धान्य, डेन्मार्कमधील लोणी व इतर प्राणिज पदार्थ आणि हंगेरींतील बार्ली यांजवरील कर बरेच कमी करण्यांत आले व याच्या बदल्यांत या राष्ट्राकडून जर्मन कारखान्यांत तयार झालेल्या जिनसांवरील कर कमी करून घेण्यांत आले. शेतकऱ्यांस राजकीय व्यवहारांत आपले घोडे पुढें दामटण्यास हीच संधि होती. या कालापर्यंत जर्मनी हा मुख्यतः शेतकीचा देश होता; यापुढें शेतकी कमी होऊन कारखाने वाढणार, अशीं चिन्हें उघड दिसूं लागलीं. शेतकरी आणि कारखानदार यांजमध्यें होणाऱ्या भावी संग्रामाचा पाया या वेळीं पडला. पूर्व आणि पश्चिम प्रशिया, पोमेरानिया, मॅक्लेनबर्ग, सायलेशिया आणि ब्रँडनबर्ग येथील जमीनदारांनीं क्याप्रिव्ही यांचे तह मुदत संपल्यानंतर पुन्हां अस्तित्वांत न येऊं देण्याची खटपट चालविली. १९०२ सालीं क्याप्रिव्ही यांच्या तहांची मुदत संपली

व त्या सालचे मुख्य प्रधान प्रिन्स ब्यूलो यांजकडून या जमीनदारांनीं आपल्या इच्छेप्रमाणें धान्यावरील करांत फेरबदल घडवून आणविला. या नव्या कायद्याचा रोंख शेतकी वाढविण्याकडे होता. त्याचप्रमाणें या कायद्यामुळें जर्मन कारखाने मागें पडूं लागले, ही गोष्टहि खरी.

प्रशियांतील जमीनदार हे स्वतःस राजरक्षक म्हणवीत असतात. राजनिष्ठेविषयीं भाषणें करतांना त्यांची जीभ जितकी लांब होते, तितकी ती दुसऱ्या कोणाचीहि होत नाहीं. जर्मनीच्या प्राचीन रीतिभाती व त्या राष्ट्राचें प्राचीन लष्करी वैभव कायम ठेवण्याचा मक्ता ईश्वरानें आपणांकडे दिला आहे, असा या जमीनदार मंडळीचा समज आहे. सरकारी खातीं, लष्कर, आणि परराष्ट्रीय खातीं या सर्वांत अद्यापिहि या जुनाट फॉ मंडळीचें वर्चस्व सर्वत्र आढळून येतें. जुन्या चालीरीति मोडूं पाहणाऱ्या सोसियालिस्ट लोकांस ही मंडळी अगदीं पाण्यांत पहाते. कोणी सोसियालिस्ट पाहिला कीं, त्यास खाऊं कीं गिळूं असें यांस होतें. जर्मनराष्ट्राची राजकीय व सामाजिक पद्धति ईश्वरानेंच निर्माण करून दिली आहे, असा यांचा पक्का समज आहे. जर्मनीवर राज्य करण्याचा हक्क आपणांस प्रत्यक्ष परमेश्वराकडून मिळाला आहे, असें ज्याप्रमाणें होहेनझोलर्न घराण्याला वाटतें, त्याचप्रमाणें जर्मनीच्या राजकीय व सामाजिक पद्धतींचें रक्षण करण्याचें काम परमेश्वरानें आपणांवर सोंपविलें आहे, असें या फॉ मंडळीस वाटतें. बादशहाचें एकादें म्हणणें रिचस्टॅग पार्लमेंटनें फेटाळून लावलें, तर एक लष्करी अम्मलदार व दहा शिपायी पाठवून सभेची बैठक ताबडतोब मोडून टाकण्याचा अधिकार बादशहास असावा, असें हर फॉ ओल्डनबर्ग हे एकदां स्पष्ट ह्मणाले. इंग्लंडांतील डेली टेलिग्राफ पत्राच्या बातमीदाराची मुलाखत स्वीकारून केसर यांनीं आपलीं कांहीं राजकीय मतें त्याजपाशीं अगदीं मोकळेपणानें बोलून दाखविलीं. या मुलाखतीची हकीकत प्रसिद्ध झाल्यानंतर बादशहाच्या तारतम्यावर सारें जर्मनराष्ट्र तुटून पडलें. या वेळीं त्यांची बाजू सांभाळण्यास या जमीनदारावांचून दुसरें कोणीहि पुढें आलें नाहीं. या वेळीं फॉ हाइडब्रँड यांनीं जें एक भाषण केलें व त्यांत केसरची जी तरफदारी

केली. ती लोकांच्या लक्षांतून कधींहि जाणार नाहीं. या वेळीं प्रिन्स ब्यूलो हे केसरच्या विरुद्ध होते. हाइडब्रँड यांचें भाषण झाल्यानंतर प्रिन्स ब्यूलो आपलें प्रधानपद सोडतील अशी लोकांची खात्री झाली व त्याप्रमाणें पुढें घडलेंहि.

बर्लिन येथें कांहीं काम नसलें, म्हणजे हाइडब्रँड हे सायलेशियांतील आपल्या खेड्यांत जाऊन राहतात. या खेड्याची मालकी शंभराहून अधिक वर्षें त्यांच्याच घराण्यांत आहे. शतसांवत्सरिक उत्सवाच्या वेळीं हाइडब्रँड यांनीं गरुडाचा एक मोठा दगडी पुतळा करून तो आपल्या घरावर लावला. त्यांचें घर विस्तीर्ण असून त्याची बांधणी एकाद्या जुन्या पद्धतीच्या भुइकोट किल्ल्यासारखी आहे. या किल्ल्याच्या भिंतीवर शिकारीच्या वस्तु जिकडे तिकडे लटकावलेल्या आढळतात. फॉं हाइडब्रँड यांस शिकारीचा अतिशय नाद आहे. यांच्या घरांत अलीकडील पद्धतीचें कोणतेंहि भपकेबाज सामानसुमान आढळून यावयाचें नाहीं. शोभेसाठीं फक्त हाइडब्रँड घराण्यांतील पूर्वपुरुषांचीं चित्रें मात्र त्यांनीं चोहोंकडे लटकाविली आहेत. या ठिकाणीं त्यांचा बहुतेक वेळ पूर्ण विश्रांतींत जातो. ते देशाच्या राजकीय कारभारांत मन घालतात; तथापि आपले घोडे, आपलीं औतें आणि आपल्या जमिनी हींच त्यांस फार प्रिय आहेत.

फॉं हाइडब्रँड हे स्वभावानें साधे गृहस्थ आहेत. दुसऱ्यावर वरपगडा बसविण्याची उत्सुकता त्यांस मुळींच नाहीं. तथापि ते निर्भय अंतःकरणाचे व करारी बाण्याचे असल्यामुळें लोकांवर त्यांचा पगडा आपोआपच बसतो. हे कायद्याची परीक्षा पास झाले आहेत व सार्वजनिक कामांत गेलीं पंचवीस वर्षें त्यांनीं खर्च केलीं आहेत. प्रशियाच्या ज्या भागानें आजपर्यंत मोठे राज्यकर्ते, प्रचंड वीर आणि धुरंधर मुत्सद्दी निर्माण केले, त्याच भागांत यांचा जन्म झाला असल्यामुळें साम्राज्याची भवितव्यता सारी आपल्याच शिरावर आहे, असें त्यांस मनःपूर्वक वाटतें. बिस्मार्क हे त्याच भागांत निर्माण झाले. असिधाराव्रताबद्दल बिस्मार्क यांची प्रसिद्धि आहे व हेंच व्रत त्यांच्या या प्रांतस्थ मंडळींनीं अद्यापिहि तसेंच पुढें चालविलें आहे, याची साक्ष हाइडब्रँड यांच्या चरित्रांत दिसून येते.

# मार्शल फॉं बायबरस्टीन.

जर्मनीचें आरमारी सामर्थ्य वाढत चाललें, तेव्हां युरोपांतील एकंदर राष्ट्रांपैकीं त्याचा संबंध इंग्लंडशीं वारंवार येणार, ही गोष्ट निश्चित झाल्यासारखीच होती. अशा प्रसंगीं दुसऱ्या वुइलियम बादशहानें साम्राज्यांतील पहिल्या प्रतीच्या मुत्सद्यास परराष्ट्रीय नीतीचीं सूत्रें आपल्या हातीं घेण्यास सांगावें हेंहि ओघालाच आलें. ब्यारन मार्शल फॉं बायबरस्टीन हे १९१२ सालच्या वसंतांत जर्मनीचे वकील या नात्यानें इंग्लंडांत आले. इंग्लंड व जर्मनी यांजमधील हितसंबंधांत आढळून येणारा विरोध दूर करण्याचें अत्यंत कष्टप्रद काम यांच्या वाट्यास आलें होतें; पण या कार्याचीं पुरीशीं सूत्रें त्यांच्या हातीं येण्यापूर्वीच ते परलोकवासी झाले; पण मरणापूर्वीं जर्मन साम्राज्याचें जेवढें हित त्यानीं साधलें, तेवढ्यानेंच त्यांचें महत्त्व जर्मन साम्राज्याच्या इतिहासांत कायम टिकेल. तुर्कांची युरोपांतील सत्ता नष्ट झाली; तथापि आशियामायनरमध्यें जें कायमचें महत्त्व बायबरस्टीन यांनीं जर्मनीस मिळवून दिलें, तेंच त्यांचें चिरकालीन स्मारक राहील. " आनाटोनिया प्रांतांत जर्मनीचे अत्यंत महत्त्वाचे हितसंबंध गुंतले आहेत व या प्रांतावर आज किंवा यापुढें झडप घालण्यास कोणीहि समर्थ होणार नाहीं. " असे उद्गार ब्यारन फॉं व्यांगेनहीम यांनीं काढले. व्यांगेनहीम हे कान्स्टांटीनोपल येथें जर्मन साम्राज्याचे वकील या नात्यानें रहात आहेत. आनाटोनिया प्रांतांत दुसऱ्या कोणाचाहि प्रवेश होऊं नये, याकरतां जर्मन बादशहाचें लष्कर आपल्या संगिनीसह तेथें कधीं काळीं सज्ज झाल्याचें दिसलें, तर त्या प्रांतांतील जर्मनीचें एवढें महत्त्व उत्पन्न होण्यास मार्शल फॉं बायबरस्टीन यांची मुत्सद्देगिरीच कारण झाली आहे, ही गोष्ट जर्मन साम्राज्य विसरणार नाहीं.

फॉं बायबरस्टीन हे शरीरानें धिप्पाड व मजबूत असून त्यांस थोडेसें पोंक आलें होतें. त्यांच्या बुद्धिमत्तेचें तेज त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटलेलें दिसत असे. ते पहिल्या प्रतीचे हजर-जबाबी व विलक्षण निधड्या छातीचे होते. त्यांची वागणुकीची तऱ्हाहि असामान्य कोटींतील होती.

अघळपघळ भाषण करतां करतांच प्रसंग पडला, तर आपलें तोंड घट्ट मिटून घेण्याची विलक्षण कला त्यांस पूर्णपणें साध्य झाली होती. प्रसंग पडेल त्याप्रमाणें आपल्या वर्तणुकीचा रोंख एकदम कसा बदलावा, हें ते जाणून होते. जर्मनराष्ट्र हें साऱ्या जगांतील पहिल्या प्रतीचें राष्ट्र होणार आहे, व असें होण्याचा यत्न कोणत्याहि मार्गानें जर्मन राष्ट्रानें करणें योग्य आहे, असें त्यांचें ठाम मत होतें. एवंगुणविशिष्ट मुत्सद्यावर ब्रिटनचा स्नेह संपादण्याचें कार्य दुसऱ्या बुइलियम बादशहानें सोंपाविलें होतें. बोअर युद्ध सुरू होण्याच्या पूर्वी प्रेसिडेंट क्रूगर यांस दुसऱ्या बुइलियम बादशहांनीं एका विशेष प्रसंगीं एक अभिनंदनपर तार पाठविली होती. यामुळें सर्व युरोपभर व विशेषतः इंग्लंडमध्यें मोठी खळबळ उडून गेली होती. ती गोष्ट तत्कालीन इतिहासांत प्रसिद्धच आहे. अशा प्रकारची तार पाठविण्यास बादशहास बायबरस्टीन यांनीं प्रोत्साहन दिलें, अशी आफवा त्या वेळीं लोकांत पसरली होती. अशा रीतीनें इंग्लंडशीं उघडपणें शत्रुत्व दाखविणाऱ्या बायबरस्टीन यांस इंग्लंडशीं सलोखा करण्याच्या कामावर बादशहांनीं नेमिलें आहे, असा गवगवा साऱ्या जर्मनीभर झाला. या तारेच्या प्रकरणांत आपलें मुळींच अंग नव्हतें, असें बायबरस्टीन म्हणत असत. इंग्लंडांतील लोकमत या वेळीं जर्मनीविरुद्ध अतिशय खवळून गेलें होतें. अशा वेळीं आपला मोठा धुरंधर मुत्सद्दी तेथें पाठवून या दोन राष्ट्रांत सख्य जोडण्याचा उपक्रम आणखी एकवार करून पाहण्याचा यत्न बुइलियम बादशहांनीं केला असावा. मार्शल बायबरस्टीन यांसहि ही नेमणूक फार पसंत पडली. हें काम अत्यंत अवघड होतें, ही गोष्ट ते जाणून होते; पण अवघड कामास हात घालण्यांत ते सदोदितच उत्सुक असल्यामुळें ही कामगिरी त्यांनीं मोठ्या संतोषानें पत्करली. कान्स्टन्टिनोपल येथील कामगिरी त्यांनीं सोडली, त्या वेळीं केलेल्या एका भाषणांत "जर्मनसाम्राज्याच्या अवघड कामाकरतांच हा देह वाहिलेला आहे," असे स्पष्ट उद्गार त्यांनीं काढले. या प्रयत्नांत बायबरस्टीनसारख्या अस्सल मुत्सद्यांस अपयश आलें असतें, तर या परस्पर राष्ट्रांत स्नेहभाव जडणें अशक्य कोटींतील आहे, असेंच साऱ्या जर्मनीनें म्हटलें असतें.

आपल्या सरकाराकडून हुकूम होतील त्याप्रमाणें नुसतें इकडून तिकडे करावयाचें, एवढेंच परराष्ट्रीय वकिलांचें काम आहे, असें बिस्मार्क म्हणत असत; पण हें तत्त्व ब्यारनमार्शल यांस मुळींच लागू नव्हतें. केवळ असलें निरोप्याचें काम करावें, यासाठीं त्यांचा जन्मच नव्हता. कोणतेंहि राजकाज स्वतः शिरावर घेऊन आपल्या जबाबदारीवर तें पार पाडण्यास लागणारी स्वतंत्र बुद्धि व हिंमत यांचा भरपूर पुरवठा बायबरस्टीन यांजजवळ होता. परदेशांतील एकाद्या राजकारणांत स्वतंत्रपणें प्रथम कामगिरी करावयाची आणि तिचा रिपोर्ट मागाहून करावयाचा असा त्यांचा परिपाठ होता. प्रत्येक गोष्टींत "हुकुमासाठीं" वरिष्ठांच्या तोंडाकडे पाहण्याची संवय त्यांस कधींच नव्हती.

ते जन्मसिद्ध मुत्सद्दी होते. (Real poïtker) असा त्यांचा लौकिक साऱ्या जर्मनसाम्राज्यभर पसरला होता. प्रत्यक्ष वस्तुस्थिति सोडून केवळ उच्च कल्पनांच्या मागें पळत सुटण्याची संवय त्यांस नव्हती. प्रत्यक्ष व्यवहार कोणत्या तत्त्वावर चालतो, हें लक्षांत ठेवूनच तदनुसार ते वागणूक करीत असत. जर्मनीला काय हवें आहे, हें त्यांच्या मुखानें एकवार इंग्लंडला समजलें असतें, म्हणजे या दोन देशांत जीं पुष्कळशीं निरर्थक कागदीं घोडीं नाचतात, तीं नाचलीं नसतीं, आणि परस्पर मुत्सद्यांतील नुसत्या पवित्र्यांच्या भाषणांचा पाऊसहि थांबला असता. आपणास काय हवें आहे, तें शक्य तितक्या स्पष्ट शब्दांनीं सांगावें, अशी बायबरस्टीन यांची चाल असे. आपल्या स्पष्टोक्तीनें कोणाचा मनोभंग झाला, तरी त्याचीहि ते पर्वा करीत नसत; पण यामुळें त्यांच्याशीं व्यवहार करणारास द्विरुक्तीचा व निरर्थक घोटाळ्यांत पडण्याचा प्रसंग सहसा येत नसे. हेग परिषदेच्या एका सभेच्या प्रसंगीं बायबरस्टीन जर्मनीतर्फें हजर होते. तेव्हां लष्करी व आरमारी वाढींत जर्मनी कधींहि मागें घेणार नाहीं, असे स्पष्ट उद्गार त्यांनीं काढले. साम्राज्याची वाढ होणें जर्मनीस अत्यंत आवश्यक आहे, या मतास त्यांची पूर्ण मान्यता होती. या दिशेनें साम्राज्याचें पाऊल पुढें पडण्यासाठीं १५ वर्षें त्यांनीं स्वतः कसून मेहनत केली. आशियामायनर व तुर्कस्थान यांमध्यें जर्मनीचें

वर्चस्व होऊन त्या द्वारें जर्मनीच्या व्यापाराला इराणच्या उपसागरांत मुक्तद्वार मिळावें, ही जर्मनसाम्राज्याची महत्त्वाकांक्षा सरकारीरीत्या उघडपणें प्रसिद्ध झाली नसली, तरी ती जर्मनसाम्राज्याच्या मनांत कायमची आहे, हें सर्वांस ठाऊक आहेच. बगदाद रेलवेच्या द्वारें जर्मनसाम्राज्यानें आपलें पाऊल या दिशेनें हळूच पुढें सरकाविलें आहे. जर्मनीची महत्त्वाकांक्षा पुरी करण्यासाठीं जे लोक धडपडत आहेत व होते, त्यांतच बायबरस्टीन यांची गणना प्रमुखत्वानें केली पाहिजे. ब्रिटिश राजकारणाचा जेथें जेथें संबंध आला, तेथें तेथें त्यांनीं ब्रिटिश हितसंबंधाविरुद्ध वर्तन केलें आहे. ब्रिटिश हितसंबंधाशीं विरोध करणें, हा त्यांचा ठरीव कार्यक्रम झाला होता. दक्षिण आफ्रिका, हेग आणि तुर्कस्थान या सार्‍या ठिकाणीं त्यांची ही मनःप्रवृत्ति उघड झाली होती.

सुप्रसिद्ध 'क्रूगरतार' त्यांनीं स्वहस्तें लिहिली नसली, तरी बादशहास त्यांनीं या कामीं प्रोत्साहन दिलें, असें त्या वेळच्या एकंदर परिस्थितीवरून उघड झालें आहे. दक्षिण आफ्रिकेंतील बोअर संस्थानें स्वतंत्र असण्यांतच जर्मनसाम्राज्याचें हित आहे, अशा अर्थाचें एक अनावृत्त पत्र त्या वेळीं युरोपांतील सर्व राष्ट्राकडे पाठविण्यांत आलें होतें. हें पत्रहि बायबरस्टीन यांच्या हातचेंच असावें, अशी पुष्कळांची खात्री झाली होती. दक्षिण आफ्रिकेंतील जेमिसन बंडाची समाप्ति झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं वुइलियम बादशहांनीं आपल्या मुत्सद्यांचें एक कौन्सिल भरविलें. त्या वेळीं बादशहास सल्ला देण्यासाठीं मुख्य प्रधान प्रिन्स होहेनलो, परराष्ट्रीय प्रधान ब्यारनमार्शल व आरमारी चिटणीस ॲडमिरल हॉलमन् हे परराष्ट्र कचेरींत जमले. क्रूगरतारेचा मसुदा मेजावर समोरच पडला होता. अशा प्रकारें तार पाठविण्याच्या बाबींत खुद्द बादशहा अगदीं विरुद्ध होते; पण ही तार पाठविलीच पाहिजे, असें मार्शल ह्मणाले. या वेळीं अशी तार पाठविणें आपल्या भावी कार्यास साधक असून जर्मन जनतेलाहि त्यामुळें संतोष होईल, असें मार्शल म्हणूं लागले. अखेरीस बादशहांनीं ही तार पाठविण्यास संमति दिली; तथापि त्या तारेच्या मूळच्या मसुद्यांतहि त्यांनीं बरीच फिरवाफिरव केली. दक्षिण-

आफ्रिकेंतील ब्रिटिश हितसंबंध हाणून पाडावेत, अशा मताचे जे कांहीं मुत्सद्दी युरोपांत होते, त्यांत ब्यारन मार्शल हे अगदीं प्रमुख होत.

परराष्ट्रीय चिटणीसाच्या जागीं ते काम करीत असतां, त्यांच्या अमदानींत इंग्लंड व जर्मनी यांजमधील संबंध विकोपास जाण्याच्या पंथास लागला होता. यानंतर थोड्याच दिवसांनीं तुर्कस्थानांतील वकिलाच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. ही जागा पत्करण्यांत तुर्कस्थानांतील ब्रिटिशहितसंबंधास विरोध करावा हाच त्यांचा हेतु होता. हा त्यांचा हेतु किती उत्तम प्रकारें तडीस गेला, ही गोष्ट तत्कालीन इतिहासज्ञास अवगतच आहे. कान्स्टान्टिनोपल येथें जर्मनीस जें वर्चस्व प्राप्त झालें, त्यास ब्यारन-मार्शल यांचेच श्रम कारणीभूत आहेत, असा सर्वांचा समज आहे. तथापि ही गोष्ट सर्वथा खरी नाहीं. या गोष्टीचा मूळपाया कान्स्टा-न्टिनोपल येथें तत्पूर्वीं कित्येक वर्षें रोवण्यांत आला होता. ब्यारन-मार्शल तेथें जाण्यापूर्वीं खुद्द बादशहांनीं तेथें प्रवास केला होता. प्याले-स्टाइन प्रांतांत यात्रेस जातांना वाटेंत सुलतान अबदूल हमीद यांची भेट घेण्यास वुइलियम बादशहा विसरले नव्हते. कान्स्टान्टिनोपल येथें जर्मन बादशहांनीं आपल्या वर्चस्वाची मुहूर्तमेढ अशा रीतीनें पूर्वींच रोवून ठेवली होती. बादशहांनीं स्वहस्तें पेरलेल्या या बीजाला पाणी घालण्याचें काम मात्र ब्यारनमार्शल यांनीं केलें.

जर्मनीच्या महत्त्वाकांक्षेस बाधक होईल, असा एक शब्दहि सुलतानानें आपल्या तोंडून बाहेर काढूं नये इतक्या गुलामगिरीच्या स्थितीस सुलतानाला आणून सोडण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला. परकीयराष्ट्रांच्या राजधानींत वकील या नात्यानें कराव्या लागणाऱ्या भानगडींची विद्या ब्यारनमार्शल यांस या वेळीं अवगत नव्हती. परराष्ट्रीय वकिलाचें काम हा वेळपर्यंत त्यांनीं कधींच केलें नव्हतें; तथापि थोड्याच महिन्यांच्या अवधींत ही विद्या त्यानीं पूर्णपणें साध्य करून घेतली. परराष्ट्रीय खात्यांत व एकंदरीनें तुर्कस्थानच्या राज्यकारभारांत थोड्याच दिवसांत त्यांनीं आपलें वजन पक्कें बसाविलें. कोणत्याहि तुर्काची अथवा परकीय मुत्सद्याची मात्रा त्यांच्यापुढें चालेनाशी झाली. सुलतानानें त्यांस उघडपणें वजिरी दिली

नव्हती इतकेंच. बाकी वस्तुतः वजिराचे सर्व अधिकार त्यांनीं आपल्या हातीं घेतले होते. तुर्कस्थानांतील जर्मनीच्या वजनास आळा घालणारा तेथें कोणीहि उरला नाहीं. मार्शल बायबरस्टीन हे सर्व समर्थ आहेत, असें सामान्य प्रजाजनांसहि वाटूं लागलें. या आपल्या वजनाचा पूर्ण फायदा त्यांनीं करून घेतला. जर्मनीच्या फायद्याकरतां प्रसंगीं दडपशाही करण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. आस्ट्रियानें तुर्कांचा बास्नीया प्रांत खाल्ला, त्या वेळीं तुर्की जनतेचीं मनें आस्ट्रियाविरुद्ध खवळून गेलीं होतीं. त्या वेळीं एका जर्मन गलबतांतून माल बाहेर काढण्याचें मजुरांनीं नाकारलें. त्या आगबोटीच्या कतानानें बायबरस्टीन यांची भेट घेऊन हा संप मोडण्यास त्यांची मदत मागितली. बायबरस्टीन स्वतः बंदरावर गेले आणि त्यांनीं एक वेळ ओरडून हांक मारल्याबरोबर मजुरांचा सारा घोळका चकार शब्दहि न काढतां निमुटपणें कामावर हजर झाला.

सुलतान अबदूल हमीद यांच्या कारकिर्दींत मार्शल यांनींच सारा सुलतानी अम्मल गाजविला. पुढें थोड्याच दिवसांनीं सुलतान अबदूल हमीद पदच्युत होऊन तरुण तुर्कांच्या अम्मलास सुरुवात झाली. सुलतान अबदूल हमीद यांजबरोबरच मार्शल यांचें व त्यांच्या द्वारें जर्मनीचें वजन संपुष्टांत येणार, असें सर्वांस वाटूं लागलें, पण वारा येईल तशी पाठ फिरविण्याची विद्या ब्यारन बायबरस्टीन यांस कशी करतलमलवत् होती, ही गोष्ट लोकांस ठाऊक नव्हती. सुलतानवर आपलें वजन बसविण्यास ज्या युक्त्यांचा उपयोग त्यांनीं केला होता, त्या सर्व टाकून देऊन त्यांनीं नवीच पद्धत स्वीकारली. प्रथम ते कांहीं दिवस अगदीं स्वस्थ बसून राहिले. नव्या राज्यपद्धतीला स्थिरता येईपर्यंत त्यांनीं कांहींच हालचाल केली नाहीं. पुढें तरुण तुर्कांपैकीं कांहीं लोक सल्लामसलतीसाठीं त्यांच्या-कडे जाऊं लागले; तेव्हां या संधीचा फायदा घेऊन तरुण तुर्कांवर आपला अम्मल बसविण्यास त्यांनीं सुरुवात केली. सुलतान अबदूल हमीदची राज्यपद्धति शुद्ध एकतंत्री असल्यामुळें त्यांच्याशीं संबंध ठेवणें आपणांस आवडत नसतांहि केवळ जरूरीमुळें प्राप्त झालें, असें ते म्हणूं लागले; पण तुर्कस्थानांत ज्या अर्थीं नव्या सनदशीर राज्य पद्धतीस

सुरुवात झाली आहे, त्या अर्थी त्यांच्याहि सेवेला आपण आनंदानें हजर राहूं, असें त्यांनीं तरुण तुर्कांस सांगितलें. अबदूल हमीदच्या कारकिर्दींत त्यांनीं गाजविलेला सुलतानी अम्मल व बास्नीया आणि त्रिपोली प्रकरणें इतक्या गोष्टी यांच्या कारकिर्दींत तुर्कांच्या मनाविरुद्ध घडल्या असतांहि तुर्कस्थानांतील जर्मनीच्या वजनास धोका आला नाहीं. एवढ्यावरूनच ब्यारन मार्शल यांच्या मुत्सद्देगिरीची परीक्षा होते.

दक्षिण जर्मनींतील बेडन प्रांतांत ब्यारन मार्शल यांचा जन्म झाला. मृत्युसमयीं त्यांचें वय ६९ वर्षांचें होतें. १२ वर्षें सरकारी वकिली केल्यानंतर राजकीय खात्यांत ते शिरले व त्याच वेळीं जर्मन साम्राज्य पार्लमेंटांत त्यांचा प्रवेश झाला. कार्लस्रूहे येथील कोर्टांत त्यांनीं चांगली कीर्ति मिळविली असल्यामुळें बर्लिन येथील सर्व संस्थानांच्या कौन्सीलांतहि बेडन संस्थानचे प्रतिनिधी ह्मणून त्यांची नेमणूक करण्यांत आली. त्या वेळीं फॉं हालस्टीन या नांवाचे एक मुत्सद्दी जर्मन साम्राज्याचीं सूत्रें चालवित होते, हालस्टीन यांचें वजन या वेळीं इतकें होतें कीं, त्यांच्या विरुद्ध जाण्यास कोणाचीहि छाती होत नसे. ब्यारन मार्शल हे हालस्टीनच्या पक्षाला जाऊन मिळाले. यानंतर थोड्याच दिवसांनीं सुप्रसिद्ध बिस्मार्क यांचे चिरंजीव कौंट हरबर्ट बिस्मार्क यांनीं आपल्या परराष्ट्रीय चिटणीशीचा राजीनामा दिल्यानंतर त्या जागीं बायबर स्टीन यांची योजना हर फॉं हालस्टीन यांनीं केली.

केवळ वकिलीचा धंदा करणाऱ्या व परराष्ट्रीय संबंधांत नवाशिक्या असलेल्या अशा मनुष्याची योजना एवढ्या महत्त्वाच्या जागीं हालस्टीन यांनीं केली, ही गोष्ट बऱ्याचशा धंदेवाल्या मुत्सद्यांना आवडली नाहीं. तशांत परराष्ट्रीय खात्याला ही वेळहि मोठी आणीबाणीची होती. खात्यांतले बरेच अंतस्थ घोटाळे या वेळीं बाहेर आले. कांहीं प्रकरणें कोर्टांत गेलीं. पुष्कळशीं कृष्णकृत्यें उघडकीस आलीं आणि कांहीं प्रकरणें तर प्रत्यक्ष हातघाईस आलीं. या साऱ्या भानगडींतून बायबरस्टीन अगदींच कोरे बाहेर पडले नसले, तरी बऱ्याच अंशीं या वेळीं त्यांनीं आपली कीर्ति सांभाळली, यांत मात्र शंका नाहीं. यांच्या कारकिर्दींत

ऑस्ट्रिया, इटली व जर्मनी यांच्या तिरंगी संधीस नव जीवन मिळालें. चीन–जपान युद्धानंतर जपानला दपटशा देण्यास रशिया फ्रान्स व जर्मनी हे यांच्याच अमदानींत एकत्र झाले. पूर्व वयांत त्यांनीं केलेलेल्या वकीलीचा त्यांस या वेळीं चांगला उपयोग झाला. पार्लमेंटांतील वादविवादांत प्रतिपक्षास आपल्या वक्तृत्वानें चीत करून टाकण्यांत त्यांचा हातखंडा होता. १८९७ सालीं परराष्ट्रीय चिटणिशीचा राजीनामा त्यांनीं दिल्यानंतर बादशाहांनीं त्यांची नेमणूक कान्स्टांन्टीनोपल येथें केली.

ब्यारन मार्शल शरीरयष्टीनें उंच व बांध्यानें धिप्पाड होते. ते फार मितभाषी असत; तथापि त्यांच्या भाषणांत उग्रता केव्हांहि आढळून आली नाहीं. त्यांचा स्वभावहि फार शांत असून वागणूक फार सभ्य असे. त्यांना इंग्रजी भाषेचें उत्कृष्ट ज्ञान असून त्या भाषेत त्यांचें वक्तृत्वहि अस्खलित चालत असे. फ्रेंच भाषा त्यांस साधारण बोलतां येत होती. ते हिंडलबर्ग विश्वविद्यालयाचे पदवीधर होते. सहा फुटांहून अधिक उंची आणि तिला योग्य अशी रुंदी अशी जोड त्यांच्या ठिकाणीं एकवटल्यामुळें केवळ बाह्य दृष्टीनें पाहणारासहि त्यांच्या शापादपि शरादपि स्वभावाची तावडतोब ओळख पटत असे. चालतांना थोडें पोंक काढण्याची त्यांस संवय होती; पण त्यामुळें ते अशक्त असावे असें कोणासहि वाटलें नाहीं.

बुद्धिबळांचा त्यांस मोठा शोक होता. तसेंच संगीत आणि बागाइत या कलांचाहि त्यांना फार नाद असे. रिकाम्या वेळीं ते बहुधा बुद्धिबळें खेळतांना आढळत. अशा वेळीं एकादा खेळगडी न मिळाला, तर सुप्रसिद्ध कवि व तंतकार विहोव्हन् याचें एकादें गाणें पियानोवर छेडीत बसलेले ते असावयाचे. बास्फरस नदीच्या कांठीं असलेल्या जर्मन वकिलातीच्या भोंवतीं गुलाबांचा सुंदर बगीच्या त्यांनीं तयार केला होता व साऱ्या फुलझाडांची निगा ते स्वहस्तें राखीत असत.

ब्यारन मार्शल यांस अनुकूल वेळींच मृत्यु आला असें म्हटलें पाहिजे. तुर्की साम्राज्यावर त्यांचें एक प्रकारचें प्रेम जडलें होतें. अधिक काळ ते जगले असते, तर बाल्कन युद्धांत झालेली तुर्की साम्राज्याची वाताहत

पाहून त्यांस मरणप्राय दुःख झालें असतें, यांत शंका नाहीं. तुर्की साम्राज्य बलवान व्हावें, एतदर्थ त्यांनीं पुष्कळ खटपट केली होती, व या खटपटीस बरेंच यश आलें असावें, असा त्यांचा समज होता. त्यांच्या अखेरच्या दिवसांत हा समज खोटा पडल्याचें त्यांस आढळून आलें असतें, तर त्यांच्या हृदयास पीळ पडल्यावांचून राहिला नसता. या महद्दुःखांतून ते वांचले, ही परमेश्वराची मोठी कृपाच होय.

## एमील रॅथेनॉ.

कोणीहि प्रवासी जर्मनींत हिंडूं लागला. म्हणजे A.E.G. हीं तीन अक्षरें वारंवार त्याच्या नजरेस पडतात आणि वारंवार तीं कर्णपथावरहि आदळत असतात. कोणतेंहि वर्तमानपत्र त्यानें उघडलें तर तेथें सुद्धां हीं अक्षरें त्याचा पिच्छा सोडीत टाहींत. तसेंच सामान्य संभाषणांतहि त्यांचा उल्लेख वारंवार कानीं येतो. फ्रान्सांत स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या कल्पनांचीं निदर्शक अशीं तीन अक्षरें L.E.F. चोहोंकडे आढळून येत असतात. हीं अक्षरें फ्रान्स देशाचें राष्ट्रीय ध्येय दाखवीत असतात. त्याचप्रमाणें जर्मनींतहि A.E.G. या तीन अक्षरांत असेंच राष्ट्रीय ध्येय सांठविलें आहे कीं, काय, असें एकाद्यास वाटेल; पण या अक्षरांनीं राष्ट्रीय ध्येय दर्शित होत नसलें, तरी तीं जर्मनीच्या एका प्रचंड उद्योगाची साक्ष पटवितात, हें मात्र खरें. जर्मन इलेक्ट्रिक कंपनीच्या जर्मन नांवाचीं हीं आद्याक्षरें आहेत. या कंपनीचें वसतिस्थान बर्लिन येथें आहे; पण तिचे हितसंबंध आणि वजन हीं मात्र साऱ्या जगभर पसरलीं आहेत. तिचे हितसंबंध रशिया, फ्रान्स, आस्ट्रिया, इटली, स्वीडन, स्पेन, स्विट्झर्लंड, तुर्कस्थान, दक्षिण आफ्रिका, अर्जेंटाईन संस्थानें, युराग्वे, चिली आणि डच ईस्ट इंडिज बेटें इतक्या ठिकाणीं पसरले आहेत. खुद्द जर्मन साम्राज्यांत तर लष्कर किंवा आरमार यांसारख्या राष्ट्रीय संस्थांइतकेंच तिचें वजन आहे. जर्मनीची सांप्रत जी कांहीं स्थिति आहे, ती मिळण्यास ही संस्था

सुद्धां बऱ्याच अंशीं कारण झाली आहे. केवळ धंद्याच्या दृष्टीनें पहातां ही संस्था अद्यापि बाल्यावस्थेंतच आहे, असें म्हटलें पाहिजे. क्रपच्या कारखान्याप्रमाणें तिजवरून चार पिढ्यांचा काळ लोटलेला नाहीं. एमील रॅथेनॉ यांनीं ही संस्था केवळ स्वतःच्याच बळावर तीस वर्षांपूर्वी निर्माण केली. त्या वेळीं तिचें एकंदर भांडवल अडीच लक्ष पौंडाचें होतें. आज तेंच वीस कोट पौंडाचें झालें आहे. १८७१ सालीं फ्रान्सला पादाक्रांत केल्यानंतर जर्मनीनें त्याजपासून बरोबर इतकीच रक्कम खंडणीदाखल घेतली होती.

हॅंबर्ग येथील बॉलिनप्रमाणेंच रॅथेनॉ हे जातीनें यहुदी असून बॉलिन-सारखेच केवळ स्वतःच्या बुद्धिबळानें ते इतक्या वैभवास चढले आहेत. जर्मनीच्या व्यापारी साम्राज्यांतील बॉलिन, थायसेन, आणि रॅथेनॉ हे तीन महाराजे होत. अत्यंत जरूरीच्या वेळीं योग्य मनुष्य पैदा करणें हा जर्मन राष्ट्राचा उपजत गुण दिसतो. जर्मन संस्थानें विस्कळित असून परस्परांच्या भांडणांनीं परक्यांच्या भक्ष्यस्थानीं पडण्याच्या बेतांत आलीं होतीं. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं बिस्मार्क यांचा जन्म झाला. बिस्मार्क यांनीं या घोंटाळ्यांतून मजबूत व सुबद्ध असें जर्मन साम्राज्य निर्माण केलें. केवळ पंचवीस वर्षांच्या अवधींत त्यांनीं एवढी अजब मुत्सद्देगिरी दाखविली, कीं जर्मन साम्राज्याच्या संघटनेच्या बाबतींत एकहि काम करावयाचें त्यांनीं शिल्लक ठेवलें नाहीं. साम्राज्य घटनेनंतर मुत्सद्देगिरीची जरूरच तेथें उरली नाहीं; पण या वेळीं व्यापारी दृष्ट्या धोरणी माणसांची वाण भासूं लागली होती. अर्थशास्त्रदृष्ट्या विस्कळित असलेल्या जर्मनीस सुसंघटित व्यापारी साम्राज्याचें रूप प्राप्त करून देणारीं माणसें या वेळीं हवीं होतीं. जर्मन साम्राज्याची बुद्धिमत्ता या वेळीं आपोआप व्यापाराकडे वळली. राजकीयदृष्ट्या देशाला सुव्यवस्था अगोदरच प्राप्त झाली असल्यामुळें देशांतील बुद्धिमत्तेचा सारा ओघ व्यापाराकडे सहजगत्या वळला. त्यामुळेंच सांप्रत जर्मनींत मुत्सद्देगिरी कमी प्रमाणावर दिसत असून व्यापारी वर्गांत अलोट बुद्धिमान पुरुष पुष्कळ निपजत आहेत. बिस्मार्क यांनीं मुत्सद्देगिरीचें कारणच उरविलें नसल्यामुळें त्यांच्या मागें

महत्वाचा मुत्सद्दीहि निर्माण झाला नाहीं. व्यापारी दृष्ट्या जर्मन देश त्या वेळीं फारच हीन स्थितींत असून मागासलेला होता. मोठ्या प्रमाणावर चाललेला असा एकहि धंदा देशांत नव्हता. असल्या प्रकारच्या अशुद्ध स्थितींतील द्रव्यापासून सुसंघटित व्यापारी साम्राज्य जर्मनींतील बुद्धिमान पुरुषांस निर्माण करावयाचें होतें. जर्मनीचा व्यापार बहुतांशीं अमेरिकेच्या हातांत होता. अमेरिकेसारख्या अनेक साधनांनीं सुसंपन्न असलेल्या देशाशीं टक्कर मारण्याचें अवघड काम त्यांच्या शिरावर पडलें होतें. आपल्या संघटनाचातुर्यानें, शास्त्रीय शोधांनीं, निधड्या छातीनें, आणि अविरत परिश्रमानें त्यांनीं ही गोष्ट साध्य केली.

व्यापारधंद्याच्या बाबतींत जर्मनीला आज जें एवढें वैभव प्राप्त झालें आहे, त्यांत एमील रॅथेनॉ हे एक प्रमुख वाटेकरी आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ध्वनिवाहक यंत्र आणि विद्युद्दीप यांची योजना जर्मनींत प्रथम त्यांनींच केली. वीज निर्माण करण्याचा कारखाना जर्मनींत त्यांनींच प्रथम स्थापन केला. कारखान्यांत विजेचा उपयोग करण्यास प्रथम त्यांनींच प्रोत्साहन दिलें. विजेच्या शक्तीनें ट्रॅमगाड्या चालविणें त्यांनींच प्रथम शक्य केलें. विद्युच्छक्तीचे निरनिराळे अनंत उपयोग त्यांनीं शोधून काढले आणि ते व्यवहार्य करण्याकरितां अनेक विद्युद्यंत्रेंहि त्यांनीं निर्माण केलीं. आपण पुढें जो कांहीं जिन्नस तयार करणार, त्यासाठीं लोकांत आगाऊ मागणी निर्माण कशी करावी, हें शास्त्र त्यांनीं प्रथम निर्माण केलें. तसेंच आपले जिन्नस गरीब लोकांना सवलतीनें देण्याची पद्धतहि त्यांनीं नवीनच सुरू केली. अशा रीतीनें इंजिनियर, व्यापारी, कारखानदार आणि सावकार इतक्यांचे धंदे जणू त्यांनीं एकवटूनच टाकले. रॅथेनॉ यांनीं केलेल्या कर्तबगारीचें सामान्य वर्णन अशा रीतीनें दहापाच ओळींत करतां आलें, तरी त्यांच्या काळानंतर त्यांनीं आपल्या उद्योगांनीं जर्मनींत जो नवा व्यापारी मनु निर्माण केला, त्याचें यथार्थ वर्णन विश्वकोशाएवढा ग्रंथ लिहूनहि होणार नाहीं.

रॅथेनॉ यांचा जन्म बर्लिन येथें झाला. या कुटुंबाची वस्ती पूर्वींच्या एक दोन पिढ्या बर्लिन येथेंच होती. आरंभींचीं त्यांची कांहीं वर्षें

कोणत्याहि एकाच धंद्यांत गेलीं नाहींत. आपल्या वयाच्या सुमारें १५ व्या वर्षी सायलेशिया प्रांतांतील एका लोखंडी कारखान्यांत ते शिक्षणासाठीं उमेदवार म्हणून राहिले. या ठिकाणीं त्यांचीं चार वर्षे गेलीं. यानंतर कांहीं नातेवाइकांकडून त्यास सुमारें ७५० पौंडांचा वारसा मिळाला. ही रक्कम त्यांनीं हॅनोव्हर आणि झुरीच येथील यंत्रपाठशाळेंत शिक्षण घेण्यांत खर्च केली. यन्त्रकलानैपुण्यांत इंग्लंड हें या वेळीं सर्वांच्या आघाडीस होतें. त्यासाठीं इंग्लंडांत यांत्रिक शिक्षण मिळण्याची सोय ते पाहूं लागले, व अखेरीस अगबोटींचीं इंजिनें तयार करणाऱ्या जॉनपेन आणि कंपनी नांवाच्या पेढीच्या ग्रीनिच येथील कारखान्यांत त्यांचा प्रवेश झाला. या कारखान्यांतून बाहेर पडून ते परत स्वदेशीं गेले, त्या वेळीं एक हजार हॉर्स पावरच्या इंजिनचें यांनीं स्वतःच्या कल्पनांनीं तयार केलेलें एक रेखाचित्र मात्र त्यांजपाशीं होतें. स्वदेशीं परत आल्यानंतर थोड्याच वेळांनीं त्यांनीं एक लोखंडाचा कारखाना स्वतःच्याच मालकीवर सुरू केला. त्यांजपाशीं द्रव्यसहाय्य भरपूर नव्हतें. किंवा त्यांस उसनवार पैसे देण्यासारखाहि कोणी इसम नव्हता; पण त्यांची महत्त्वाकांक्षा मोठी आणि बेत दांडगे असल्यामुळें या लहानशा कारखान्यानें त्यांच्या चित्ताचें समाधान झालें नाहीं. अखेरीस त्यांनीं हा कारखाना विकून टाकला. या कारखान्याच्या बाबतींत अनुभवावांचून दुसरा कसलाहि फायदा त्यांस झाला नाहीं; पण या वेळीं मिळालेला अनुभव पुढील आयुष्यांत त्यांच्या फार उपयोगी पडला. या वेळीं आलेल्या अनुभवावरून हातांत भांडवल असल्याशिवाय धंद्यांत पाऊल घालावयाचें नाहीं, असा नियम त्यांनीं करून टाकला. आरंभींच्या काळांतील आलेल्या साऱ्या अनुभवांचा फायदा सध्यांच्या धंद्यांत त्यांस मिळत आहे. त्यांनीं आपला पाहिला कारखाना उभारला त्या वेळीं कांहीं पेढ्यांनीं त्यांस पैशाची मदत करण्याचें आश्वासन दिलें होतें; पण त्यांजजकडून वेळेवर पैशाची मदत न झाल्यामुळें त्यांस तो धंदा बंद करणें भाग पडलें.

पाहिला धंदा बंद झाल्यानंतर रॅथेनॉ हे जवळ जवळ दहा वर्षे स्वस्थच होते,

असें म्हटलें असतां चालेल. फ्रँको–प्रशियन युद्ध नुकतेंच संपून गेलें होतें व युद्धामुळें उत्पन्न झालेल्या पैशाच्या अडचणींतून जर्मनी अद्यापि मोकळा झाला नव्हता. युद्धाचे परिणाम साऱ्या धंद्यास थोडे फार जाणवत होते. अशा वेळीं स्वतःच्या डोक्यांतील महत्त्वाकांक्षेस व प्रचंड बेतास वाव मिळणार नाहीं, ही गोष्ट रॅथेनॉ यांच्या लक्षांत आली. त्यांच्या बुद्धीची ही कुशाग्रता आजपर्यंत अनेकवार उघड झाली आहे. परिस्थिति कशी आहे, हें पाहून तदनुरूप आपल्या धंद्याची मांडणी करावयाची कला, त्यांच्या आंगीं पूर्णपणें वसत आहे. अमेरिकेंतील धंद्यास इतकी ऊर्जितावस्था येण्याचें मुख्य कारण त्यांचें यंत्रकला नैपुण्य होय, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली होती. माणसांचे श्रम वांचविणारीं यंत्रें अमेरिकन लोकांनीं निर्माण केल्यामुळेंच साऱ्या धंद्यांत त्यांची एवढी प्रगति झाली, ही गोष्ट त्यांस ठाऊक होती. फ्रँको–प्रशियन युद्धांत फ्रेंचाच्या आठ लक्ष चास्पॉट बंदुका जर्मन लष्करी खात्याच्या हातांत पडल्या होत्या. यांत थोडा फेरबदल करून त्या नव्या घडणीच्या करावयाच्या होत्या. त्या वेळीं अमेरिकन यंत्राच्या सहाय्यानें हें काम आपण एक तृतियांश खर्चांत करूं, असें बोलणें त्यांनीं लष्करी खात्याकडे लावलें; पण अमेरिकन यंत्रावर जर्मनीचा भरंवसा त्या वेळीं नसल्यामुळें हें काम त्यांस मिळालें नाहीं.

१८७६ सालीं फिलाडेलफियां येथें एक शतसांवत्सरिक प्रदर्शन भरलें होतें. हें प्रदर्शन रॅथेनॉ यांनीं पाहिलें. कोणताहि धंदा प्रचंड प्रमाणावर सुरू केल्याखेरीज व्यापारी दृष्ट्या तो फायदेशीर होत नाहीं, ही गोष्ट या प्रदर्शनांत त्यांच्या लक्षांत आली. अमेरिकेंतील प्रत्येक धंद्याचें विशालत्व त्यांच्या चित्तांत तुडुंब भरून राहिलें. विशेषतः या प्रदर्शनांत प्रथमच मांडलेल्या ध्वनिवाहक यंत्राकडे ( टेलिफोन ) त्यांचें लक्ष विशेषच वेधलें. ध्वनिवाहक यंत्रें तयार करण्याची युक्ति जर्मनींत आपल्या हक्काची करावी, असा त्यांचा प्रथम विचार होता; पण तो बदलून बर्लिनमध्यें ध्वनिवाहक यंत्रें स्थापण्याचा हक्क मिळविण्याच्या उद्योगास ते लागले. सरकारी कामगारांनीं त्यांच्या या बेतासहि बरेच अडथळे आणले. ध्वनिवाहकयंत्रांचा उपयोग बर्लिनमध्यें फारकरून कोणी करणार नाहीं, असें ते ह्मणूं लागले;

पण अखेरीस हा हक्क त्यांस मिळून त्यांनीं या यंत्राचा प्रचार सुरू केला; तेव्हां थोड्याच अवधींत सरकारी अधिकाऱ्यांचें ह्मणणें खोटें पडल्याचें उघड दिसून आलें.

१८८१ सालीं पॅरीस येथें एक मोठें विजेचें प्रदर्शन भरलें होतें. अमेरिकेंतील सुप्रसिद्धशोधक एडिसन् यांनीं आपला विजेचा दिवा प्रथम या प्रदर्शनांत मांडला. हा शोध जगांत महत्त्वाची जागा पटकावणार ही गोष्ट रॅथेनॉ यांच्या लक्षांत आली. जर्मनींत विजेचे दिवे तयार करण्याचा हक्क मिळविण्याचा निश्चय त्यांनीं केला आणि या हेतूनें 'जर्मन एडिसन कंपनी' या नांवाची एक व्यापारी मंडळी स्थापन केली. याच मंडळींतून सध्यांची 'जनरल इलेक्ट्रिक कंपनी' नंतर निर्माण झाली.

एडिसन कंपनी स्थापन केल्यावेळेपासून रॅथेनॉ यांची भरभराट होण्यास सुरुवात झाली. एकाहून एक वरचढ असे अनेक उद्योग ते हातीं धरीत गेले आणि त्यांत त्यांस यशहि येत गेलें. एडिसन् कंपनींतून १८८७ सालीं जनरल इलेक्ट्रिक कंपनी निर्माण झाली. मोठ्या प्रमाणावर विद्युतयंत्रें तयार करण्याचा कारखाना त्यांनीं सुरू केला. या वेळीं विद्युद्दीपांचा प्रचार जर्मनींत फारसा झाला नव्हता. खर्चाच्या दृष्टीनें हे दिवे महाग पडत असल्यामुळें चैनी श्रीमंताखेरीज त्यांचा उपयोग फारसा कोणी करीत नसे. ही स्थिति पालटून हे दिवे स्वस्त होऊन गरीबांच्याहि घरीं यांचा प्रवेश होईपर्यंत आपल्या कंपनीस फारसा फायदा होणार नाहीं, असें रॅथेनॉ यांस आढळून आलें. त्यांनीं प्रथम बर्लिन इलेक्ट्रीसिटी वर्क्स या नांवाची वीज उत्पन्न करण्याचा एक कारखाना सुरू करून रस्त्यावर दिवे लावण्याचा हक्क म्युनिसिपालिटीकडून मिळविला. तसेंच रस्त्यांतून तारा घालून विजेचे दिवे लांब अंतरापर्यंत थोड्या खर्चानें मिळण्याची सोय त्यांनीं केली. शहरांत विजेचे दिवे पुरविण्याच्या कारखान्याची आजची किंमत सुमारें साठ लक्ष पौंड आहे. रस्त्यांचा हक्क दिल्याबद्दल १८८९ सालीं बर्लिनच्या शहर म्युनिसिपॅलिटीला या कंपनीकडून साडे सातशें पौंड मिळाले होते. आज सालीना याच हक्काबद्दल त्या कंपनीकडून तीस लक्ष पौंड म्युनिसिपालटीस मिळत आहेत.

विद्युद्दीपांचा प्रसार अशा रीतीनें केल्यानंतर रॅथेनॉ यांचें लक्ष ट्रॅम-गाड्याकडे वळलें. या वेळीं सायमेन्स आणि हॉल्स्क या नांवाची एक जुनी विद्युत् कंपनी होती. लहानसहान कारखाने चालण्यास लागणाऱ्या विद्युत्शक्तीचा पुरवठा ही कंपनी करीत असे. अशा रीतीनें विजेच्या शक्तीचा उपयोग करण्यापेक्षां स्वतःच्याच कारखान्यांत वीज उत्पन्न केल्यास कारखानदारांस ती गोष्ट फायदेशीर होईल, असें रॅथेनॉ यांच्या लक्षांत आलें. तेव्हां या दोन कंपन्यांच्या धंद्यांत चढाओढ होऊं नये म्हणून सायमेन्स कंपनीशीं त्यांनीं एक करार केला. शहारांतून किंवा बाहेरील संस्थानांतून सायमेन्स यांस विजेचा पुरवठा करण्याची मागणी आली, तर त्या धंद्यांत बर्लिन कंपनीनें चढाओढ करूं नये व कोठेंहि विद्युत् उत्पादक कारखाना चालविण्याची मागणी आली तर त्या बाबतींत सायमेन्स कंपनीनें चढाओढ करूं नये. केवळ वरवर पाहणारास हा करार गरीबसा दिसतो; पण धंदा आपणाकडे चालून येतो, कीं नाहीं, याची वाट पहात न बसतां धंद्याकडे चालून जाऊन तो आपलासा करण्याची रॅथेनॉ यांची प्रवृत्ति आहे. या गोष्टीची ओळख सायमेन्स कंपनीस पटली नव्हती. हळू हळू रॅथेनॉ यांची ही पद्धत हटकून यशस्वी होते, असा अनुभव सर्वांस येऊं लागला.

व्यापाराच्या व फडणीशीच्या बाबतींत रॅथेनॉ यांची बुद्धि अचाट आहे, याबद्दल आतां सर्वांची खात्री होऊन चुकली होती. त्यांच्या विजेच्या कंपनीची भरभराट इतक्या झपाट्यानें होऊं लागली कीं, तिच्या वाढत्या धंद्यास लागणारें भांडवल पुरें पाडण्याकरतां नवे नवे मार्ग शोधण्याची जरूर भासू लागली. या भांडवलाच्या उभारणीसाठीं १८९५ सालीं रॅथेनॉ यांनीं झूरीच येथें एक ब्यांक स्थापिली. या ब्यांकेच्या कामाची रूपरेखा अमेरिकन पद्धतीवर त्यांनीं आंखली होती. शक्य तितक्या द्वारांनीं विजेच्या उपयोगाचा प्रसार करून तो व्यापार पूर्णपणें आपल्या हातीं ठेवावयाचा, असा या ब्यांकेचा मूळ उद्देश सांगण्यांत आला होता. यानंतर या मूळ कंपनींतून ज्या अनेक शाखा जर्मनींत व इतर युरोपीय देशांत निर्माण झाल्या, त्यांजवर देखरेख

ठेवण्याकरतां त्यांनीं आणखी दोन ब्यांका स्थापन केल्या. १९०२ सालीं बर्लिनची दुसरी एक विजेची कंपनी त्यांनीं विकत घेतली; तथापि तेवढ्यानेंहि तृती न होतां १९१० सालीं फ्रँकफर्ट आणि मूलहीन येथील समुद्रांतून तारा घालणाऱ्या कंपन्यांचा धंदा त्यांनीं आपल्या कंपनीस जोडला.

एमील रॅथेनॉ यांस त्यांच्या धंद्यांत जें एवढें अपूर्व यश आलें, त्याची मुख्य दोन कारणें आहेत. एक दूरदृष्टि, व दुसरें मागणी उत्पन्न करणें. अमुक एका जिनसाची गरज लोकांस लागेल, कीं नाहीं, याची वाट पहात न बसतां ती आपण उत्पन्न करावयाची; हें यांच्या धंद्यांतील आदितत्त्व होय. विजेचा उपयोग लोकांत वाढत्या प्रमाणावर करून देण्याकरतां त्यांनीं यासंबंधाचे अनेक धंदे हातीं घेतले. वाफेच्या आग-गाड्या बंद होऊन विजेच्या गाड्या सुरू करण्याच्या खटपटींत सध्यां ते आहेत. बर्लिन आणि हँबर्ग यांजमधील रेलवेच्या फांट्यावर विजेच्या गाड्या आपण आपल्या खर्चानें सुरू करतों असें बोलणें, त्यांनीं सरकारा-कडे लावलें आहे. विजेची गाडी बिनधोकपणें तासास सव्वाशें मैल प्रवास करूं शकते, हें सिद्ध करण्याकरतां थोड्या वर्षांपूर्वी त्यांनीं सव्वा लक्ष पौंड पदरचे खर्च केले.

रॅथेनॉ हे मोठे विलक्षण बुद्धिमान् पुरुष आहेत असें नाहीं. केवळ बुद्धीच्या दृष्टीनें पाहतां ते अगदीं सामान्य बुद्धीचे आहेत. गुंतागुंतीचे धंदे त्यांस समजत नाहींत व तसल्या धंद्यांची त्यांस आवडहि नाहीं. जी गोष्ट एकाद्या लहान मुलासहि उघडपणें समजेल, तीच हातीं धराव-याची असा त्यांचा बाणा आहे. कोणतीहि गोष्ट ते इतक्या साध्या खुलाशानें लोकांपुढें मांडतात कीं, त्यांच्या म्हणण्याच्या सयुक्तिकपणाबद्दल लोकांची तावडतोब खात्री पटून लक्षावधि पौंडांचें भांडवल हां हां म्हणतां गोळा होतें. दूरदृष्टि त्यांजपाशीं अपूर्व आहे. आजपासून दहा वर्षांनीं लोकांना कशाची जरूर लागेल, हें त्यांस आज समजतें. आजपर्यंतच्या त्यांच्या साऱ्या यशाच्या मुळाशीं हीच दूरदृष्टि आहे. एमील रॅथेनॉ यांस स्वतःच्या धंद्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची आवड नाहीं. रिकाम्या

वेळांतहि स्वतःच्या धंद्याव्यतिरिक्त दुसऱ्या कसल्याहि गोष्टीचे विचार त्यांच्या चित्तांत येत नाहींत. धंद्याखेरीज त्यांचें लक्ष ओढणारी दुसरी एकच बाब आहे. ती बाब म्हणजे परोपकार. मदतीस योग्य असा कोणीहि इसम त्यांजकडून आजपर्यंत विन्मुख परत गेला नाहीं. रॅथेनॉ यांचें वय सध्यां ७८ वर्षांचें आहे व त्यांची शरीरप्रकृतीहि फारशी चांगली नाहीं; तथापि एवढ्या अवाढव्य धंद्यांतील साऱ्या बाबी ते जातीनिशीं पहात असतात.

## मॅक्स रीनहार्ट.

सुमारें २५ वर्षांपूर्वीं हर आटोब्रॅम या नांवाचा एक प्रसिद्ध जर्मन नाटक मंडळीचा म्यानेजर आपल्या कंपनीला कांहीं पात्रें मिळविण्यासाठीं व्हिएन्नाला गेला होता. त्या वेळीं त्यानें तेथें बरेच प्रयोग पाहिले. त्यापैकीं, एका प्रयोगांत वृद्धाचें सोंग घेतलेल्या एका तरुण नटाकडे त्याचें विशेष लक्ष वेधलें. या तरुण नटाचें नांव मॅक्स रीनहार्ट असें होतें. मॅक्स रीनहार्ट यानें कांहीं काळानंतर स्वतःची एक मंडळी स्थापन करून तो जर्मनींत खेळ करूं लागला. हळु हळू प्रेक्षकावर त्याची छाप बसूं लागली. सध्यां तर सारा जर्मनी तो झुलवीत आहे, असें झटल्यास वावगें होणार नाहीं. त्याला जसे निंदक पुष्कळ आहेत, तसेंच त्याचें अनुकरण करून पुढें येऊं पाहणारेहि पुष्कळ आहेत; पण लोकांवर त्याची जी एकवार छाप बसली, तींत त्यांच्या प्रयत्नांनीं यत्किंचितहि उणीव आली नाहीं. त्याची कीर्ति एकसारखी वाढतच गेली आणि सध्यां केवळ जर्मनींतच नव्हे, तर साऱ्या युरोपभर आणि अमेरिकेंतहि पसरली आहे. लंडन येथें केवळ तीनच प्रयोग करून सारें शहर त्यांनीं हलवून सोडलें. प्यारीस, न्यूयार्क, पेट्रोग्राड ( सेन्टपिटरबर्ग. ) मास्को, व्हिएन्ना, बुडापेस्ट आणि स्टॉकहोम या साऱ्या राजधानींच्या शहरींहि त्यानें मोठे विजय संपादन केले आहेत. विसाव्या शतकांतील प्रमुख नट अशी त्याची कीर्ति साऱ्या युरोपभर पसरली आहे.

कामाची चिकाटी, लीनता, चित्ताची एकाग्रता आणि वाढती महत्त्वाकांक्षा हे रीनहार्ट याचे प्रमुख गुण आहेत. तो एकसारखें इतकें काम करतों कीं, तो सामान्य मनुष्य नसून असामान्य कोटींतील असावा असेंच एकांधास वाटतें. त्याची शरीर यष्टि मजबूत व बांधेसूद असून त्याच्या शरीर सामर्थ्याची खूण तीवरून तावडतोब पटण्यासारखी आहे. या शारीरिक सामर्थ्यालाच मानासिक सामर्थ्याची जोड मिळालेली असल्यामुळें त्याचे गुण उत्तम रीतीनें विकास पावले. त्याच्या पाणीदार चेहऱ्यांतच त्यांचें मानासिक सामर्थ्य व्यक्त होतें. निर्जीव यंत्र ज्याप्रमाणें कित्येक तास एकसारखें काम करतें, त्याप्रमाणें रीनहार्टहि तासांचे तास आपल्या कामांत घालवीत असतो; पण त्या वेळीं सुद्धां तो आपली शांतवृत्ति कधींहि सोडीत नाहीं. कोणत्याहि कारणांनीं त्याला कधीं क्रोध येत नाहीं. बर्लिनमध्यें त्याला शत्रू पुष्कळ आहेत, तथापि त्यांच्यावर चिडल्याचें त्याला कोणी पाहिलें नाहीं. नाटककारांनीं लिहिलेल्या नाटकाच्या तंत्रानें न चालतां रंगभूमीवरील प्रयोगाला तें साजेसें करून घेणें हा रीनहार्ट याच्या नाट्यकलेंतील विशेष होय. अमर-कीर्ति मिळविलेल्या प्राचीन नाटककारांच्या कृतींतहि जरूर ते फेरबदल करण्यास रीनहार्ट चुकत नाहीं. सुप्रसिद्ध नाटकरांच्या कृतीची यामुळें मोडतोड मात्र होतें, असें ह्मणणारेहि बरेच लोक जर्मनींत आहेत आणि मूळ नाटकांत अनेक फेरबदल तो करतो ही गोष्टहि खरी आहे. कोणताहि प्रयोग मग तो एकाद्या आनंदपर्यवसायी नाटकाचा असो कीं, एकाद्या किरकोळ फार्साचा असो, तो बापदाद्यांनीं लावून दिलेल्या रूढीनें न करतां तो स्वतःच्याच पद्धतीनें पुढें मांडण्याचा त्याचा जणूं काय निश्चय आहे. कान आणि डोळे या दोन्ही इंद्रियांचें हक्क रंगभूमीवर सारखेच आहेत, असें त्याचें ह्मणणें आहे. प्राचीन नाटकांचे प्रयोग रंगभूमीवर आणतानाहि त्यांचें स्वरूप नाट्यकलेच्या दृष्टीनें योग्य बनविल्याशिवाय तो ते रंगभूमीवर आणीत नाहीं. या त्याच्या गुणामुळेंच कांहीं अहंमन्य टीकाकारांची त्याजवर गैरमर्जी झाली आहे. प्रयोगाला योग्य स्वरूप देण्याकरतां कित्येक वेळां मुळांतील प्रवेशच्या प्रवेश तो छाटून टाकतो. यामुळें कांहीं जुन्या कवींच्या

अंधभक्तांचें पित्त खवळून जातें तथापि अशा गृहस्थानांहि त्यानें केलेल्या एकाद्या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर प्रत्यक्ष पाहिला ह्मणजे ते आश्चर्यानें थक्क होतात. विंटर्सटेल वगैरे दोन तीन शेक्सपीयरच्या नाटकांचे प्रयोग त्यानें रंगभूमीवर केले, तेव्हां ते पाहून एक टीकाकार पंडित अगदीं भांबावून गेले. शेवटीं त्यांनीं इतकाच अभिप्राय दिला कीं, हे प्रयोग रंगभूमीवर फार उत्कृष्ट वठले; पण हे शेक्सपीयरच्या नाटकाचे प्रयोग झाले नाहींत. सुप्रसिद्ध जर्मन नाटककार शिलर याच्या एका नाटकाचीहि अशीच गोष्ट झाली. गटे यांच्या फॉस्ट या नाटकाचा प्रयोग डशुश थियेटरमध्यें झाला, त्या वेळींहि 'अरे, हा गटे नव्हे' अशी ओरड या टीकाकारांनीं केली; पण टीकाकारांनीं कितीहि ओरड केली, तरी रीनहार्ट हा सारें जग आज झुलवीत आहे, ही गोष्ट मात्र खरी. रीनहार्टच्या नाट्यकलेवर पुष्कळ टीकाकार तुटून पडले आहेत; पण त्यांच्या शिव्यांचा उपयोग ओव्यांसारखा झाला आहे. नाट्यकला ही साहित्याची अथवा नीतितत्त्वांची पोषक असलीच पाहिजे असें नाहीं; हें त्याचें मत तो दिवसें दिवस अधिकाधिक जोरानें लोकापुढें मांडीत आहे. मनुष्याची दानत सुधारावी याच उद्देशानें नाट्यकला आस्तित्वांत आली नाहीं, किंवा रंगभूमीवर येण्यास अपात्र अशा सात्विक प्रमेयांचें लोकापुढें प्रदर्शन करणें, हेंहि नाट्यकलेचें काम नव्हे, असें तो ह्मणतो. दुसऱ्या अनेक कलांप्रमाणें नाट्यहि हीसुद्धां स्वतंत्र कला आहे, असें त्यांचें ठाम मत आहे. आणि केवळ याच मताला अनुसरून सर्व प्रयोग तो रंगभूमीवर आणीत असतो. सृष्टीचें हुबेहूब चित्र डोळ्यापुढें धरणें. हेंच माझ्या रंगभूमीचें कार्य आहे, आणि मानवी चरित्रांत दिसून येणाऱ्या सर्व घडामोडी स्पष्टपणें निदर्शनास आणणें, हें रंगभूमीचें कार्य आहे. दैवाच्या सर्व विचित्र लीला रंगभूमीवर प्रत्यक्षाइतक्याच स्पष्ट रीतीनें प्रगट झाल्या पाहिजेत. दैवाचे दुःखोत्पादक आणि भेसूर प्रकार व अत्युच्च आनंदोत्पादक प्रकार हे सारख्याच उत्कटतेनें प्रकट झाले पाहिजेत. या ठिकाणीं हास्य आणि रूदन हीं एकसारखींच दाखविलीं गेलीं पाहिजेत. 'क्वचित् वीणावाद्यं क्वचिदपि च हाहेति रुदितं' हा

जगांत नित्य घडून येणारा उलट सुलट देखावा, येथेंहि तसाच दिसला पाहिजे. प्रत्यक्ष व्यवहारांतहि सुखदुःखांचा जो परिणाम मानवी मनावर होतो, तोच परिणाम रंगभूमीनेंहि उत्पन्न करून दिला पाहिजे.

वर सांगितलेल्या संहितेस धरूनच रीनहार्ट आपल्या नाटकांचे प्रयोग बसवीत असतो. नाटकांतील सर्व भाग चित्ताकर्षक करण्याकरतां नित्य नव्या योजना शोधून काढण्यांत त्याचें मन सदोदित गुंतलेलें असतें. यासंबंधीं तो स्वस्थ बसून असल्याचें कधींहि आढळून येत नाहीं. कांहीं प्रयोगासाठीं त्यानें फिरत्या रंगभूमीची योजना केली आहे. अर्नेस्ट स्टर्न आणि रोलर या नांवाचे दोन प्रख्यात रंगभूमि लेखक त्यानें आपल्या मदतीस घेतले असून त्यांच्या मदतीनें देखाव्यांचे भाग तो इतके चित्ताकर्षक बनवितो, कीं वस्तुस्थिति आणि रंगभूमि यांतील यत्किंचितहि भेद प्रेक्षकांच्या लक्षांत येत नाहीं. रंगभूमीवर मांडण्याच्या वस्तूंतूनहि प्रतिनिधि वस्तूंचा त्यानें पूर्णपणें निषेध केलेला आहे. पुस्तकें, खुर्च्या, टेबलें, फुलें आणि खिडक्या, दारें वगैरे सुद्धां त्याच्या रंगभूमीवर खरींच मांडलीं जांतात. या ठिकाणीं नाटकी नकली वस्तूंचा विटाळहि तो आपल्या रंगभूमीला होऊं देत नाहीं. एकाद्या काफीपानगृहाचा देखावा त्याच्या रंगभूमीवर आला, तर अस्सल काफीच्या वासानें सारें नाटकगृह दरवळून जातें आणि प्रेक्षकांच्या तोंडासहि पाणी सुटतें. एकाद्या राजमहालाचा देखावा त्याच्या रंगभूमीवर आला, तर एकाद्या खऱ्या राजमहालालाहि आपल्या वैभवानें तो दिपवून टाकील. उलटपक्षी दरिद्रतेचें चित्रहि तिला साजेशा निष्ठुरपणानें आपल्या रंगभूमीवर तो उभें करतो. आपण नाटक पाहिलें नसून प्रत्यक्षाचाच अनुभव घेतला, या भावनेनेंच त्याचा प्रत्येक प्रेक्षक ड्यूश थिएटरांतून बाहेर पडतो.

रंगभूमि सजविण्यासाठीं रीचहार्ट जितकी काळजी घेतो, तितकीच नटांच्या शिक्षणासंबंधानें घेतो. नटांनीं आणि नटींनी केवळ शिकविल्याप्रमाणें यंत्रासारखें वागावें, असा त्याचा हेतु नाहीं. स्वतंत्र कर्तबगारी दाखविण्याचा वाव त्यानें प्रत्येक नटाला ठेवला आहे; तथापि नाटकासाठीं नट असून नटासाठीं नाटकें नाहींत, हें मात्र कोणाहि नटानें विसरूं

नये, अशाबद्दल तो फार सक्त खबरदारी घेत असतो. एकाद्या नटाचें तेज पडावें एवढ्याच उद्देशानें कोणताहि खेळ तो रंगभूमीवर आणीत नाहीं. कोणतेंहि चांगलें नाटक नाट्यकला या दृष्टीनें रंगभूमीवर उत्तम वठावें याकरतां रंगसज्जा आणि नट हीं जितकीं उत्तम तयार करतां येतील, तितकीं करण्यांत यत्किंचितहि कसूर करावयाची नाहीं, असा त्याचा निश्चय आहे. आणि हा निश्चय तो अत्यंत निष्ठुरपणें पाळीत असतो.

नट आणि प्रेक्षक यांचें एकदील तादात्म्य करून देणें हेंच नाट्याचार्याचें अखेरचें साध्य आहे, असें त्यानें एक वेळ बोलून दाखविलें होतें. नट आणि नाट्यवस्तु यांत कोणतीहि उणीव राहिली असता, ती या साध्यांत उणीव आणल्यावांचून रहात नाहीं. रीनहार्टचीं नाटकें रंगभूमीवर येऊं लागलीं, तेव्हां जर्मनींत नव्याच नाट्यमनूचा उदय झाला, असें म्हटलें पाहिजे.

'मेऱ्याकल' या नांवाचा खेळ त्यानें इंग्लंडांत केला, त्या वेळीं सारें इंग्लंड आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन गेलें. नट आणि श्रोता यांचा एकजीव कसा होऊन जातो, हें त्या वेळीं पूर्णपणें लोकांच्या निदर्शनास आलें. आपण केवळ नाटक पहात नसून त्यांतील सर्व भावनांचा व विकारांचा प्रत्यक्ष आपल्या ठिकाणीं अनुभव घेत आहों, असें प्रेक्षकास वाटत होतें. नाटकांत गोंधळलेल्या, आनंदाच्या, दुःखाच्या आणि भीतीच्या भावनाशीं सर्व प्रेक्षकांचें इतकें तादात्म्य होऊन जात असे, कीं नाटक चालू असेपर्यंत त्यांना बाह्य जगाचा विसर पडे. अशा रीतीनें दहा दहा हजार प्रेक्षकासमोर खेळ करून त्यांचें तादात्म्य करावयाचें, अशी रीनहार्ट याची महत्त्वाकांक्षा आहे. अशा रीतीनें सुमारें पांच सहा हजार लोकांसमोर ज्युलियस सीझर तो करणार असून या दृष्टीनें तो सध्यां तें नाटक बसवीत आहे.

बर्लिन येथें येऊन त्यानें 'डूकननेस' या नाटकाचा पहिलाच प्रयोग केला व या पहिल्याच वेळीं त्यानें लोकांवर छाप बसविली. यानंतर 'स्यालोम' या नांवाचें दुसरें नाटक तो रंगभूमीवर आणणार होता; पण सरकारी परीक्षकांनीं तें नापास केल्यामुळें तें रंगभूमीवर आलें नाहीं;

तथापि त्याचा एक खाजगी प्रयोग त्यानें केला व तो फारच उत्कृष्ट वठला. यानंतर कांहीं विद्वानांच्या खटपटीनें या नाटकास परवाना मिळून तें जर्मनींत अत्यंत लोकप्रिय झालें. स्यालोम हें नाटक ऑस्करवाईल्ड नांवाच्या इंग्रज कवीनें लिहिलेलें आहे. यानंतर म्यक्झीन्‌गोरकी नांवाच्या प्रसिद्ध कवीस त्यानें हाताशीं धरलें. त्याच्या 'नाईट असायलम' नाटकाचा प्रयोग त्यानें रंगभूमीवर आणला. या नाटकाचे एकट्या बर्लिन शहरांतच ओळीनें पांचशें प्रयोग झाले. यानंतर शेक्सपियरचीं व विद्यमान कवी बर्नार्ड शा याचीं नाटकें त्यानें रंगभूमीवर आणलीं.

१९०५ सालीं ड्यूश थिएटर त्यानें विकत घेतलें. बारा वर्षांपूर्वी याच थिएटरांत तो पगारदार नट म्हणून नाचत होता. हें थिएटर त्यानें ताब्यांत घेतलें, तेव्हां शेक्सपीयरच्या 'मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकाचा प्रयोग त्यानें प्रथम मालकीच्या हक्कानें पुढें आणला. या मर्चंटचे अनेक प्रयोग जर्मनींत लोकांनीं पाहिले होते; पण या प्रयोगानें शेक्सपियरची जणूं काय नव्यानेंच आपणास ओळख होत आहे, असें लोकांस वाटलें. पुढें थोड्याच दिवसांनीं ड्यूश थिएटरजवळ त्यानें एक लहानसें नवें थिएटर बांधलें. यांत फक्त तीनशें लोक बसण्यापुरतीच जागा असून त्यांत फक्त निवडक विद्वान् प्रेक्षकांसाठींच खेळ होतात. हें थिएटर इंद्रभुवनाप्रमाणें सुंदर व सुखकर आहे. या ठिकाणीं कांहीं निवडक नाटकांचे प्रयोग निवडक माणसासाठींच होतात.

रीनहार्ट याचा तरुण माणसांवर अधिक भरंवसा आहे. धंद्यांत फार वर्षें मुरलेल्या नटास तो आपणाकडे आश्रय देत नाहीं. नाट्यकलेचें शिक्षण तरुणपणींच मिळाल्यास त्या कलेंत नटाची बुद्धि कुशाग्र होते, असा त्याचा अनुभव आहे. त्याचे रंगभूमीवरील सर्व मदतगार त्याजवर जिवापलकिडे प्रेम करणारे आहेत. स्टर्न या नांवाचा गृहस्थ पोषाख आणि रंगभूमीवरील देखावे ही तयार करीत असतो. याचप्रमाणें दुसरेहि अनेक शास्त्रकोविद त्याच्या मदतीस असून या साऱ्यांच्या मदतीनें रंगभूमि तयार करण्याचें काम तो करीत असतो. हीं सर्व माणसें अगदीं तरुण आहेत. मॅक्स रीनहार्ट याला एडमंड या नांवाचा एक भाऊ असून

धंद्याच्या तिजोरीचें काम तो पहात असतो. आपल्या कामांत एडमंड हाहि फार वाकबगार आहे.

रीनहार्ट याला गृहसौख्य फार चांगलें आहे. त्याची पत्नीहि उत्तम नटी असून ती कांहीं खेळांत काम करीत असते. त्याला पोहण्याचा फार नाद आहे व फावल्या वेळीं वाचनाचाहि शोक आहे. त्याचा स्वभाव अगदीं साधा व निगर्वी असून कोणाहि प्रेक्षकाशीं तो मोठ्या प्रेमानें बोलत असतांना आढळून येतो.

---

## पोस्याडोस्की.

जर्मन पार्लमेंटांत लहान मोठे मिळून एकंदर चवदा तट आहेत. या पार्लमेंटांत एका सरदार घराण्यांतील शुभ्रदाढीचे एक वृध गृहस्थ बसत असतात. वर सांगितलेल्या चवदा तटांपैकीं ते आपणास कोणत्याहि एका तटाचें ह्मणवीत नाहींत. अमुक एका पक्षाच्या अथवा तटाच्या वतीनें पार्लमेंटांत ते काम करीत नसून साम्राज्यांत अंतरगत सुव्यवस्था ज्या मार्गानें करतां येईल, तो मार्ग हे वृद्ध गृहस्थ निर्भयपणें स्वीकारीत असतात. या वृद्ध गृहस्थांचें नांव डॉक्टर कौंट आर्थर फॉ पोस्याडोस्की वेनर असें आहे. वेस्ट फ्यालिया प्रांताच्या बिलफील्ड भागाच्यातर्फे ते पार्लमेंटचे सभासद आहेत. जर्मनींतील सामान्य जनतेच्या कल्याणाकरतां यांनीं जेवढी मेहनत घेतली आहे, तेवढी ती दुसऱ्या कोणीहि घेतलेली नाहीं. १९१२ सालच्या निवडणुकींत सोसियालीस्ट पक्षाचा विजय जिकडे तिकडे होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्यावेळीं वेस्ट फ्यालियांतील सोसियालिस्ट उमेदवारांविरुद्ध त्या प्रांतांतील लोकांनीं निवडणुकीसाठीं पोस्याडोस्की यांस उभें केलें. ते कोणत्याहि एकाच पक्षाला वाहिलेले नसल्यामुळें व सामान्य जनतेच्या कल्याणाची इच्छा त्यांच्या मनांत प्रबळ आहे, अशी सर्वांची खात्री असल्यामुळें सोसियालिस्टांस टक्कर देण्यास तेच एक समर्थ आहेत, अशी सर्वांची खात्री होती. वेस्ट फ्यालिया प्रांतांतील कान्सरवेटीव,

क्याथोलिक, न्याशनल, लिबरल, ऱ्याडिकल, इत्यादि पक्षाच्या लोकांनीं आपल्या वतीनें उमेदवार होण्याची विनंति पोस्या डोस्की यांस केली, तेव्हां आपण कोणत्याहि विशिष्ट पक्षास चिकटून राहणार नाहीं, अशा अटीवर उमेदवार होण्याचें त्यांनीं कबूल केलें. यानंतर बादशाही प्रधान मंडळांत काम करण्याचा मानहि त्यांस मिळाला; तथापि तेव्हांहि आपलें लोक-सेवेचें व्रत त्यांनीं सोडलें नाहीं. अशा रीतीनें ' नृपति जनपदांना दुर्लभः कार्यकर्ता ' या दुर्मिळ कोटींत त्यांनीं स्थान मिळविलें आहे. दोन तीन वर्षांपूर्वीं जर्मनींत लष्करी विमानांची संख्या फ्रान्सहून आधिक करण्याची चळवळ सुरू करणारा एक पक्ष उत्पन्न झाला. लोकांच्या वर्गण्यांनीं मोठ्या रकमा जमवून जर्मनीच्या अस्मानीं आरमाराची वाढ करावयाचा ब्रेत त्यांनीं केला. या कामीं कौंट पोस्या डोस्की यांची मदत मिळेल, तर सारा देश वर्गण्या घेऊन धांवत येईल, अशी या पक्षाची खात्री होती. त्याच्या विनंतीस मान देऊन पोस्याडोस्की यांनीं याचें अध्वर्युत्व स्वीकारलें. सहा महिन्यांच्या अवधींत जवळ जवळ अर्ध कोट रुपये वर्गणी जमली व या वर्गणीनें अस्मानी आरमार जवळ जवळ फ्रेंचाच्या दुप्पट झालें.

जर्मनीच्या सामान्य जनतेची स्थिति सुधारण्यासाठीं पोस्या डोस्की यांनीं जी खटपट केली, तीवरून त्यांचें नांव अजरामर झालें आहे. वृद्ध, अशक्त व आजारी लोकांस सरकारनें मदत केली पाहिजे, असा जो कायदा जर्मनींत आहे, त्याचें मूळ जनकत्व पोस्याडोस्की यांजकडे नाहीं, ही गोष्ट खरी; तथापि ती मूळ कल्पना त्यांचीच असून तिचा प्रसार साऱ्या देशभर त्यांनीं अगाऊच करून ठेवला होता. या त्यांच्या खट-पटीमुळेंच हा कायदा जर्मनींत आस्तित्वांत आला. दुबळ्यांची काळजी सरकारनें वाहणें, हें सरकारचें कृत्य म्हणजे परोपकार नसून, हें त्याचें एक प्रमुख कर्तव्य आहे, असें पोस्याडोस्की यांचें मत आहे. दिवसें दिवस प्रबळ होत जाणाऱ्या उच्छृंखल सोसियालिस्ट पक्षाला लगाम घालण्याचा उपाय यावांचून दुसरा नाहीं, अशी त्यांनीं प्रधान मंडळाची खात्री करून दिली. दुबळ्यांना सरकारी मदत मिळावी; ही गोष्ट न्यायाची व दुबळ्यांच्या हक्काची आहे, हें तत्त्व त्यांनीं सामान्य जनतेच्याहि मनांत

भरवून दिलें. गरीबांचीहि काळजी वाहणें हा परोपकार नसून, तें आपलें कर्तव्य आहे, असें त्यांनीं श्रीमंतांस शिकविलें. समाजबंधनें कायम राहून त्यांतील सर्व घटकांस स्वतःची वाढ स्वतःच्या दिशेनें करण्यास सर्व योग्य सवलती देणें, हें सर्व समाजाचें आद्य कर्तव्य आहे, हें तत्व त्यांनीं जर्मन जनतेच्या मनांत भरविलें. समाज्याच्या सर्व अंगांची वाढ सारख्या प्रमाणानें झाली नाहीं, तर एकंदर समाज दुबळा होतो, असें त्यांचें मत आहे. प्रधान मंडळांत असल्या प्रकारचे विचार स्पष्टपणें बोलून दाखविणें हें सुद्धां मोठें अवघड काम आहे. जर्मनींतील प्रधानमंडळ बहुधा जुन्या सरदार घराण्यांतील लोकांचें बनलें असून सुलतानी अम्मल गाजविण्यास चटावलेलें आहे. पूर्वाग्रहांनीं ज्यांचीं डोकीं कठीण झालीं आहेत, असल्या लोकांपुढें हे विचार मांडण्यांस असामान्य धैर्य पाहिजे होतें. सोसियालिस्ट पक्ष दिवसेंदिवस प्रबळ होत चालला होता. त्याची नांगी मोडण्याकारितां बिस्मार्कशाहींतील दपटशांच्या कायद्यांचे पुनरुज्जीवन केलें पाहिजे, अशाबद्दल कांहीं पक्ष ओरड करूं लागले होते. सोसियालिस्ट पक्षाचा जमाव वाढत चाललेला पाहून कारखानदार लोक घाबरून गेले होते. संपाच्या वेळीं कांहीं मजूर त्यांतून फुटून आपल्या कामावर गेले, तर त्यांस संपवाले लोक अनेक प्रकारें त्रास देतात, असा अनुभव आहे. संपवाले अशा मजुरांना फितुरी समजत असतात. अशा मजुरांस संपवाल्यांनीं त्रास दिल्यास त्यांस कांहीं मुदत काळ्या पाण्याची शिक्षा व्हावी, अशी ओरड कारखानदारांनीं चालविली होती. अशा वेळीं गरीब मजुरांच्या तर्फेनें बोलण्यास केवढ्या धैर्याची अपेक्षा होती, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल

मजूरदाराच्या मागण्या रास्त असून औद्योगिक चळवळ यशस्वी होण्यास मजूरदारांची स्थिति सुधारणें, हें सरकाराचें आद्य कर्तव्य आहे, असें या वेळीं पोस्या डोस्की यांनीं स्पष्टपणें जाहीर केलें. सोसियालिस्ट लोकांचा उत्सृंखलपणा आणि मजूरदारांच्या योग्य मागण्या यांतील भेद लक्षांत ठेवून मजूरदारांस समाजांतील इतर घटकांप्रमाणेंच सवलती

मिळणें न्यायाचें आहे, हें तत्त्व पोस्या डोस्की यांनींच प्रथम जाणलें. सोसियालिस्ट पक्षांतलि लोकांशींहि त्यांचें वर्तन सहानभूतीचें होतें. कारण मजूरदारांचें राजकीय पुढारीपण याच पक्षाकडे होतें. याकरतां या पक्षांशीं मिळून मिसळून वागून त्यांच्या मार्फतच कामदारांच्या हिताहिताचा प्रश्न सोडविणें सोपें होतें.

१८९७ सालीं पोस्या डोस्की यांची नेमणूक होम सेक्रेटरीच्या जागीं झाली. या वेळीं त्यांनीं जें भाषण केलें, त्यांत आपल्या पुढील कार्याची रूपरेखा स्पष्ट आंखून ठेवली होती. समाजबंधनाच्या बाबींत फार कायदे आणि नियम असणें हितावह नाहीं, असें ते ह्मणाले. उद्योगधंद्यांत पोलिसला वारंवार आपला हात शिरकविण्याची संधि देणें, ह्मणजे धंद्याची वाढ खुंटविणेंच होय. लोकांस सदोदित कायद्याच्या कात्रींत धरणें अत्यंत अनिष्ट आहे व अशा रीतीनें देशाला एक मोठा कैदखाना बनविणें ह्मणजे लोकांच्या स्वतंत्र विचारशक्तीचा नाश करणें होय. असें ते या वेळीं ह्मणाले होते. या भाषणांत पोस्या डोस्की यांनीं आपलें समाजसुधारणेचें आदितत्त्व स्पष्ट करून दाखविलें होतें. आपले विचार चार चौघांसमोर उघड बोलून दाखविण्यास ते कचरत नसत. या निर्भिड-पणाच्या बाबतींत त्यांच्या इतका स्पष्टवक्ता जर्मन प्रधान मंडळांत त्या वेळीं दुसरा कोणीहि नव्हता. सरकाराकडून मिळणाऱ्या मानमरातबांची आणि बिल्ल्यांची त्यांनीं कधींहि पर्वा केली नाहीं. सरकार त्यांच्यावर खुष नव्हतें यामुळेंच जणू काय लोकांत त्याजबद्दल प्रेम उत्पन्न झालें. खुद्द बादशाहाशीं बोलतांना सुद्धां स्पष्ट बोलण्यास ते कचरत नसत. यामुळें दरबारी मंडळीचा त्यांजवर मोठा रोष झाला होता. यांच्या भाषणाच्या वेळीं बादशाहांनीं ब्यांड सुरू करून त्यांनीं यांच्या कटकटी-पासून आपली सोडवणूक करून घेतली, अशी कांहीं दरबारी मंडळींनीं गप्प उठविली होती, यावरून त्या मंडळीस हे किती अप्रिय झाले होते, हें उघड दिसून येतें. १९०७ सालीं पोस्या डोस्की यांनीं प्रधान मंडळांतील आपल्या जागेचा राजीनामा दिला. या दहा वर्षांच्या अवधींत बड्या सरदार मंडळास ते इतके अप्रिय झाले होते, कीं, कोणत्याहि

खाजगी दरबारी समारंभास त्यांस बोलावणें नसे. तथापि दुसऱ्या वुईलियम बादशाहाच्या कारकीर्दींत यांच्याइतका निरलस, स्पष्टवक्ता आणि हुषार कामगार प्रधानमंडळांत दुसरा कोणीहि झाला नाहीं, अशी यांची कीर्ति मात्र सर्वतोमुखीं झाली.

आपल्या कारकीर्दींत पोस्या डोस्की यांनीं घडवून आणलेल्या सुधारणांची नुसती यादी देऊन त्यांचें महत्त्व लक्षांत येण्यासारखें नाहीं. कामगार-वर्गाचे जन्मसिद्ध हक्क ओळखून तदनुसार समाजरचनेंत योग्य जागीं त्यांची रचना करणें अवश्य आहे, हें या सुधारणांचें आदितत्त्व आहे. या आदितत्त्वाला मूर्तस्वरूप देण्याच्या बाबतींत त्यांनीं प्रथम दुबळ्यांचा विमा उतरण्याचा कायदा हातीं घेऊन त्यांत मजूरदारांच्या दृष्टीनें सुधारणा केली. यानंतर मजूरदारांचे तंटे तोडण्यासाठीं स्थापन झालेल्या लवाद पद्धतींतहि त्यांनीं सुधारणा घडवून आणल्या. आजारामुळें बेकार झालेल्या मजूरदारांस तावडतोब मदत मिळावी, याकरतां त्या कायद्यांतहि त्यांनीं इष्ट सुधारणा केली. समुद्रावरील खलाशी मजुरांची स्थिति सुधारण्याकरतांहि नवे कायदे त्यांनीं अस्तित्वांत आणले. लहान मुलास कामावर लावण्याच्या बाबतींत त्यांनीं कडक नियम अमलांत आणले. चार्लटनबर्ग येथें मजुराकरतां एक पदार्थसंग्रहालय त्यांनीं स्थापन केलें असून त्यांत आरोग्यरक्षणाचीं व कारखान्यांत अपघात घडूं न देण्याचीं साधनें मांडून ठेवलीं आहेत. अशा प्रकारचें पदार्थसंग्रहालय साऱ्या जगात हें एकच आहेत. लहान पगाराच्या सरकारी नौकरांकरतां थोड्या भाड्याचीं घरें बांधण्यास त्यांनींच प्रथम सुरुवात केली. रात्रीं नऊ वाजतां सर्व दुकानदारांनीं आपल्या नौकरांस सोडलें पाहिजे, असा कायदा त्यांनीं पास केला. १९०० सालीं स्टेट् इन्शुअरन्स ( गरीबांस मदत देण्याच्या ) कायद्यांत सुधारणा करण्याकरतां एक नव्या कायद्याचा मसुदा त्यांनीं पार्लमेंटापुढें आणला. शेतकीकडील मजूर आणि उद्योगधंद्यांतील मजूर यांच्या हितसंबंधास पूर्वीच्या कायद्यानें जो पक्षपात केला होता, तो या नव्या कायद्यांत नाहींसा करण्यांत आला होता. दोन्ही पक्षांचा समतोलपणा यांत इतक्या उत्तम रीतीनें राखण्यांत आला होता, कीं त्याला

सोसियालिस्ट लोकांच्या पक्षालाहि हरकत घेतां आली नाहीं. बादशहांच्या नांवानें पुढें आलेल्या कायद्यास सोसियालिस्ट लोकांच्या पक्षाची मंजुरी या वेळीं प्रथमच्च मिळाली. यानंतर १९०३ सालीं याच कायद्यांत आणखी सुधारणा होऊन आजारी मजुरांना सरकारी मदत मिळण्याची मुदत तेरा आठवड्यांची सव्वीस आठवडे करण्यांत आली. दिवसें दिवस अधिकाधिक लोकांस अधिकाधिक प्रमाणावर सरकारी मदत मिळून देणें हा पोस्या डोस्की यांच्या कायद्याचा रोंख होता.

१९११ सालीं उपलब्ध झालेल्या आंकड्याप्रमाणें या कायद्याअन्वयें साडेबारा कोट पौंडांचें उत्पन्न होऊन त्यापैकीं आठ कोट साडे सतरा लक्ष पौंड मदतीच्या रूपानें मजूरदारांस देण्यांत आलें. या कायद्याप्रमाणें सुमारें दीड कोट लोकांचा विमा उतरण्यांत आलेला आहे. यांत या पद्धतीनें साडेसात कोट पौंडांचें भांडवल गुंतलें असून त्यापैकीं दोन कोटी साडे-बत्तीस लक्ष पौंड मजूरदारांचीं घरें बांधण्याच्या कामीं व्याजी लावले आहेत. पंचाहत्तर लक्ष पौंड आरोग्य साधनांच्या कामीं खर्चीं पडले आहेत. पन्नास लक्ष पौंड शेतकऱ्यांस कर्जाऊ दिले आहेत. पंचेचाळीस लक्ष पौंड दवाखाने व आरोग्यभुवनें याकरतां खर्च झाले असून साडे सद-तीस लक्ष पौंड मजुरांच्या शिक्षणाकडे लागले आहेत. याखेरीज कित्येक दवाखाने, क्षयरोग्यांकरतां आरामस्थानें, आजारी लोकासाठीं शुश्रूषास्थानें वगैरे बाबतींत अठ्ठावीस लक्ष पौंड गुंतले आहेत. गरीबांस व वृद्धांस मदत देण्याच्या बाबींत जर्मनीनें साऱ्या जगांतील राज्यांचे गुरुपद स्वीकारलें आहे, अशी त्याची कीर्ति कां झाली, हें या आंकड्यावरून उघड दिसून येतें. इतर राष्ट्रें या बाबीचा विचार करूं लागण्यापूर्वींच जर्मनीनें या बाबतींत पुष्कळ आघाडी मारली आहे. हल्लीं ७० वर्षांचें वय होईपर्यंत मजुरांना पेन्शन मिळत नाहीं; पण ६५ व्या वर्षींच त्याला पेन्शन मिळावें अशी सुधारणा या कायद्यांत होण्याचें घाटत आहे. हा कायदा अद्यापि सर्वांगांनीं परिपूर्ण झाला आहे असें नाहीं, तथापि त्यांत सुधारणा अजूनहि घडून येतील. विधवा स्त्रिया, पोरकी पोरें व बेकार

मजूर यांना सरकारी आश्रय मिळूं लागेपर्यंत जर्मन समाजसुधारक स्वस्थ बसणार नाहीं असें ह्मणावयास हरकत नाहीं.

कौंट पोस्या डोस्की हे मूळचे सायलेशिया प्रांतांतले रहिवाशी असून त्यांचें वय जवळ जवळ पाऊणशें वर्षांचें आहे. त्यांचें घराणें मूळचें खानदानीचेंच होतें; पण फ्रेडरिक दि ग्रेटच्या कारकीर्दींत त्याला कौंट हा किताब मिळाला. पोस्या डोस्की यांचा त्या काळचा पूर्वज फ्रेडरिकच्या सैन्यांत घोडदळाचा सेनापति असून सायलेशिया प्रांतांतील लढायात त्यानें अतुल शौर्य गाजविल्यावरून त्याला कौंट ही पदवी मिळाली होती. कौंट पोस्या डोस्की हे ब्रेसला युनिव्हरसिटीचे कायद्याचे पदवीधर आहेत. सरकारी नौकरींत त्यांची प्रथम नेमणूक पोझेन येथें झाली. त्या वेळीं पोझेन येथील फडणविशींत विलक्षण घोटाळा माजला होता. पोस्या डोस्की हे हिशोबी कामांत वाकबगार असल्यामुळें हा घोटाळा साफ मोडून टाकून तें खातें त्यांनीं उत्तम शिस्तीस लावलें. यामुळें त्यांची हुषारी बर्लिन येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेस येऊन १८९३ सालीं बादशाही फडणिशीच्या जागीं त्यांची योजना झाली. खर्चांत काटकसर करण्याची विद्या जर्मन राष्ट्रांस या वेळेपर्यंत ठाऊकच नव्हती, असें म्हटलें तरी चालेल. आद्या-बाहेर खर्च करावयाचा नाहीं, हें तत्त्व पोस्या डोस्की यांनीं प्रथम अमलांत आणलें. सरकारी कर्ज फुगत जात होतें, त्यास एकदम आळा घालून मूळच्या कर्जांची फेड करण्यास त्यांनीं सुरवात केली.

व्यापाराच्या संरक्षणाचे कायदे, आणि अबकारी कायदे, या बाबतींतहि पोस्याडोस्की यांनीं बरीच खटपट केली आहे. आजूबाजूच्या राष्ट्रांशीं १९०२ सालीं जर्मनीनें जे व्यापारी करारनामे केले, त्यांत पोस्याडोस्की यांचें बरेंच अंग होतें. एकमेकाविरुद्ध कर बसवून राष्ट्रांनीं व्यापारी भांडणें भांडावींत ही गोष्ट त्यांस अगदीं नापसंत आहे. दारूच्या प्रसारास आळा घालण्याकरतां १९०३ सालीं ब्रेमेन येथें भरलेल्या मद्यपाननिषेधक महासभेंत त्यांनीं पुढाकार घेतला होता. स्वतः दारूला ते कधीं शिवलेहि नाहींत. एके बाजूस खुद्द बादशहा आणि दुसऱ्या बाजूस सोसियालिस्ट पक्ष हे एकमेकांशीं विळ्या-भोपळ्यासारखें वागणारे

पक्ष या बाबतींत एकदिलानें काम करीत असतांहि या व्यसनास जर्मनींत अजून चांगलासा आळा बसला नाहीं.

सरकारी नौकरीचें जूं खांद्यावरून झुगारून देऊन कौंट पोस्याडोस्की हे आतां जर्मन पार्लमेंटाचे स्वतंत्र सभासद झाले आहेत. पूर्वी प्रधान-मंडळांत काम करून नंतर सरकारावर स्पष्टपणें टीका करण्यास न भिणारे असे हे जर्मन प्रधानमंडळांतील पहिलेच कामगार आहेत. ग्रेट-ब्रिटन आणि युनायटेडस्टेट येथील उदारमतवादी संस्थांचे ते पूर्ण भोक्ते आहेत. जर्मनींत अशा संस्थांचा प्रसार करण्याकरतां कायावाचामनानें ते खटपट करीत असतात.

---

## जर्मनीचें लष्कर.

(डॉ० आर्मगार्ड कार्ल ग्रेव्हज् याच्या १९१२ च्या लेखावरून.)

जर्मनीचें लष्करी मनुष्यबळ, त्याची प्रांतावर वांटणी आणि त्याची युद्ध-विषयक तयारी; यांजबद्दल सामान्य लोकांसहि बरीच माहिती आहे; तथापि सुमारें अर्धकोट मनुष्यांवर प्रमुखपणें अधिकार चालविणारा मेंदु कोठें आहे आणि त्याची काम करण्याची पद्धत कशी आहे, यांबद्दल मात्र फारशी तपशीलवार माहिती कोणास नाहीं. जर्मनीच्या युद्धयंत्राच्या अंतर्गतभागाची आणि त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीची माहिती, आज प्रथमच प्रसिद्ध करण्यांत येत आहे. ही माहिती सर्व प्रकारें पुरी आहे असें नाहीं. कारण, एकाच मनुष्यास सर्व तपशील कळणें शक्य नाहीं; तथापि सामान्य वाच-कांस एवढ्या माहितीवरून बरेंच अनुमान करतां येईल, यांत शंका नाहीं. जर्मनीच्या हेर खात्यांत पुष्कळ वर्षें काम केल्यामुळें व या धंद्यासंबंधानें प्रमुख लष्करी आणि आरमारी अधिकाऱ्यांशीं भेटींचा प्रसंग नित्य पडत गेल्यामुळें जर्मनीच्या अंतःस्थ युद्धयंत्राची अंतःस्थ माहिती मिळण्याचा योग मला आपोआपच आला आणि या योगाचा फायदाहि मीं चांगला करून घेतला. या ठिकाणीं मी जें कांहीं नमूद करणार आहे. तें माझ्या अनुभवाचें आहे.

मनुष्याच्या मेंदूतून ज्या ज्या युक्त्या निघण्याचा संभव आहे, त्या साऱ्यांचा उपयोग जर्मनीनें आपल्या युद्धयंत्रांत करून घेतला आहे. "हें युद्धयंत्र केवळ युद्ध आणि नासधूस करण्याकरतांच निर्माण झालें नसून जर्मन साम्राज्यांतील बुद्धिमत्तेचा जणू काय कस लावण्याचेंहि काम येथें चालतें. युद्ध खात्यांत समाविष्ट केलेल्या अनेक युक्त्यांचा उपयोग रोजच्या व्यवहारांतहि नित्यशः दिसून येतो. या यंत्राच्या मूळ उत्पादकाचें नांव जनरल स्टीन असें होतें. यानें हें यंत्र सुप्रसिद्ध नेपोलियन याच्या धामधुमींत निर्माण केलें. यानंतर अनेकांनीं त्यांत नवी भर घातली आणि त्याचें कार्यक्षेत्र विस्तृत केलें. हें यंत्र सर्वथा बादशहाच्या सत्तेखालीं असतें. यावर दुसऱ्या कोणत्याहि मुत्सद्याची अथवा इतर कोणाहि व्यक्तीची यत्किंचितहि सत्ता चालत नसल्यामुळें तें यंत्र सांप्रतच्या पूर्णावस्थेस पोहोंचलें असून अगदीं सुरळीत चालतें. मुत्सद्यांतील परस्पर चुरस व पक्षभेद याजपासून तें अगदीं अलिप्त असून एकहातीं असल्यामुळें त्याच्या वाढीस केव्हांहि अडथळा आलेला नाहीं. जर्मन साम्राज्याच्या लष्करावर एकमुखी सत्ता चालविणाऱ्या संस्थेस ग्रोसर जनरल स्टॉब अथवा ग्रेट जनरल स्टाफ असें नांव आहे. अद्वितीय बुद्धिमत्ता, काम पार पाडण्याचें सामर्थ्य आणि उत्तम प्रतीचें शास्त्रीयज्ञान यांची जोड असल्यावांचून या संस्थेंत कोणाचाहि प्रवेश व्हावयाचा नाहीं. येथें वशिला अथवा मोठें नांव अथवा पुष्कळ पैसा, यांपैकीं एकाचीहि डाळ शिजावयाची नाहीं. येथे तरणेबांड अम्मलदार आणि केंसांची अंबाडी झालेले सेनापति एकत्र काम करतांना आढळून येताव. येथें एखाद्या सामान्य घिसाड्यापासून तों अत्यंत निष्णात इंजिनियरापर्यंत सर्व दर्जाचे लोक गुण्यागोविंदानें नांदत असल्याचें आढळून येतें. हें यंत्र शक्य तितक्या उत्तमोत्तम स्थितीस आणणें या एकाच उद्देशानें हीं सर्व माणसें जणू काय चढाओढीनें काम करतात असें वाटतें. या यंत्राची अधिष्ठात्री देवता खुद्द बादशहा हेच असून चेफडेस ग्रोसन जनरल स्टॉब किंवा चीफ ऑफ दी ग्रेट जनरल स्टाफ या आपल्या हस्तकाच्या द्वारें सर्व कामकाज ते जातीनिशीं पहात असतात. या संस्थेंत एकंदर १८०पासून २०० पर्यंत अम्मलदार कामावर असतात.

ईलाव आणि फ्रीडलंड येथील लढायांत नेपोलियननें प्रशियन सैन्याचा खुर्दा उडविल्यानंतर केवळ प्रशियाच नव्हे, तर सारा मध्य यूरोप नेपोलियनच्या अंगाखालीं आला व नेपोलियनच्या या मोहिमेची परिसमाप्ति टिलसिटच्या-तहानें झाली. या वेळीं प्रशियाचें संस्थान मोडून टाकावें असें सर्व फ्रेंच मुत्सद्यांचें ह्मणणें होतें. विशेषतः नेपोलियननें गुरुपदीं मानलेला त्यालिऱ्यॉंड याचा व नेपोलियनच्या सेनापतींचा आग्रह तर या कामीं विशेषच होता; पण नेपोलियनला ही गोष्ट पसंत पडली नाहीं ह्मणा किंवा तो एका सुंदर चेहऱ्याला बळी पडला ह्मणा, प्रशियाचें स्वातंत्र्य त्यावेळीं त्यानें हरण केलें नाहीं. साऱ्या जगाचा इतिहास एकाद्या क्षुल्लकशा भासणाऱ्या गोष्टीनेंहि कसा बदलतो, याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. तहाची वाटाघाट करण्याकरतां टिलसिट येथें उभय पक्षांचे मुत्सद्दी जमले असतां त्या ठिकाणीं त्या वेळची प्रशियाची राणी लुइसी ही हजर होती. अनुपम स्वरूपाबद्दल तिची ख्याति होती. तिच्या चेहऱ्याकडे पाहण्याबरोबर प्रशियाचें स्वातंत्र्य हरण करण्याचा नेपोलियनचा विचार मनांतल्या मनांतच जिरला. प्रशियानें स्वतंत्रपणें थोडेंसें सैन्य ठेवावें इतका अधिकार देण्याविषयीं राणीनें नेपोलियनची विनवणी केली. तिच्यावर भाळलेल्या नेपोलियननेंहि बारा हजार खडें सैन्य ठेवण्याची परवानगी प्रशियास दिली. ही परवानगी मोठ्याश्या महत्त्वाची होती, असें केवळ वरवर पाहणारास वाटणार नाहीं. नेपोलियनसारख्या अफाट सैन्य बाळगणाऱ्या रणधुरंधर योध्यास बारा हजार सैनिकांची मोठीशी भीती बाळगण्याचें कारण नव्हतें; पण या क्षुद्रबीजापासून प्रशियन देशभक्तांनीं जो प्रचंड वृक्ष निर्माण केला, त्यावरून नेपोलियनला त्यानीं कसें सपशेल फसाविलें, हें पाहून कोणासहि मोठा चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं.

आणीबाणीच्या प्रसंगीं करतीं माणसें निपजविणें, हा अजब गुण प्रशियाच्या मेंदूंत फार काळापासून आहे. या प्रसंगींहि असाच एक विशाल लष्करी बुद्धीचा पुरुष तेथें निर्माण झाला. त्यानें प्रशियांतील प्रत्येक प्रांत, प्रत्येक जिल्हा, प्रत्येक शहर आणि प्रत्येक खेडेंपाडें यांची

जंत्री तयार करून त्यांतील साऱ्या धष्टपुष्ट माणसांची यादी तयार केली. या यादींतून नेपोलियनच्या परवानगीप्रमाणें प्रथम बारा हजारांची निवड त्यानें केली. त्यांना कवाइत व युद्धोपयोगी शिक्षण त्यानें दिलें. बारा हजारांचा हा पहिला संघ युद्धनिष्णात झाल्याबरोबर त्यास रजा देण्यांत आली आणि दुसऱ्या बारा हजारांस लष्करी शिक्षण देण्याची सुरुवात झाली. सांप्रतच्या जर्मनीच्या लष्करी कायद्याचें बीजारोपण जनरल स्टीन यांनीं अशा प्रकारें केलें, व सांप्रतच्या प्रचंड लष्कराचाहि उगम येथेंच झाला. तीन वर्षांच्या अवधींत प्रशियाजवळ एक लक्ष ऐंशी हजार जय्यत फौज निर्माण होऊन याशिवाय एक लक्ष वीस हजार राखून ठेवलेलें सैन्य जमा झालें. रशियाच्या स्वारींत नेपोलियनच्या सैन्याची उपासमार होऊन तो मास्कोहून परत फिरला, त्या वेळीं बारा हजारांहून अधिक सैन्यास आपणास तोंड द्यावें लागेल, अशी कल्पनाहि त्याला नव्हती; पण त्याला अनुभव वेगळाच आला. युरोपच्या या सुलतानाला धुळीस मिळविण्यास हेंच सैन्य थोड्या फार अंशीं कारण झालें.

यानंतर सन १८६४, १८६६ आणि १८७० या सालीं प्रशियानें जीं युद्धें केलीं, त्यांत या सैन्यांत अधिकाधिक भर पडत चालली. प्रसंगानुसार सैन्याच्या निरनिराळ्या भागांस अधिकाधिक पूर्णावस्था प्राप्त झाली. ही पूर्णावस्था प्राप्त करून देण्याच्या कामांत अनेकांचे श्रम खर्ची पडले आहेत. या कामीं अनेक युद्धनिष्णात पुरुषांनीं जी अचाट मेहनत केली, आणि जे बारीकसारीक तपशिल रचिले, त्यांचें वर्णन केलें, तर तें कोणास खरेंहि वाटणार नाहीं. युद्धाची आरंभींची तयारी कशी करावी, या एकाच विषयावर १८७१ सालचे रणधुरंधर सेनानी हेलमुथ फॉं मोल्टके यांनीं एक मोठें शास्त्र रचून ठेवलें आहे. याच शास्त्राच्या अनुरोधानें जर्मन लष्कर अद्यापीहि चालतें.

पूर्वीचे सेनापति मोल्टके आणि सांप्रतचे मुख्य सेनापति जनरल हेरिनजेन यांजमध्यें मोठें विलक्षण साम्य आहे. दोघेहि सारखेच उंच, दोघेहि सारखेच रोडके, दोघेहि सारखेच मूकवृत्तीचे, दोघांच्याहि चेहऱ्यावर सारखीच तरतरी, फार काय; पण दोघांच्या आवडीनिवडींतहि

असेंच साम्य आढळतें. मोल्टके बुद्धिबळाच्या खेळाचे भोक्ते होते. हेरिनजेन हे आपल्या शिशाच्या शिपायाबरोबर फावल्या वेळीं खेळत असतात. त्यांजपाशीं तीस हजार शिशाच्या शिपायांचें सैन्य आहे, अशी लोकवार्ता आहे. सुप्रभातीं डोळे उघडल्याबरोबर या सैन्याचें निरीक्षण करणें हें त्यांचें पहिलें काम झालें आहे. मोल्टके जागे झाल्याबरोबर प्रथम बुद्धिबळांचा पट मागवीत असत. लष्करी लोकांत मोल्टके यांज-सारखेंच हेरिनजेन यांचें वजन असून ते मोल्टकेप्रमाणेंच युद्धशास्त्र-विशारद आचार्य आहेत, असा साऱ्या लष्करी अम्मलदारांचा समज आहे. युरोपांत कोठेंहि गडबडीचें चिन्ह दिसलें, व विशेषतः फ्रान्सशीं थोडीशीहि कूरबूर उपस्थित झाली, तर जनरल हेरिनजेन किंवा त्यांचे सहाध्यायी जनरल फॉं थुल्सेन हेसेलर हे मेटझ् किल्ल्याचीं लष्करीं सूत्रें तत्क्षणींच हातीं घेतात, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. जर्मन साम्राज्यांत मेटझ् हे एक फार महत्त्वाचें व नाकेबंदीचें लष्करी ठाणें आहे.

मेटझ्च्या किल्ला व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश यांची माहिती जनरल फॉं हेरिनजेन यांस इतकी आहे, कीं तिच्या अर्ध्या हिश्शानेंहि माहिती असलेला साऱ्या जर्मनींत दुसरा कोणी नाहीं. कडाक्याच्या थंडीच्या दिवसांत बर्फ पडत असतां व वादळ होत असतां भर मध्यरात्रीनंतरहि एक थोडीशी लंगडणारी आकृति मेट्झच्या आजूबाजूस फिरत असतांना तेथील संत्र्यास आढळते. या आकृतीच्या अंगावर लांब लष्करी कोटा-शिवाय दुसरें अधिक मौल्यवान् अथवा मोठा दर्जा दर्शविणारें वस्त्र नसतें. या व्यक्तीबरोबर कांहीं अनुचर असून त्यांजजवळ विजेच्या बत्त्या, रात्रीच्या वेळीं लांब पहातां येईल अशा कांचेच्या दुर्बिणी, इकडून तिकडे सहज नेतां येतील, अशा प्रकारच्या छोट्या घडवंच्या आणि टेबलें, इत्यादि सामान असतें. दुसऱ्या एकाद्या अनुचराच्या हातांत कागद व पेन्सिल असून या आकृतीच्या तोंडून निघालेले तुटक तुटक शब्द हा अनुचर मोठ्या काळजीनें टिपून घेत असतो. अशा रीतीनें पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण या चारी दिशांकडे जमिनीच्या प्रत्येक वाराची पाहणी ही व्यक्ति करीत असते. ही व्यक्ति म्हणजे जनरल फॉं हेरिनजेन हीच होय. फ्रान्सच्या छातीकडे

रोंखून धरलेला हा मेटझ्चा पोलादी बाण जोंवर असल्या रक्षकांच्या हातीं आहे, तोंवर तो आपलें काम चोख बजावील, याबद्दल शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं.

ग्रोसन जनरल स्टॅब या खात्याच्या अधिपतीला डरग्रोस जनरल स्टॅब असा किताब असून त्याची मुख्य कचेरी बर्लिन येथें आहे. प्रत्येक सैन्य-समूहास ( आर्मीकोर ) एकेक क्लीन जनरल स्टॅब असून यांपैकीं निवडक व हुषार असे अधिकारी बर्लिन येथील मुख्य खात्यांत असतात. या लष्करी अधिकाऱ्यांच्या मदतीस अत्यंत निष्णात रसायनशास्त्री, इंजिनियर आणि यंत्रकलानिपूण लोक दिलेले असतात. हीं माणसें आपापल्या कलेंत अत्यंत निष्णात अशीं असतात. अशा रीतीनें ग्रेट जनरल स्टाफ ही संस्था स्थापन झाली आहे. या संस्थेचें आधिपत्य कायद्यानें बादशहा-कडे असतें.

ह्या जनरल स्टाफच्या इमारतींत एक लहानशी कोंदट व विशेष न सजविलेली अशी खोली आहे. परराष्ट्राशीं कांहीं कटकट उभी राहिली, तर या खोलींत पांच माणसांची एक सभा भरते. अध्यक्षस्थानीं खुद्द सरकार स्वारी असते. अध्यक्षाच्या उजव्या बाजूस चीफ आफ दी जनरल स्टाफची स्वारी बसलेली असते. डाव्या बाजूस लष्करी प्रधान असतो आणि समोर रेलवेचा प्रधान आणि आरमारी स्टाफचा मुख्य, असे बसलेले असतात. यांशिवाय इतर कोणताहि प्रधान अथवा मुत्सद्दी तेथें आढळा-वयाचा नाहीं. कारण, एकाद्या राजकारणाची मजल मुत्सद्देगिरीच्या आवाक्याबाहेर गेली, म्हणजेच ही पांचांची छोटेखानी सभा भरते. या वेळीं तोंडांचें काम संपून हातांचें काम सुरू होण्याची वेळ आलेली असते. या खोलींत बसून बादशहानें आपल्या लेखणीला हात लावला कीं, पन्नास लक्ष वीरांच्या तलवारी ताबडतोब म्यानांतून बाहेर उडी घालतात.

मोरोक्को प्रकरणासंबंधीं सर्व जर्मनीभर खळबळ उडून गेली असतां एके दिवशीं जनरल फॉ हेरिनजेन हे बागेंत फिरावयास जाण्यासाठीं नेहमींप्रमाणें आपल्या घरांतून बाहेर पडले, तों दरवाजांतच कित्येक

लष्करी अम्मलदारांनीं त्यांस गांठून विचारलें, 'सेनापतीसाहेब, तलवार काढण्याची वेळ आली का?' त्यांजकडे पाहून व थोडें हंसून सेनापति ह्मणाले, "सात अक्षरांचा अद्याप अवकाश आहे."

हीं सात अक्षरें म्हणजे सैन्य जमविण्याच्या हुकुमाच्या सरकारी यादीवरील बादशहांची सही होय.

या प्रचंड युद्धयंत्राची साधारणपणें बरीचशी कल्पना येण्याकरितां त्याच्या निरनिराळ्या भागांचे निरनिराळे वर्णन देणें अवश्य आहे हें युद्धयंत्र खऱ्या युद्धाला कितपत जय्यत आहे, हें समजण्यास त्याच्या आगाऊ तयारीच्या पद्धतीची माहिती असणें अवश्य आहे. माणसांची जमवाजमव, त्यांना लागणाऱ्या शस्त्रसामुग्रीचा पुरवठा, त्यांस लागणारे कपडे, त्यांस लागणारें अन्न, आणि त्यास इकडून तिकडे हलविण्याकरितां लागणारीं वाहनें, इतक्या गोष्टींचा अंतर्भाव पूर्वतयारी या एका विषयांत होतो. सुमारें अर्धकोट मनुष्यांस शक्य तितक्या थोड्या वेळांत इतक्या गोष्टींचा पुरवठा करणें व ही सारी तयारी देशाच्या कोणत्याहि ठिकाणीं जय्यत राखणें, हें काम केवढें प्रचंड आणि अवघड असेल हें वर्णनानें सांगतां येणें शक्य नाहीं. यांत आणखीहि एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, जर्मनीचें सारें लष्कर कोणत्याहि सरहद्दीवरील कोणत्याहि ठाण्यावर एकदम जय्यत स्थितींत वज्रासारखें लोटतां आलें पाहिजे, या मूळ तत्त्वावरच जर्मन सैन्याचें सारें शिक्षण झालेलें असून त्याची आगाऊ तयारीची पद्धतहि याच तत्त्वास अनुसरून आंखली गेली आहे. शत्रूच्या देशांतच रणमैदान करणें फायद्याचें व अगत्याचें आहे, ही गोष्ट पूर्वानुभवानें जर्मनीच्या लक्षांत आलेली आहे. युद्धाग्नीच्या ज्वाळांचा स्पर्शहि स्वदेशास लागणें अनिष्ट आहे, असें जर्मनीचें पहिलें लष्करी तत्त्व आहे. यामुळें जर्मन लष्कराची उभारणी करतांना ती स्वसंरक्षणाच्या तत्त्वावर केलेली नसून युद्धाचा आखाडा शत्रूच्या देशांत पाडावा या तत्त्वावर केलेली असते. या आगाऊ तयारींत चार शाखांचा अंतर्भाव होतो. त्या चार शाखा अशाः—

### १ जमवाजमव.

२ वाहतुक.

३ पुरवठा.

४ बातम्या.

या प्रत्येक शाखेंतहि आणखी अनेक पोटशाखा असतात. या शाखांचा क्रमशः विचार करतां करतां पोटशाखांचें वर्णनहि त्यांत ओघानें येईलच.

## १ जमवाजमव.

जर्मन सैन्याचे मुख्य तीन विभाग आहेत. खडें सैन्य, राखून ठेवलेलें सैन्य आणि लँडवर सैन्य.

खड्या सैन्यांत शिपाई व अम्मलदार मिळून सात लक्ष नव्वद हजार लोक असतात. हें सैन्य कोणत्याहि क्षणीं पूर्णपणें युद्धाच्या तयारींत असतें. जमवाजमव करावयाची ती फक्त राखून ठेवलेल्या सैन्यासाठीं करावी लागते. त्यासाठीं जर्मनीनें अनेक पद्धतींचें एक मोठें प्रचंड जाळें निर्माण करून ठेवलें आहे. राखून ठेवलेल्या सैन्यांत दोन वर्ग आहेत. त्याचप्रमाणें लँडवर सैन्यांतहि पहिला आणि दुसरा असे दोन वर्ग आहेत. कोणताहि सशक्त पुरुष २१ वर्षांचा झाला ह्मणजे लष्करी नौकरींत त्यास दाखल करतां येतें. तथापि अशा प्रत्येक पांच मनुष्यांपैकीं एक मनुष्य सध्यां दाखल केला जातो. जरूरीपेक्षां लोकसंख्येंतून अधिक माणसें घेतां येण्याजोगीं असल्यामुळें या सर्वांचा समावेश होणें शक्य नाहीं. याकरतां एकच मनुष्य दाखल करण्याची चाल आहे. याला पायदळ, रिसाला, तोफखाना, इंजिनियर तुकडी किंवा आरमार यापैकीं कोणत्या तरी शाखेंत घेतलें जातें. पायदळ सैन्यांतील शिक्षणाचा काळ दोन वर्षांचा, रिसाल्यांतील तीन वर्षांचा, तोफखान्यांतील तीन वर्षांचा, आरमारांतील तीन वर्षांचा आणि इंजिनियर तुकडीचा दोन वर्षांचा आहे. या काळांत उत्तम वर्तणुकीबद्दल दाखला मिळाल्यास दोनपासून चार महिन्यांची सूट मिळते; पण यावरून लष्करी अधिकारीवर्ग मोठा उदार आहे, असें मात्र कोणीं समजूं नये. पार्लमेंटानें पास केलेल्या कायद्याला सभ्यपणें तुडवून जाण्याची ही एक युक्ति आहे. दोन चार महिन्यांच्या या सव-

लतीमुळें आणखी ७५,००० लोक पार्लमेंटच्या संमतीवांचून बादशहास ठेवता येतात. विश्वविद्यालयाचे पदवीवर अथवा दुसऱ्या परीक्षा पास झालेले लोक प्रत्येक शाखेंत फक्त एकच वर्ष शिक्षण घेत असतात. राखून ठेवलेल्या सैन्यांस लागणाऱ्या अम्मलदारांचा पुरवठा बहुशः याच वर्गांतून होतो. खऱ्या सैन्यातील अम्मलदार हे बहुधा जुन्या जमीनदार घराण्यांतून येतात. तसेंच जुन्या लष्करी अम्मलदारांचीं मुलेंहि खऱ्या सैन्यांत अम्मलदार म्हणून नेमलीं जातात. यांचें लष्करी शिक्षण जर्मनींतील कोणत्या तरी लष्करी कॉलेजांत झालेलें असतें. सर्व कॉलेजांत बर्लिन येथील कॉलेज फार प्रसिद्ध आहे. याशिवाय जर्मन सैन्यांतील दुय्यम अम्मलदारांच्या वर्गांत शिपायांतील माणसांची त्यांच्या हुशारीप्रमाणें भरती केली जाते. जर्मन सैन्याचें खरें बळ मात्र दुय्यम अम्मलदारांवर अवलंबून असतें. किंबहुना जर्मन साम्राज्याचें व विशेषतः प्रशियन राजघराण्याचे मुख्य आधारस्तंभ म्हटले, तर हे दुय्यम अम्मलदारच होत. बारा वर्षे शिपायाची नोकरी केल्यानंतर यांची नेमणूक कोणत्या तरी मुलकी खात्यांत केली जाते. सैन्यांतील बारा वर्षांच्या नोकरीमुळें त्यांच्या आंगीं आज्ञाधारकता, शिस्त आणि चिकाटी हे गुण चांगले मुरलेले असतात. या बारा वर्षांनंतर त्यांची नेमणुक रेलवे, टपालखातें, अबकारी, म्युनसीपलखातें किंवा पोलीस यांपैकीं एकाद्या खात्यांत केली जाते. अशामुळें लढाईच्या कामांत तरबेज झालेलीं हीं माणसे कोणत्याहि क्षणीं युद्ध खात्याच्या हातांत कशीं असतात, हें वाचकांच्या लक्षांत येईल. अशाच रीतीनें लष्करी नौकरी कांहीं वर्षे झाल्यानंतर लष्करी अम्मलदारांची नेमणूक मुलकी खात्यांत उच्च अधिकारावर केली जाते. सैन्याचे एकंदर मुख्य पंचवीस विभाग किंवा फौजा आहेत. ( 25 Army corps ) यांची वांटणी लष्करी दृष्ट्या योग्य अशा ठाण्याठाण्यांनीं केलेली आहे. आल्सेस लारेन प्रांतांत आणि ऱ्हाईन नदीच्या कांठच्या ठाण्यांत फौजांची सर्वांत अधिक संख्या आहे. बाकीच्या फौजा प्रशिया आणि रशिया यांच्या सरहद्दीवर वांटून देण्यांत आल्या आहेत. सर्व देशाचे लष्करी जिल्हे केले असून जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं

त्या त्या जिल्ह्याचें लष्करी दप्तर असतें. या दप्तरांत जिल्ह्यांतील प्रत्येक धट्ट्या-कट्ट्या पुरुषाची, प्रत्येक मोटार गाडीची, प्रत्येक घोड्याची आणि प्रत्येक जातीच्या कोणत्याहि वाहनाची नोंद ठेवलेली असते. याशिवाय जिल्ह्यांतील धान्य व कोळसा यांचें कोठार केवढें आहे, व गवत-काडी वगैरे किती मिळण्याचा संभव आहे, यांचीहि नोंद असते. एकंदरीनें सैन्याच्या उपयोगी पडणारी अथवा सैन्यास जरूर असणारी प्रत्येक जातीची वस्तु येथें नोंदलेली असते. राखून ठेवलेल्या सैन्यांतील अथवा लष्कराच्या दुसऱ्या कोणत्याहि शाखेंतील प्रत्येक मनुष्यास आपली हजिरी देण्याची जागा ठाऊक असते. हुकूम झाल्यापासून चोवीस तासांच्या अवधींत त्यानें हजिरी दिली पाहिजे, असा कायदा आहे. या कामीं थोडीशी हयगय झाली, तरी कायद्यानें त्याला जबर शिक्षा ठेवली आहे. अगदीं शांततेच्या काळींहि हा कायदा फार कडक पाळला जातो. मग युद्धाच्या प्रसंगीं तर बोलावयासच नको. हुकूम झाल्याबरोबर शक्य तितक्या लवकर माणसें व सामानसुमान जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं एकत्र जमतील अशा धोरणानेंच ही मुख्य ठिकाणची जागा उघडलेली असते. या जिल्हा ठिकाणांच्या जागीं बहुधा अनेक आगगाड्यांचे फांटे एकत्र झालेले असतात. यामुळें अनेक ठाण्यांतून माणसांची व सामानाची एकदम भरती झाली, तरी त्यांची रवानगी वांटणीप्रमाणें योग्य स्थळीं करण्यास यत्किंचितहि अडचण पडत नाहीं. सैन्याच्या व सामानाच्या वाहतुकीचें काम कसें चालतें, हें मी पुढें सांगेन. जिल्ह्याचीं मुख्य ठाणीं हीं त्या त्या जिल्ह्याचीं मुख्य कोठारेंच होत. या ठिकाणीं जिल्ह्यांतील माणसांना लागणारे कपडे, शस्त्रास्त्रें व दारू गोळा हीं जय्यत भरून ठेवलेलीं असतात. आज मुलकी नौकरींत असलेला मनुष्य उद्यां एकदम शिपायी कसा बनतो, हें सांगून कोणास खरेंहि वाटावयाचें नाहीं. ज्या यक्षिणीच्या कांडीनें ही उलथापालथ घडविली जाते, ती कांडी प्रत्यक्ष पाहिल्यावांचून नुसत्या वर्णनानें तिची खरी कल्पना कधींहि यावयाची नाहीं. पद्धतशीर शिक्षण आणि वारंवार केलेल्या तालमी, यांनींहि ही यक्षिणीची कांडी सदोदित पूर्ण जय्यत स्थितींत ठेवली जाते. या लष्करी

तालमी फार खर्चाच्या आहेत, ही गोष्ट खरी; तथापि लष्करी माणसास सदोदित तरबेज राखण्याकरतां आणि सेनापतीस प्रचंड लष्करांच्या हालचाली कशा कराव्या हें शिकविण्याकरतां हा खर्च करणें आवश्यक आहे, अशी जर्मनांची भावना आहे. एका तालमीच्या प्रसंगीं ५–६ लाख माणसें सर्व सामानासह सरहद्दीवरील कोणत्याहि ठाण्यावर एकत्र केलीं जातात. साम्राज्याच्या एका टोंकाहून दुसऱ्या टोंकाला एवढा मोठा लोंढा वहात जात असतांहि, त्यांत कोणताच अडथळा उपस्थित होत नाहीं.

शांततेच्या अथवा युद्धाच्या वेळीं लष्कराचें सर्व स्वामित्व बादशहांच्या हातीं असतें. लष्करांत कोणतीहि घडामोड करावयाची झाली, तरी ती बादशहा एकटे करतात. लष्करी बाबतींत कोणाहि मुत्सद्यांचीं अथवा लोकांचीं मतें घेण्याचें कारण बादशहास पडत नाहीं. मुत्सद्यांचा परस्परांत मत्सर असला, तरी लष्कराशीं त्यांचा कोणताहि संबंध नसल्यामुळें त्याचा परिणाम लष्कराच्या तयारीवर होत नाहीं. आज्ञाधारकता आणि तयारी हीं लष्करी लोकांस प्रथम शिकविलीं जातात. मुत्सद्यांचीं भांडणें आणि लष्करी लोकांतील परस्पर मत्सर यांचे दुष्परिणाम रशियाच्या पूर्वेकडील मोहिमेंत जसे दिसून आले, अथवा फ्रान्सच्या आरमारांत मुत्सद्यांनीं केलेला घोंटाळा जसा बाहेर पडला, तशी गोष्ट जर्मनींत होणें शक्य नाहीं. कारण, जर्मन लष्कर आणि जर्मन आरमार यांजवर एकटी बादशाहांचीच सत्ता आहे. आणि ही सत्ता प्रसंगीं ते पूर्णपणें गाजवितातहि. लष्करांत एकादा सेनापति यत्किंचित् ढवळाढवळ करीत आहे, अशी नुसती शंका आली, तरी बादशाहा त्यांचें कडक पारिपत्य केल्यावांचून रहात नाहींत. बादशाहांनीं दिलेल्या शिक्षेवर एकाद्या प्रधान मंडळाकडे अथवा चेंबर ऑफ डेप्युटीजकडे अपील करण्याची सोयहि जर्मनींत नाहीं. सैन्याची आगाऊ जमवाजमव करण्याच्या बाबतींत पैशाच्या तरतुदीचा विचारहि अवश्य केला पाहिजे. १८७१ सालीं फ्रान्सकडून लढाईच्या खर्चाबद्दल जर्मनीला जी सुमारें तीन अब्ज रुपयांची खंडणी मिळाली, तिच्यापैकीं जवळ जवळ अर्धी रक्कम युद्धाची गंगाजळी ह्मणून निराळी सांठवून ठेवण्यांत आली. ज्या इमारतींत ही गंगाजळी ठेवण्यांत आली आहे,

तिचें नांव ज्युलियस थर्म असें असून ती स्पँडा नांवाच्या गांवीं आहे. या गंगाजळींत प्रति वर्षी सुमारें ४५००००० रुपयांच्या किंमतीच्या सोन्यांच्या नाण्यांची भर करण्यांत येत असते. १८७१ सालापासून प्रत्येक आक्टोबर महिन्याच्या पहिल्या तारखेस नवीन पाडलेल्या सोन्याच्या नाण्यांनीं भरलेल्या तीन दारू गोळ्याच्या गाड्या आपला माल या इमारतींत रिकामा करतात. हा माल सांठविण्याकरतां ज्युलियस थर्ममध्यें एक खोल तळघर केलें असून तें सर्व बाजूंनीं जाड लोह-कवचांनीं मढविलें आहे. जर्मनीच्या युद्ध यंत्रास चालना देण्याचें बादशाहानें मनांत आणलें, ह्मणजे ही सारी गंगाजळी त्याला मदत करण्यास तयार असते. या तिजोरींत आज मितीस ( इ. स. १९१२ ) सुमारें चाळीस कोट रुपयांचें नगद सोनें भरलेलें आहे. एवढ्यावर साऱ्या जर्मन लष्कराच्या दहा महिन्याचा खर्च भागतो. युद्ध चालविण्यास लागणाऱ्या पैशासाठीं रीच स्टॅग किंवा पार्लमेंट यांजकडे तोंड वेंगाडण्याचें कारण सरकारास नाहीं. निदान युद्धाच्या आरंभीं तरी तसें कारण पडत नाहीं. युद्ध पुकारलें जाऊन एकवार त्यास प्रत्यक्ष सुरुवात झाली, ह्मणजे गरज लागल्यास अधिक पैसा लोक आपोआपच देतात.

स्पँडा येथील गंगाजळी सर्वस्वी लष्करी अधिकाऱ्यांच्या ताब्यांत आहे. स्पँडाची गंगाजळी ही निव्वळ दंतकथा आहे, असा पुष्कळांचा समज आहे; पण ही गंगाजळी खरोखरच अस्तित्वांत आहे, याबद्दल आतां पुरी खात्री झालेली आहे. जर्मनीवर कसलाहि प्रसंग आला, अथवा खजिन्यांत पैशाची कितीहि टंचाई पडली, तरी या गंगाजळीस बोटहि लावलें जात नाहीं. तिचा उपयोग फक्त युद्धाच्या वेळींच करावयाचा आहे. या इमारतीवर फारच कडक पहारा ठेवला जातो, हें सांगावयास नकोच. इमारतीभोंवतीं पहाऱ्याचीं तीन कडीं आहेत. याशिवाय जवळून वाहणाऱ्या हावेल नदींतून पाण्याचा एक प्रवाह जवळ आणून ठेवला आहे. जरूर पडल्यास हा प्रवाह सोडल्याबरोबर सारी गंगाजळी पंधरा फूट पाण्यांत बुडून जाते. दर वर्षी खुद्द बादशहा अथवा युवराज या इमारतीची दोनदां तपासणी करतात. नाणीं मोजण्यासाठीं

अतिशय सूक्ष्म फरक दाखविणारे तराजूं तेथें ठेवले आहेत. या तराजूंची रचना अशी खुबीची केली आहे कीं, तेथील सारें सोनें मापून पहाण्यास पुरे दोन तासहि लागत नाहींत. तसेंच हे तराजूं इतके चोख आहेत कीं, खजिन्यांत एका नाण्याची कमतरता असली, तरी तेवढी सुद्धां दाखविल्यावांचून रहात नाहींत.

## २ वाहतुक.

सैन्याची पहिली जमवाजमव करण्याच्या बाबतींत वाहतुकीची बाबत सर्वांत अत्यंत महत्त्वाची आहे. स्किपियोविरुद्ध हॉनिबॉलनें केलेल्या, स्वाऱ्या आणि नेपोलियनच्या मध्य युरोपांतील मोहिमा इतक्या यशस्वी झाल्या, याचें कारण त्यांची सैन्याची झपाट्याची वाहतुक हेंच होय. सध्यांच्या काळीं तर वेळाचें महत्त्व पूर्वीपेक्षां दसपट वाढलें आहे, असें ह्मणावयास हरकत नाहीं. दारूगोळा, माणसें, तोफखाना इत्यादि युद्ध सामग्रीसंबंधीं पाहतां युरोपांतील सर्व राष्ट्रें थोडी फार सारख्याच तोलाची आहेत, असें ह्मणावयास हरकत नाहीं. तसेंच धैर्य, शौर्य, चिकाटी, आवेश इत्यादि वैयक्तिक गुणांतहि साऱ्यांचे शिपायी सारख्याच तोलाचे आहेत. व्यक्तिदृष्ट्या फ्रेंच, रशियन, इंग्लिश, अथवा जर्मन शिपायी यांत ह्मणण्यासारखा फरक आढळून यावयाचा नाहीं. या बाबतींतील सर्वांचा समतोलपणा लष्करी तज्ज्ञाच्या लक्षांत येऊन चुकला आहे. जो कांहीं फरक आहे, तो फक्त तयारीच्या आणि शिस्तीच्या बाबतींत असून वाहतुकीच्या गतींतहि कांहीं फरक पडण्याचा संभव आहे. कोणत्याहि ठाण्यावर ठराविक मुदतींत, शक्य तेवढें मोठें सैन्य जय्यत स्थितींत जें राष्ट्र उभें करूं शकेल, त्याच्याच आरंभीचा फायदा पदरांत पडेल, हें उघड आहे. या वाहतुकीच्या बाबतींत एक दोन मुद्दे विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ठराविक ठिकाणीं जाऊन पोहोंचे-पर्यंत माणसें आणि जनावरें हीं थकून जाणार नाहींत, अशा रीतीनें हें काम झालें पाहिजे. दुसरें असें कीं, देशाच्या ज्या भागांतून त्यांचा हा प्रवास व्हावयाचा असेल, त्या भागाला सैन्याकडून यत्किंचित्‌हि उपसर्ग पोहोंचता कामा नये. सैन्याच्या वाहतुकीमुळें त्या भागांतील रहिवाशांच्या

सामान्य व्यवहारात यत्किंचित्हि व्यत्यय येऊं नये, अशा रीतीनें हें वाहतुकीचें काम चाललें पाहिजे. हे हेतु साध्य होण्याकरतां देशांत अनेक मार्गांची आगाऊ सिद्धता असली पाहिजे. जर्मनीचे भीष्माचार्य यांचें एक लष्करी सूत्र अद्यापिहि जर्मन लष्करानें पाठ करून ठेवलें आहे. तें सूत्र असें:—" वाहतुक निरनिराळ्या रस्त्यानें करावी; पण मोहिम एक मतानें चालवावी."

ज्या देशांतील रेलवे रस्ते, मोठ्या सडका, टपालखातें आणि तारखातें हीं सर्वस्वी सरकारच्या ताब्यांत असतील, त्याच देशांत वाहतुकीचें काम अत्यंत शिस्तीनें पार पाडतां येणें शक्य आहे. जर्मनीच्या जनरल-स्टॉफच्या हातांत ही सारीं साधनें जय्यत आहेत. जर्मनींतील सर्व रेल रस्ते विशेषतः गेल्या वीस पंचवीस वर्षांत बांधलेले रेल रस्ते, केवळ लष्करी दृष्टीनेंच आंखून बांधलेले आहेत. बर्लिन शहर मध्यबिंदु कल्पून जर्मनीच्या रेल्वेचा नकाशा पाहिला, तर कोळ्याच्या जाळ्याशीं त्याचें पुष्कळसें साम्य आढळून येतें. बर्लिनपासून तों थेट फ्रेंच आणि रशियन सरहद्दीपर्यंत कित्येक रेल्वेंचे रस्ते पसरलेले असल्याचें आढळून येईल. हे रस्ते एकेरीच आहेत, असें नसून ते बहुतेक दुहेरी व कित्येक ठिकाणीं तर तिहेरी आणि चोहेरीहि आहेत. वाटेंत या रस्त्यांना दुसरे आडवे रस्ते ठिकठिकाणीं नाक्यांच्या जागीं येऊन भेटतात. म्याकडेबर्ग, हॅनोव्हर, नॉर्डोसेन, क्यासेल, फ्रँकफार्ट, कोलोन, स्ट्राफबर्ग इत्यादि अनेक नाकीं कोळ्यांच्या जाळ्याप्रमाणें दोन्हीं सरहद्दींच्या साऱ्या लांबीवर पसरलीं आहेत. या रेल्वे नाक्यांच्या ठिकाणीं पूर्वीं सांगितलेलें जिल्ह्यांचें मुख्य कोठार असून त्या ठिणाणीं शिबंदी, दारूगोळा आणि शिधासामग्री यांचा बारा महिन्यांचा भक्कम पुरवठा असतो.

रेल्वेच्या द्वारें रक्कमबंद माल किती झपाट्यानें आणि किती लौकर नेतां येईल, याचा तपशील अत्यंत काळजीनें व प्रत्यक्ष अनुभवानें आगाऊ ठरविलेला आहे. मुख्य मुख्य नाक्यांच्या सर्व ठिकाणीं कांहीं इंजिनें व मालांचे आणि माणसांचे डबे लष्करीखात्याच्या उपयोगाकरितां खास राखून ठेवण्यांत आलेले आहेत. मोरोक्कोसारखे प्रकरण उपस्थित होऊन

राजकीय वातावरण क्षुब्ध झालें, तर हीं इंजिनें अहोरात्र पेटवून सज्ज करून ठेवलेलीं असतात.

रेल्वेंतील अधिकारी वर्गांत शेंकडा नव्वद लोक जुने लष्करी अधिकारी असतात, हें पूर्वी सांगितलेंच आहे. यामुळें बादशहांनीं मोहिमेच्या तयारीच्या हुकुमावर सही केल्यापासून पांच मिनिटांच्या अवधींत जर्मन साम्राज्यांतील प्रत्येक रेल्वेचा फाटा लष्करी अधिकारीवर्गास आपल्या ताब्यांत घेतां येतो. वाहतुकीचें कामकाज करण्यांत विशेष निष्णांत असलेले जनरल स्टाफमधील लोक रेल्वेचा सारा कारभार आपल्या ताब्यांत घेतात. या खेरीज खड्या सैन्यांत रेल्वे बांधण्याच्या कामांत वाकबगार अशा लोकांची एक खास तुकडी असते. रेल्वेचा कारभार लष्कराच्या हातांत गेल्याबरोबर गाड्यांचीं जुनीं वेळापत्रकें ताबडतोब बदलून त्या जागीं नवीं लष्करी वेळापत्रकें सर्व स्टेशनावरून चिटकविण्यांत येतात. हीं लष्करी वेळापत्रकेंहि अगाऊच छापून ठेवलेलीं आहेत. वर्षांतून दोन वेळ मोठ्या तालमी होतात, त्या वेळीं या वेळापत्रकांचा उपयोग प्रत्यक्ष अजमाविण्यांत येत असतो.

वर सांगितलेली रेल्वेची गोष्ट, मोठ्या सडका व जलमार्ग यांसहि लागू आहे. कित्येक ठिकाणीं लहानशा खेड्यापाड्यांतूनहि रुंद प्रशस्त आणि पक्के रस्ते बांधलेले असून त्यांजवर केव्हांहि फारशी रहदारी नसते, हें पाहून एकाद्यास फार आश्चर्य वाटेल; पण हे रस्ते सामान्य वाहतुकीसाठीं बांधलेले नसून त्या केवळ लष्कराच्या नाड्या आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवली म्हणजे आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. बर्लिन येथील जनरल स्टाफच्या कचेरींत देशांतील सर्व रेल्वेंचे रस्ते खोदीव नकाशांनीं तयार करून ठेवलेले आहेत. हे नकाशे मोठमोठ्या टेबलांवर बसविलेले असून त्यांजवर कांचेचीं तावदानें आहेत. या नकाशांत जमीनीचें उंच सखल भाग व रेल्वे रस्त्यांचा सारा तपशील प्रत्यक्ष दाखविलेला आहे. या टेबलाशेजारीं बसून व तेथें ठेवलेल्या वाटतील त्या किल्ल्या फिरवून तेथील लोक सर्व वाहतुकीचें काम करतात.

या पद्धतीनें वाहतुकीचें काम किती चोख होतें, हें दर्शविणारी एक

लहानशी गोष्ट सांगतों. थोड्या वर्षांपूर्वी पश्चिम प्रशियांत सैन्याच्या तालमी सुरू होत्या. त्या वेळीं इंग्लंडांतील मिडलंड रेलवेचा नकाशा जनरल स्टाफच्या कचेरींत पोहोंचविण्याकरतां मी गेलों होतों. मी तेथें उभा असतां जनरल स्टाफमधील एक कामगार तेथें आला आणि त्याची पलटण घेऊन जाणारी गाडी कोठपर्यंत पोहोंचली आहे, याचा शोध करूं लागला. नकाशाच्या टेबलाजवळ बसलेल्या एका कामगारानें कांहीं हस्तीदंती बटणें दाबून केवळ अडीच मिनिटांत त्या गाडीचा नक्की पत्ता त्या कामगाराला सांगितला. ती गाडी त्या वेळीं बर्लिनपासून ३१० मैलांच्या अंतरावर असलेल्या दोन स्टेशनांच्यामध्यें होती. गाडीचा नक्की पत्ता कळण्यास किती वेळ लागतो, हें कळण्याची जिज्ञासा मला असल्यामुळें मी घड्याळ काढून पहात होतों. जर्मनीच्या आगबोट कंपन्यांच्या सर्व मालांच्या व उतारूंच्या बोटी आणि त्याचप्रमाणें साम्राज्यांतील सर्व मोटारगाड्या, भाड्याच्या अथवा इतर खाजगी गाड्या आणि सर्व खटारे सरकारला कायद्यानें आपल्या ताब्यांत घेतां येतात. अशा प्रकारें वाहतुकीची तयारी अत्यंत परिणतावस्थेस पोहोंचली असल्यामुळें अठ्ठेचाळीस तासांच्या अवधींत सर्व प्रकारें जय्यत असलेलें दहा लक्ष लष्कर कोणत्याहि सरहद्दीच्या कोणत्याहि ठाण्यावर जर्मनीला जमवितां येतें. आणि आणखी साठ तासांत हीच संख्या दुप्पट करतां येतें.

## ३ पुरवठा.

सैन्याच्या हालचाली पोटावर अवलंबून आहेत, असें नेपोलियन ह्मणत असे. ही ह्मण त्या काळा इतकीच आजहि लागू पडते. लष्करी शास्त्रांत अन्नपाणी आणि दाणा वैरण यांची तरतूद हा एक मोठा महत्वाचा भाग आहे. पांच सात लाख लोकांस काटकसरीनें अन्नपाणी पुरविणें हें शांततेच्या वेळीं देखील मोठें कठिण काम आहे. आणि युद्धाच्या वेळीं म्हटलें, तर याच्या इतकें दुसरें अवघड कामच नाहीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांतून जर्मनीसारखें जें राष्ट्र शिधासामग्रीचा कांहीं भाग बाहेर देशांतून आणतें, त्याला तर हें काम फारच अवघड जातें, यांत नवल नाहीं. युद्ध उपस्थित झाल्यास जर्मनीचा जगाशीं असलेला

संबंध तुटून आपला कोंडमारा होईल, ही गोष्ट जर्मन लष्करी अधिकाऱ्यांच्या लक्षांत आलेली असून आपल्या नेहमींच्या पद्धतीनें त्यांनीं तिजवर तोडहि योजून ठेवली आहे. सैन्यांतील प्रत्येक मनुष्याला बारा महिने पुरेल इतकी शिधासामग्री व चंदीवैरण सरकारी कोठारांत व खाजगी व्यापाऱ्यांकडे कोणत्याहि क्षणीं तयार ठेवलेली असते. एवढी तरतूद अपुरी वाटण्याचा संभव आहे; तथापि युरोपांतील युद्ध बारा महिन्यांहून अधिक काळ चालू राहण्याचा फारसा संभव नाहीं, ही गोष्ट जर्मन लष्करी अधिकाऱ्यांस माहीत आहे.

प्रत्येक वर्षीं हीं सर्व कोठारें उपसून टाकून त्यांतील खराब झालेला अथवा शिळा होत चाललेला माल काढून टाकून त्या जागीं नवा माल भरण्यांत येतो. खाण्याच्या पदार्थांनीं भरलेले लक्षावधि जस्ती डबे दर वर्षीं बाजारभावापेक्षांहि कितीतरी कमी दरानें लष्करी कोठारांतून विकले जातात. चंदी, वैरण बहुधा शेतकरी वर्गांत विकली जाते आणि खाण्याच्या पदार्थांचे डबे गरीब लोकांस विकले जातात. त्याचप्रमाणें लष्कराला लागणारें धान्य व गवतकाडी यांची खरेदी खुद्द शेतकऱ्यांकडून केली जाते. यामुळें लष्करी कंत्राटावर पोसल्या जाणाऱ्या ऐतखाऊ कंत्राटदारांचा वर्ग जर्मनींत अस्तित्वांत नाहीं. कित्येक देशांतील कंत्राटदार लोक आपल्या मातृदेशाशीं किती निमकहरामीनें वागतात, याबद्दलची माझी माहिती मीं तुह्मांस सांगितली, तर तुह्मांस खरोखर फार आश्चर्य वाटेल. असल्या मातृद्रोही लोकांस जर्मनीनें केव्हांहि आश्रय दिलेला नाहीं.

याशिवाय आणखीहि एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. जर्मन लष्कर सदोदित इतक्या जय्यत स्थितींत ठेवलेलें असतें, कीं युद्ध सुरू झाल्यापासून थोड्याच काळाच्या अवधींत युद्धाचा आखाडा शत्रूच्या मुलुखांत जाऊन पडतो. यामुळें जर्मन लष्कर पोसण्याचा भार अर्थातच शत्रूच्या प्रांतावर पडतो. शत्रूच्या मुलुखांतून शिधासामग्री मिळविण्याची विद्या जर्मन लष्करी अधिकाऱ्यांस चांगली अवगत आहे. बोअर युद्धांत इंग्रज अधिकाऱ्यांनीं या कामीं जी चपळायी दाखविली, तितकीच प्रशियन अधिकारीहि दाखवितील, याबद्दल माझी खात्री आहे.

शिधासामग्रीच्या बाबतींतहि शास्त्रीय पद्धतीचा किती उपयोग केला जातो, हें दाखविण्याकरतां एकच उदाहरण सांगतों. वाटाणे, कणिक, डुकराचें मांस, मीठ आणि मसाला हीं एकत्र करून तीं कोरड्या हवेच्या दाबानें वाळवून व एक जीव करून त्यांचे तुकडे जस्ती डब्यांत भरून ठेवलेले असतात. प्रत्येक डब्यांत हें अन्न पाव रत्तल असतें. हें वजनांत फार हलकें, अतिशय पौष्टिक, कधींहि न नासणारें, प्रकृतीस पथ्यकर व अत्यंत रुचकर असतें. डबा फोडून आंतील तुकडा कढत पाण्यांत मिसळल्याबरोबर अन्न तयार होतें. या अन्नाची करोडों डबडीं लष्करी कोठारांत सैन्यासाठीं भरून ठेवलेलीं असतात.

## ४ बातम्या.

ज्याच्या मेहनतीवर आणि बातम्यांवर जर्मनस्टाफचें काम मुख्यतः अवलंबून असतें, असें खातें ह्मणजे, बातमीखातें हेंच होय. इतर राष्ट्रांनीं लाविलेले शास्त्रीय शोध, त्यांची लष्करी बाबींतील प्रगति, त्यांनीं बांधलेले नवे किल्ले व तयार केलेली नवी यंत्रसामुग्री यांजबद्दल बातमीखात्यांतून ज्या स्वरूपाची बातमी मिळेल, त्यावरच जनरल स्टाफचें भावी कार्य अवलंबून असतें. यामुळें या खात्यांत अत्यंत तरतरीत अशा तरुण कामगारांचा भरणा केलेला असतो, हें रास्तच आहे. या खात्यांतील मनुष्यांचें शिक्षण व ज्ञान हीं अति उंच प्रतीचीं असून त्यांना कामहि फार कसून करावें लागतें. केवळ एकाच विषयाकडे पुष्कळ वर्षें—किंबहुना सारें आयुष्य खर्च केलें आहे, अशीं मनुष्यें या खात्यांत कामावर असतात.

स्वतःच्या देशाबद्दल जशी खडानखडा माहिती जर्मन जनरल स्टाफच्या कचेरींत असते, त्याचप्रमाणे युरोपांतील साऱ्या देशासंबंधानेंहि नित्य जमवून ती संग्रहीं ठेवण्याचा उद्योग प्राशियन लष्करी अधिकारी कित्येक वर्षांपासून करीत आहेत. १८७०–७१ च्या फ्रांको-जर्मन मोहिमेंत अगदीं खालच्या दर्जाच्या लेफटेनंटपर्यंत प्रत्येकाजवळ फ्रान्सांतील प्रत्येक प्रांताचे नकाशे आणि खेड्यापाड्यासुद्धां सर्व ठिकाणाची तपशीलवार माहिती होती. खुद्द फ्रेंच सेनापतींना सुद्धां जितकी माहिती नसेल, तितकी माहिती प्रत्येक प्रशियन लेफ्टेनंटाजवळ होती. न्युसेनबर्ग, ओथ आणि मेट्झ

येथील पराभवानंतर फ्रेंच सेनपतींनीं कित्येक मार्‍याचीं ठिकाणें फुकटांत सोडून दिलीं, हें आतां सर्वश्रुतच आहे. त्या विशिष्ट जागांची योग्य प्रकारची माहिती त्यांजपाशीं नसल्यामुळें त्यांचें महत्त्वच त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. स्वतःच्याच देशाबद्दल त्यांजजवळ इतकें अज्ञान होतें. प्रशियाच्या बाबतींत अशी चूक होण्याचा कधीं संभवच नाहीं. ज्यांतील भूमीचे नकाशे प्रत्येक तपशिलासुद्धां जर्मनीनें तयार केलेले नाहींत, असा एकहि देश सार्‍या युरोपांत नाहीं. जनरल स्टाफच्या दसरांत या सर्व बाबी योग्य रीतीनें नोंदून ठेवलेल्या आहेत. अशा प्रकारें जगांतील सारीं लष्करी खातीं आपापली तयारी करीत असतातच; पण या बाबींत जर्मनी-इतकी मेहनत दुसरें कोणतेंहि राष्ट्र घेत नाहीं.

कोनिगर ग्राटझर स्ट्रासविरील आरमारी खात्यांत माझें शिक्षण चालू असतां, एके वेळीं इंग्लंडांतील लिंकनशायर परगण्यांतून दोन शहरांमधील अंतराबद्दल माझ्या शिक्षकाचा व माझा वाद झाला. तेव्हां आमच्या भांडणाचा निकाल लावण्याकरतां आमच्या गुरुमहाराजांनीं टेबलाजवळील एक खुंटी पिरगळून नं. ६४ चा नकाशा मागविला व त्याबरोबर त्या नकाशेखात्याच्या कामगारालाहि बोलाविलें. तावडतोब तो नकाशा घेऊन ते कामगार हजर झाले. हा अम्मलदार पंचवीस वर्षांहून अधिक वयाचा नव्हता. लिंकनशायर परगण्यांतील ज्या गावांबद्दल आमच्यांत वाद चालला होता, त्या गांवाबद्दलची सर्व माहिती सरळ इंग्रजी भाषेंत मला तो खडाखड सांगूं लागला. त्या प्रांतांतील सारे रस्ते, त्या रस्त्यांवरचीं घरें, शेतकर्‍यांच्या झोंपड्या आणि घिसाड्यांचीं दुकानें, यांचें सुद्धां वर्णन त्यानें आपल्या माहीतींत सोडलें नाहीं. त्याभागाची त्याला इतकी खडान-खडा माहिती आहे, हें पाहून मला फार आश्चर्य वाटलें. 'तूं त्या प्रांतांत बरींच वर्षें घालविलीं असावींस?' असें मीं त्याला ह्मटलें; तेव्हां तो ह्मणाला; 'जर्मनीच्या बाहेर अद्यापि मीं पाऊलहि ठेवलें नाहीं. माझा फार लांबचा समुद्राचा प्रवास ह्मटला, ह्मणजे मी एकदां हेलिगोल्यांडला गेलों होतों, तेवढाच.' त्याचें हें उत्तर ऐकून मला किती आश्चर्य वाटलें असेल, याची तुह्मीच कल्पना करा. यानंतर मीं जी कांहीं चवकशी केली

व निरनिराळ्या खात्याशीं जो माझा संबंध जडला, त्यावरून इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया यांचे तपशीलवार नकाशे बातमीखात्यांत असल्याचें मला कळून आलें. यांपैकीं प्रत्येक देशाचे वेगवेगळे भाग केलेले असून या प्रत्येक भागावर दोन अधिकारी आणि एक चिटणीस यांची नेमणूक केलेली असते. त्या भागाची अगदीं बारीकसारीक सुद्धां माहिती त्यांस आपल्याजवळ ठेवावी लागते. जर्मन हेरांचें जाळें सर्व युरोपभर दाट पसरलेलें असल्यामुळें ताजीताजी माहिती रोजच्या रोज येत असते.

बातमीखात्यांत व्यक्तिविषयक पलटण म्हणून हेरांची एक स्वतंत्र तुकडी असते. मोठमोठ्या राष्ट्रांतील लष्करी आणि आरमारी कामदारां-बद्दल व्यक्तिविषयक माहिती मिळविणें हे या तुकडींतील लोकांचें काम आहे. मुख्य अॅडमिरलापासून तों कर्नेलापर्यंत प्रत्येक अम्मलदाराच्या परिस्थितीबद्दल माहिती यांस गोळा करावी लागते. त्यांच्या खाण्या-पिण्याच्या संवयी, त्यांचा स्वभाव, त्यांच्या आवडीनिवडी आणि त्यांची सांपत्तिक स्थिति, यांजबद्दलची माहिती जर्मन बातमीखात्यांत नेहमीं तयार असते. या पद्धतीचा फायदा कसा होतो, हें तज्ज्ञांस सांगावयास नकोच. सामान्य वाचकाला मात्र हें रहस्य तत्काळ समजावयाचें नाहीं. लढाईच्या वेळीं शत्रूच्या सेनापतीचा स्वभाव कसा आहे, याची उत्तम बातमी ज्याला आहे, असा अधिकारी या माहितीचा फायदा पुष्कळ प्रकारें करून घेतो. स्वतःच्या गिऱ्हाइकाबद्दल पूर्ण माहिती असलेल्या एखाद्या वाण्याला ज्याप्रमाणें फायदा मिळवितां येतो, त्याचप्रमाणें ही गोष्ट आहे. हें तत्त्व जर्मन लष्करी अम्मलदारांनीं पुरातनकाळापासून ओळखलें असून तदनुसार आपली वर्तणूक ठेवली आहे.

---

## आकाशयानें.

युरोपियनराष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यांत क्रांति करून टाकणारें एक नवेंच यंत्र सांप्रत उपस्थित झालें आहे. हें यंत्र म्हणजे आकाशसंचारक विमानें हें होय.

जगांत ज्या ज्या कांहीं युक्त्या निघतील, आणि जो जो नवा शास्त्रीय शोध लागेल, त्याचा संग्रह आपल्या युद्धयंत्रासाठीं करावयाचा, अशी जर्मनीची पद्धत कित्येक वर्षांपासून चालू आहे. लिलियनथॉल यानें पहिलें विमान उडविल्यास आज बराच काळ लोटून गेला. त्याचें यान आकाशांत फक्त चारच मिनिटें तरंगत होतें. तेव्हांपासून आकाशसंचाराची कला वाढतां वाढतां आतां तिला केवढें स्वरूप आलें आहे, पहा! आतां पंचवीस माणसें व बारा टन दारूगोळा बरोबर घेऊन सांप्रतचें अस्मानी जहाज पंचवीस तासांची फेरी खुशाल करूं शकतें. जर्मनीनें एक अस्मानी जहाज असें बांधलें होतें कीं, तें शहाण्णव तास एकसारखें हवेंत होतें व या अवधींत तें एकसारखें दर तासास अडतीस मैल या वेगानें धांवत होतें यांतहि विशेष मौज ही कीं, त्याला जवळ जवळ चाळीस मैल वेगाचा तोंडचा वारा सहन करावा लागला. असल्या प्रकारच्या युक्त्यांनीं युद्धसाहित्यांत क्रांति होऊन गेली, तर नवल नाहीं.

आकाशसंचाराच्या विद्येत जर्मनी किती पुढें सरसावला आहे, व त्यानें यांत किती प्राविण्य मिळविलें आहे, हें दाखविण्याचाच माझा उद्देश आहे. पूर्वीं कोणींहि प्रसिद्ध न केलेली अशी माहिती आज प्रथमच मी सांगणार आहें. ही माहिती बर्लिन येथील जनरल स्टाफ-वांचून बाहेरच्या कोणाहि इसमाला नाहीं. युरोपांतील प्रधानमंडळांनाहि ती समजलेली नाहीं.

अगदीं नव्याच पद्धतीचें अस्मानी आरमार जर्मनीजवळ आहे, ही गोष्ट निःसंशय खरी आहे. १९०८–९ च्या सरकारी अंदाजपत्रकांत बारा झेपेलिन बांधून तीं जय्यत ठेवण्यास लागणाऱ्या खर्चाची सरकारनें मंजुरी दिलेली आढळून येते. जर्मनीच्या अस्मानी आरमाराबद्दल जगाला जी कांहीं माहिती आहे, ती इतकीच; पण सरकारी रीत्या उघडपणें प्रसिद्ध केलेल्या संख्येच्या तिप्पट अस्मानी आरमार जर्मनीजवळ आहे, यांत शंका नाहीं.

आकाशी आरमाराचीं मुख्य ठाणीं जर्मनींत पांच असून त्यांची योजना फार नाजुक अशा मार्‍याच्या जागीं केलेली आहे. यांपैकीं दोन

ठाणीं फ्रेंच सरहद्दीवर असून एक रशियन सरहद्दीवर, एक अटलांटिक किनाऱ्यावर व एक खुद्द बर्लिन येथें आहे. स्ट्रास्बर्ग, मेननदीवरील फ्रँकफर्ट, पोझन, वुइलियमशेवन आणि बर्लिन इतक्या ठिकाणीं हीं ठाणीं आहेत. यांखेरीज उत्तर समुद्रांतील हेलिगोल्यांड येथें असलेलें ठाणें वेगळेंच. त्याचा संबंध फक्त इंग्लंडापुरताच आहे. हेलिगोल्यांड येथील ठाण्याबद्दल कोणालाच फारशी माहिती उपलब्ध झालेली नाहीं. फक्त तेथल्या नियमित कामदारांशिवाय दुसऱ्या कोणासहि हजार यार्डांच्या मर्यादेच्या आंत येऊं दिलें जात नाहीं. या ठाण्यासंबंधानें मला जी कांहीं माहिती मिळाली आहे, ती मी येथें नमूद करतों.

या लष्करी ठाण्याशिवाय कांहीं व्यापारी स्टेशनेंहि ठिकठिकाणीं असून त्यांचा उपयोग लोकांस करून देण्यांत येतो; तथापि व्यापारी समुद्र-यानावर जर्मन सरकारची ज्याप्रमाणें पूर्ण सत्ता असते, त्याचप्रमाणें या अस्मानी जहाजावरहि सरकारची सत्ता असून कांहीं द्रव्य देऊन सरका-रांनीं तीं आपल्याकरतां राखून ठेवलेलीं आहेत. थोड्याशा तासांच्या मुदतींत त्यांचें व्यापारी स्वरूप पालटून व त्यांस लष्करी रूप देऊन सरकारास त्यांचा उपयोग करतां येतो. अशा रीतीनें लष्करी व व्यापारी अस्मानी जहाजांची मोजणी केली, तर युद्धाच्या प्रसंगीं जर्मनीला पन्नास प्रचंड अस्मानी जहाजें उपयोगांत आणतां येण्यासारखीं आहेत. झेपेलिन जहाजास वारंवार अपघात होत असतात व त्यांत अनेक प्रकारचें वैगुण्य आढळून येत असतांहि जर्मनराष्ट्र आपल्या अस्मानी आरमारावर दरसाल दीडकोट रुपये खर्च करण्यास हट्ट कां करते, याचें कित्येकांस मोठें नवल वाटेल. खरोखर हा मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. यासंबंधीं एक विशेष खुबीची गोष्ट मला प्रत्यक्ष माहीत आहे. ही गोष्ट जनरल स्टाफला व अस्मानी कप्तानांनाहि अर्थातच माहीत आहे. कांहीं अस्मानी जहाजें लष्करी दृष्टीनें तालमीच्या प्रसंगीं उपयोगांत आणलीं जात असतांहि हींच जहाजें उतारूंची ने-आण करतांनाहि वापरलीं जातात ही गोष्ट सर्वविश्रुतच आहे. या पद्धतीबद्दल वर्तमानपत्रांतून पुष्कळ वेळां उघड चर्चा होत असल्यामुळें तिची माहिती सर्व जगास झाली आहे.

अस्मानी जहाजें वापरण्याची दुसरी एक पद्धत असून ती अगदीं गुप्त राखण्यांत आली आहे. लष्करी तालमीच्या वेळींहि या पद्धतीचा उपयोग केला जात नसून कांहीं विशेष प्रसंगीं तिचा उपयोग अत्यंत गुप्तपणें केला जातो. या पद्धतीनें अस्मानी जहाजांचा उपयोग केल्यास अपघातांचें भय पंचाहत्तर टक्क्यांनीं कमी करतां येते, असा अनुभव आला आहे. यासंबंधाची सारी माहिती व आंकडे फक्त जनरल स्टाफला मात्र माहीत आहेत.

यासंबंधीं तज्ज्ञांनीं केलेल्या टीकेचा विचार आपण येथें करूं. जर्मन झेपेलिनपेक्षां एरोप्लेन किंवा साधी आकाशयानें अधिक श्रेष्ठ आहेत, असें म्हणणारे टीकाकार मुख्य तीन मुद्दे पुढें आणतात. १. झेपेलिन जहाज आकाशयानापेक्षां बांधणींत अधिक जड व आकारानें मोठें. २. ज्या वायूच्या जोरावर हें जहाज आकाशांत वर चढतें, तो वायु पेटण्याची भीति असते. ३. जरूरीइतका वेळ आकाशांत तरंगत राहण्यास पुरेसा वायु त्यांत भरतां येत नाहीं.

जर्मनीच्या युद्धखात्यानें या तिन्ही बाबींत रामबाण युक्त्या योजिल्या आहेत. अस्मानी जहाज फार जड होऊं नये म्हणून एक नवेंच मिश्रण जर्मन रसायनशास्त्र्यांनीं शोधून काढलें आहे. हें मिश्रण अलिमिनियमपेक्षां हलकें असून अलिमिनियमचा चिवटपणा त्याच्या अंगीं पूर्णपणें आहे. आणि याशिवाय पोलादांतील स्थिति स्थापकत्व गुणहि त्याच्या अंगीं अधिक आहे. जर्मनीच्या अंदाजपत्रकांत बारा अस्मानी जहाजें उघडपणें दाखविलीं आहेत. त्यांत या मिश्र धातूचें जहाज नाहीं. हें मिश्रण कसें केलें आहे, हें रहस्य जर्मनसरकारानें सात कुलुपांत ठेवलें असून तें मिळण्याकरतां युरोपांतील कोणताहि देश करोडो रुपये खर्चण्यास राजी होईल.

अस्मानी जहाज उचलणारा वायु पेटूं नये यावरहि युक्ति योजण्यांत आली आहे. स्पँडा येथील सरकारी रसशाळेंत एक नवा डाय ऑक्सिन ग्यास तयार करण्यांत येत असतो. हायड्रोजन वायूपेक्षां हा वायु तिप्पट हलका असून त्याशिवाय हायड्रोजनप्रमाणें तो पेट घेत नाहीं, हा गुण

त्यांत विशेष आहे. या वायूचे केलेले प्रयोग मीं स्वतः पाहिले आहेत. प्रकाश देण्याकरतां या वायूचा उपयोग करतां येत नाहीं. या वायुनें भरलेली जहाजे स्फोटानें दगावत नाहींत. या वायूंत आणखीहि एक विशेष गुण असा आहे कीं, तो प्रवाही रूपांत तयार करतां येतो. अस्मानी जहाजांत या गुणाचा उपयोग केवढा होतो, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. या पाण्यासारख्या प्रवाही वायूचा संयोग हवेशीं होण्याबरोबर त्याची वाफ होऊन तिचें अदृश्य वायूंत रूपांतर होतें. सहा इंची व्यासाच्या आणि दोन फूट लांबीच्या धातूच्या नळींत प्रवाहिरूपानीं हा वायु कितीतरी सांठवितां येतो. अशा नळ्या प्रवाही वायूंनीं भरून जहाजावर घेतल्या, म्हणजे हवेंतल्या हवेंत या वायूचा नवा पुरवठा दीर्घ काळपर्यंत करतां येणें अवघड नाहीं, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. अशा रीतीनें झेपेलिन जहाजांतले दोष जर्मन लष्करी-खात्यानें कसे नाहींसे केले आहेत, हें वाचकांस कळून येईल.

१९१२ सालीं एक्स (X) या नांवाचें एक झेपेलिन जहाज युद्ध-खात्यानें तयार करून त्याचा प्रयोग पाहिला. हें जहाज स्टेटीन येथून निघालें, तें बाल्टिक समुद्रावरून स्वीडनमधील उपसाला या गांवीं जाऊन तेथून पुनः फिनलंडच्या उपसागरांतील रिगा बंदरावर येऊन व तेथून स्टेटीन येथें परत आलें. या प्रवासांत या जहाजानें ९७६ मैलांचें अंतर तोडलें. या अस्मानी जहाजावर २५ मनुष्यें आणि पांच टन वजन होतें. हा प्रवास मार्च महिन्यांत झाला. हवा वादळी असून पाऊस व गारा हीं सपाट्यानें पडत होतीं. या प्रवासानें कोणती महत्त्वाची गोष्ट सिद्ध केली, हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. स्ट्रास्बर्ग किंवा डुसेलडॉर्फ येथून पॅरीस किंवा इतर फ्रेंच महत्त्वाच्या जागेचें अंतर सुमारें ३०० मैल आहे. अर्थात् एकादें झेपेलिन पॅरीसला जाऊन व तेथें आजूबाजूला फेऱ्या घालून स्वस्थळीं सुखरूप परत येणें शक्य आहे. याशिवाय जर्मन लष्करी-खात्यानें जे अनेक अनुभव घेऊन पाहिले आहेत, त्यावरून जळण किंवा वायु यांचा नवा पुरवठा घेण्याकरतां मध्यें कोठेंहि न उतरतां झेपेलिन यानें लांबलांबचा प्रवास करूं शकतात. ही गोष्ट निःसंशय सिद्ध झाली आहे.

जर्मनीच्या अस्मानी सैन्याची रचना कशी आहे, हें आतां सांगतों. या सैन्यांत एकंदर दहा तुकड्या असून प्रत्येक तुकडींत ३५० माणसें असतात. केवळ याच कामासाठीं यांना शिक्षण दिलेलें असतें. यांतील सर्व माणसें पहिल्या प्रतीच्या कारागिरांतून निवडलेलीं असतात. अतिशय शूर व बुद्धिवान अशाच तरुणांची नेमणूक अम्मलदारांच्या जागीं केली जाते. सैन्यांत दिल्या जाणाऱ्या पगाराच्या मानानें या माणसांच्या पगाराचें प्रमाण फारच अधिक असतें. जर्मनीच्या लष्करी यंत्रापैकीं दुसऱ्या कोणत्याहि खात्यांतील लोकांस एवढा मोठा पगार मिळत नाहीं. या सैन्याची भरती सामान्य वर्गांतून केली जात नाहीं. लष्करी कायद्याचा दोन वर्षांचा नियम या खात्याला लागू नाहीं. बहुतेक लोक बऱ्याच लांबपर्यंतच्या मुदतीच्या करारानें बांधलेले असतात. विवाहित तरुणास बहुधा या खात्यांत नौकरी मिळत नाहीं. या नौकरींत जिवाला धोका अधिक आहे, हें उघड आहे. अस्मानी जहाजांचीं सर्व ठाणीं फारच तपशीलवार रीतीनें सज्ज केलेलीं असतात. मनुष्याच्या बुद्धीला सुचणाऱ्या साऱ्या युक्त्या या ठाण्यांत तुह्मांला आढळून येतील. प्रत्येक ठाणें सदोदित पूर्ण स्थितींत सज्ज ठेवलेलें असतें. कोणत्याहि जिनसेकरतां एका ठाण्याला दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें लागत नाहीं. उदाहरणादाखल हेलिगोल्यांड येथील ठाण्याचें वर्णन मी येथें देतों. हें ठाणें नवीनच बांधलें असून त्याबद्दलची सर्व माहिती गुप्त राखण्यांत आली आहे.

हेलिगोल्यांड बेटाच्या अगदीं पूर्वेकडच्या कोंपऱ्यांत वाळूचे मोठमोठे ढीग दिसत असतात. येथेंच लंबचौकोनी आणि धुरकट रगाच्या प्रचंड अशा तीन इमारती बांधलेल्या आहेत. या इमारतींपासून १००० यार्डांच्या अंतराच्या आंत कोणासहि फिरकूं दिलें जात नाहीं. या भागाकडे जाण्यास एकच रस्ता असून त्या रस्त्यावर तीन चौक्या आहेत. या रस्त्याकडे तुह्मी जाऊं लागला, तर पाहिल्या चौकीपासून शंभर यार्डांवरच सूचनांच्या पाट्या तुह्मांस आढळून येतील. ही हद्द ओलांडून गेल्यास गुन्हेगारास ताबडतोब शिक्षा होईल, असें या पाट्या तुह्मांस स्पष्टपणें सांगतात. या पाट्यांचा हुकूम अमान्य केल्यास ताबडतोब जबर

शिक्षा होते, असा अनुभव पुष्कळ जर्मन प्रवाशांसहि आला आहे; तथापि न भितां आपण आणखी थोडें पुढें जाऊं या.

आकाशयानासाठीं बांधलेल्या इमारतीपासून पन्नास यार्डांवर जाऊन आपण पोहोंचलों, ह्मणजे कांटेरी तारांचें एक उंच कुंपण आपणांस दिसतें. या तारा मागल्या दोन चौक्यांशीं विद्युत्प्रवाहानें जोडलेल्या आहेत. एखादा धाडसी हेर रात्रीच्या वेळीं येथवर आला व या तारांतून पलीकडे जाण्याचा प्रयत्न करूं लागला, तर त्यांस त्याचा स्पर्श होण्याबरोबर या दोन्ही चौक्यावर एकदम घंटांचा गजर होऊं लागतो. अशा रीतीनें एकामागें एक सहा कुंपणें आहेत. हीं कुंपणें ओलांडून आपण आणखी पलीकडे जाऊं. या कुंपणांच्या मागें एक अष्टकोनी उंच मनोरा उभा आहे. या मनोऱ्याच्या शिखरावर दोन प्रखर उजेडाच्या शोधक बत्त्या आहेत. तसेंच या ठिकाणीं बिनतारांचें संदेशयंत्रहि ठेवलेलें आहे. हें यंत्र सर्व झेपेलिन जहाजांबरोबर असतें. येथील शोधक बत्त्यांचा प्रकाश इतका उज्ज्वल आहे कीं, अमावास्येच्या मध्यरात्रींहि भर मध्यान्हाचा प्रकाश त्यांतून उत्पन्न होतो. वर सांगितलेल्या तीन इमारती एकाच ओळींत शेजारीं शेजारीं बांधलेल्या आहेत. यांतील मधली इमारत सर्वांत मोठी असून तींत पूर्ण तयारीचीं दोन अस्मानी जहाजें राहूं शकतात. दुसऱ्या दोन इमारतींपैकीं प्रत्येकीं एकेक जहाज असतें. या इमारतींची लांबी ८०० फूट असून रुंदी २०० फूट आणि उंची १५० फूट आहे. या इमारती सुमारें चाळीस डिग्रीपर्यंत हालवितां येतात. एंजिनचें तोंड फिरविण्यासाठीं स्टेशनावर केलेल्या योजनेप्रमाणेंच ही योजना आहे. वारा कोणत्याहि दिशेनें वहात असला, तरी त्रास न होतां जहाज बाहेर काढतां यावें, या हेतूनें ही योजना करण्यांत आली आहे. आजूबाजूच्या दिसणाऱ्या चिन्हांवरून येथें आणखीहि कांहीं इमारती उठविण्याचा बेत जर्मन सरकारचा असावा असें वाटतें. किंबहुना आणखी निदान एका तरी इमारतीची पूर्व तयारी आपणांस येथें आढळून येते. सरकारचें एक हवामापक खातें येथें ठेवलेलें असून त्यांत हवामानाच्या अगदीं सूक्ष्मभेदहि दाखविणारीं यंत्रें जोडीजोडीनें ठेवलेलीं असतात.

या यंत्रांची देखरेख करणारे कामदार आपापल्या विद्येंत अत्यंत निष्णात असे आहेत.

मी हेलिगोल्यांड येथें गेलों होतों, तेव्हां तेथील तटबंदींत बराच महत्त्वाचा फेरफार झाला असल्याचें मला आढळून आलें. पूर्वी या तटबंदीवरील लष्करी तयारी अगदीं पहिल्या प्रतीची होती; पण येथें आरमारी ठाणें झाल्यापासून या तटबंदीची तयारी दुय्यम प्रतीची झाली आहे. पूर्वीच्या शिबंदींतील सगळीं माणसें कमी झालीं असून त्यांची रवानगी दुसऱ्या कोठें करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें तेथील तोफखानाहि बराच कमी झाला आहे. या बेटांतील पूर्वेच्या बाजूच्या कोंपऱ्यांत तेथील प्रत्यक्ष कामदारावांचून दुसऱ्या कोणाचाहि प्रवेश आजवर झालेला नाहीं. या ठिकाणीं पूर्वी पांच अस्मानी जहाजें ठेवण्याची तयारी होती, हें मला प्रत्यक्षच माहीत आहे. त्यानंतर या तयारींत भर पडली नसेल, असें घेऊन चाललें, तरीसुद्धां येथल्या तयारीपुढें कोणाहि शत्रूचा पाड लागण्यासारखा नाहीं. हेलिगोल्यांडला तटबंदी अथवा बुरूज यांचें कारणच उरलेलें नाहीं. हे नवे हवेंतले किल्ले एकवार आकाशांत गेले कीं, तेथून आजूबाजूस प्रत्यक्ष मृत्यूचें साम्राज्य सुरू करतील. त्यांतून होणाऱ्या वज्रपातापुढें कोणाचाहि टिकाव लागण्याचा संभव नाहीं.

हेलिगोल्यांड हें बेट पूर्वी इंग्लंडच्या मालकीचें होतें. आतां तें इंग्लंडचें हितशत्रु होऊन बसलें आहे. लॉर्ड सालसबरी हे इंग्लंडचे मुख्य प्रधान असतां त्यांनीं हेलिगोल्यांड बेट देण्याचें साटें बिस्मार्क यांजकडे करून त्याच्या बदल्यांत पूर्व आफ्रिकेंत कांहीं सवलती जर्मनीकडून मिळविल्या. आतां हें हेलिगोल्यांड बेट जर्मनीचें मुख्य संरक्षक होऊन बसलें आहे. जर्मनीच्या व्यापारी नाड्यांचें केंद्रस्थान हँबर्ग या बंदरीं असून हँबर्गची शेंडी हेलिगोल्यांडच्या हातांत आहे. पांच हवेंतल्या किल्ल्यांनीं सज्ज झालेलें हेलिगोल्यांड हँबर्गचें रक्षण करण्यास उभें आहे, तोंवर त्याच्या केंसासहि धक्का लावण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. एका बाजूनें हँबर्गचें रक्षण हेलिगोल्यांड याप्रमाणें करीत असतां, समोरच अस-

लेल्या इंग्लंडकडे तें डोळे वटारून पहात आहे. यांतील हवेंतील किल्ले समुद्र ओलांडून पलीकडे केव्हां जातील हें कोणीं सांगावें ? सुखासमाधानानें नांदत असलेल्या राष्ट्रांतहि वैराग्नि केव्हां भडकेल, हें कोण सांगू शकेल ?

आतां या अलीकडच्या अस्मानी जहाजांचें सामर्थ्य काय असतें, याचा विचार करूं. या नव्या पद्धतीच्या जहाजांत नव्या पद्धतीचा वायु भरलेला असल्यामुळें हवेंत उडण्याची त्याची शक्ति पूर्वींपेक्षां तिपटीनें वाढली आहे. तसेंच डीझल पद्धतीची सुधारणा केलेली नवी एंजिनें यांत बसविलीं आहेत. या एंजिनांचें रहस्यहि जर्मन सरकारनें अगदीं गुप्त ठेवलें आहे. बुइलियमसेव्हन आणि कील येथील गोद्यांत या जातीचीं पन्नास एंजिनें जोडून तयार आहेत. युद्ध सुरू झाल्याबरोबर हीं एंजिनें पाणबुड्यांत किंवा अस्मानी जहाजांत तावडतोब बसवितां येतील, अशा पद्धतीचीं आहेत. या नव्या एंजिनांनीं झेपेलिन जहाजांचें सामर्थ्य किती वाढलें आहे, हें कोणाच्याहि लक्षांत आलेलें नाहीं. सध्यांतरी तें कल्पनातीत आहे, ही गोष्ट खरी. आरंभीं हीं जहाजें फक्त पन्नास मैल ये जा करण्यापुरतीं उपयोगांत पडत असत; पण त्यांचें हें सामर्थ्य आतां ७००।८०० मैलापर्यंत वाढलें आहे. X१५ या नांवाचें एक झेपेलियन जहाज २४ मनुष्यें, सहा जलदबारी तोफा आणि सात टन दारूगोळा एवढें साहित्य बरोबर घेऊन स्टेटीनहून निघालें, तें बाल्टिक समुद्रावरून स्वीडनमधील स्वेंडबोर्ग गांवीं जाऊन तेथून पुन्हां जर्मनीच्या स्वाईनमुंड गांवीं येऊन उतरलें. त्या वेळींहि त्यांत आणखी छत्तीस तासांच्या प्रवासाची सर्व सामग्री शिल्लक होती. हें सारें अंतर ५००—६०० मैल आहे. इंग्लंड आणि जर्मनी यांमध्यें युद्ध सुरू झालें, तर या यानांचें सामर्थ्य काय करूं शकेल, हें अधिक सांगणें नकोच.

या जहाजांत फक्त सातच टन दारूगोळा जातो, असें नाहीं. जरूर पडल्यास हें जहाज चौदा टनांपर्यंत वजन घेऊं शकेल, असें एका तज्ज्ञनें मला सांगितलें आहे. हीं जहाजें जों जों अधिकाधिक मोठीं होतील, तों तों तीं अधिकाधिक वजन उचलतील, हें निर्विवाद आहे.

असल्या जातीच्या बारा राक्षसी गिधाडांनीं एकाद्या मोठ्या शहरावर हल्ला केला, तर त्याची काय दशा होईल, याची कल्पना करा. संरक्षणासाठीं ह्मणून आजपर्यंत निघालेल्या सर्व युक्त्या या गिधाडधाडीपुढें रद्द पडतील. झेपेलिन जहाजें ७।८ हजार फूट उंच उडत असल्यामुळें तीं फुटबॉलहून अधिक मोठी दिसत नाहींत. झेपेलिन यानें दहा हजार फूट उच उडाल्याचें मला प्रत्यक्ष माहिती आहे. इतक्या उंचीवरहि आंतील माणसांस थंडीची बाधा न होण्याची व्यवस्था केली आहे. माणसांस बसण्याकरतां केलेल्या खोल्या कृत्रिम साधनांनीं इतक्या उबदार ठेवतात, कीं, जणूं काय आपण आपल्या घरींच बसलों आहों, असें आंत बसणारास वाटतें. या जहाजांची ज्यांना फक्त अर्धवट माहिती आहे, त्यांना असें वाटतें, कीं छोटी आकाशयानें यांना निकामी करूं शकतील. आतां सहा हजार फूट उंचीवर गेलेल्या छोट्या आकाशयानांची (एरोप्लेन) दशा काय असते, तें पहा. झेपेलिन जहाज त्यावर आणखी ३।४ हजार फूट असतें याचा विचार करा. सहा हजार फूट उंचीवर गेलेल्या छोट्या आकाशयानांतिल मनुष्य थंडीनें इतका गारठून गेलेला असतो, कीं, आपलें भान कसेंबसें सांभाळण्याहून अधिक कांहीं करण्याचें सामर्थ्य त्यांस राहिलेलें नसतें. अशा स्थितींत स्वतःच्या डोक्यावर दोन तीन हजार फूट असलेल्या झेपेलिनयानास तो कितपत इजा करूं शकेल, याचा तुह्मीच विचार करा. एखादा मनुष्य छोट्या आकाशयानांतून प्रसंगीं आठ हजार फूटपर्यंत वर गेला, तर थंडीनें त्याची काय अवस्था होते, हें त्याचें त्यालाच विचारलें पाहिजे. थंडीनें धनुष्य वळलेला मनुष्य उबदार जागेंत चैनीनें शांतपणें बसलेल्या मनुष्यास कितपतशी इजा करूं शकेल ! जर्मन लोक या प्रश्नाला आपल्या लष्करी भाषेंत 'क्रॅश' एवढेंच उत्तर देतील.

झेपोलिन जहाज आठ हजार फूट उंचीवर दर तासास ३५ पासून ६० मैलाच्या वेगानें धांवत असते. इतक्या उंचीवर त्याचा आकार एकाद्या चेंडू एवढा दिसतो. अशा स्थितींत जमीनीवरचा तोफखाना त्याजवर लागू पडण्याचा संभव फारच थोडा आहे. त्यांतुनहि या गिधाडाला

अंधाऱ्या रात्रीचा फायदा घेतां येतो, हें वेगळेंच. ग्चा अंतर्भाव ढवळ्या एकाद्या ढगाच्या मागें लपून राहण्याचीहि त्यांस सव - प्रांतांची आतां इतक्या सवलती असलेलें हें गिधाड एकाद्या मोठ्या शहरा. कांहीं तर वरून कुलपी गोळ्यांचा भडीमार करून त्या शहराची तें किती दुर्दशा करूं शकेल, याची तुह्मीच कल्पना करा. तेथें मोठ्या निशाण-बाजीचेंहि काम नको. एकाद्या विशिष्ट पदार्थावर त्यांना निशाण मारावयाचें नसतें. जर्मन लष्करी खात्यानें नवीन पद्धतीनें तयार केलेले कुलपी गोळे नुसते इतस्ततः पेरीत जावयाचें, इतकेंच त्यांचें काम आहे. हा नव्या पद्धतीचा कुलपी गोळा जेथें पडेल, तेथें आगीचा प्रचंड लोळ उद्भवितो. अशा रीतीनें एकाद्या मोठ्या शहराची होळी हें जहाज हां हां ह्मणतां करूं शकेल.

एरोप्लेन, बायप्लेन, मोनोप्लेन इत्यादि असंख्य जातींचीं चिलटवजा आकाशयानें झेपेलिन जहाजास इजा करूं शकतील, असें कित्येकांस वाटतें या बाबतींत जर्मन लष्करी अधिकाऱ्यांनीं हजारो प्रयोग करून पाहिले आहेत. झेपेलियनांची संख्या वाढविण्याचा उद्योग जर्मन सरकार अट्टाहासानें करीत आहे, यांतच या साऱ्या प्रश्नाला पूर्ण उतर मिळतें. युद्धांत उपयोगी पडण्याजोगी जी जी नवी युक्ति निघेल, तिजवर सहस्रशः प्रयोग करून तिचा उपयोग सर्व दृष्टींनी पूर्णपणें अजमावून ठेवण्याची खटपट जर्मन लष्करीखातें जितकी करतें, तितकी खटपट जगांतील दुसरें कोणतेंहि लष्करीखातें करूं शकत नाहीं. अशाच रीतीनें छोटी चिलटवजा यानें आणि झेपेलिन जहाजें यांजवर प्रयोग करून त्या दोहोंचाहि उपयोग त्या खात्यानें अजमावून ठेवला आहे. या दोन्ही प्रकारच्या आकाशयानांवर कित्येक वर्षें काम करून जे या कलेंत निष्णांत झाले आहेत, त्यांनीं स्पष्टपणें आपला अभिप्राय असा प्रगट केला आहे, कीं, चिलटवजा यानांकडून झेपेलिन जहाजास यत्किंचित्‌हि उपद्रव होण्याची भीति नाहीं.

## लष्करी तयारी !

असल्या जात…
हल्ला केला

…च्या नकाशांत बरेचसे फेरफार पुढें मागें होण्याचा संभव आहे. सध्यांच्या स्थितीवरून सामान्य वाचकांची युरोपाबद्दल जी कांहीं कल्पना होते, तीवरून युरोप बाह्यतः शांतसा दिसतो; पण युरोपांतील सामाजिक व आर्थिक परिस्थिति इतकी चमत्कारिक व घोंटाळ्याची झाली आहे, कीं, तिच्यामुळें युरोपांत लवकरच अदलाबदल झाली पाहिजे. विशेषतः मध्य-युरोपांतील राजकीय महत्त्वाकांक्षेनें या घोटाळयांत आणखी भर पाडली आहे. यामुळें तेथील राष्ट्रांच्या सरहद्दींत कांहीं तरी फेरफार लवकरच घडून आल्यावांचून राहणार नाहींत. हे फेरफार कदाचित् शांततेनेंहि घडतील; अथवा कदाचित् तरवारीनें घडतील; तथापि ते तरवारीनेंच घडण्याचा अधिक संभव आहे. कोणत्याहि गोष्टीबद्दल भांडण उपस्थित झालें, तर तें नुसत्या वादविवादानें मिटविण्यापेक्षां दंडादंडीनेंच मिटविण्याकडे मानवी मनाचा अधिक कल आहे, अशी साक्ष इतिहास आजवर देत आला आहे. जगांत शांतीचें साम्राज्य व्हावें, एतदर्थ अनेक महात्म्यांनीं व पुण्यपुरुषांनीं आजवर खटपट केली आहे. पण अजूनपर्यंत या खटपटीस यश आल्याचीं चिन्हें फारशीं दिसूं लागलीं नाहींत. स्वतःचें साध्य सिद्ध करण्यासाठीं अगाऊ तयारीच्या दृष्टीनें मनुष्यप्राणी ज्या ज्या युक्त्या योजितो, त्यांचें पर्यवसान आजपर्यंत युद्धांतच होत आलें आहे. ख्रिस्त कालापूर्वी मनुष्य जितका भांडखोर होता, तितकाच भांडखोर तो अजूनहि राहिला आहे. युरोपानें ख्रिस्ति धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांतील भांडणाच्या पद्धतींत फेर पडला असेल, पण अंतीं परिणाम एकच. भांडणाचें शेवटचें 'अपील' न्यायाच्या तराजूकडे न जातां तरवारीच्या तीक्ष्ण धारेकडे जातें.

मध्य युरोपांत अत्यंत जिवट आणि परपक्षी अशी एकादी शक्ति असेल, तर ती जर्मनी हीच होय. जर्मनी या शब्दांत जर्मन किंवा ट्यूटन वंश जेथें जेथें पसरला आहे, त्या साऱ्या भागांचा अंतरभाव करण्यास हरकत नाहीं. जर्मन भाषा बोलणारा आस्ट्रियाचा भाग, हॉलंद;

स्वित्सर्लंड, स्वीडन, नार्वे आणि डेन्मार्क एवढ्या भूमीचा अंतर्भाव स्थूल दृष्टीनें जर्मनी या शब्दांत करण्यास हरकत नाहीं. या प्रांतांची सामाजिक व व्यापारी ध्येयें जवल जवळ एकच असून यांतील कांहीं देश स्वतंत्र बाण्याचे असले तरी, मध्य जर्मनीशीं एक संघ करण्याकडे त्यांचा कल आहे. स्वीडन, नार्वे आणि डेन्मार्क हे देश स्वतंत्र आहेत व राजकीय दृष्ट्या ते तसेच स्वतंत्र राहतील, यांत संशय नाहीं; पण सामाजिक आणि व्यापारी उन्नतीपुरतें मध्य जर्मनीशीं बांधून घेण्याची त्यांची तयारी दिसते. स्वतंत्र मानववंशाच्या दृष्टीनें एकंदर युरोपखंडाचे सामान्यतः तीन विभाग झाले आहेत. ते विभाग म्हणजे ट्युटॉनिक वंश लॅटीन वंश आणि स्लॅव्हॉनिक वंश हे होत. ट्युटॉनिक वंशांत अँग्लो सॅक्सन्, जर्म्यानिक आणि नॉर्स अशा तीन उपशाखा आहेत. लॅटीन वंशांत फ्रेंच, इटालियन आणि स्पॅनिश या राष्ट्रांचा अंतर्भाव होतो आणि स्लॅव्हॉनिक वंशांत स्लॉव, मस्कोव्हाईट, झेच्, पोल, क्रोट, सर्व, बलगर इत्यादि अनेक उपशाखाचा अंतर्भाव होतो. चालीरीती, विचार-परंपरा, साध्यें आणि महत्त्वाकांक्षा या बाबतींत हे तीन मानववंश परस्परांपासून अगदीं भिन्न आहेत. या मुळच्या भिन्नतेंत निरनिराळ्या धर्मपंथांनीं व अर्वाचीन व्यापारी वाढीनें आधिकच भर घातली असून त्यांचे हितसंबंध पुरे विभागून टाकले आहेत. सर्व जगांतील संपत्ति एके ठिकाणीं आणून त्याच ठिकाणीं ती जखडून ठेवावयाची, हा हल्लींच्या व्यापारी युगाचा अंतिम हेतु आहे. नेपोलियनच्या वेळच्या युद्धांनंतर जर्मन वंश आरंभीं हळु हळू; पण आतां सपाट्यानें संघटित होत आहे. गेल्या पंचवीस तीस वर्षांत या निरनिराळ्या शाखांचें एकीकरण होऊन व्यापारी दृष्ट्याहि त्यांचें पाऊल विलक्षण झपाट्यानें पुढें पडत आहे. बेल्जम, हॉलंड, डेन्मार्क आणि स्वित्सर्लंड हीं राष्ट्रें इतकीं छोटीं आहेत, कीं, त्यांच्या शेजारपाजारच्या राक्षसी राष्ट्रांनीं त्यांची केव्हांच चटणी करून टाकली असती; पण हीं मोठीं राष्ट्रें एकमेकांस पाण्यांत पहात असल्यामुळें त्यांचें स्वातंत्र्य आजवर टिकलें आहे. आतां या राष्ट्रांतहि संघटनेच्या इच्छेचा प्रादुर्भाव होऊं लागल्याचीं स्पष्ट चिन्हें

दिसूं लागलीं आहेत. त्या त्या राष्ट्रांच्या राजकर्त्या पुरुषांस ही गोष्ट पसंत वांटत नसली; तथापि सामान्य जनतेचीं मनें एका मध्यवर्ती संस्थेकडे ओढलीं जात आहेत, यांत मात्र संशय नाहीं. अशाच प्रकारची साऱ्या युरोपभर दाब ठेवणारी मध्यवर्ती शक्ति मध्ययुरोपांत निर्माण करावी, हीच होहेनझोलार्न घराण्याची मुख्य महत्त्वाकांक्षा आहे.

फार प्राचीन काळापासून या महत्त्वाकांक्षेला आरंभ झाला आहे. नरेन्बर्गचे कौंट हे ब्रॅन्डन्बर्गचे इलेक्टर झाल्यापासून आणि फ्रेड्रीक दि ग्रेट-च्या काळांपासून तों थेट सध्यांच्या बादशहापर्यंत या होहेनझोलार्न घराण्यानें विलक्षण जिवटपणा दाखविला आहे. युरोपच्या अर्वाचीन इतिहासांत याच्या इतकें जिवट राजघराणें दुसरें नाहीं. या घराण्यांतील सर्वच पुरुष मोठे बुद्धिवान् होते, असें नाहीं, तथापि आपला हेतु साध्य करण्यास लागणाऱ्या मोठ्या माणसांची निवडणुक करून त्यांजकडून आपला हेतु साधावयाचा, ही दुर्मिळ कला मात्र या घराण्यांतील पुरुषांस साध्य झाल्याचें इतिहासावरून दिसून येतें.

मध्ययुरोपांत आणि विशेषतः जर्मनींत अद्यापि जुन्या जमीनदारी आणि सरदारी पद्धतीचा पूर्ण प्रादुर्भाव असल्यामुळें शिस्त व निकाटी यांची तेथें आवश्यकता असते. डोकें शांत ठेवून सामान्य जनतेची सांपत्तिक वाढ आणि संस्कृति यांस अडथळा होऊं न देण्याची खबरदारी जोपर्यंत सरकार घेत आहे, तोंपर्यंत तेथील राजशासन पद्धतींत क्रांति घडून येण्याचा यत्किंचित्‌हि संभव नाहीं.

जर्मनी आणि आस्ट्रिया या देशांत सोसियालिझम प्रबळ होत चालला आहे, व त्यामुळें सध्यांच्या राजशासनपद्धतींत मोठी क्रांति घडून येण्याचा संभव आहे, असा प्रवाद सर्वत्र ऐकूं येतो; पण या दोन देशांतील परिस्थितीचें निरीक्षण ज्यानें सूक्ष्म दृष्टीनें केलें असेल, त्याला या प्रवादांत कांहीं तथ्य आढळून येणार नाहीं. राजशासनपद्धति कशा प्रकारची असावी, याबद्दलचा सूक्ष्म आणि तात्त्विक विचार करण्याची संवय ट्यूटॉनिक वंशाला फार प्राचीन काळापासून आहे; पण अशा प्रकारें तत्त्वशोधन करीत असतांहि प्रत्येक गोष्टीचा विचार ते व्यवहारिक दृष्टीनेंहि

करीत असतात, हें विसरतां कामा नये. कोणत्याहि शासन पद्धतींतील गुणावगुणांचा परिणाम प्रत्यक्ष व्यवहारांत कसा दिसून येतो, यांकडेहि ते लोक लक्ष पुरविण्यास चुकत नाहींत. जर्मन सोसियालिस्ट हा प्राणी कल्पनाविवश होणारा असला, तरी तो त्या कल्पनेबरोबर भलतीकडे कधींहि वाहवत नाहीं. कल्पनावेशानें तो व्यवहारपरांगत होत नाहीं. ल्याटिन वंशांतील सोसियालिस्ट प्राणी याच्या अगदीं उलट आहे. तो आपल्या कल्पनावारूवर एकदां आरूढ झाला, कीं, व्यवहाराशीं फारखत करून बेगुमानपणें वाटेल तिकडे पळत सुटतो. ल्याटीन सोसियालिस्ट हा पाऱ्यासारखा पकडण्याला मोठा कठिण आहे. लोकांच्या सुखाभिवृद्धीवर सिंहासनाचें चिरस्थाइत्त्व अवलंबून आहे, हा धडा जर्मनीच्या राजघराण्यांनीं पक्का गिरविला आहे. अशा प्रकारें पुष्कळ काळपर्यंत एकच घराण्याचें राज्य झाल्याचा दाखला इतिहासांत दुसरा सांपडत नाहीं, हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे. संस्कृति मार्गावर ज्याचें पाऊल एकसारखें पुढें पडत आहे, आणि ज्याची भरभराट अव्याहतपणें आजपर्यंत झाली आहे, असा देश जर्मनीशिवाय जगांत दुसरा एकहि नाहीं; पण याच भरभराटींत भावी अनर्थाचें बीज आहे. वाढत असलेला कोणताहि वृक्ष अधिक वर वर गेल्यावांचून रहात नाहीं. आकाशांतील अधिक अधिक जागेचें आक्रमण तो एकसारखा करीत असतो. तसेंच पैशाच्या आणि सामर्थ्याच्या दृष्टीनें सरळ असलेलें जर्मनराष्ट्र योग्य काळाची वाट पहात स्वस्थ बसेल, असाहि संभव नाहीं. लौकरच दोहोंपैकीं एक गोष्ट घडून येण्याचा निश्चित संभव दिसतो. एक तर जर्मनी आपले हात पाय शांत मार्गांनीं ईशानीकडे आणि पश्चिमेकडे पसरील किंवा उल्हाटयंत्रांच्या प्रचंड कडकडाटानें सारें जग हलवून सोडील!

शांततेच्या आणि सौजन्याच्या उपायांनीं जर्मनीच्या योग्य वाढीस अवसर मिळेल, असा भरंवसा जर्मन मुत्सद्यांस बिलकूल नाहीं. जर्मन लोक जात्याच अत्यंत व्यवहारी आणि मितव्ययी आहेत. असल्या प्रकारचे लोक क्रोडो रुपये आणि अमूल्य वेळ व श्रम यांचा खर्च करणार नाहींत, हें कोणाच्याही लक्षांत येईल. आणि ज्या अर्थीं या साऱ्या अमूल्य

चिजांचा उपयोग त्यांनीं लष्कराच्या जय्यत तयारीकडे केला आहे, त्या अर्थी त्याच्या आवश्यकतेबद्दल त्यांची पुरी खात्री झाली असली पाहिजे; यांत संशय नाहीं. जर्मन राष्ट्र आज मित्तीस प्रबळ आणि संपत्तिमान् आहे, तथापि त्यालासुद्धां हा लष्करी खर्च डोईजड झाला आहे. याकरितां बाकीचीं कारणें वगळलीं तरी, या एकाच कारणामुळें युरोपांतील नकाशाचे रंग लवकरच फिरण्याचा संभव आहे, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल.

युरोपांत अशी क्रांति घडून येणार, यांत शंका नाहीं; पण ती केव्हां घडून येईल याची नक्की तारीख ठरविणें मात्र शक्य नाहीं. कदाचित् उद्यां सुद्धां या क्रांतीला आरंभ होईल. कांहीं झालें तरी युरोपची शांतता आठ दहा वर्षांपलीकडे टिकावयाची नाहीं, हें मात्र निश्चित होय. आस्ट्रियाचा बादशहा फ्रान्सीस जोसेफ मरण पावला, तर या क्रांतीस ताबडतोब सुरुवात होईल.

दुसरी एक धार्मिक बाबहि येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. क्याथोलिक पंथांच्या लोकांचें पुढारीपण आस्ट्रियन पादशाहीकडे आहे. ही पादशाही नामशेष झाली, तर त्यांना दुसरा कोणी तरी पुढारी पहावा लागेल. यांचें पुढारीपण नीट रीतीनें सांभाळून पंथाचें महत्त्व व मान कायम राखील असा एकहि क्याथोलिक राजा सध्यां युरोपांत नाहीं. जर्मन बादशहा हा प्राटेस्टंट पंथाचा पुरस्कर्ता आहे, ही गोष्ट खरी; तथापि तो खिस्ताचा खरा अनुयायी आहे. याशिवाय आजवर त्यानें जी तीक्ष्ण आणि लांब दृष्टि दाखविली आहे, तिजमुळें त्याच्या साम्राज्यांत पंथापंथांतील तंट्यास वाव उरलेला नाहीं. क्याथोलिक पंथाच्या लोकांस स्वधर्माचरणाची पूर्ण मुभा ज्याप्रमाणें अमेरिकेंत किंवा ब्रिटिश साम्राज्यांत मिळते, त्याचप्रमाणें जर्मनींतहि ती मिळते. जर्मनीशिवाय युरोपांतील इतर कोणत्याहि देशांत क्याथोलिक पंथास इतकें स्वातंत्र्य मिळत नाहीं. याशिवाय पोपशीं बादशहांचा खाजगी स्नेहसंबंधहि फार उत्तम प्रकारचा आहे. मधून-मधून इटलींत जाऊन पोप महाराजांच्या चरणीं वंदन करण्यास दुसरा वुइलियम बादशहा चुकत नाहीं, हें पुष्कळांस ठाऊक असेलच.

तुर्काशीं स्नेह संबंध जोडून ज्याप्रमाणें जर्मनीनें तुर्कस्थानाचा उपयोग उंटाप्रमाणें करून जसा आपला दक्षिण भागाचा दरवाजा सुरक्षित केला आहे, त्याप्रमाणेंच उत्तरेच्या बाजूला स्वीडन आणि नार्वे यांच्याशीं स्नेहसंबंध जोडून त्या दिशेलाहि एक उंट विरेला घालण्याची तजवीज केली आहे. स्वीडन आणि नार्वे हे देश रशियाशीं केव्हांहि मैत्री दाखवीत नव्हते. प्राचीन काळापासून रशियाशीं त्यांचा उभा दावाच आहे. गेलीं कांहीं वर्षे या त्यांच्या मनःस्थितींत आणखी भरच पडली आहे. हे दोन्हीं देश स्वातंत्र्याचे विलक्षण अभिमानी आहेत. स्वतःस जर्मन साम्राज्यांत ते सामील करून घेणार नाहींत. जर्मन साम्राज्याची तशी इच्छा नाहीं, ही गोष्ट त्यांस पूर्णपणें अवगत आहे. उलटपक्षीं रशिया आपणाकडे लोभी दृष्टीनें पहात आहे, हेंहि त्यांस माहीत आहे. यामुळें संरक्षणार्थ जर्मनीची मदत त्यांस हवी आहे. जर्मनीच्या मदतीनें हीं राष्ट्रें प्रसंग पडल्यास सात आठ लक्ष पहिल्या प्रतीचें सैन्य उभें करूं शकतील. आणि हें सैन्य रशियाच्या नाजुकभागीं घाव घालूं शकेल.

होहेनझोलार्न घराण्याला राजकीय दृष्ट्या अर्थातच पुष्कळ महत्त्व आहे; पण याशिवाय सांपत्तिक आणि स्नेहसंबंध दृष्टीनेंहि या घराण्यानें आपलें महत्त्व युरोपात विलक्षण वाढविलें आहे. बादशहाच्या मुलांचे विवाह मोठमोठ्या आणि श्रीमंत घराण्यांतील राजकन्यांशीं झालेले आहेत. त्याशिवाय बादशहाची खाजगी दौलत फार मोठी असून व्यापारांतहि त्यांचा पुष्कळ पैसा गुंतलेला आहे. यामुळें व्यापारी वर्गांतहि बादशहांचें महत्त्व पुष्कळ वाढलें आहे.

---

## केसरचीं कांहीं कारस्थानें.

सध्यांच्या बादशहांचे आजे पहिले वुइलियम हे गादीवर असतां सध्यांचे बादशहांस त्यांनीं पहिल्या ड्रॅग्यून गार्डचे कर्नल नेमलें. ही पलटण त्या- वेळीं पाटस्ड्याम येथील शिबन्दींत होती. एके वेळीं हा तरुण कर्नल भर मध्यरात्रीं आपल्या पलटणीच्या बराकींत अचानक गेला. त्यावेळीं

आपले बहुतेक अम्मलदार मदिरापानांत धुंद झाले असल्याचें त्यांस आढळून आलें. कर्नल प्रिन्स वुइलियम यांनीं त्या सर्वांस एकदम कैद करून बराकींत ठेवलें. हे सर्व अम्मलदार प्रशियांतील जुन्या व मोठ्या सरदार घराण्यांतील होते. त्यांचीं कुटुंबें राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या मोठीं वजनदार गणलीं जात असत. वृद्ध बादशहाला खाजगी रीतीनें भेटून कांहीं जुन्या वजनदार माणसांनीं ही हकीगत त्यांच्या कानीं घातली आणि अम्मलदारांची मुक्तता करण्याची विनंति केली. बादशहानें कर्नल साहेबांस बोलावून आणून अम्मलदारांना सोडण्याबद्दल सुचविलें. प्रिन्स वुइलियमनें आपल्या आजास म्हटलें, " पहिल्या ड्रॅग्यून गार्डोचा मी कर्नल आहेना ? "

" अर्थात्. तूं कर्नल आहेस. "

" त्या पलटणीची सर्व जबाबदारी मजवर आहेना ? "

" निःसंशय. "

तरुण राजपुत्रानें कमरेची तरवार काढून ती बादशहापुढें ठेवली, आणि कुर्निसात करून म्हटलें, " सरकारचरणीं मी कर्नलच्या जागेचा राजीनामा सादर करतों. "

बादशहा एकदम चकित् झाले; तथापि मनांतल्या मनांत त्यास फार संतोषहि झाला. त्यांनीं ती तरवार राजपुत्राच्या हातीं परत देऊन त्याचा राजीनामा स्वीकारण्याचें नाकारलें. अम्मलदारांची मित्रमंडळी बादशहाच्या भेटीस पुन्हां गेली, तेव्हां बादशहा त्यांस म्हणाले, " काय करावें ? तुमचें म्हणणें मान्य करण्यास मीं आनंदानें तयार आहे; पण तशी कर्नलची इच्छा नाहीं, त्यास निरुपाय आहे. " यांतलि बरेचसे अम्मलदार नौकरींतून कायमचे वजा झाले.

\+ \+ \+

जर्मन साम्राज्याचे पहिले मुख्य प्रधान कौंट बिस्मार्क यांना जर्मन पार्लमेंटांतील क्याथोलिक पक्षाचें पाठबळ नसल्यामुळें सैन्य व आरमार यांजवरील वाढत्या खर्चाचें बील नामंजूर झालें. यानंतर बिस्मार्क यांच्या जागीं कौंट होहेनलो यांची नेमणूक झाली. हे एका सुप्रसिद्ध क्याथोलिक

कुटुंबांतील गृहस्थ होते. त्यांच्या नेमणुकीमुळें क्याथोलिक पक्ष आणि राजपक्ष यांचा समेट होऊन लष्करी खर्चास पार्लमेंटाची मंजुरी मिळाली. यानंतर या पक्षाचें पाठबळ कायम राखण्यासाठीं दुसऱ्या बुइलियम बादशहानें आणखी एक युक्ति योजली.

पोप पिटर याच्या गादीवर जे जे पोप आजपर्यंत बसत आले, त्या सर्वांना एकाद्या शक्तिमान् राजाच्या स्नेहाची अपेक्षा वाटत होती. ऐहिक विषयांशीं आपणास कांहीं कर्तव्य नाहीं, असा बाणा हे धर्मगुरु जरी बाह्यतः बाळगीत होते, तरी स्वतःचें महत्त्व कायम राखण्यासाठीं शक्तिमान् राजांच्या कच्छपी ते लागत असत. युरोपांत स्पेनचें महत्त्व नष्ट झाल्यानंतर या धर्मगुरूंनीं आपल्या जहाजाचा नांगर फ्रान्सांत टाकला. यानंतर फ्रान्सांत प्रचंड राज्यक्रांति होऊन बादशाही सत्ता नष्ट झाली, तेव्हां पोपचें हें तारू व्हिएन्नाच्या बंदरीं गेलें; पण हें बंदरहि फार काळ आसरा देऊं शकणार नाहीं, ही गोष्ट या धर्मगुरूंच्या ध्यानीं लवकरच आली. अनेकविध पंथांच्या पसाऱ्यानें बुजबुजलेल्या आस्ट्रियापेक्षां एकाच महत्त्वाकांक्षेनें संयुक्त झालेल्या जर्मन साम्राज्यांत आपणास आसरा मिळाल्यास तें अधिक हितावह होईल, असें त्यांस वाटूं लागलें. त्यांच्या वाटेंतील मोठा कांटा जो प्रिन्स बिस्मार्क तो याच सुमारास उपटला गेला आणि अशा रीतीनें धर्मगुरूंचें आद्यपीठ आणि जर्मनी यांजमधील स्नेहसंबंधाचा मार्ग मोकळा झाला.

बर्लिन येथील आपल्या तबेल्यांतून सुंदर, शुभ्र आणि आकाशीरंगांनीं रंगविलेली व तिच्या बाह्यभागीं प्रशियाचें गरूडांकित राजचिन्ह रंगविलें आहे, अशी गाडी बाहेर पडली. सुख सोयींच्या दृष्टीनें या गाडीशीं तुलना करण्यास योग्य अशी दुसरी एकहि गाडी सांपडावयाची नाहीं. या गाडीला पांच डबे असतात. पहिल्या डब्यांत बादशहांचे रेलवे कामदार व इतर अम्मलदार असतात. दुसऱ्या डब्यांत बादशहांच्या खास तैनातीचे लोक असतात. मधल्या ( तिसऱ्या ) डब्यांत खुद्द बादशहांची स्वारी असते. सौंदर्य आणि सुख या दृष्टीनें हा डबा मानवी कौशल्याचें एक अप्रतिम स्मारक आहे, यांत शंका नाहीं. याच डब्यांतील एका कोपऱ्यांत बाद-

शहांची कामास बसावयाची जागा आहे. येथें मात्र कसल्याहि चैनीचा अथवा संपत्तीचा मागमूसहि लागत नाहीं. या ठिकाणीं बादशहांसाठीं जो पलंग मांडला आहे, व त्यावर जी गादी आहे, तसली गादी एकाद्या रेल्वे कंपनीनें आपल्या डब्यांत घातली, तर खरोखर तिजवर शिव्यांचा भडिमार होईल.

प्रवासांत असतांहि दुसऱ्या वुइलियम बादशहांच्या दिनचर्येंत फरक पडत नाहीं. प्रवासांत त्यांजबरोबर सुप्रसिद्ध लेखक, कवि आणि भौतिक-शास्त्र विशारदपंडित नेहमीं असतात. फुरसतीच्या वेळीं यांजबरोबर संभाषण करून साहित्यसंगितादिकलांची झालेली वाढ व भौतिकशास्त्रांतील अगदीं नवे शोध यांजबद्दल बादशहा माहिती मिळवीत असतात. बादशहांची स्मरणशक्ति विलक्षण उज्वल आहे. एकादा लांबलचक निबंधहि एकदां वाचून ते जवळ जवळ अक्षरशः म्हणून दाखवितात. बादशहांना प्रवासाची विलक्षण हौस आहे. 'भरारी केसर' असें यांचें जर्मनींत नांव पडलें आहे. पहिले वुइलियम, तिसरे फ्रेड्रीक आणि दुसरे वुइलियम यांचें वर्णन अगदीं थोडक्यांत कसें करतां येईल, याबद्दल एका विद्वान मंडळांत वाद निघाला असतां एक विद्वन्मणी म्हणाले, "१ सज्जन केसर, २ मुका केसर आणि ३ भरारी केसर एवढ्यांत या तिन्ही बादशहांचें गुण-वर्णन येईल." या कोटीबद्दल या विद्वन्मणीस सहा महिने सरकारचा फुकट पाहुणचार मिळाला.

बादशहांची गाडी मुक्कामाला पोहोंचेपर्यंत वाटेंत तिला कोठेंहि थांबविण्यांत येत नाहीं. मुख्य गाडीच्या आगेंमागें पांच-पांचशें यार्डांच्या अंतरावर सुटी इंजिनें रक्षक या नात्यानें धांवत असतात.

रोम शहर आज नटून सजून तयार झालें होतें. दुसरे वुइलियम बादशहा आपणास आज भेट देणार याबद्दल रोम शहराला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या.

रोम शहराला भेट देण्यांत केसरचा अंतस्थ हेतु वेगळाच होता. दरबारी मेजवानीनंतर आठ तासांनीं बादशहांची गाडी कसलाहि थाटमाट

न करतां गुरूमठाच्या–पोपच्या–दाराशीं जाऊन उभी राहिली. केसर-दुसरे वुइलियम–मोठ्या आदबीनें दरवाजांतून आंत शिरले.

इ. स. १०७७ सालीं सातवा ग्रेगरी या नांवाच्या पोपनें त्या वेळच्या जर्मनीचा बादशहा चवथा हेनरी यांजवर बहिष्कार घातला होता. तेव्हां तो बादशहा पोपकडे गेला व त्यांजसमोर बर्फ पडत असतांहि अनवाणी उभा राहिला. तेव्हां ग्रेगरीनें कृपावंत होऊन त्याजवरील बहिष्कार दूर केला. या प्राचीन गोष्टीस अनुलक्षून बिस्मार्क यांनीं ' आम्हीं क्याथोलिक पक्षाची मनधरणी कधींहि करणार नाहीं ! ' असे उद्गार काढले होते. पण ते उद्गार विसरून पोपशीं सलोखा ठेवणें जर्मन साम्राज्यशक्तिस आज अधिक उचित वाटलें. 'वारांगने व नृपतिनीरनेक रूपा '

धर्मगुरू दहावे लिओ, सर्व ख्रिस्त्यांचे धर्मगुरू, रोमचे बिशप, सेन्ट पिटरच्या गादीचे मालक आणि दुसरे वुइलियम प्राशियाचे राजे आणि जर्मनीचे शहानशहा यांची खासगी भेट झाली. धर्मगुरूंच्या पाठबळाचें महत्त्व काय आहे, ही गोष्ट केसरच्या ध्यानीं आगाऊच आली होती. या भेटींत परस्परांनीं परस्परांचा स्नेहसंबंध उत्कृष्ट राखण्याचीं वचनें परस्परांस दिलीं.

* * *

धुडुम ! धुडुम ! ! धुडुम ! ! !

तुर्कांच्या आरमारी जहाजांतून सलामीच्या तोफा सुटूं लागल्या. बादशाही नौका होहेनझोलर्न सलाम्या घेत घेत पुढें जात होती. अखेरीस एका ठिकाणीं तिनें नांगर टाकला. इतक्यांत एक सुंदर नौका होहेनझोलर्नकडे येऊं लागली. शुभ्र पोषाक केलेले व फेज टोप्या घातलेले अठ्ठेचाळीस धष्टपुष्ट खलाशी ही नौका वल्हवीत होते. या नौकेंतून तुर्कस्थानचे सुलतान व महंमदानुयायांचे अधिपति पादशहा अबदुल हमीद हे प्राशियाचे राजे व जर्मनीचे बादशहा दुसरे वुइलियम यांच्या भेटीसाठीं जात होते.

सुलतानची नौका जवळ आली, तेव्हां होहेनझोलार्न मधून सलामीच्या तोफा कडकडल्या. सुलतान आपल्या मुख्य वजिरासह होहेनझोलार्नवर

चढले. त्या ठिकाणीं जर्मन बादशहा व त्यांचे मानकरी हे सुलतानचें स्वागत करण्यासाठीं उभे होते.

ही भेट मोठी अपूर्व होती. राजकारणाशीं संबंध नसलेल्या एकाद्या त्रयस्थ निरीक्षकाला हा प्रसंग केवळ अभ्यासाच्या दृष्टीनेंहि मोठा लोकोत्तर वाटला असता, यांत संशय नाहीं. एका बाजूला जर्मन आरमारांतील उंच, धिप्पाड आणि निवडक खलाशी दिसत होते. त्यांचा पोषाक अगदीं साधा; पण स्वच्छ आणि नीटनेटका होता. दुसऱ्या बाजूला पौर्वात्य खलाशी दिसत होते. यांच्या बांध्यांत प्रमाण ह्मणून कसलेंच दिसत नव्हतें. ठेंगणें, बाध्यानें बोजड, लठ्ठ पोटाचे व आजाऱ्यासारखे दिसणारे असे हे दुसरे खलाशी होते. त्यांच्या पोषाखांत इंद्रधनुष्यांतील सारे रंग दिसत होते आणि हे रंग झांकून टाकण्याकरतां सोनेरी कलाबतूचा मनमुराद उपयोग करण्यांत आला होता. हे खलाशी जणूं काय आपापल्या राष्ट्राची स्थितीच दर्शवीत होते. जर्मन खलाशांच्या देखाव्यावरून तें राष्ट्र जिवट व उदयोन्मुख आहे, हें कोणाच्याहि लक्षांत आलें असतें. उलटपक्षीं तुर्की खलाशांकडे पाहून त्यांच्या राष्ट्राचा कमजोरपणा व निद्राप्रियता हीं कोणाच्याहि लक्षांत आलीं असतीं.

हे दोन बादशहा एकमेकांस भेटले. दुसऱ्या वुइलियम बादशहानें अडमिरलच्या हुद्याचा पोषाक केला होता. त्यांच्या चेहऱ्यावर त्यांच्या मानसिक स्थितीचा ठसा पूर्णपणें उमटला होता. भविष्यत् काळाकडे दुसऱ्या वुइलियमची नजर पूर्ण आशेनें पहात आहे, असें उघड दिसत होतें. सुलतान अबदुल हमीद हे नुकतेच झोंपेंतून उठल्यासारखे दिसत होते. आपली झोंपमोड झाल्याचें त्यांस जणूं काय वाईट वाटत होतें. आपलें निद्रापद स्वीकारण्याची इच्छा त्यांच्या चेहऱ्यावर व्यक्त होत होती. ही भेट संपल्याबरोबर होहेनझोलर्न बरोबरच्या छोट्या राजनौकेंत सर्व मंडळी बसलीं व ती नौका सुवर्णश्रृंगाकडे—गोल्डनहार्नकडे गेली. सुवर्णश्रृंगावर या मंडळीचें स्वागत करण्यासाठीं लक्षावधि जनसमूह जमला होता.

राजवाड्यांतील बडी मेजवानी आटोपल्यानंतर जर्मनीची महाराणी व तिच्या तैनातींतील मंडळी आपल्या नौकेवर परत आली. थोड्या वेळानें

बादशहा व सुलतान हे मुख्य मशिदीकडे गेले. या वेळीं हे दोघे राजपुरुष शुभ्र अरबी घोड्यांवर बसले होते. जर्मन बादशहानें तुर्की सेनापतीचा पोषाख केलेला असून डोक्याला लाल फेज टोपी घातली होती. रस्त्यानें लक्षावधि लोक स्वागत करण्यास उभे होते. ही स्वारी मशिदीच्या पुढें थांबली. मशिदींतून प्रचंड घंटेचा नाद व त्याबरोबर 'अल्ला–इल–अल्ला-सेफका–इल–महंमद' असा प्रचंड ध्वनि बाहेर येत होता. क्षणार्धांत ही गडबड बंद झाली व तो सारा प्रचंड जनसमूह मक्केकडे तोंड करून गुडघे टेंकून बसला.

मशिदीच्या द्वाराशीं शेख–उल–इस्लाम यानें जर्मन बादशहांचें स्वागत केलें. आपल्या बुटावर सपाता घालून बादशहांची स्वारी मशिदींत शिरली. कांहीं शतकापूर्वीं याच बादशहांच्या पूर्वजांनीं तुर्की अर्धचंद्राला युरोपांतून अर्धचंद्र देण्यासाठीं आपले देह धारातीर्थीं अर्पण केले होते! आणि आजचा हा देखावा त्याच्या अगदीं उलट होता. सर्व इस्लामाचे मुख्य सुलतान आणि एक ख्रिस्ती बादशहा हे हातांत हात घालून महंमदीयांच्या अत्यंत पवित्र मशिदींत प्रवेश करीत होते! मशिदींतून जर्मन बादशहा बाहेर पडले, त्या वेळीं मुख्य शेखनें हाजींची निशाणी त्यांस नजर केली. ज्यांनीं मक्केची महायात्रा केली असेल, त्यांसच ही 'हाजी' पदाची खूण मिळत असते. अशा रीतीनें जर्मन बादशहा महमदीयांतील हाजी बनल्यामुळें तुर्कांत त्यांचें विलक्षण वजन वाढलें, यांत नवल नाहीं. सांप्रतच्या केसरनीं महंमदीधर्माचा स्वीकार केला आहे, असा समज तुर्की सैन्यांत जिकडे तिकडे पसरला आहे. तुर्की सैन्यांत अद्यापिहि धर्मवेड्यांचा भरणा फार असल्यामुळें परकीय अंमलदारांच्या हाताखालीं रहावयास ते फारसे उत्सुक नसावयाचे; पण वरील समजामुळें जर्मन अम्मलदारांचा उर्मटपणा सुद्धां ते निमुटपणें सहन करतात.

दुसऱ्या वुइलियम बादशहांच्या या स्वारीसंबंधीं साऱ्या युरोपभर पुष्कळ प्रतिकूळ टीका झाल्या; तथापि यांत बादशहांचा फार खोल असा राजकीय हेतू असून तो त्यांनीं मोठ्या शिताफीनें सिद्धीस नेला, यांत शंका नाहीं. ही भेट होण्यापूर्वीं तुर्कस्थानांत फ्रान्सचें वजन अगदीं अबाधितपणें

वाढत होतें. केवळ तुर्कस्थानच नव्हे, तर जगांतील सारी महंमदी राष्ट्रें फ्रान्साला आपला रक्षण कर्ता असें समजत होतीं; पण या भेटीनंतर फ्रान्सच्या वजनास एकदम उतरती कळा लागली आणि मुसलमानी राष्ट्रांचें पितृपद जर्मनीला प्राप्त झालें. या भेटीमुळें मुसलमानी राष्ट्रें आणि जर्मन साम्राज्य याचे हितसंबंध सलोख्याचे झाले. यानंतर लवकरच जर्मनींतून सुमारें तीस कोट रुपयांची युद्ध सामुग्री तुर्कस्थाननें खरेदी केली. तुर्की सैन्य जर्मन लष्करी अंम्मलदारांच्या हाताखालीं तयार होऊं लागलें. व सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही, कीं, या वेळीं जर्मनीला बगदाद रेलवेचा परवाना मिळाला. जर्मन व्यापाराचे प्रमुख एजंट खुद्द जर्मन बादशहाच आहेत, असें कोणी म्हणतात, त्यांत पुष्कळ तथ्य आहे.

\+ + + +

१९१० सालच्या आक्टोबर महिन्याची सातवी तारीख. चंद्राभोंवतीं हिरवट पिंवळ्या रंगाचें खळें पडलें होतें. मधून मधून काळेकुट्ट ढगहि इकडून तिकडे हिंडत होते. स्वाइनमुंडहून स्टेटीन बंदराकडे जाणाऱ्या रस्त्यावर आज नेहमींपेक्षां दुप्पट पहारा ठेवला होता. या रस्त्यावर कोणासहि जाण्याची आज मनाई होती. इतक्यांत एक मोटारगाडी स्वाइनमुंडहून मोठ्या त्वरेनें येत होती. त्या गाडींत पांच स्वाऱ्या बसल्या होत्या. रस्त्यावरच्या पहारेकऱ्यानें चट्कन् उडी मारून गाडी थांबविण्याबद्दल सुचविलें. गाडीच्या पुढच्या जागीं बसलेल्या मनुष्यानें एक शब्द उच्चारतांच पहारेकरी चपापून एकदम मागें गेला आणि गाडी सपाट्यानें पुढें चालू झाली. समुद्राच्याकांठीं असलेल्या एका उंच इमारतीजवळ ही गाडी उभी राहिली. हीं पांच मनुष्यें त्या इमारतीच्या आंत मोठ्या आतुरतेनें डोंकावून पाहूं लागलीं. आंतील बाजूस एक चांदीसारखा चकाकणारा व माशाच्या आकाराचा प्रचंड पदार्थ दिसत होता.

एकादा प्रचंड देवमासा हवेंत तरंगावा, त्याप्रमाणें हा चकचकीत पदार्थ सहा फूट उंचीवर तरंगतांना दिसत होता. वर सांगितलेल्या गाडींतून दोन तरुण गृहस्थ बाहेर पडले व या राक्षसी पदार्थाकडे चालत गेले आणि त्या माशाच्या पोटांतून बाहेर लोंबत असलेल्या लोखंडी शिडीनें

वर जाऊन त्याच्या पोटांत जणूं काय गडप झाले. गार्डीतील बाकीचे उतारू ही सर्व कृति लक्षपूर्वक पहात होते. इतक्यांत एक मृदुध्वनि होण्यास सुरुवात झाली आणि तो राक्षसी मासा आपलें नाक वर करून आकाशांत चढूं लागला व चढतां चढतां अखेरीस तो दिसेनासा झाला. गार्डीतील दोन मनुष्यांनीं हें सर्व कृत्य निमुटपणें पाहिलें. तो राक्षसी मासा दिसेनासा झाल्यानंतर या दोहोंपैकी एक गृहस्थ उठून उभा राहिला आणि लष्करी थाटाचा सलाम करून ह्मणाला, " सरकार, माझें वचन मीं आज पुरें केलें. "

बादशहांची नजर अद्यापि आकाशाकडेच लागलेली होती. त्या सलाम करणाऱ्या व्यक्तीचा हात आपल्या हातांत घेऊन बादशहा ह्मणाले, " सरदार-साहेब, पितृभूमि तुमची सदैव ऋणी राहील. "

अशा रीतीनें हवेंतील पहिल्या बेडर जहाजांच्या उड्डाणाचें निरीक्षण दुसरे वुइलियम व ग्राफ ( कौंट ) फॉं झेपेलिन यांनीं केलें.

तें प्रचंड झेपेलिन आपला आकाशमार्ग मोठ्या सपाट्यानें आक्रमण करीत होतें. त्याची गति अत्यंत त्वरेची असतांहि आंतील मनुष्यांस ती विशेषशी समजूनहि आली नाहीं. या आकाशी जहाजाचा सुकाण्या पुढील भागीं असलेल्या आपल्या जागेंत बसला होता. वर सांगितलेल्या गार्डीतून उतरलेल्या प्रवाशापैकीं एक प्रवाशी सुकाण्याजवळ गेला व त्यांशीं कांहीं गप्पा मारूं लागला. जहाजांतील चालक यंत्रें इतक्या शांतपणें चाललीं होतीं कीं, आंतील मंडळीस परस्परांच्या संभाषणावांचून दुसरा कोणताहि ध्वनि ऐकूं येत नव्हता. तीन हजार फूट उंचीवरून जमीन आणि पाणी हे भाग स्पष्ट दिसत होते. बाल्टिक समुद्राचा किनारा रुप्याच्या पत्र्याप्रमाणें चमकत होता. आतां खालीं सर्वत्र सपाटी दिसूं लागली. भूमीचे कोणत्याहि प्रकारचे उच्च नीच भाग खालीं दिसत नव्हते. मधून मधून समुद्रावर पडलेला चंद्राचा प्रकाश परावर्तित होऊन दिसत होता. जहाज सपाट्यानें पुढें चाललेंच होतें.

स्वीडनचा किनारा यावयास अद्यापि दोन तासांचा अवकाश असल्या-मुळें ' सर्व जहाज पहावयास चला ' असें कप्तानसाहेब ह्मणाले. त्यांच्या

ह्मणण्यास रुकार देऊन आंतील सर्व पाहुणे मंडळी कप्तानाबरोबर त्याच्या खोलींतून बाहेर पडली. खोलीच्या बाहेरील जिना उतरल्याबरोबर एक सुंदर भोजनगृह दिसलें. थोडेंसें पुढें गेल्यावर कप्तानसाहेबांनीं एका खोलीचा दरवाजा उघडून पाहुणे मंडळीस त्या खोलींत नेलें. ही खोली अर्धचंद्राकार होती. या खोलीचा उपयोग हवेंतील टारपेडो सोडण्याकडे केलेला होता. अशा प्रकारच्या आगमासे सोडणाऱ्या खोल्या दोन असून प्रत्येकींत पन्नास पन्नास पौंड वजनाचे सहा सहा आगमासे असतात. अर्थातच सध्यां या खोल्या रिकाम्या होत्या. यानंतर सर्व मंडळी इंजिनच्या खोलींत गेली. येथें दोनशें हॉर्सपावरचें डीझल इंजिन चालू होतें. व त्याच्यायोगें जहाजाला गति देणारे दोन पंखे झपाट्यानें चालले होते. इंजिन इतक्या सपाट्यानें चाललें होतें, तरी तेथें कसलाहि आवाज किंवा गडबड होत नव्हती. या खोलीला जोडूनच एक विद्युत्गृह असून तेथें विद्युत् उत्पादक यंत्रें व संदेश यंत्रें ठेवलेलीं होतीं. एकंदरींत योजकाची चतुरता सर्वत्र एकसारखीच व्यक्त होत होती.

जहाजावर बारा खलाशी व अडीच टन इतर वजन इतक्यांचा समावेश होण्यासारखा होता. विद्युत् गृहांतून बाहेर पडून ही सर्व मंडळी एका लोखंडी जिन्यानें वर गेली. या जागीं ग्यासच्या पिशव्या ठेवलेल्या होत्या. जहाजाच्या प्रत्येक बाजूस बारा व आगेमागें एकेक याप्रमाणें एकंदर सव्वीस पिशव्या होत्या. जवळच लहान लहान नळकांडीं पडलीं होतीं. हीं नळकांडीं कशाचीं ? असा प्रश्न करतांच कप्तानसाहेब म्हणाले, " यांत झेपेलिनची उड्डाण करण्याची शक्ति भरलेली आहे. " या पुढें आणखी एक जिना लागला. यानें वर जाऊन ही सर्व मंडळी जहाजाच्या अगदीं शिखरावरच्या भागास पोहोंचली. जहाजाच्या पुढच्या व मागच्या टोंकास तोफांच्या बैठकी जोडलेल्या असून त्यांत वाटेल तेव्हां जलदबारी तोफा बसविण्याची योजना केली होती. तसेंच या वरच्या भागांत दोन प्रचंड शोधक बत्याहि बसविल्या होत्या.

इतक्यांत एका खलाशानें कप्तानसाहेबांस, 'स्वीडनचा किनारा दिसूं लागला' म्हणून सांगितलें. सर्व मंडळी पुन्हां कप्तानसाहेबांच्या खोलींत

येऊन खिडकींतून समोर पाहूं लागली; तेव्हां भूभागाची कृष्णवर्ण रेषा दिसूं लागली. या वेळीं जहाज तीन हजार फूट उंचीवर आहे, असें पाहून तें चार हजार फुटावर नेण्यास हुकूम दिला. जहाजाच्या सुकाण्यानें कांहीं दांडे हालविल्याबरोबर जहाजाचें नाक वर होऊं लागलें आणि पुन्हां थोड्या वेळानें सर्व जहाज समांतर रेषेंत आलें. आतां आजुबाजूस सर्वत्र ढग दिसत होते. इतक्यांत कप्तानसाहेब म्हणाले, ' स्वीडनच्या कोणाहि माणसानें हें जहाज पहावें अशी आमची इच्छा नाहीं. '

आतां जहाज स्वीडनब्रोर्गवर पोहोंचलें. स्वाइनमुंडपासून जहाजानें सुमारें सव्वातीनशें मैलांचा प्रवास केला. तेथून पुढें 'उपसाला' शहरावर जाऊन नंतर तें परत घरीं येण्यास निघालें.

या जहाजानें एकंदर अठरा तास प्रवास करून सुमारें साडेआठशें मैलांचें आक्रमण केलें. जहाज परत आलें, त्या वेळींहि मोटारगाडींत मागें राहिलेल्या त्या दोन व्यक्ति त्या जहाजाचें स्वागत करण्यास हजर होत्या. जहाज किनाऱ्यावर उतरल्याबरोबर आंतील सर्व मंडळी मोटारगाडीनें कोणीकडे निघून गेली. मोटारगाडींतल्या मुख्य गृहस्थाच्या हुकुमावरून जहाजाखालीं कांहीं दारूचे भोत ठेवून त्यांस बत्ती देण्यांत आली. त्याबरोबर प्रचंड आवाज होऊन सर्व जहाजाचा चक्काचूर झाला. जहाजाचे जे यांत्रिक भाग अद्यापीहि चांगल्या स्थितींत होते, ते वाफच्या घणानें फोडण्यांत आले. नंतर या सर्व तुकड्यांच्या ढिगाला जलसमाधि देण्यांत आली.

दुसऱ्या दिवशीं सर्व वर्तमानपत्रांनीं असा एकच कोलाहल करून दिला कीं, नवें X झेपेलिन अपेशी ठरून त्याचा भडका झाला.

हें ज ाज फोडून टाकल्यानंतर सांप्रतचें युद्ध सुरू होईपर्यंत त्याचे वेगळे वेगळे भाग तयार करून त्यांचा संग्रह करण्यांत आला होता; पण शांततेच्या वेळीं ते केव्हांहि जोडले गेले नाहींत. शांततेच्या वेळीं एकहि लष्करी झेपेलिन अस्तित्वांत नव्हतें. युद्धसाहित्य विषयक आपलीं रहस्यें जर्मनी कशीं गुप्त ठेवतो, याचा हा एक मासला आहे.

* * *

आज एसेन येथील क्रपच्या कारखान्याची पहाणी व्हावयाची होती.

खुद्द बादशहा अथवा युवराज वर्षांतून दोन वेळ आपल्या राज्यांतील दारूच्या कोठारांची व कारखान्यांची पाहणी करीत असतात. या साऱ्या कारखान्यांत एसेन येथील क्रुपचा कारखाना प्रमुख आहे. हा धंदा बाह्यतः खाजगी ह्मणविला जातो; तथापि वस्तुतः त्याजवर सरकारची सक्त देखरेख असते. फ्रँको-प्रशियन युद्धानन्तर या कारखान्यास जर्मन सरकाराकडून पैशांची मदत मिळण्यास सुरुवात झाली आणि फ्रेड्रीक क्रुप हे मरण पावल्याचा पुकारा झाल्यानंतर हा कारखाना पूर्णपणें सरकारच्या ताब्यांत गेला.

फ्रेड्रीक क्रुप हे खरोखरच मरण पावले, असा पुरावा केव्हांच पुढें आलेला नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी फ्रेड्रीक क्रुप यांचें एका फ्रेंच स्त्रीवर प्रेम जडलें. ही स्त्री एका मोठ्या फ्रेंच अम्मलदाराची नातेवाईक होती. पुढें लवकरच क्रुप यांस कांहीं असाध्य रोगांनीं पछाडलें. विशेष महत्त्वाचे लोक आणि ज्यांचेपाशीं राजकीय रहस्यांचा संग्रह आहे, अशा जर्मनांचें प्रेम एखाद्या फ्रेंच स्त्रीवर जडल्यास त्याबरोबरच त्यांना एकादा असाध्य रोगहि जडावयाचा, असा अनुभव जर्मनींत वारंवार आलेला आहे. फ्रेड्रीक क्रुप यांची खरोखर काय वाट लागली, हें निश्चितपणें कोणासहि ठाऊक नाहीं.

बादशहांची स्वारी कारखान्यांत गेल्याबरोबर तेथील अधिकाऱ्यांनीं त्यांचें मोठ्या थाटानें स्वागत केलें. बादशहांनीं सर्व कारखाना पाहिला. विशेषतः तोफखान्याच्या भागांतील प्रत्येक कृति त्यांनीं फारच सूक्ष्म रीतीनें पाहिली. सर्व मंडळी जातां जातां एका लांबच लांब बांधलेल्या सोप्यापर्यंत आली. खुद्द बादशहा, यांचें मुख्य सेनानायक, कारखान्याचा मालक आणि त्याचा इंजिनियर इतक्या इसमांनींच या दालनांत प्रवेश केला. बाकी सर्व मागे राहिले. या दालनांत विशेष पहाण्यासारखें असें कांहीं दिसत नव्हतें. फक्त पोलादाचे ५०।६० प्रचंड ठोकळे मात्र येथें पडले होते. हे ठोकळे ज्या भांड्यांत ठेवले होते, त्यांतून सल्फुरिक असीडचा धूर निघत होता. हे ठोकळे स्वच्छ करण्याच्या कामावर सहा माणसें लाविलीं होतीं. ते ठोकळे घासून घासून त्या माणसांनीं ते आरशासारखे स्वच्छ केले होते.

या ठोकळ्यांचा उपयोग काय, याबद्दल तेथील कामकऱ्यांत कित्येक दिवस मोठी चर्चा माजून राहिली होती. हे सर्व ठोकळे बादशहांनीं व त्यांच्या सेनापतींनीं फार लक्षपूर्वक पाहिले. कारखान्यांतील मुख्य इंजिनिअर बादशहांच्या कानांत कांहीं कुजबुजला, तेव्हां बादशहांच्या चेहऱ्यावर मृदु स्मिताची एक लकेर झळकूं लागली.

युरोपच्या या कार्तिकस्वामीला संतोष झाला, यांत कांहीं नवल नाहीं. कारण, अगदीं थण्ड पडून राहिलेल्या आणि निरुपद्रवी दिसणाऱ्या या लोखण्डी ठोकळ्यांच्या पोटांतून सत्रा इंची तोफा पुढें लवकरच बाहेर पडल्या. सांप्रतच्या युद्धांत सुप्रसिद्ध गडांचीहि धुळधाण या तोफांनीं कशी उडविली, हें आतां सर्वांस ठाऊक झालें आहे.

शांततेच्या वेळीं यापैकीं एकहि तोफ अस्तित्वांत नव्हती. भिंतीला सुद्धां कान असतात, ही म्हण जर्मनीनें पुरी पाठ करून ठेवली आहे.

* * *

कील येथील सरकारी गोदींत आज मोठी गडबड सुरू होती. केसरचे बंधु आणि बादशाही आरमाराचे ग्रॅस ॲडमिरल, प्रशियाचे प्रिन्स हेनरी, आरमारी प्रधान ॲडमिरल टिरपिट्झ आणि ॲडमिरल कोस्टर इतक्यांच्या स्वाऱ्या कील येथें पाहणी करण्यासाठीं आज आल्या होत्या. सर्व गोदीभर फिरून त्यांनीं प्रत्येक वस्तूची काळजीपूर्वक पाहणी केली. थोड्या वेळानें तेथून बाहेर पडून ही मंडळी एका खडकाळ बेटाकडे रवाना झाली. हें बेट श्ले नांवाच्या उपसागराच्या तोंडाशीं आहे. बेटांतील एका निरुंद आणि खडकाळ अशा भागीं असलेल्या एका तरत्या गोदीजवळ या मंडळीची बोट उभी राहिली.

या ठिकाणीं धूसर पोषाक केलेले कांहीं लोक एक बोट बांधण्याचें काम करीत होते. या बोटीचा आकार प्रथमावस्थेंतल्या लांबट बेडकाप्रमाणें दिसत होता. या बोटीवर काम करणारीं सर्व माणसें जन्मठेपेचे कैदी होतीं. कांहीं गुप्त कामें करण्याकरतां या माणसांचा उपयोग जर्मनी करून घेत असतो. या लोकांना फारच चांगल्या प्रकारें वागविलें जातें; परंतु त्यांस पुन्हां स्वातंत्र्य मात्र मिळत नाहीं.

पाहणी करण्यास आलेली मंडळी एका मोठ्या माशाच्या आकाराच्या बोटींत शिरली. मंडळी आंत गेल्याबरोबर या माशानें एकदम बुडी मारली. तीन तासांनंतर ही पाणबुडी पुन्हा आपल्या जागीं परत आली. मंडळी बाहेर पडली, तेव्हां त्यांचे चेहरे आनंदानें फुललेले दिसत होते. यावरून पाणबुडीच्या कर्तबगारीबद्दल त्यांची खात्री झाली होती, असें दिसतें. यांपैकीं एक गृहस्थ हळूच पुटपुटला "चार हजार मैलांचा प्रवास करील." या बोटींत दोन हजार हॉर्सपावरचें ऑईल एंजीन व नऊशें हॉर्सपावरचें विजेचें मोटार एंजिन बसविलीं होतीं. १९१२ सालापर्यंत बांधलेल्या जर्मन पाणबुडींत मोठी चालक शक्ति फक्त साडे सहाशें हॉर्स-पावरची होती व प्रवासाचा परिघ दोन हजार मैलांचा होता. पाण्या-खालून चालणाऱ्या बोटींत याहून अधिक सामर्थ्य एकवटणें शक्य नाहीं, असा इतर राष्ट्रांतील सर्व नाविकांचा समज झाला होता; पण जर्मनीनें मात्र या समजास जागा दिली नाहीं. नव्या नव्या पद्धतीचे बांधणीचे प्रकार अजमावून पाहण्याचें काम जर्मनींत चालूच होतें. या नव्या पाणबुडीला तीन परिवीक्षण नळ्या लावलेल्या होत्या. यांशिवाय पाहणी करण्याच्या जागीं एक विशेष प्रकारचें यंत्र लावलेलें होतें. संधि प्रकाशासारख्या कमी प्रकाशाच्या वेळींहि लांबवर वस्तु नजरेस याव्या अशी योजना या यंत्रांत केली होती. यामुळें कमी प्रकाशानें होणारा त्रास वांचला जाऊन जर्मन पाणबुडीला वाटेल त्या वेळीं हल्ल करण्याचें साधन उपलब्ध झालें. या नव्या पाणबुडींत आगमासे भरण्याच्या आठ जागा केल्या होत्या, हा दुसरा विशेष. याशिवाय हींत चौदा पौंडी दोन जलदबारी तोफा व एक पौंडी दोन आकाशी तोफा बसविण्यांत आल्या होत्या. अम्मलदारसुद्धां हींत ३५ खलाशी असतात.

लष्करी झेपेलिन ज्याप्रमाणें फोडून टाकण्यांत आलें, त्याचप्रमाणें ही सवाई पाणबुडीहि ताबडतोब फोडून टाकण्यांत आली. ही नवी पाणबुडी आपल्या ठाण्याबाहेर १५ दिवस एकसारखी राहूं शकते. अर्थातच ती एकसारखी चालू असते असें नाहीं. यानंतर या सवाई पाणबुडीचे निर-निराळे भाग तयार करण्याचें काम मात्र अखंड सुरू होतें.

इंग्लंडांत शिकारीचा मोसम पूर्ण भरास आला होता. एका बड्या सरदारसाहेबांच्या घरीं इंग्लंडच्या निरनिराळ्या भागांतून शिकारी लोक रोज येत होते. सदोदित सुस्त असें भासणारें तें रेलवे स्टेशन आणि तें खेडें माणसांनीं गजबजून गेलें होतें.

इंग्रज लोकांस शिकार फार प्रिय आहे. शिवाय या मर्दानी खेळामुळें ब्रिटनमधील सरदार घराण्यांतील लोकांना एकत्र जमण्याचा प्रसंग येत असतो. यामुळें शिकारीचे प्रसंग तिकडे वारंवार येत असतात. या प्रसंगीं सारी मंडळी एकमेकांशीं अगदीं मोकळ्या मनानें वागत असतात. या वेळीं आपला आणि परका अथवा लहान आणि मोठा हा भेदसुद्धां फारसा पाळला जात नाहीं. एकादा परदेशस्थ माणूस खंदा स्वार असला आणि त्याची निशाणबाजी चांगली असली, तर बडे बडे सरदारहि त्याच्या गळयास मिठी मारण्यास कसी करणार नाहींत. कोणी मनुष्य पट्टीचा विद्वान् असला, अथवा मोठा शास्त्री अथवा पंडित असला किंवा पुष्कळ श्रीमंत असला, तरी त्याजबद्दल इंग्रजांना फारसें कौतुक वाटा-वयाचें नाहीं; पण क्रिकेट किंवा शिकार यांसारख्या मर्दानी खेळांत जो प्रवीण असेल, त्याची जातगोत न पाहतांहि ते त्याशीं मैत्री संपादन करतात. अशाच एका शिकारीच्या प्रसंगीं एक जर्मन घोडदळांतील अम्मलदार एका इंग्रज सरदाराच्या घरीं पाहुणचारासाठीं गेला.

हा अम्मलदार शरीरयष्टीनें उंच आणि दिसण्यांत फार रुबाबदार होता. सरदारसाहेबांच्या मित्रमंडळांत लवकरच त्यानें आपला चांगला जम बसविला.

अगदीं शांतपणें आणि कोणाच्याहि लक्षांत येऊं न देतां सहज बोल-ण्याच्या ओघांत जर्मनसरकारला उपयुक्त होईल, अशी माहिती तो मिळवूं लागला. आपल्या या नव्या मित्रमंडळींत विशेष उपयोगी पडणारीं स्त्री-पुरुषें कोण आहेत, याचा शोध तो करूं लागला. आपल्या स्नेहीमंडळी-च्या चालचालणुकीवर तो बारीक नजर ठेऊं लागला. इंग्लंडांत ब्रिज नांवाच्या पत्त्याचें खेळाचें व्यसन श्रीमंत घराण्यांत अतिशय बोकाळलें आहे. या खेळाच्या पायीं मोठमोठ्या सरदारांच्या स्त्रिया आणि पुरुष हीं

धुळीस मिळालीं आहेत. आपला जर्मन अम्मलदार त्यांजबरोबर स्वतः कधीं खेळत नसे; पण त्यांपैकीं प्रत्येकानें किती किती रकमेच्या हुंड्या कोणास लिहून दिल्या आहेत, याची माहिती मात्र त्यानें पुरी मिळविली आणि हा धागा हातीं धरून आपलें सूक्ष्म जाळें विणण्यास त्यानें आरंभ केला. एकादे दिवशीं एकाद्या पोकळ झालेल्या सरदाराकडे एकाद्या मारवाडीवाण्याचा गृहस्थ हळूच यावयाचा आणि हुंडी पुढें करून पैशाचा तगादा करावयाचा. सरदारांचा खिसा रिकामा असल्यामुळें हुंडीची भरपायी करण्याचा एकादा वाममार्ग शोधणें त्यास भाग पडावयाचें. तवा इतका खरपूस तापला, कीं, या जर्मन अम्मलदाराची पोळी त्यावर पडलीच.

ब्रिटिशराज्याला आंतून पोखरणारे हे भुंगे आंत सोडण्याचें काम मुख्यतः बर्लिन येथील हेरखातें करतें; तथापि जर्मन वकिलातीला या गोष्टी अगदींच अज्ञात असतात असें नाहीं. एके वेळीं, एक नामधारी कौंटेस लंडन येथील बड्या घराण्यांत फार प्रसिद्धीस आली होती. कांहीं दिवसांनीं लंडन येथील पोलिस म्याजिस्ट्रेट समोर कौंटेसच्या भ्रमाचा भोपळा फुटला. या बाईबद्दल माहिती विचारतां जर्मन वकिलातीनें अर्थातच कानावर हात ठेवले. पण खुद्द वकीलसाहेब आणि या नामधारी कौंटेस अनेक मेजवान्यांच्या प्रसंगीं एकमेकांशीं संभाषण करीत असत, हें अनेकांनीं पाहिलें आहे.

कित्येक वेळां केसरची स्वारी इंग्लंडला गेली असतां, आपणाबरोबर कांहीं लोक मुद्दाम घेऊन जात असत. एके वेळीं व्हिक्टोरिया राणीच्या मृत्यूच्या आधीं केसरची स्वारी इंग्लंडास गेली होती, त्यावेळीं प्रिन्स ऑफ वेल्स ( एडवर्ड बादशहा ) यांनीं आपल्या भाच्यास पुढील निरोप पाठविला होता. " आमच्या मातुःश्रीची प्रकृति बरीच नादुरुस्त असल्यामुळें तिजकडून योग्य तऱ्हेचा आदरसत्कार कदाचित् होणार नाहीं; तथापि माझ्याकडून बनेल तेवढा करीन. आतां एक विशेष सूचना इतकीच करावयाची कीं, येतांना ॲडमिरल फॉं सेडन बिब्रियन यांस मात्र बरोबर आणूं नये."

या ॲडमिरलनें एके प्रसंगीं प्रिन्सला कमीपणा आणणारें भाषण केलें

होतें. केसरची स्वारी इंग्लंडांत आली, तेव्हां अॅडमिरलसाहेब सर्वांच्या पुढें चालत असतांना आढळले. त्या वेळीं केसरनीं बरोबर इतकीं माणसें आणलीं होतीं, कीं, त्या सर्वांची सोय वुइंडसर राजवाड्यांत लावण्यासारखें नव्हतें. यामुळें त्यांतील पुष्कळांची सोय निरनिराळ्या जागीं लावावी लागली. केसरबरोबरच्या सर्व माणसांना निरीक्षण शास्त्राचे धडे मिळालेले असतात, हें सांगावयास नकोच. या वेळीं अनेक माणसांनीं ज्या अनेक गमती केल्या, त्या सर्व सांगावयाचें म्हटलें, तर एक महाभारतच होईल; पण मासल्यासाठीं एकच गोष्ट सांगतों.

एका सरदारसाहेबांनीं समुद्रप्रवासाचा बूट काढला. लंडनमधून निघून स्काटलंडच्या उत्तर किनाऱ्यापर्यंत गमतीनें प्रवास करावयाचा बेत त्यांनीं ठरविला. या प्रसंगीं आपल्या अनेक ओळखीच्या स्त्री-पुरुषांस त्यानें पाचारण केलें. या मंडळींत इंग्लंडांतील नामांकित स्त्रिया आणि पुरुष व कित्येक लष्करी आणि आरमारी कामदारहि होते. एक मोठी आगबोट भाड्यानें ठरविली होती. या आगबोटीवर सर्व प्रकारच्या खेळाची योजना करण्यांत आली होती. एकंदरीनें हा प्रवास मोठ्या मौजेचा होईल, याबद्दल कोणासहि शंका नसल्यामुळें सर्व मंडळी आनंदांत गर्क होती. पुष्कळ मंडळींनीं आपलीं फोटोग्राफीचीं उपकरणेंहि बरोबर घेतलीं होतीं. आमच्या जर्मन सरदारसाहेबांनीं फोटोग्राफीवर अशा सुंदर गप्पा मारल्या कीं, त्यांची सर्व श्रोते मंडळी आपल्या फोटोग्राफीच्या ज्ञानाचें प्रदर्शन करण्यास विलक्षण उत्सुक झाली. दुसऱ्याच दिवसापासून किनाऱ्याचे फोटो भराभर बाहेर पडूं लागले. अशा रीतीनें वेगवेगळ्या भागांचा फोटोंचा एक प्रचंड ढीग जर्मन सरदारसाहेबांजवळ जमला. सांप्रत हे सर्व फोटो नंबरवारीनें एका पुढें एक असे बर्लिन येथील आरमारी खात्याच्या फडणीशींत लागले असून इंग्लंडच्या साऱ्या दक्षिणोत्तर किनाऱ्याचें प्रत्यक्ष प्रदर्शन करीत आहेत.

× × ×

इंग्लंड युद्धांत पडलें, तर आपणास तें जड गेल्यावांचून राहणार नाहीं; हें लक्षांत आणून जर्मनीच्या जनरल स्टाफनें आपल्या तयारींत कोणतीहि

उणीव राहूं न देण्याची खटपट चालविली होती. इंग्लंडची तंगडी मोडण्याकरितां दोन गोष्टी करणें अवश्य होतें. एक इंग्लंडवर स्वारी करणें अथवा तें न साधल्यास हवेंतून जमिनीवर हल्ले करणें आणि पाण्यांतून इंग्लंडच्या अन्नाचा पुरवठा तोडण्याचा यत्न करणें. आरमारी जहाजांची संख्या वाढवून इंग्लंडबरोबर आपला निभाव लागणार नाहीं, ही गोष्ट जर्मनीच्या लक्षांत पूर्णपणें येऊन चुकली होती. आपलें आरमार इंग्लंडच्या आरमाराच्या बरोबरीचें करण्याचा यत्न जर्मनीनें चालविला होता, पण जर्मनीच्या एका जहाजास दोन जहाजें बांधण्याचा उपक्रम इंग्लंडनें सुरू केल्यामुळें जर्मनी या शर्यतींत मागें पडला. या बाजूनें निराशा झाल्यानंतर त्यानें आपला मोर्चा दुसरीकडे वळविला. झेपेलिन, डीझल आणि सायमनलेक यांच्या युक्त्यांनीं जर्मनीचा हा दुसरा प्रयत्न बराच यशस्वी झाला.

आटो डीझल यानें एक नवें इंजिन बनविलें आहे. हें इंजिन जर्मन सरकाराकडे आल्याबरोबर त्यानें तें विकत घेतलें. याबद्दल डीझल याला साडेसात लक्ष रुपये रोख व वीस हजाराचें वर्षासन मिळालें. एवढें द्रव्य अचानकपणें खिशांत पडल्यावर डीझलच्या तोंडास अधिक पाणी सुटलें. हें आपलें इंजिन घेऊन इंग्लंडांत जाण्याचा विचार त्यानें केला पण ही गोष्ट जर्मन सरकारास समजली. थोड्या दिवसांनीं हंबर्गहून एडिंबरोला जाणाऱ्या एका बोटीवर डीझल चढला. त्याला पुढें केव्हांहि कोणीं जिवंत पाहिला नाहीं. आपण कोणाशीं स्पर्धा करीत आहों, ही गोष्ट बिचाऱ्या डीझलच्या लक्षांत आली नाहीं !

सायमन लेक या नांवाचा एक अमेरिकन गृहस्थ होता. पाणबुड्या बोटींत यानें कित्येक सुधारणा केल्या होत्या. खुद्द अमेरिकेंत त्याच्या श्रमाचें चीज झालें नाहीं; तेव्हां तो जर्मनींत निघून आला; जर्मन सरकारानें ताबडतोब त्याला आश्रय दिला. त्याच्या युक्त्या त्याजपासून विकत घेऊन जर्मन इंजिनियरांनीं त्यांत आणखी सुधारणा केली. ४२ सेंटिमिटर ( १६·८ ) इंच तोफेची मूळ कल्पनाहि अमेरिकेंतच उद्भवली. अशी बोलवा आहे; पण अमेरिकेंतील या वियाण्याचें अखेरचें फळ

जर्मनीच्या पदरांत पडलें, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. भवितव्यता बलीयसी !

झेपेलिन प्रत्यक्ष अस्तित्वांत आलें. अशक्य वाटणारी ४२ सेंटिमिटर तोफ प्रत्यक्ष सिद्ध झाली. आपल्या पुरवठ्याच्या कोठारापासून १५ दिवसांच्या अंतरावर चालून जाणारी पाणबुडी तयार झाली, भावी दिवसाकरतां ( Der Tag ) जर्मनीची सर्व तयारी पूर्ण झाली.

केसर दिवसेंदिवस जणू काय अधिक तरुण होत आहे, अशा रीतीनें वागूं लागले. त्यांच्या चेहऱ्यावरील पूर्वींची काळजीची छटा नाहींशी झाली. आपल्या हातीं असलेल्या वज्राच्या सामर्थ्याबद्दल जणूं काय त्यांची खात्री पटली. पूर्ण तयारी करून योग्य संधीचीच ते जणू काय वाट पहात होते.

१९१४ च्या वसंत मासाच्या आरंभीं जर्मनींतील तरुण शेतकऱ्यांस राजवाड्यांतून पाचारण झालें. बराच वेळ बादशहांशीं त्यांची भेट झाली. अखेरीस त्यांना निरोप देतांना बादशहा ह्मणाले, " सद्गृहस्थ हो, जर्मनीच्या इतिहासांत अननुभूत अशा प्रकारचें यंदाचें पीक मोठें येईल, असें तुह्मी ह्मणतां, ही गोष्ट अगदीं खरी ना ? "

" होय सरकार. ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. "

' तो दिवस ' जवळ येत चालला.

× × ×

तो दिवस जवळ येत चालला. परिस्थितींत विलक्षण बदल झाला होता. सन १९०० पासून १९०६ सालापर्यंत इंग्लंड सर्व युरोपीय राष्ट्रापासून अलग राहिलें होतें. हा अलगपणा बरा नाहीं, ही गोष्ट प्रथम सातव्या एडवर्ड बादशहांच्या नजरेस आली, आणि त्यांच्या खटपटीनें युरोपची सारी परिस्थिति बदलण्यास आरंभ झाला. इंग्लंड आणि फ्रान्स यांची मैत्री पक्की आहे, ही गोष्ट मोरोक्को प्रकरणाच्या वेळीं उघड झाली. यानंतर ट्यानस अरण्यांतील मुत्सद्यांच्या भेटीचा योग जुळवून आणून इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया या त्रिकुटांत फूट पाडण्याचा यत्न केसरनीं केला; पण त्या प्रयत्नांत त्यांस यश आलें नाहीं.

या घडामोडीमुळें जर्मनी दिवसेंदिवस अधिक मस्त होत चालला. जंगली हत्ती मस्त झाला, म्हणजे बेगुमानपणें समोर दिसेल, त्यावर तो कसा तुटून पडतो, व तशा स्थितींत त्याच्या समोर जाणें किती धोक्याचें आहे, ही गोष्ट सर्व शिकाऱ्यांना माहीत आहेच. जर्मनीची आज अशीच स्थिति झाली आहे. जर्मनी आतां अगदीं पिसाळला आहे. त्यानस अरण्याच्या भेटीच्या वेळीं आपली तयारी कितपत आहे, याचा अजमास जर्मनीनें इंग्लंडला दिला होता; तथापि त्या वेळींहि बेचाळीस सेंटिमिटर तोफ, झेपेलिन आणि पाणबुडी याचा थांग मात्र जर्मनीनें कोणासहि लागूं दिला नव्हता.

आपलें खरें सामर्थ्य किती आहे, हें जर्मनीनें सर्वांस अगोदर जाणविलें असतें, तर जगाच्या शांततेचा भंग झाला नसता, असेंहि कोणी म्हणतात; पण भविष्यत् कालाबद्दल खात्री कोणीं द्यावी ? इंग्लंड आपल्या बाजूस वळत नाहीं, असें पाहून जर्मनीनें इंग्लंडांत आपल्या हेरांचा नुसता सुळसुळाट करून दिला.

---

## जर्मनराष्ट्राचें अंतरंग.

युरोपच्या शांततेचा कधींहि भंग होणार नाहीं, अशी खात्री बाळगणारे अद्यापिहि युरोपांत होते. बरेच दिवस युरोपांत शांतता नांदल्यामुळें, त्यांच्या डोक्यांत हा भ्रम उत्पन्न झाला होता. व्यापाराच्या विलक्षण भरभराटीमुळें सर्व राष्ट्रांचे परस्पर संबंध पूर्वीपेक्षां अधिक गुंतागुंतीचे झाले होते. ही गुंतागुंतच युद्ध होऊं देणार नाहीं, असा पुष्कळांचा समज होता. सर्व देशांत शांतिसूक्तें म्हणणाऱ्या लोकांच्या ओरडाओरडींत आणि शांतता परिषदांच्या गडबडीमुळें खरी परिस्थिति लपून गेली होती; यामुळें वस्तुस्थितीचा विसर लोकांस पडला. ही बाह्य शांतता खोटी आहे, असें म्हणणाऱ्या लोकांची गणना वेड्यांत होऊं लागली. विशेषतः इंग्लंडांत शांतिःपुष्टिःस्तुष्टिश्चास्तूचा पाठ विशेष जोरानें चालला होता.

लॉर्ड राबर्ट, जनरल बेडन पॉवेल, लॉर्ड फिशर आणि लॉर्ड किच्नेर इत्यादिकांच्या सूचनांकडे इंग्लंडनें फारसें लक्ष पुरविलें नाहीं.

× × ×

जर्मनीची परिस्थिति त्याहून अगदीं वेगळी होती. शांततेच्या, युद्ध-साहित्य कमी करण्याच्या व सलोख्यानें तंटे तोडण्याच्या सूचना इतर राष्ट्रांनीं केल्या, तर त्या अगदीं शांतपणें ऐकून घ्यावयाच्या व ताबडतोब फेटाळून लावावयाच्या असा क्रम जर्मनीनें सुरू केला होता. टयूटनवंश युद्धदेवतेचा भक्त आहे, या म्हणण्यांत फारसा जीव नाहीं. विनाकारण रक्तपात करण्याची हौसहि त्यास नाहीं; तथापि राष्ट्राराष्ट्रांतील तंट्यांचा अखेरचा निकाल प्राचीन कालाप्रमाणें सांप्रतहि केवळ तलवारीनेंच लागतो, ही कल्पना मात्र जर्मनीच्या डोक्यांतून अद्यापि निघालेली नाहीं. मानवजातीच्या कल्याणास शांततेची स्थिति किती उपकारक आहे, ही गोष्ट जर्मनी जाणत नाहीं, असें नाहीं; तथापि माणसांमाणसांतील सर्व भांडणांचा निकाल थंड्या मार्गानें लागण्याचा दिवस पूर्वेतिहासांत ज्या-प्रमाणें उगवलेला दिसत नाहीं, त्याचप्रमाणें सांप्रतहि तो उगवलेला नाहीं, असें जर्मनीचें ठाम मत आहे.

गत युद्धांच्या कारणांची कितीहि मीमांसा करून भावी युद्धें टाळ-ण्याच्या उपपत्ति त्याजवरून कोणी बसविल्या अथवा भारेच्या भारे ग्रंथ लिहून आपलें पांडित्य त्यांनीं सिद्ध केलें, तरी या साऱ्या गडबडींत एक महत्त्वाची गोष्ट हे पंडित विसरत असतात. ही गोष्ट म्हणजे मनुष्य स्वभाव.

युद्धास सुरुवात झाल्याबरोबर जो प्रथम तडाखा मारतो, तो अर्धें युद्ध जिंकतो, असें जर्मन चालकांचें मत आहे. युरोपांतील सांप्रतची गुंतागुंत शेवटीं तरवारीनेंच मोकळी होईल, अशी खात्री चित्तांत बाळगून जर्मनीनें त्या दिशेनें पहिला तडाखा मारण्याची तयारी चालविली होती.

गेल्या तीन होहेनझोलर्न घराण्याच्या बादशहांच्या कारकीर्दींत जर्मनीला युरोपांत प्रमुखस्थान मिळालें होतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. सुमारें चाळीस वर्षांच्या अवधीच्या शांततेनें जर्मनीची विलक्षण भरभराट झाली होती, हेंहि खरें आहे. या चाळीस वर्षांच्या अवधींत आपल्या

विलक्षण मेहनतीनें आणि सशास्त्र उद्योगानें जर्मनीनें आपला व्यापार इतका वाढविला कीं, शेंकडों वर्षांनीं आपल्या पुढें असलेल्या इतर राष्ट्रांच्या पंक्तीस तो येऊन बसला.

सामान्यपणें पहांतां जर्मन लोकांना सुखासमाधानानें आयुष्याचे दिवस कंठण्याची जितकी आवड आहे, तितकी इतर कोणत्याहि लोकांना नसेल. होतां होईल, तों पोटचें पाणी हालवावयाचें नाहीं, असा त्यांचा बाणा आहे. या बाबतींत त्यांची बरोबरी चिनी लोकांशिवाय दुसरें कोणी करणार नाहीं. शरीर सामर्थ्याला इतर देशांत जो मान आहे, तो जर्मनींत मुळींच नाहीं. यामुळें मैदानी अथवा मर्दानी खेळांचें महत्त्व मुळींच मानण्यांत येत नाहीं. व्यापार आणि आधिभौतिक शास्त्रें यांच्या होणाऱ्या वाढींत इतर राष्ट्रांच्या चढाओढीची भीति जर्मनीला वाटण्याचें कारण नव्हतें. स्वतःचें घर संभाळून राहण्याचें सामर्थ्य जर्मनींत होतें; पण कालाची सूक्ष्म गति अवलोकन करण्याची संवय जर्मनराष्ट्रास फार प्राचीन काळापासून आहे. क्यांट, शापेनहारपासून तों अलीकडच्या ट्रीचेनीचेपर्यंत झालेले तत्त्ववेत्ते जर्मनराष्ट्राच्या मानसिक स्थितीची साक्ष पटवीत आहेत. शांततेनें आपण मिळविलेला घांस आपल्या तोंडून कोणी तरी ओढून नेण्याचा दिवस उगवेल, अशी खात्री अंतर्यामी पटल्यामुळें त्या दिवसाकरतां जर्मनी आपली तयारी करीत होता. असा प्रसंग येणें ही मोठी आपत्ति आहे, ही गोष्ट तो जाणून होता; पण ती टाळतां येणें शक्य नाहीं, असेंहि त्यास वाटत होतें.

जर्मन सैन्याची आश्चर्योत्पादक तयारी आणि त्याची प्रतिरोधकशक्ति हीं सैन्याच्या आगाऊ शिस्तीचीं फळें होत. जर्मन लष्कर एकाद्या यंत्राप्रमाणें तयार केलें जातें. ही यांत्रिक पद्धत केवळ लष्करापुरतीच आहे, असें नाहीं. साऱ्या साम्राज्याची इमारतहि एकाद्या यंत्राप्रमाणें उभारलेली आहे. जर्मनींतील प्रत्येक व्यक्तीला आज्ञाधारकपणाची शिस्त लहानपणापासूनच लावली जाते. जर्मन आईबाप आपले हुकूम मुलांकडून तंतोतंत पाळवितात. मुलांवर आईबापांची सत्ता अप्रतिहत असली पाहिजे, असें जर्मन लोकांचें मत आहे आणि या तत्त्वाची अम्मलबजावणी बादशहाच्या राज-

वाड्यापासून तों थेट एकाद्या शेतकऱ्याच्या झोंपडीपर्यंत एकसारखीच होत असते. जर्मन जनतेच्या भावी आयुष्याच्या मुळाशींहि हेंच तत्त्व असतें. जर्मन मूल मोठें होऊन शाळेंत जाऊं लागलें, म्हणजे तें शाळागुरूंच्या करड्या अम्मलाखालीं असतें. यानंतर शाळा सुटून तें एकादा धंदा शिकण्याकरितां एकाद्या कारखान्यांत राहिलें म्हणजे, कारखान्याचा मालक त्याचा सर्वस्वी धनी बनलेला असतो. ठरीव वय झाल्याबरोबर जर्मन मुलाचा प्रवेश सैन्यांत अगर आरमारांत होतो. येथील शिस्तीची कदर सर्वविश्रुत आहेच. यावरून शिस्त आणि आज्ञाधारकता हे दोन गुण साऱ्या जर्मन राष्ट्राच्या अंगांत कसे भिनविण्यांत येतात, याची कल्पना येईल.

केवळ वर वर पहाणारांस बाह्यदेशीयांस ही पद्धत विलक्षण त्रासदायक वाटेल, यांत शंका नाहीं आणि जन्मापासून अशा रीतीनें वागण्याची संवय ज्यांना नाहीं, अशा माणसाना हा करडा अम्मल असह्य वाटेल यांत शंका नाहीं; तथापि आकुंचित व्यक्तिविषयक सर्व भावना नाहींशा होऊन त्यांचा लय विशाल राष्ट्रिय भावनांत होण्यास शिस्त आणि आज्ञाधारकता यावांचून दुसरा उपाय नाहीं, असें जर्मन पुढाऱ्यांचें मत आहे. जनतेच्या कल्याणाकरतांच राष्ट्र अस्तित्वांत आलेलें असतें. तसेंच राष्ट्रिय जीवित कायम राखणें हें जनतेचें आदि कर्तव्य आहे. राष्ट्र आणि जनता ह्यांचे संबंध पितापुत्राप्रमाणें आहेत. जर्मन जनतेच्या आचरणांत या तत्त्वांचा अंतरभाव सर्वत्र झाल्याचें आढळून येतें. आगगाड्या, टपालखातें, तारखातें, मोठे गाडी रस्ते आणि पाण्यांतील दळणवळणाचे मार्ग हीं सारीं कंपन्यांच्या ताब्यांत नसून सरकाराच्या म्हणजे राष्ट्राच्या ताब्यांत असलीं पाहिजेत. ह्या तत्त्वाचा प्रत्यक्ष पुरस्कार जर्मनीनें पुष्कळ वर्षांपासून केल आहे. हीं सुखसाधनें व्यापारी लोकांच्या हातांत गेलीं, म्हणजे त्यांचा उपयोग हे व्यापारी स्वतःच्या तुंबड्या भरण्याकडे करतात. उलट पक्षीं हीं साधनें सरकारच्या स्वाधीन राहिलीं, म्हणजे त्यांचा उपयोग राष्ट्राच्या कल्याणाकडे होतो. प्रजासत्ताक संस्थानांत या तत्त्वांचा नुसता उच्चार नुकताच कोठें होऊं लागला आहे. व्यापारी दृष्ट्या जर्मनीची इतकी अश्रुतपूर्व भरभराट होण्यास हींच तत्त्वें मूळ कारण झालीं.

. ट्यूटनवंश हा कल्पनातरंगवंश आहे, असा त्याचा लौकिक आहे. कल्पनेच्या साम्राज्यांत, ट्यूटनवंश अधिक वावरत असतो ही गोष्ट खरी, तथापि तो व्यवहारापासून सुटत नाहीं, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आपले पाय प्रथम जमिनीवर पक्के केल्यावांचून आपलें डोकें तो आकाशांत कधींहि भडकूं देत नाहीं. शीलर, गटे, शापनेहार, श्लेजेल, आणि क्यांट इत्यादिकांचा तत्ववाद व व्याग्नर वगैरे कवींचें संगीत आणि नाट्यग्रंथ यांचीं पारायणें करून त्यांतील रहस्यें तुह्मांस पचनीं पाडतां आलीं, तरच जर्मन कुलाचें खरें हृद्गत तुमच्या हातीं पडेल. त्यांचें साहित्य, त्यांचें तत्त्व-दर्शन आणि त्यांचें संगीत या सार्‍यांच्या मुळाशीं ऐहिक कल्याणाची इच्छा तुम्हांस आढळून येईल.

या सर्वतत्त्वांची व अशा स्वरूपाच्या जड वादाची मूर्तिमंत मूस जर तुम्हांस पाहणें असेल, तर ती तुम्हांस होहेनझोलार्न घराण्यांत आढळून येईल. होहेनझोलार्न बादशहाच्या भोंवतीं असलेला राजकीय थाटमाट व डोळे दिपविणारा लखलखाट काढून टाकला, तर आंत बाकी राहिलेला पुरुष शुद्ध वणिकवृत्तीचा पुतळा आहे, असें तुमच्या निदर्शनास येईल. ट्यूटनसारख्या अत्यंत व्यवहारी राष्ट्रावर राज्य करण्यास हा गुण राजाच्या अंगीं अवश्य असला पाहिजे. जर्मन लोक जसे अत्यंत व्यवहारी, तसेच अत्यंत कल्पनावश आहेत आणि त्यांच्या या दुसर्‍या गुणाचें प्रदर्शन त्यांच्या बादशहाच्या भाषणप्रसंगीं अनेक वार झालेलें आहे. दुसर्‍या वुइ-लियम बादशहाचीं भाषणें हीं एकाद्या नाटकांत शोभण्यासारखीं असून त्याचे हावभावहि नाटकी असतात, ही गोष्ट सर्वविश्रुत आहेच.

आपणाभोंवतीं काय चाललें आहे, हें जाणण्याचा गुण बहुतेक सार्‍या होहेनझोलर्न राजांस होता, असें इतिहासावरून दिसून येतें. कांहीं प्रसंगीं त्यांपैकीं कित्येकांनीं सुलतानी अम्मल गाजविला असला, तरी लोकांचा कल पाहून तदनुसार राज्याची शिस्त राखावयाची व आपलें व देशाचें कल्याण करून घ्यावयाचें. हा क्रम त्यांनीं बहुधा सोडला नाहीं. विशेषतः सांप्रतच्या बादशहांनीं तर या कामीं चांगलीच कुशलता दाखविली आहे. सांप्रतचे बादशहा लोकांस भासवितात, तितके ते खरोखर बुद्धिवान् नाहींत.

साहित्यशास्त्रादि कलांतील त्यांचें नैपुण्य अनेक बाबतींत आक्षेपार्हहि आहे; तथापि आजुबाजूची परिस्थिति ओळखून तदनुरूप वर्तन करण्याचा होहेंझोलर्न घराण्याचा गुण त्यांजपाशीं मुबलक आहे. त्यांची खाजगी शेती व गुराढोरांची संपत्ति जर्मनींत सर्वांहून मोठी आहे. यांशिवाय सराफकट्यावरहि त्यांचा दांडगा व्यवहार चालू असतो. त्यांच्या सुनाहि युरोपांतील अत्यंत श्रीमंत घराण्यांतील आहेत.

जर्मन बादशहा अत्यंत संपत्तिमान असले, तरी खर्चाच्या बाबतींत ते विलक्षण काटकसरी आहेत. या बाबतींत सांप्रतचे जर्मन युवराज आपल्या वडिलांच्या अगदीं उलट स्वभावाचे आहेत.

हें युद्ध सुरू होण्यापूर्वीं युवराजांनीं इंग्लंडांत एक शर्यतीचा सट्टा केला होता. हा सट्टा त्यांच्या अंगावर आला. पैशाबद्दल लिहून दिलेली हुंडी लंडन येथील एका प्रसिद्ध सावकाराच्या हातीं गेली. युवराजाकडून पैसे घेण्याकरतां या सावकारानें बरीच खटपट करून पाहिली; पण ते लवकर मिळण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां त्यानें एक विलक्षण युक्ति योजिली. एका बड्या सरदार घराण्यांतील एक स्त्री त्याच्या ओळखीची होती. जर्मन राजघराण्याशींहि या स्त्रीचा मित्रत्त्वाचा संबंध होता. या स्त्रीमार्फत त्या सावकारानें एक पत्र वुइलियम बादशहांच्या हातीं जाण्याची व्यवस्था केली. या पत्राच्या द्वारें आपण एक दुर्मिळ जुनें नाणें बादशहास पाठवीत आहों, असा त्यानें त्या सरदार स्त्रीचा समज करून दिला. ही सरदार स्त्री पुढें लवकरच बार्लिन येथें गेली. तेथें तिला एके दिवशीं राजवाड्यांतून मेजवानीचें बोलावणें आलें. या प्रसंगीं बादशहांची भेट होतांच सावकाराकडून आणलेलें पाकिट तिनें बादशहाच्या स्वाधीन केलें. बादशहाला जुनीं नाणीं गोळा करण्याचें विलक्षण वेड आहे. आतां एक मोठी अजब चीज आपल्या हातीं लागणार, अशा आशेनें बादशहांनीं मोठ्या आतुरतेनें हें पत्र फोडलें; परंतु त्यांत जुनें नाणें मिळण्याऐवजीं पावणेचार लक्ष रुपयांचीं नवीं नाणीं पाठविण्याचा तगादा मात्र बादशहांच्या दृष्टीस पडला. पत्र वाचतांना बादशहाचा संतापलेला चेहरा पाहून ती बिचारी सरदार स्त्रीहि मोठ्या बुचकळ्यांत पडली. पत्राची घडी करून बादशहा ह्मणाले,

"असले तगादे पावते करण्याचें काम ब्रिटिश सरदार घराणीं केव्हांपासून करूं लागलीं?" सरदारस्त्रीनें सर्व हकीकत बादशहाच्या कानावर घातली. बादशहा मोठे रसिक असल्यामुळें त्या मारवाड्याच्या युक्तीचें व कौटिल्याचें त्यांना एकदम मोठें हंसूं आलें. सरदारस्त्रीकडे वळून ते ह्मणाले, "ठीक आहे. या रकमेची भरपायी युवराजांच्या खाजगी तैनातींतून होईल."

वैवाहिक संबंध जोडून त्या द्वारें आपलें तट्टू सदोदित पुढें ढकलावयाचें असा प्रशियाचा पूर्वापर क्रम आहे; तथापि ही युक्ति नेहमीं सारखीच साध्य होते असें नाहीं.

नार्वे, स्वीडन आणि डेन्मार्क या तीन स्क्यान्डीनेव्हियन देशांचे जर्मनीशीं निरनिराळ्या प्रकारचे संबंध आहेत. डेन्मार्क व ब्रिटन यांच्यांत वितुष्ट पडण्यासारख्या कांहीं गोष्टी पूर्वेतिहासांत घडल्या असतांहि डेन्मार्कचें मन जर्मनीपेक्षां इंग्लंडकडे अधिक ओढ घेतें. १८६४ सालीं प्रशियानें श्लेस्वीग-हाल स्टीन प्रांत डेन्मार्कपासून बळकावला. जर्मनीची ही लूट डेन्मार्क अद्यापिहि विसरला नाहीं. आल्सेस-लोरेन प्रांताचें शल्य जसें फ्रान्साच्या हृदयांत अद्यापिहि बोंचत आहे, त्याचप्रमाणें वरील शल्य डेन लोक अद्यापि विसरलेले नाहींत. यामुळें एकाद्या युद्धप्रसंगीं जर्मनीला डेन्मार्ककडून कसल्याच प्रकारची मदत मिळण्याची आशा नाहीं. चालू युद्धांत डेन्मार्क जर्मनीच्या पंखाखालीं गेला असता, तर बाल्टिक समुद्राची नाकेबंदी करण्याचें काम ब्रिटिश आरमारास अत्यंत जड गेलें असतें, यांत शंका नाहीं. डेन्मार्कला अशा रीतीनें असंतुष्ट ठेवण्यांत जर्मन मुत्सद्यांनीं बरीच मोठी चूक केली आहे. कदाचित् होहेनझोलर्न घराण्याच्या उद्दाम स्वभावाच्या अतिरेकानेंहि ही गोष्ट घडून आली असेल. उलटपक्षीं राजकन्या आलेक्झांड्रा व सातवे एडवर्ड यांजमधील विवाहामुळें इंग्लंड व डेन्मार्क यांचे स्नेहसंबंध दृढ झाले.

स्वीडन आणि नार्वे यांचे जर्मनीशीं राजकीय संबंध याहून वेगळ्या प्रकारचे आहेत. जर्मनीबद्दल या देशांच्या मनांत मोठेंसें प्रेम आहे, असें नाहीं; तथापि रशियाबद्दल मात्र त्यांच्या मनांत विलक्षण भीति आहे. ही भीति इतकी दृढमूल आहे, कीं तिच्यापुढें बाकीचे सारे विचार रद्द

पडतात. याशिवाय नार्वे आणि स्वीडन यांचा जर्मनीशीं असलेला व्यापारी संबंधहि अत्यंत महत्त्वाचा आहे. या देशांतील खानिज जिनसांना जर्मनी हें एक मोठें गिऱ्हाइक आहे. यामुळें बाल्टिक समुद्राचा रस्ता सदोदित मोकळा राहण्यांत त्यांचा फायदा आहे. या दोन देशांची व्यापारी जहाजांची संख्याहि मोठी असल्यामुळें जलमार्ग मोकळे रहाण्यांत त्यांचा फायदा आहे. या दोन देशांच्या व्यापारास धोका येईल, असें वर्तन जर्मनीनें आजपर्यंत केव्हांहि केलेलें नाहीं. उलट त्यांच्या व्यापारास त्यानें मदतच केली आहे. ड्यान्झीग, स्टेटीन, स्वाइनमुंड, रोस्टाक, कील, हॅांबर्ग इत्यादि बंदरांत नित्य दृष्टीस पडणारे स्विडिश आणि नार्वेजियन डोलकाठ्यांचें अरण्य या गोष्टीची साक्ष देतात. याशिवाय खुद्द जर्मन बादशहाचें वजनहि लक्षांत घेण्यासारखें आहे. या देशांतील पुष्कळशा लोखंडाच्या खाणी बाह्यतः क्रप कंपनीच्या; पण वस्तुतः वुइलियम बादशहांच्या ताब्यांत आहेत, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

यंदाच्या जुलई महिन्यांत अतिशय उकाडा होत होता. साऱ्या हवत या उष्म्यामुळें औदासिन्य आलें होतें. आकाशांत एकहि ढग दिसत नव्हता. तरी लवकरच प्रचंड वादळ होणार, असें भविष्य वायुभारमापनशास्त्री वर्तवीत होते. हवामानांतील ही स्थिति युरोपांतील राजकीय परिस्थितीशीं अत्यंत जुळती होती. सर्व देशांचे परस्परांचे संबंध इतके गुंतागुतीचे झाले होते, कीं या गांठी सुटून, कीं तुटून मोकळ्या होणार, हें कोणासहि सांगतां येत नव्हतें.

जर्मनीची सांपत्तिक स्थिति अगदींच वाईट नसली, तरी फार समाधानकारकहि नाहीं. मजुरांना पुरेसें काम मिळत नव्हतें. पुष्कळसे कारखाने केवळ उसन्या भांडवलावर चालले होते. जगभर झालेल्या व्यापारी मंदीचा परिणाम जर्मनीला जाणवत होता. लष्कर आणि आरमार यांजवरील खर्चाच्या ओझ्याखालीं जर्मन सरकार मेटाकुटीस आलें होतें. यामुळें व्यापाऱ्यांस मिळणारी पैशाची मदत कमी होत चालली होती. अशा अनेक गोष्टींच्या एकीकरणांनीं जर्मन राष्ट्र उदास आणि बेदील झालें होतें.

• जर्मनीचे राजकीय संबंधहि फारसे संतोषकारक नव्हते. आपण साऱ्या युरोपांत एकटे पडलों आहों, ही जाणीव बादशहांच्या हृदयास टोंचत होती. यामुळें बादशहावर जर्मनींतील युद्ध प्रिय पक्षाचा पगडा वाढत्या प्रमाणावर बसूं लागला होता. या पक्षाचें प्रमुखत्व खुद्द युवराजानें स्वीकारलें होतें; तथापि होतांहोईतों तरवार म्यानाबाहेर काढण्याची बादशहांची इच्छा नव्हती. ती नुसती खुळखुळावून व धाकदपटशा दाखवून होईल तितकें कार्य साधावें असा बादशहांचा मनोदय होता.

अद्यापि आकाश निरभ्र होतें.

× × ×

इंग्लंडांतहि इतरेजनांची परिस्थिति अशीच बिकट होत चालली होती. जर्मनीच्या व्यापारी मुसंडीपुढें ब्रिटिश व्यापाराची पिछेहाट होऊं पहात होती. जर्मन आगबोटींच्या वाढत्या संख्येपुढें आपला टिकाव कसा लागेल, ही काळजी ब्रिटिश आगबोट कंपन्यांस जाणवूं लागली होती. त्याचप्रमाणें जर्मनीचें वाढतें आरमारहि ब्रिटिश मुत्सद्यांची झोंपमोड करण्यास कारण होत होतें. सांपत्तिक परिस्थितीहि प्रतिकूल होऊं पहात होती. व्यापार कमी झाल्यामुळें मजुरांस काम मिळेना. यामुळें जिकडे तिकडे संप होण्यास सुरवात झाली आणि यामुळें आधींच खालावत चाललेला व्यापार अधिक डबघाईस येत चालला.

याच सुमारास इंग्रज लष्करी अम्मलदार बेल्जमची पाहणी करीत आहेत अशी वदंता उठली. बेल्जमचा प्रत्येक चौरसमैल या अम्मलदारांच्या नजरेखालून गेला आहे, अशी गप्प पसरली. त्याचप्रमाणें सर्व मोठ्या रस्त्यांची व जलमार्गांची पाहणी झाली असून बेल्जम देशांतील धान्य वगैरेंचा पुरवठा, रेल्वेरस्ते, वगैरे सर्व बाजूंचें टिपण तयार झालें आहे, असें लोक ह्मणूं लागले.

अद्यापिहि आकाश निरभ्र होतें.

× × ×

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या सुमारें दुप्पट आकार व तितकीच लोकसंख्या असा रशिया आहे. दगडी कोळसा, लोखंड व इतर अशो-

धित धातु यांच्या धनत्तर खाणी रशियांत आहेत. तसेंच मोठमोठ्या वृक्षांचीं पुष्कळ अरण्यें तिकडे असून विस्तीर्ण गव्हाचीं शेतेंहि आहेत. गव्हाची शेतकी इतक्या मोठ्या प्रमाणावर जगांतील दुसऱ्या कोणत्याहि देशांत आढळावयाची नाहीं. देशाची सांपत्तिक भरभराट होण्यास ज्या गोष्टी मुळांत असाव्या लागतात, त्या सगळ्यांची तयारी रशियापाशीं भरपूर आहे. असें असतांहि रशिया बऱ्याच अंशीं दरिद्री आहे. दरिद्री याचा अर्थ त्याजपाशीं सोन्याचे वैपुल्य केव्हांहि झालेलें नाहीं.

दुसऱ्या क्याथेराइन राणीच्या वेळेपासून उष्ण प्रदेशांतील एखादें बंदर मिळविण्याची धडपड रशियानें एकसारखी चालविली आहे. उत्तर दिशेंतील धडपड स्वीडनच्या बाराव्या चार्लस राजानें बंद पाडली. त्यांत त्याला प्रशियन राजांचें सहाय्य होतें. दक्षिणेकडील म्हणजे काळ्या समुद्रांतील धडपड इंग्लंड व फ्रान्स यांनीं बंद पाडली. पूर्वेकडच्या खटपटीस जपाननें शह दिला. या खटपटीस थोडेंसें यश येण्याचा संभव दिसत होता व याच वेळीं जर्मनीच्या चिथावणीनें आस्ट्रियानें बाल्कन संस्थानांत आपलें तट्टू पुढें दामटलें नसतें, तर इंग्लंडच्या सहाय्यानेंहि जपानला रशियावर मात करता आली असती कीं नाहीं, याची शंकाच आहे.

पूर्वेकडे झालेला तंगडमोडीचा पहिला परिणाम म्हटला म्हणजे आस्ट्रियानें हारजेगोविना आणि बासनिया हे दोन प्रांत गिळंकृत केले, हा होय. अशा रीतीनें बाल्कन द्वीपकल्पांतील रशियाच्या वजनास शह बसत असतांहि त्याला त्याचा प्रतिकार वेळींच करतां आला नाहीं. रूसो-जपानी युद्धापूर्वी जर्मनी रशियाला फार भीत असे. प्रख्यात मुत्सद्दी बिस्मार्क यानें रशियाशीं सदोदित मैत्रीचें धोरण ठेवलें होतें. फ्रेडरिक दी ग्रेटच्या काळाच्या सप्त वार्षिक युद्धानंतर ट्यूटन आणि मस्कोव्हाईट यांच्या समशेरी एकमेकांविरुद्ध केव्हांहि चमकल्या नाहींत. रशियाशीं कधींहि वैर करूं नये, अशाबद्दलचे स्वदस्तुरचे लेख फ्रेडरिक दि ग्रेटनें लिहून ठेवलेले आहेत, असें म्हणतात. जर्मनीला रशियाबद्दल मत्सर वाटतो, याबद्दल बिलकुल शंका नाहीं. रशियाच्या जमिनीचा एकादा

लहानसाहि तुकडा जर्मनीला पाहिजे, असें नाहीं; पण रशियाचें सारें राजकारण आपल्या तंत्रानें चालावें, अशी जर्मनीची इच्छा आहे. " रशियाच्या पोटांत भावी इतिहासाची मुबलक सामग्री आहे; पण पौरुषयुक्त जर्मनीच्या हाताचें सहाय्य असल्याशिवाय त्या सामग्रीचा उपयोग होणार नाहीं, " असें बिस्मार्क म्हणत असे. सांप्रतच्या वुइलियम बादशहानींहि असेंच मत एका ठिकाणीं व्यक्त केलें आहे. जर्मनी व रशिया यांसारखी दोन एकसत्ताक, प्रबळ आणि महत्त्वाकांक्षी राष्ट्रें एकदील झालीं असतीं, तर पृथ्वीवर काय अनर्थ ओढवला असता, याचा अजमास करणें कल्पनेच्याहि बाहेर आहे. हीं राष्ट्रें परस्परविरुद्ध असल्यामुळेंच पुष्कळसे देश आज स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घेत आहेत, ही गोष्ट मात्र खरी.

रशियाचा वारंवार पाणउतारा करण्याचा मार्ग जर्मन मुत्सद्यांनीं स्वीकारला. यामुळें पूर्वीची मैत्री अस्तंगत होत चालली. रशियन लोक मुळचे तारतार वंशांतील असल्यामुळें अर्धवट एशियाटिक आहेत, असें म्हणावयाला हरकत नाहीं. एशियाटिक लोक अपमान विसरून जात नाहींत अथवा त्याबद्दल क्षमाहि करीत नाहींत. या तत्त्वाला अनुसरूनच जर्मनीनें केलेल्या अपमानाचें उट्टें काढण्याची तयारी रशिया धिमेपणें आणि गुप्त रीतीनें करीत होता. तो केवळ अनुकूल संधीचीच वाट पहात होता, आणि ती संधि प्राप्त होण्याची चिन्हेंहि दिसूं लागलीं. केवळ बाह्य दृष्टीनें पाहणारास रशिया आंतून पोखरल्यासारखा दिसत होता. वारंवार होणारीं बंडें, यहुदी लोकांचा असंतोष आणि पैशाची कमतरता या कारणांनीं रशिया हलाकीस आला असावा, असें अनुमान कोणींहि काढलें असतें; पण हें अनुमान खात्रीनें चुकीचें आहे. रशियाच्या वस्तुस्थितीबद्दल आजपर्यंत अनेकांनीं अनेक प्रकारचीं अनुमानें काढून त्या राज्याचें भविष्यहि वर्तविलें आहे; पण हीं सारीं अनुमानें व भविष्यें खोटीं ठरत असल्याचा प्रत्यय युरोपास अनेकवार आला आहे. रशियन राज्य हें मुत्सद्यांस एक मोठें कोडें होऊन बसलें असून त्याचा उलगडा आजपर्यंत कोणासहि करतां आला नाहीं.

आस्ट्रो-जर्मनांच्या महत्त्वाकांक्षेस आळा घालण्यास रशियास सामर्थ्य नाहीं, असें पाहून दुसऱ्या बुइलियम बादशाहांनीं बाल्कन संस्थानांत आपलें घोडें पुढें ढकललें. यामुळें रशिया पूर्णपणें आंग्लो फ्रेंच द्वयीस मिळाला.

× × ×

व्यापारीदृष्ट्या अथवा पैशाचा तुटवडा पडला ह्मणून, फ्रान्स देशाला युद्धोपस्थित करण्याचें मुळींच कारण नव्हतें; पण १८७० सालीं गमावलेल्या आल्सेस लोरेन प्रांताचें शल्य त्याच्या हृदयांत अद्यापि ताजें आहे. फ्रेंच लोक विशेषतः विकारवश आहेत. कोणत्याहि विकाराचें प्राबल्य त्यांच्या चित्तांत ताबडतोब होतें. कॉर्डिनल, रिचेल् अथवा नेपोलियन बोनापार्ट यांसारख्या लोकोत्तर बुद्धिमान पुरुषांनीं फ्रेंचांच्या याच स्वभावविशेषाचा उपयोग करून घेतला, आणि त्या त्या वेळीं राजकीय दृष्ट्या फ्रान्सचा फायदा झाल्यासारखा दिसला, ही गोष्टहि खरी; पण कार्य आणि प्रतिकार्य यांच्या परस्पर विरोधी लाटा नेहमींच समप्रमाणानें उठत असतात, या शास्त्र सिद्धांताचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य रिचेल् किंवा बोनापार्ट यांच्या आंगीं नव्हतें. कोणताहि मानासिक विकार उत्कंठतेस पोहोंचून तो ओसरून गेला, ह्मणजे त्याचे अंतिम परिणाम शारिरिक अवनतींत दिसून येतात. चैनीची चटक लागून सामान्य नीतीचीहि हेळसांड होऊं लागते. सांप्रतच्या युद्धाच्या पूर्वी फ्रान्सची अंतःस्थ स्थिति कशी होती, हें सूक्ष्म नजरेनें पाहणारांच्या लक्षांत आलें असेलच. या वेळीं फ्रान्स मोठ्या पेचांत सांपडला होता. जर्मनीवर सूड उगविण्याची त्याची इच्छा प्रबळ होती; पण सिडान आणि मेट्झ् यांची आठवण अद्यापि ताजी असल्यामुळें जर्मनीशीं एकाकी सामना बांधण्यास तो धजावत नव्हता. त्यामुळें इतर राष्ट्राची मदत घेण्याचा उपक्रम त्यानें सुरू केला. मोठमोठ्या रकमा रशियास कर्जाऊ देऊन त्यानें प्रथम रशियाचें पाठबळ मिळविलें; तथापि इंग्लंडशीं मैत्री होईपर्यंत फ्रान्सच्या मनांतील धाकधूक गेली नव्हती. अशा रीतीनें फ्रान्स आणि इंग्लंड यांच्याशीं स्वतःची मैत्री पक्की होतांच

१८७० सालच्या जुन्या शल्यानें त्याच्या मनांत पुनः जोरानें उचल खाल्ली आणि आपल्या मनस्वी स्वभावास अनुसरून ही बदललेली परिस्थिति फ्रान्सनें शक्य तितक्या स्पष्ट रीतीनें जर्मनीच्या नजरेसहि आणून दिली. शक्य असेल, तर फ्रान्सला आपल्या बाजूस वळवावें, असें केसरचें धोरण होतें; पण फ्रान्सच्या कृतीनें या त्याच्या धोरणास पूर्ण हरताळ लागून जुनें शत्रुत्व पुनः नव्या जोमानें प्रकट झालें.

× × ×

आस्ट्रिया-हंगारी या जोड राज्याच्या प्रजेंत एकंदर निरनिराळ्या सव्वीस जातीचे लोक आहेत. पांच कोटी दहा लक्ष प्रजेपैकीं अर्धी प्रजा टयूटन वंशापैकीं आहे. हंगारीची दोन कोटी दहा लक्ष प्रजा कांहीं कांहीं बाबतींत टयूटन प्रजेशीं सहानुकंपा बाळगणारी आहे. बाकी उरलेल्या प्रजेंत स्लाव आणि झेच या प्रमुख असून जर्मनाशीं त्यांचें हाडवैर आहे. याशिवाय इटालियन सरहद्दीजवळील ट्रेंटिनो व डालमेशिया या प्रांतांतल्या जोड राज्यांतील इटालियन प्रजा राहते. तिचा ओढा अर्थातच इटलीकडे आहे. अशा रीतीनें वस्तुतः विस्कळित असलेल्या या राज्याचे केव्हांच तुकडे होऊन जावयाचे; पण बादशहा दुसरे फ्रान्सीस जोसेफ यांच्या अस्तित्वामुळेंच तें अद्यापि टिकून राहिलें आहे. खुद्द या बादशाहाच्या कारकीर्दींतहि राज्याचीं शकलें होण्याचे प्रसंग आले नव्हते असें नाहीं.

मध्य युरोपांत होहेनझोलर्न आणि हॅप्सबर्ग हीं दोन प्रमुख राज-घराणीं आहेत. यांत होहेनझोलर्न घराणें पुष्कळ पुढें सरकलें असून दुसरें घराणें मागें पडलें आहे. १८६६ सालच्या साडावोच्या लढाईत हॅप्सबर्ग घराण्याचें राजकीय महत्त्व होहेनझोलर्न घराण्यानें बहुतेक नाम-शेषच केलें, असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं; पण लढाईनें या दोन घराण्यांतील वैमनस्याचा काळ संपून यांच्या मैत्रीस सुरुवात झाली. सांप्रत या दोन घराण्यांचीं साध्यें आणि आकांक्षा हीं जवळ जवळ एकजीव झालीं असून परस्पर परस्परांस वाटेल त्या बाबतींत सहाय्य देण्यास तयार आहेत. आस्ट्रियन राज्यावर जर्मनीचें वजन इतकें आहे,

कीं, जर्मनीच्या वाटेल त्या म्हणण्यास रुकार न भरणारा युवराज तेथें टिकूं शकत नाहीं.

आस्ट्रियन गादीचा वारस आर्च डयूक रूडोल्फ याचा उत्तर आस्ट्रियांतील मेअरलिंग गांवीं गुप्तपणें खून झाला. ही गोष्ट कशी घडली, याजबद्दल अनेकांनीं अनेक तर्क केले; पण खरीं कारणें केव्हांहि बाहेर पडलीं नाहींत. या बाबतींत विशेषसा पूसतपास झाला नाहीं. अथवा कांहीं धरपकडहि झाली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या राजपुत्राचा ऑटो या नांवाचा एक नौकर होता. राजपुत्राचा खून झाला, त्या वेळीं ऑटो तेथें हजर होता. आज मितीस न्यूयार्क शहरापासून ५०० मैल अंतरावर असलेल्या एका गांवीं तो अद्यापि जिवंत आहे. या ऑटोनें या खुनाच्या बाबतींत अद्यापि मूग गिळले आहेत. त्यानें तोंड उघडलें, तर काय चमत्कार बाहेर पडतील हें कोणीं सांगावें !

राजपुत्र रूडोल्फ हा जर्मनीचा मनापासून द्वेष्टा होता. आस्ट्रियावर जर्मनीचा ताबा दिवसेंदिवस वाढत आहे, या गोष्टीचा त्याला विषाद वाटत होता.

× × ×

क्यापटन फॉं ट्यापकेन यांना आज सांकेतिक भाषेंत एक तार आली होती. कांहीं इंग्रजी लष्करी अधिकारी बेलजमची पाहाणी करीत आहेत, असा मजकूर त्या तारेंत होता. ही पाहाणी कशाकरितां होती ? असा प्रश्न बर्लिनमध्यें उपस्थित झाला. याबरोबरच बेल्जममधून आणखीहि एक बातमी आली. लीज, नामूर वगैरे किल्ले नव्या साहित्यानें सज्ज केले जात असून याप्रीत्यर्थ सुमारें साडे बारा लाख रुपये खर्च होत आहेत, अशा अर्थाची ही बातमी होती. यापैकीं फक्त तृतियांश रक्कम मात्र बेलजम सरकारची असून बाकीची कोठून आली, हें कळण्यास मार्ग नव्हता. मग ही रक्कम प्यारागवेनें, ब्रेझिलनें अथवा दुसऱ्या कोणत्याहि देशानें दिली असेल.

हरजेगोविना आणि बासनिया या प्रांतांची पाहणी करण्याकरतां आस्ट्रियन युवराजांची स्वारी सपत्नीक आली. वास्तविक पाहतां या दोन

प्रांतांची स्थिति त्या वेळीं अत्यंत असमाधानकारक होती. अशा स्थित युवराजांच्या जाण्यास आस्ट्रियनसरकारनें व बादशहानें अनुमोदन क दिलें, हें समजणें कठिण आहे. यानंतर या भेटीचा शेवट क झाला, हें सर्व जगास विदित आहेच. आस्ट्रिया व सर्विया यांजमध्य तंटा विकोपास गेला.

सर्वियन सरकारला आस्ट्रियाचा निर्वाणीचा खलिता मिळाल्यापासू अठ्ठेचाळीस तासांनीं आस्ट्रियाच्या सरहद्दीवरील आपल्या सैन्यास तया राहण्याचा हुकूम झारकडून आला. हें काम इतक्या गुप्तपणें व शिताफी झालें कीं, तीक्ष्ण नजरेच्या जर्मन हेरांच्याहि तें लक्षांत आलें नाहीं केसर यांनीं झारला लिहिलेल्या खलित्यांत उत्तराकरतां फक्त चार दिवसांची मुदत दिली होती. कारण, त्या दिवसापासून चवथे दिवश रशियन सैन्याची तयारी पूर्ण होईल, अशी बातमी केसरला आगाउ लागली होती.

दक्षिणेकडे आणि पश्चिमेकडे राजकीय क्षितिज गढूळ दिसूं लागलें पूर्वेकडे थोडेथोडे ढग येऊं लागले. मधून मधून विजाहि चमकूं लागल्या वातावरण धुंद होऊं लागलें. ह्या आगामी वादळाची वाट पहात भय चकित होत्सातें सारें युरोप आ करून बसलें. आतां फक्त एक ठिणग पडण्याचाच अवकाश होता.

चालू युद्धाकरतां जर्मनीनें आपली तयारी किती विचारपूर्वक आणि सशास्त्र केली होती, हें आतां साऱ्या जगास कळून चुकलें आहे: तथापि कांहीं बाबतींत जर्मनीच्या मुत्सद्यांनीं विलक्षण घोडचुका केल्या आहेत युद्धशास्त्रविशारदांनीं आपलें काम जितकें काळजीपूर्वक आणि चोख केलें आहे, तितकें मुत्सद्यांनीं आपलें काम केलें नाहीं.

युद्ध सुरू झाल्यानंतर अमेरिकेंत जर्मनीबद्दल फारशी सहानुकपा आढ- ळून आली नाहीं. इतकेंच नव्हे, तर कांहीं बाबतींत पूर्ण उदासीनताच दिसून आली. अमेरिकन लोक होतां होईतों दुसऱ्यांच्या भानगडींत पडत नाहींत. तसेंच त्यांच्या घरच्या कारभारांत दुसऱ्या कोणी तोंड घातलेलें त्यांना खपत नाहीं. इंग्लंडाबद्दलहि अमेरिकन लोकांच्या मनांत मोठें



आहे, असें नाहीं. असें असतांहि त्यांचा कल इंग्लंडकडे अधिक ळलेला दिसला. या वस्तुस्थितीचें मुख्य कारण होहेनझोलार्न घराण्याचा मानी स्वभाव हें होय. प्रजासत्ताक राज्यें त्यांच्या दृष्टीनें तुच्छशीं सतात. सारीं राजघराणीं परमेश्वरनिर्मित आहेत, असा त्यांचा पक्का ज असल्यामुळें राज्य करण्याचा हक्क फक्त राजकुलोत्पन्न पुरुषांसच आहे, व जगाची अबाधित सत्ता राजघराण्याकडेच चालली पाहिजे. त्यांस वाटतें. स्पॅनिश-अमेरिकन युद्धाच्या वेळीं वुइलियम बाद- चा विशेष ओढा स्पेनकडे दिसून आला, त्याचें कारण हेंच. त्या जर्मनीबद्दल अमेरिकन लोकांच्या मनांत जी तेढ उत्पन्न झाली, ती पीहि पूर्ण नाहींशी झालेली नाहीं. स्पॅनिश-अमेरिकन युद्धानंतर पली चूक सुधारण्याचा प्रयत्न वुइलियम बादशहानें केला. प्रशियाचे न्स हेनरी हे अमेरिकेस भेट देण्याकरितां गेले, त्यांतील इंगित हेंच. पलें उद्दिष्ट प्रिन्स हेनरी यांनीं उत्तम प्रकारें सिद्धीस नेलें, यांत शंका हीं. आपला राजकुलीनत्त्वाचा उच्चपणा क्षणभर बाजूस ठेवून अमेरि- तील सामान्य जनसमूहाशींहि ते अगदीं सलोख्यानें वागले. यामुळें यांची बरीचशी अढी नष्ट होऊन अमेरिका व जर्मनी यांचे संबंध लोख्याचे होण्याच्या मार्गास लागले.

या भेटींत कांहीं राजकीय हेतु नव्हता ही गोष्ट खरी; तथापि आपल्या हमींच्या पद्धतीस अनुसरून या प्रसंगाचा फायदा जर्मनीनें आपल्या शेष पद्धतीनें करून घेतला. प्रिन्सबरोबर असलेल्या लवाजम्यांत अनेक यांचे तज्ञ असून त्यांनीं पुष्कळ प्रकारची उपयुक्त माहिती गोळा केली.

अमेरिकेंत असलेल्या कांहीं जर्मन संस्थांनीं प्रिन्सला मेजवानी दिली त्या वेळीं आपापल्या संस्थांचे सभासद प्रिन्सच्या नजरेस पडण्याची वस्था केली होती. लष्करी वाद्यांची सलामी घेत प्रिन्स उभे असतां यांजसमोर हे सभासद चालत गेले. अखेरचा मनुष्य प्रिन्स समोरून घून गेल्यानंतर प्रिन्सच्या तैनातींतल्या एका मनुष्यानें झटकन् आपले ड्याळ खिशांतून बाहेर काढून म्हटलें, “ सत्याण्णव मिनिटें सरकार. ” च दुसरा एक कामगार म्हणाला, “ ६६,५०० . ”

ज्या ज्या शहरीं आणि गांवीं प्रिन्सची स्वारी गेली, त्या सर्व ठिकाणीं या प्रकाराची उजळणी झाली. या मोजदादींत पंचवीस आणि चाळीस या वयाच्या दरम्यान असलेल्या जर्मन अमेरिकन पुरुषांची संख्या ३,००,०२० असल्याचें बाहेर आलें आहे.

अमेरिकेच्या बाबतींत जर्मन मुत्सद्यांनीं अनेक चुका केल्या असल्या, तरी अमेरिकेच्या लष्करी बाबतींत जर्मन जनरल स्टाफनें मात्र कोणतीहि चूक केलेली नाहीं. अमेरिकेच्या लष्करी बळासंबंधीं अनेक प्रकारची माहिती जनरल स्टाफच्या दप्तरांत नमूद केलेली आहे. ही माहिती सर्व दृष्टींनीं इतकी परिपूर्ण आहे, कीं, खुद्द अमेरिकन अधिकाऱ्यांसहि ती नसेल. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत असलेल्या जर्मन प्रजेची जर्मनींत ठेवलेली नोंद खुद्द वाशिंगटन येथील खानेसुमारीच्या नोंदीपेक्षांहि अधिक विश्वसनीय आहे. या नोंदीप्रमाणे अमेरिकेंतील एकंदर जर्मन प्रजेची संख्या १,३४,७६,००० असून यांपैकीं ३१,६०,००० खुद्द जर्मनींत जन्मलेले आहेत. यांत २,८५,००० हजार लष्करी शिक्षण घेतलेले लोक असून ते जर्मनीच्या राखून ठेवलेल्या सैन्यापैकीं आहेत. जर्मनी व अमेरिका यांजमध्यें कदाचित् युद्ध उपस्थित झालें, तर या आंकड्यांचा विचार करणें अमेरिकन सरकारास भाग पडेल.

× × ×

अमेरिकन लोकांत स्वतःबद्दल सहानुकंपा उत्पन्न करण्याचा इंग्लंडनें बराच प्रयत्न केला आणि त्यांत त्यास यशहि आलें. या बाबींत इंग्लंडच्या वर्तमानपत्रांनीं बरीच महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. याशिवायइंग्लंडांतील सरदारघराण्यांचे जे शरीरसंबंध अमेरिकन घराण्यांशीं झाले आहेत, तेहि इंग्लंडबद्दल स्नेहभाव उत्पन्न करण्यास कारणीभूत झाले आहेत. संयुक्त संस्थानास आवडणार नाहीं, अशा प्रकारची कोणतीहि ढवळाढवळ इंग्लंडनें कधींहि केली नाहीं. या परिस्थितीचा फायदा इंग्लंडास सध्यां मिळत आहे. युद्धसामुग्रीच्या बाबतींत अमेरिकेचें सहाय्य किती मोठें आहे, हें सर्वांस ठाऊक आहेच.

**संपूर्ण.**

IRBK-0100195

१९५
चरित्र

IRBK-0100195